सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)

पृ.शी. : 2002 पासून अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे.

मु.शी. : 2002 पासून अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे या विषयावर सर्वश्री.विनोद तावडे, दिवाकर रावते,पांडुरंग फुंडकर,रामदास कदम, जयंत प्र. पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्री.सुमंतराव गायकवाड, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे,सर्वश्री. भाई गिरकर, रामनाथ मोते,ॲड.आशिष शेलार,डॉ.रणजित पाटील, ॲड.अनिल परब,श्री.भगवान साळंखे,वि.प.स. यांचा प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

तालिका सभापती : माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार येत आहेत.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सभापती आल्यानंतर माननीय मंत्री महोदय सदनामध्ये कसे येतात, हे बरोबर नाही.

सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

याठिकाणी आदिवासी विभागावर बोलत असताना मला एक गोष्ट शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. ज्या गरीब आदिवासींच्या नावाने गेली 60 वर्षामध्ये अब्जावधी रुपयांची खरेदी झाली आणि अनेक योजना राबविल्या गेल्या. त्या विकासाच्या गंगेमध्ये आदिवासी का न्हाऊन निघाले नाहीत, त्यांची लंगोटी आज देखील का गेली नाही? 60 वर्षानंतर देखील आदिवासींची परिस्थिती "जैसे थे" असेल तर आपण आदिवासी विभागामध्ये जो पैसा खर्च केला, तो सगळा विकासाचा पैसे कुठे गेला? या महाराष्ट्रातील विषमता नष्ट होण्यासाठी आणखी किती वर्षे लागणार आहेत हा प्रश्न आहे. याचा खुलासा शासनाकडून होणे अत्यंत आवश्यक आणि गरजेचे आहे. 13 डिसेंबर 1946 रोजी घटना समितीमध्ये राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचा ठराव मांडताना पंडीत ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

जवाहरलाल नेहरु यांनी आदिवासींसह सर्व कमकुवत घटकांच्या हक्काचे संरक्षण करण्यास राज्य घटना कटीबध्द असल्याबाबत निर्वाळा दिला. त्याचे काय झाले? आज आपण कुठे आहोत? राज्य घटनेनुसार 1946 साली जेव्हा आम्ही आदिवासींच्या हक्काचे संरक्षण करणार असे सांगितले आणि आज आपण कोणत्या वर्षामध्ये आहोत.

सभापती महोदय, प्रत्येक वर्षी आपण अथर्संकल्प सादर करतो. आदिवासींच्या नावाने निधी ठेवतो. पण तो निधी नेमका कुठे जातो हा प्रश्न आहे. आदिवासींचा विकास का होत नाही? आदिवासींमधील विषमता नष्ट होण्यासाठी आणखी किती वर्षे लागणार आहेत हे देखील शासना-कडून स्पष्ट झाले पाहिजे असे माझे म्हणणे आहे. 1993-94 मध्ये सुखटणकर समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली.त्यानुसार काही अंशी निधी देण्यात आला. ही शिफारस करुन 17 वर्षाचा कालावधी उलटून गेला. या 17 वर्षामध्ये आदिवासींच्या लोकसंख्येप्रमाणात दिलेला निधी खर्च होऊन त्यांच्या जीवनामानामध्ये काय फरक पडला याची माहिती जर शासनाच्या उत्तरातून मिळाली तर मी त्यांचा अत्यंत आभारी राहीन. मला कळले पाहिजे की, शासनाने सुखटणकर समितीच्या निर्णयाप्रमाणे मागील 17 वर्षामध्ये आदिवासींसाठी निधी दिला काय आणि तो किती शिल्लक आहे?

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

दिला नसेल तर किती निधी देणे बाकी आहे याची माहिती मंत्री महोदयांनी दिली पाहिजे.

सभापती महोदय, या समितीने दिलेल्या निर्णयाप्रमाणे मागील सतरा वर्षात आदिवासी विकास विभागाचे 18 हजार 239 कोटी रुपये अन्य कामांसाठी वळविण्यात आले. हा सर्व निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळविण्यात आला असे मी म्हणणार नाही. परंतु हा निधी कोठे खर्च झाला हे आम्हाला समजले पाहिजे. आम्ही कोकणातील सिंचनासाठी निधी मागितला तर शासन लगेच माननीय राज्यपालांच्या निर्देशाकडे बोट दाखवून सांगते की, माननीय राज्यपालांच्या आदेशाप्रमाणे वाटप होईल त्याप्रमाणे निधी देण्यात येईल.

सभापती महोदय, आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीचे वाटप होते. त्याप्रमाणे 18 हजार 239 कोटी रुपये कोणाच्या घशात, कोणाच्या खिशात, कोणाच्या भागात गेले याची माहिती दिली पाहिजे. राज्यात आदिवासींची लोकसंख्या 84 लाख 86 हजार इतकी आहे. त्यातील 80 टक्के आदिवासी आजही दारिद्र्य रेषेखाली आहेत. प्रगतशील महाराष्ट्रातील 80 टक्के आदिवासी आजही दारिद्रय रेषेखाली असेल तर राज्यात नेमका विकास कोणाचा झालेला आहे ? जिसकी लाठी उसकी भैंस असा प्रकार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात दर दिवशी 2 लाख 30 हजार आदिवासी बालकांचा जन्म होतो. त्यातील 22 हजार अर्भकांचा प्रत्येक दिवशी मृत्यू होत आहे. प्रगतशील महाराष्ट्रात हे घडत आहे. आपण कुपोषण थांबवू शकलो नाही. आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्या देखील थांबवू शकलो नाही. तसेच कुपोषणामुळे होणारे आदिवासी मुलांचे मृत्यू आपण थांबवू शकलो नाही. या संदर्भात उत्तर देताना आकडेवारीची कसरत करुन कुपोष्ण कमी होत आहे असे सभागृहात सांगायचे.

सभापती महोदय, या ठिकाणी आदिवासी विकास विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत. त्यांना सभागृहात उपस्थित राहण्याची आवश्यकता वाटत नाही. सभागृहातील कामापेक्षा त्यांचेकडे महत्वाचे काम असेल. आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांची माननीय सामाजिक न्याय मंत्री नोंद घेत आहेत. आपण सर्व विभाग सांभाळणार आहात काय ? आदिवासी विकास विभागाचे मंत्री काल देखील सभागृहात उपस्थित नव्हते. शासन सर्व बाबतीच उदासीन आहे. आपल्या विभागावर विरोधी पक्ष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

चर्चा करीत आहे, तेव्हा सभागृहात येऊन विरोधी पक्षातील सदस्य काय बोलत आहेत हे ऐकावे. परंतु तसे काही घडत नाही. आम्ही काही बोललो तर त्यांना ते झोंबते असे त्यांचे वागणे असते. मग तुम्ही आम्हाला का बोलता, मग आम्ही महापौरांबद्दल बोलतो, महानगरपालिकेबाबत बोलतो.

सभापती महोदय, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक असा एकच कायदा आहे. आदिवासीसाठी वेगळा कायदा करण्याची भूमिका सरकार केव्हा घेणार आहे ? आदिवासी कल्याण मंत्रालयाच्या म्हणण्याप्रमाणे हा कायदा आदिवासींच्या अत्याचाराबाबत प्रतिबंध करण्यास किंवा आदिवासींना न्याय देण्यास अत्यंत अपुरा आहे. हे माझे म्हणणे नाही तर केंद्र शासनाचे म्हणणे आहे. तेव्हा शासन वेगळा कायदा केव्हा करणार आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात दिली तर ते अधिक चांगले होईल.

सभापती महोदय, आपणास बेल वाजविण्याची संधी द्यायची नाही असे मी ठरविले आहे म्हणून मी माझे भाषण आटोपते घेणार आहे.

सभापती महोदय, आदिवासींसाठी स्वतंत्र शिक्षण आयुक्तालय स्थापन करुन त्याचे मुख्य केंद्र नाशिक येथे होणार होते. त्याबाबत पुढे काय झाले ? कारण आदिवासींसाठी शासनाकडे निधी नसेल. या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात खुलासा केल्यास आमच्या ज्ञानात थोडी भर पडेल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

आज आदिवासी विकास विभागामध्ये तब्बल 60 टक्के पदे रिक्त आहेत. अशा परिस्थितीत आदिवासींचा विकास कसा होईल, त्यांना न्याय कसा मिळेल ? आदिवासी विकास विभागातील भरतीसंदर्भात मी अनेक वेळा सभागृहात मुद्दा उपस्थित केला. परंतु त्या अनुषंगाने कसलीही कार्यवाही केली गेली नाही. या माध्यमातून आदिवासींना विविध विकास योजनांपासून उपेक्षित ठेवण्याचे पाप शासन करीत नाही काय ? एकप्रकारे या राज्य सरकारने आदिवासींचा विकास ठप्प करुन ठेवला आहे. ठराविक कालावधीपर्यंत आदिवासी विकास विभागातील किमान 90 टक्के भरती प्रक्रिया पूर्ण केली जाईल हे माननीय मंत्र्यांनी स्पष्ट केले पाहिजे.

महोदय, राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाने 2008 मध्ये मागासवर्गीय उद्योजकांच्या विकासासाठी एक योजना तयार केली होती. त्यानुसार मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थाना 7 कोटी रुपयापर्यंत कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय घेतला हा कर्ज पुरवठा दोन टप्प्यांमध्ये केला जाणार होता. योजना तयार झाल्यानंतर 372 सहकारी संस्थांना कर्जाचे वाटप करण्यात आले. मी माहितीच्या अधिकारात ज्या संस्थांना कर्ज पुरवठा केला त्याची यादी मिळविली आहे. त्या यादीतील बहुतेक संस्था राजकीय नेत्यांशी संलग्न आहेत. महोदय, आश्चर्याची बाब अशी की, 372 औद्योगिक सहकारी संस्थांपैकी केवळ 70 संस्था दुसरा हप्ता घेण्यासाठी पुढे आल्या. याचाच अर्थ उर्वरित संस्था या योजनेंतर्गत पहिला हप्ता घेऊन मोकळ्या झाल्या. त्यांनी कोणतेही काम केले नाही. एकप्रकारे या योजनेचा पैसा लाटण्याचे काम त्यांनी केले. महोदय, मी या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला तिन्ही अधिवेशनात, आम्ही त्या संस्थांना नोटीस दिली आहे, हेच उत्तर देण्यात आले. महोदय, या मध्ये माननीय मंत्र्यांच्या बोगस संस्था आहेत असे मी समजू का ? नसेल तर, आपण या संस्था चालकांना पाठीशी का घालत आहात ? वास्तविक पाहता हा पैसा गरीब माणसांचा आणि मागासवर्गीय बेरोजगार तरुणांचा होता. त्यांच्या हाताला काम देण्यासाठी आणि त्यांचे संसार उभे करण्यासाठी हा पैसा द्यावयाचा होता. परंतु ते उद्दिष्ट साध्य झाले नाही. मागासवर्गीय बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी शासनाचा पैसा राजकीय पुढारी लाटणार असतील किंवा कुंपणच शेत खाणार असेल तर या बाबतचा सकारात्मक निर्णय कोणी घ्यायचा हे या ठिकाणी स्पष्ट झाले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभापती महोदय, व्यावसायिक प्रशिक्षण योजनेत आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय कुटुंबातील मुलांना संगणक, नर्सिंग, टेलिफोन ऑपरेटर, आयटीआय इत्यादिंचे प्रशिक्षण घेण्यासाठी दरमहा 100 रुपये विद्या वेतन दिले जाते. हे विद्या वेतन फारच तुटपुंजे आहे. प्रवासामध्येच विद्यार्थ्यांचे विद्या वेतनाचे पैसा खर्च होतात. त्यामुळे या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या विद्या वेतनात आपण वाढ करणार आहात काय ?

महोदय, जात पडताळणी समित्यांचा विषय फार गंभीर आहे. या समित्यांच्या कार्यपध्दतीत राज्य सरकार बदल करणार आहे की नाही ? आज जात पडताळणी समित्यांकडे अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी अनेक उमेदवार जात पडताळणी समित्यांकडे हेलपाटे घालत आहेत. त्यामुळे उमेदवारांना विनाविलंब जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भातील राज्य सरकार निर्णय घेणार आहे की नाही ?

महोदय, कोकणातील सिंचनाच्या बाबतीत राज्य सरकार निर्णय घेणार आहे की नाही, कोकणातील सिंचन प्रकल्पांना निधी देणार आहात की नाही ? आमच्या कोयनेचे 67 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळते. गेल्या 45 वर्षांपासून ते पाणी अडविण्यात आलेले नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, वाहून जाणारे पाणी अडवून कोकणातील लोकांना आपण न्याय देणार आहात की नाही ?

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदय, आदिवासीसाठी 20 कोटी रुपयांच्या गहू आणि तांदळाची खरेदी 70 कोटी रुपयांमध्ये केली. त्या संदर्भात उच्च न्यायालयात जे प्रतिज्ञापत्र दिले होते त्याचाही अवमान करण्याचे काम आदिवासी विभागामध्ये झालेले आहे. 50 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार गहू आणि तांदळाच्या खरेदीमध्ये झालेला आहे याची चौकशी करणार का ?

सभापती महोदय, पावसाळ्यामध्ये आदिवासींच्या हाताला काम नसते त्यामुळे त्यांना दरवर्षी खावटी कर्ज देतो. या खावटी कर्जामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करण्याचे काम झाले आहे. 2011-2012 मध्ये 4 लाख लाभार्थ्यांसाठी 120 कोटी रुपयांच्या अन्नधान्याची खरेदी झाली. 2012-2013 मध्ये 1 लाख 80 हजार आदिवासींसाठी 60 कोटी रुपयांच्या अन्नधान्याची खरेदी झाली. या खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला. पावसाळ्यामध्ये आदिवासींच्या हाताला काम नसते म्हणून खावटीची खरेदी केली जाते पण या खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार तर झालाच पण या खावटीची खरेदी केल्यानंतर पावसाळा संपल्यावर आदिवासींना खावटीचे वाटप केले. ज्या दुप्पट भावाने खावटीची खरेदी केली त्या भावाने आदिवासींकडून खावटीची वसुली करावी लागणार आहे. कारण आदिवासींना जे खावटी कर्ज दिले जाते त्याची वसुली होते. त्यामुळे अशा पध्दतीने आदिवासींना देखील लुटण्याचे काम या शासनाकडून होत आहे.

सभापती महोदय, आदिवासी मुलांच्या नाईट ड्रेसमध्ये देखील भ्रष्टाचार झालेला आहे. 6 कोटी रुपयांची खरेदी करण्याचा अंदाज ठेवला होता पण आदिवासी विभागाने जाहीर केलेल्या निविदेमध्ये नाईट ड्रेससाठी अपेक्षित खर्च 6 कोटी 9 लाख रुपये असताना 18 कोटी रुपयांची खरेदी झाली. या नाईट ड्रेसच्या 18 कोटीच्या खरेदीमध्ये डबल पैसे दिले गेले. माझ्याकडे बाजारभाव आहे पण वेळ कमी असल्यामुळे मी ते सांगत नाही.

सभापती महोदय, कुपोषणाला आळा घालण्यासाठी 11 कोटी रुपयांचे लिक्विड प्रोटीन निविदा न मागविताच खरेदी करण्यात आले. त्या बाबतच्या चौकशीचे काय झाले हे आतापर्यंत समोर आलेले नाही. ते समोर आले पाहिजे. आश्रमशाळांकरिता चटई खरेदीसाठी 6 कोटी 30 लाख रुपये मंजूर झाले. 300 रुपयांची चटई एक हजार रुपयांना खरेदी केली. त्याची चौकशी होणार आहे का ? गॅस सिलेंडरची बाजारातील किंमत 500 ते 800 रुपये असताना 1400

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

रुपयामध्ये खरेदी झाली. याची चौकशी होईल का ? 8500 कृषी पंपांच्या खरेदीसाठी प्रत्येकी 15 हजार रुपये किंमत असताना 19 हजार रुपयेप्रमाणे खरेदी झाली. याची चौकशी होणार का ? 300 रुपयांच्या चटईसाठी 1500 रुपये दिले गेले. त्याची चौकशी होईल का ? राज्यातील अंगणवाडीतील 43 लाख बालके, गरोदर आणि स्तनदा मातांसाठी पूरक पोषण आहार देण्यासाठी वार्षिक सुमारे 550 कोटी रुपयांचा जो निधी दिला जातो त्यामध्ये देखील मोठ्या प्रमाणामध्ये भ्रष्टाचार झाला आहे. त्याची चौकशी होईल का ? एका बाजूला मोठ्या प्रमाणामध्ये आदिवासींचे पैसे दिले जात नाहीत आणि दुसऱ्या बाजूला आदिवासींच्या पैशामध्ये अशा पध्दतीने खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करुन आदिवासींचा विकास थांबविला जातो. आदिवासी विभागामध्ये 60 टक्के अधिकारी, कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्या रिक्त पदांच्या बाबतीत सभागृहामध्ये आश्वासन देऊनही त्या रिक्त जागा भरल्या गेलेल्या नाहीत. त्या जागा कधी भरणार ? यासर्व बाबतीत माननीय मंत्र्यांकडून उत्तर मिळावे.

जलसंधारणाच्या कामांच्या बाबतीत कोकणासाठी जोपर्यंत आपण लघुपाटबंधाऱ्यांचे निकष बदलत नाही तोपर्यंत कोकणाचा विकास होणार नाही. कोकणातील लघुपाटबंधाऱ्यांच्या योजना आर्थिक मापदंडामध्ये बसत नाहीत. 59 योजना पूर्ण झाल्यास जवळजवळ 113.80 द.ल. लीटर पाणीसाठा निर्माण होऊ शकतो आणि त्या व्दारे कोकणातील 9616 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकेल. म्हणून लघुपाटबंधारे योजनांच्या बाबतीत कोकणात आर्थिक मापदंड वाढविले तरच खऱ्या अर्थाने कोकणाला न्याय मिळेल. तेथील योजना आर्थिक मापदंडात बसत नसल्यामुळे गेल्या 14 वर्षात कोकणात एकही पाझर तलाव झाला नाही. या सर्व पाटबंधारे योजना ठप्प झालेल्या आहेत.

सभापती महोदय, कोकणासाठी वैधानिक विकास मंडळ तत्काळ निर्माण करावे. केळकर समिती रद्द करावी. कोकणातील सिंचनामध्ये झालेल्या घोटाळ्याबाबत सीबीआय चौकशी व्हावी अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर भाष्य करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचे आभार मानतो. सामाजिक न्यायावर आधारित, कोकणातील सिंचन व पर्यटन या विषयावर त्यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे. महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, दलितांचे कैवारी, भारतरत्न प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाची घटना लिहिली आहे. लोकशाही ही केवळ राज्यपध्दती नसून ती एक जीवन प्रणाली आहे. लोकशाही व्यवस्था अर्थपूर्ण करुन समाजातील सर्व घटकांना मग ते दुर्बल घटकातील अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी मधील असोत. ज्यांना पिढ्यान्पिढ्या समाजातील मुख्य प्रवाहामध्ये येता आले नाही. शासनाच्या कोणत्याही सुविधा मिळाल्या नाहीत, फायदा झालेला नाही अशा समाजाला न्याय देण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहिली. त्या घटनेच्याच आधारे सामाजिक न्यायाची प्रस्थापना झालेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्री आणि अर्थ मंत्री श्री.अजित पवार यांनी सन 2013-2014 या वर्षाचा राज्याचा अर्थसंकल्प मांडलेला आहे. हा अर्थसंकल्प वाचला, तपासला व अभ्यासला तर तो सामाजिक न्यायावर आधारित आहे. सर्व पक्षांच्या निवडणुकीच्या जाहिरनाम्यामध्ये मग शिवसेना पक्ष असेल, भारतीय जनता पक्ष असेल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल, काँग्रेस पक्ष असेल या सर्व पक्षांचा जाहिरनामा हा सामाजिक न्यायावर आधारित असतो. राष्ट्रवादी पक्षाने सनद जाहीर केली होती आणि काँग्रेस पक्षाने सामाजिक वर्ष साजरे केले होते. त्यामध्ये 105 सूचींचा समावेश केला. या सूचींची माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांनाही माहिती आहे. या सूचींची आम्ही वेळोवेळी चाचपणी केलेली आहे. त्यानुसार या सूचीतील 74 टक्के कामे झालेली आहेत. तथापि, ओबीसीच्या विद्यार्थ्यांना अद्यापी शिष्यवृत्तीचे वितरण झालेले नाही. दलित वस्ती सुधारणा या कार्यक्रमांतर्गत देण्यात येणारा निधी गावाच्या दलित वस्तीमध्ये वापरला जात नाही. इंदिरा गांधी आवास योजनेंतर्गत बेघरांना घरे देण्याची योजना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

श्री.सुभाष चव्हाण.....

राबविताना अनेक गावांमध्ये लाभार्थी मिळत नाहीत असे सांगितले जाते. त्यामुळे हा निधी परत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या योजनेची व्याप्ती वाढवून दलितांना घरे देण्याबरोबरच ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गावठाणामध्ये दुकाने बांधण्याची परवानगी द्यावी. त्यांना घरे देता येत नसतील तर एस.टी.स्टॅण्डच्या बाजूलाच दुकान बांधून दिले तर ते तेथे राहूही शकतील अशी मी सूचना करीत आहे.

सभापती महोदय, या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये 2.2 टक्के म्हणजे 4487.68 कोटी रुपये अनुसूचित जातीच्या लोकांसाठी राखून ठेवलेले आहेत. त्याचप्रमाणे संपूर्ण अर्थसंकल्पाच्या 8.9 टक्के इतके म्हणजे 4187.48 कोटी रुपये आदिवासींच्या विकासासाठी राखून ठेवलेले आहेत. देशातील एकमेव महाराष्ट्र राज्य आहे की, या राज्यात दलितांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दिला जातो. या वेळी या समाजासाठी राखून ठेवलेला आहे. तो निधी कृपया अन्यत्र वळवू नये अथवा त्याला स्पर्श करु नये अशी विनंती मी माननीय अर्थ मंत्र्यांना करु इच्छितो. मला खात्री आहे की, मंत्री महोदय दलितांच्या विकासासाठी हा संपूर्ण निधी वापरतील.

सभापती महोदय, अनुसूचित जातीमध्ये 45 लाख 5 हजार पुरुषांची संख्या आहे आणि 42 लाख 52 हजार 667 स्त्रियांची संख्या आहे. मला सभागृहाच्या मुद्दाम लक्षात आणून द्यावयाचे आहे की, शासनाने साक्षरतेचे प्रमाण 73 टक्के गृहित धरलेले आहे. परंतु निरक्षरांमध्ये जास्तीत जास्त अनुसूचित जाती व जमातीच्या स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. या समाजातील स्त्रियाच शिक्षित झाल्या नाही तर त्यांची मुले शिक्षित कशी होणार ? मागासवर्गीयांची मुले शिक्षणाच्या बाबतीत पाठीमागे का आहेत हे एक कारण आहे. एक स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. कुटुंबातील आई हे एक विद्यापीठ आहे असे आपण म्हणतो. त्या विद्यापीठाकडेच आपण दुर्लक्ष करतो.

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री. सुभाष चव्हाण...

तळागाळातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, आदिवासी यांच्यामध्ये परिवर्तन झाले पाहिजे. ई-स्कॉलरशीप, संगणकप्रणालीचा अवलंब करुन 2010-2011 पासून महाविद्यालयाच्या बँक खात्यामध्ये शालांत परीक्षेतर शिष्यवृत्ती व परीक्षा शुल्काची रक्कम परस्पर जमा करण्यात येते. भारत सरकारने 2010-2011 पासून शिष्यवृत्ती व निर्वाहभत्त्यामध्ये वाढ केलेली असून पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा 1 लाख रु. वरुन 2 लाख रु. केलेली आहे. ई-जात प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री असताना परदेशामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी दलितांच्या 25 मुलांना पाठविण्याचा निर्णय घेतलेला होता. आता ही संख्या 75 पर्यंत वाढविण्यात आलेली आहे ही अतिशय अभिनंदनीय बाब आहे. या समाजासाठी भारत सरकारच्या असंख्य शिष्यवृत्त्या आणि निधी दिला जातो. राज्याला केन्द्र सरकारकडून जेवढा निधी येतो त्याचा हिस्सा राज्य शासन वेळेत दिला जात नाही. राज्य सरकारकडून केन्द्राकडे वेळेत प्रस्ताव पाठविले जात नाहीत. हे सर्व प्रस्ताव 30 डिसेंबरच्या आत गेले पाहिजेत. आपले प्रस्ताव डिसेंबर महिन्यामध्ये जातात. त्यामुळे केन्द्र शासनाचा निधी लॅप्स होण्याची शक्यता असते. केरळ, कर्नाटक, बिहार, उत्तर प्रदेश ही राज्ये केन्द्राचा निधी मिळविण्यात अग्रेसर राहिली आहेत. केन्द्राचा निधी मिळण्याकरिता वेळेत प्रस्ताव पाठविण्यासंबंधी सचिव स्तरावर एक समिती स्थापन करण्यात यावी.

सभापती महोदय, आपण मागासवर्गीय औद्योगिक संस्था, सहकारी संस्था काढलेल्या आहेत. या संस्थांना 1:9 या प्रमाणे भागभांडवल दिले जाते. जातीवर आधारित एकाच समाजाला सवलत न देता सर्व जाती, उपजाती याचा समावेश त्यामध्ये होईल याची दक्षता घेतली पाहिजे. हा क्रांतीकारक निर्णय होईल. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी सर्व महामंडळांना भरभरुन निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सर्व मागासवर्गीय महामंडळाची कर्जे माफ केलेली आहेत. चालू`वर्षी अर्थसंकल्पात भरीव भागभांडवलाची तरतूद केलेली आहे. काही महामंडळाना दुप्पट तर काही महामंडळांना चारपट, पाचपट भागभांडवल दिलेले आहे. मात्र चर्मोद्योग विकास महामंडळ हे सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित आहे. या चर्मोद्योग विकास महामंडळाच्या भागभांडवलामध्ये वाढ करावी. समाजाचे लोक उद्योगपती झाले पाहिजेत. जोपर्यंत औद्योगिक क्रांती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

होत नाही तोपर्यंत जातीवर आधारित विषमता नष्ट होणार नाही. बुटांचे, चपलांचे स्टॉल्स लंडन अमेरिकेमध्ये आहेत. ते या समाजातील आपल्या लोकांचे झाले पाहिजेत. कोल्हापूरी चपलांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ आहे. ती या समाजाला प्राप्त झाली पाहिजे व त्यादृष्टीने प्रयत्न करणे हे या विभागाचे काम आहे.

सभापती महोदय, इंदू मिलच्या 12.5 एकर जमिनीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक करण्याचा क्रातिकारक निर्णय माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी घेतलेला आहे. या निर्णयामुळे दलित आणि दलितेतर जनता आनंदित झालेली आहे. इंदू मिलची 12.5 एकर जागा मिळविण्यासाठी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख, औचित्याचे मुद्दे अशा विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून प्रयत्न केलेले आहेत. आता केवळ प्राधिकरण स्थापन करण्याचे शिल्लक राहिलेले आहे. सचिवांची सुकाणू समिती स्थापन केलेली आहे. प्राधिकरणाची स्थापना लवकरात लवकर करुन माननीय मुख्यमंत्र्यांना त्या प्राधिकरणाचे अध्यक्ष करावे, माननीय उपमुख्यमंत्र्यांना देखील त्या प्राधिकरणावर घ्यावे आणि सभागृहातील लोकप्रतिनिधींचा देखील समावेश करावा. (अडथळा) माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार हे काम करण्यामध्ये क्रांतिकारक आहेत. आम्ही लोकप्रतिनिधींनी त्यांना काम सांगितले तर ते झटपट काम करतात.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीची नाही

श्री.सुभाष चव्हाण....

सभापती महोदय, कोकणामध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो, परंतु पावसाचे पाणी वाहून समुद्राला जाऊन मिळते. कोकणी माणूस कायम तहानलेला राहिला आहे. सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नाही. कोकणातील जमीन ओलिताखाली आलेली नाही. सिंचनाचा सर्वात जास्त अनुशेष कोकणामध्ये पहावयास मिळतो. कोकणाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने तीन वेळा पॅकेज जाहीर केले. कोकण सिंचनाच्या योजना तयार केल्या, परंतु योजना केवळ कागदोपत्री राहिल्या आहेत. कोकणातील सिंचनाचा अभ्यास करण्यासाठी चितळे समिती नेमली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालाची अद्याप अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. ही बाब लक्षात घेऊन कोकणातील सिंचनासाठी स्वतंत्र अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, कोकणातील पर्यटनाला चालना देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. पर्यटनाच्या दृष्टीने कोकणातील समुद्र किनारे व अन्य पायाभूत क्षेत्रांचा विकास करणे आवश्यक आहे. नव्याने केलेल्या सर्व्हेनुसार 897 कि.मी.चा समुद्र किनारा कोकणाला लाभलेला आहे. कोकणचा कॅलिफोर्निया करण्याचा महाराष्ट्र शासनाचा संकल्प आहे. संपूर्ण देशात सिंधुदुर्ग हा एकमेव जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे. या जिल्हयातील मौ.तोंडवळी, ता.मालवण येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा 'सी वर्ल्ड' हा जागतिक प्रकल्प उभा रहात आहे. या प्रकल्पाबाबत मी यापूर्वी विवेचन केले होते. हा सी वर्ल्ड प्रकल्प उभा करण्यासाठी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी 250 कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. त्यातील 100 कोटी रुपये भूसंपादनासाठी राखून ठेवलेले आहेत. हा प्रकल्प 7 महासागरांची प्रतिकृती आहे. स्वर्गाचे प्रतिबिंब, मोठमोठे बर्फाचे डोंगर, रिसॉर्ट, हॉटेल्स, रेस्टॉरन्ट यांचा समावेश असलेला जागतिक प्रकल्प कोकणात उभा रहात आहे.

सभापती महोदय, कोकण रेल्वे प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे कोकणी माणसाचे स्वप्न साकार झाले आहे. चिपी येथे विमानतळ उभारण्यात येत आहे. माननीय श्री.नारायण राणे हे उद्योग मंत्री झाल्यानंतर एमआयडीसीच्या माध्यमातून चिपी येथे विमानतळ उभारण्याच्या कामाला त्यांनी चालना दिली आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. चिपी येथे विमानतळ आणि तोंडवळी येथील सी वर्ल्ड प्रकल्पामुळे गावागावांमधील अंतर कमी होण्यास मदत होणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

सभापती महोदय, मी नेहमी माझ्या धामापूर गावाचा उल्लेख करतो. धामापूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जून्या कालव्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी 15 कोटी रुपयांची तरतूद केली. परंतु गेली 2 वर्षे मी 92 कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प सादर केला होता, त्याचा सतत पाठपुरावा करीत आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने ज्या काही शिफारशी केल्या आहेत त्यामुळे भारत सरकारच्या आयटीडीसीने औरंगाबाद, सोलापूर, अक्कलकोट व नाशिक येथील पर्यटन स्थळासाठी 171 कोटी रुपयांची तरतूद केली. आतापर्यंत भारत सरकारकडून 178 कोटी रुपये प्राप्त झाले. परंतु कोकणासाठी भारत सरकारकडून एक दमडीही मिळाली नाही. धामापूर येथील 92 कोटी रुपयांचा प्रकल्प सादर केला आहे. केंद्रीय पर्यटनमंत्री श्री.चिरंजीवी यांच्याकडेही पाठपुरावा केला होता. ज्या विभागाचा नेता प्रभावी आणि पॉवरफूल आहे त्या भागासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध होतो असा माझा अनुभव आहे. म्हणून मागासवर्गीय वर्गासाठी निधीची जास्तीत जास्त उपलब्धता करुन द्यावी एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आज अधिवेशनाच्या कामकाजाचा शेवटचा दिवस आहे. सभागृहाच्या विशेष बैठकीमध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. ही चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणासह दुपारी 12.15 वाजेपर्यंत पूर्ण करावयाची आहे. मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सकाळी 11.30 वाजता सुरु होईल. अजूनही 9 माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. त्यामुळे माननीय सदस्यांनी 5-5 मिनिटात आपले विचार मांडले तर सर्वांना न्याय देता येईल, त्या दृष्टीने माननीय सदस्यांनी मला सहकार्य करावे.

नंतर एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला असून त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर जे विचार व्यक्त केलेले आहेत त्यासंदर्भातील माहिती सर्व वर्तमानपत्रात छापून आलेली आहे. महाराष्ट्र शासनावर ॲट्रॉसीटी ॲक्ट लावला जावा अशा बातम्या छापून आलेल्या आहेत. सन 2002 पासून दलितांचे 7 हजार कोटी रुपये दलितांच्या योजनेवर खर्च केले नाहीत, हे पैसे इतरत्र वळविण्यात आलेले आहेत अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, ॲट्रॉसीटीच्या संदर्भात संपूर्ण देशात महाराष्ट्र आघाडीवर आहे. केवळ 5.5 टक्के दोषी व्यक्तींना ॲट्रॉसीटी ॲक्ट खाली शिक्षा झालेली आहे. ॲट्रॉसीटीच्या संदर्भातील जी समिती आहे ती सुध्दा या विषयावर गंभीर नाही. महाराष्ट्रामध्ये दलित अत्याचाराचा मोठा विषय असल्यामुळे मी ॲट्रॉसीटीवर जास्त बोलणार नाही. बिहारपेक्षा महाराष्ट्रात दलितांवर जास्त अन्याय, अत्याचार होत आहेत याबाबतचे माझ्याकडे पुरावे आहेत.

सभापती महोदय, माझे सन्माननीय मित्र, दलित चळवळीचे कार्यकर्ते ॲड. जयदेव गायकवाड साहेब म्हणाले होते की, या राज्याचा अर्थसंकल्प चांगला आहे, राज्याचा विकास चांगला झाली आहे. ते पुढे असेही म्हणाले की, "केवळ दलितांच्या योजनेसाठी तरतूद केली नाही, या मंडळात भ्रष्टाचार झाले, घोटाळे झाले असे सांगून काहीही होणार नाही". मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, स्वातंत्र्यानंतरच्या 65 वर्षामध्ये दलितांच्या योजना योग्य पध्दतीने राबविल्या गेल्या असत्या तर आज दलितांची जी दुरवस्था आहे ती राहिली नसती. दलितांचा नोकरीमधील, शिक्षणातील जो अनुशेष आहे तो त्या त्या वेळेत भरला गेला असता तर आज दलितांवर अशी परिस्थिती आली नसती. केवळ मुंबईमध्ये जातीभेद मानला जात नाही परंतु ज्यावेळेस आपण वाडया वस्त्यावर जातो तेथे दलितांची आजची अवस्था काय आहे हे आपल्याला दिसून येते. दलितांच्या अन्याय, अत्याचाराच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा करण्यापेक्षा विकासाच्या संदर्भात पाऊल उचलले गेले तर ते अधिक योग्य होईल. दलितांच्या हक्काचा जो निधी आहे तो योग्य प्रकारे वापरला असता, त्या निधीमध्ये घोटाळे झाले नसते तर दलितांचा खऱ्या अर्थाने विकास झाला असता व हा समाज इतर समाजाच्या बरोबर आला असता. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर .....

सभापती महोदय, "या राज्यामध्ये दलित सुरक्षित आहेत काय ? देश स्वतंत्र असल्याचा काहीच फायदा दलितांना झाला नाही", सत्तेत दलित समाजाचा महत्वपूर्ण वाटा असतांना दलित समाजाच्या प्रश्नाकडे सरकार गंभीरतेने बघत नाही त्यामुळे या राज्यात दलित सुरक्षित आहेत काय ?" असा प्रश्न उपस्थित करुन या संदर्भात मंत्री मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्याचा आग्रह माननीय दुग्धविकास मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी उचलून धरला अशी बातमी वर्तमानपत्रात छापून आलेली आहे.

सभापती महोदय, "दलित महिला अत्याचारावरुन काँग्रेस मंत्र्यांचा आबांवर हल्ला"असा मथळा वर्तमानपत्रात छापून आलेला आहे. दलित तसेच दलित महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनावरुन काँग्रेसच्या मंत्र्यांनी बुधवारी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना चांगलेच धारेवर धरले. "राज्यात दलितांच्या हत्या आणि महिलांच्या अब्रूवर घाला घालून हत्त्या केल्या जात असल्याने या वर्गामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. गृहखाते दलितांना सुरक्षा देण्यामध्ये अपयशी ठरले" असल्याचा आरोप रोजगार हमी योजना माननीय मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केलेला आहे. माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे तसेच माननीय महिला व बालकल्याण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी राज्यमंत्री मंडळाच्या बैठकीत यासंदर्भात उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, या मंत्री महोदयांना या समाजाबद्दल सहानुभूती आहे परंतु त्यांना जो अनुभव आलेला आहे तो अनुभव त्यांनी मंत्री मंडळाच्या बैठकीत व्यक्त केलेला आहे. या राज्याचे मंत्रीच सांगतात की, "स्वातंत्र्य मिळून 65 वर्षे झाली परंतु या 65 वर्षात दलितांना फायदा झाला नाही".

यानंतर श्री. भारवि.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

दलित महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण देखील खूप आहे. माननीय मंत्रीच माननीय गृहमंत्र्यांना मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये धारेवर धरतात. मागासवर्गीयांचे हाल बेहाल हे मी म्हणत नाही, तर एका मान्यवर वर्तमानपत्रात यासंबंधातील बातमी आली आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, वर्तमानपत्रात चुकीच्या बातम्या येतात. वर्तमानपत्रातील बातम्या ह्या कोट केलेल्या असतात. मंत्रिमंडळातील चर्चा ही गोपनीय असते. मंत्रिमंडळामध्ये अशा प्रकारची चर्चा होत नाही, असे कोणीही बोलत नाही.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मागासवर्गीयांचे हाल-बेहाल, घर नाही, रोजगार नाही, साधी सायकलही नाही, 17 टक्के भारतीय टीव्ही, मोबाईल पासून दूर या संबंधातील आकडेवारी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दिल्यामुळे ती मी येथे देत नाही.

महात्मा फुले मागासवर्ग महामंडळामध्ये गैरव्यवहार झाला आहे. तो विषय देखील माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडला. माझ्याकडे त्यासंबंधातील सगळे पुरावे आहेत. मी त्याबद्दल बोलत नाही. शासकीय वसतिगृह उभारणीमध्ये देखील अनियमितता झाली आहे. साडेपाच हजार विद्यार्थी लाभा पासून वंचित आहेत. समाजकल्याण विभागात टेंडर घोटाळा झाला आहे. समाजकल्याण विभागत चाललेल्या भ्रष्टाचारासंबंधातील माहिती माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दिली आहे. हा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी देखील मांडला आहे. ई-टेंडरमध्ये देखील घोटाळा आहे. अधिकारी व ठेकेदाराच्या संगनमताने होणाऱ्या भ्रष्टाचाराला प्रतिबंध बसावा यासाठी सरकारने ई-टेंडरींग पद्धती सुरू केली. मर्जीतील ठेकेदाराव्यतिरिक्त इतर कोणीही भाग घेऊ नये यासाठी निविदेत जाचक अटी घालण्यात आल्या. आपल्याच लोकांना टेंडर देऊन येथे सुद्धा भ्रष्टाचार करण्यात आला.

सभापती महोदय, उपोषण करून काहीच होईना म्हणून विद्यार्थ्यांनी स्वत:ला कोंडून घेऊन आंदोलन केले. पिण्यासाठी पाणी नाही, स्वच्छतागृहाची स्वच्छता होत नाही. प्रत्येक युनिटचे सुपरवायझर येत नाहीत. सुरक्षा रक्षक नाहीत. ग्रंथालय, व्यायामशाळा नाही. सोलरसिस्टीम असून ती बंद अवस्थेत आहे. अनेक ठिकाणी बांधकाम कोसळलेले आहे. पिण्याचे पाणी 3 कि.मी.वरून आणावे लागते. स्वयंपाक घरात अंधार असतो. अशी स्थिती वसतिगृहांची असल्यामुळे विद्यार्थ्यांची दूरवस्था होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

समाजकल्याण विभागामार्फत घेण्यात येणारी दलित विकास कामे रखडली आहेत. त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी केला आहे. ज्या घोटाळ्याचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे व माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी केला आहे तो मी करत नाही.

अण्णाभाऊ साठे महामंडळाचे अध्यक्ष थकीतदार आहेत. थकितदाराला बँकेचा डायरेक्टर वगैर काहीच होता येत नाही. या महामंडळाचा अध्यक्ष स्वत:च थकितदार आहे. या महाभागाने काय काय केले हे मी 2-3 मिनिटातच सांगणार आहे. मूळात या अध्यक्षांची नेमणूकच नियमबाह्य आहे. त्यांच्याकडे रूपये 7 लाख रकमेची थकबाकी आहे. तसेच, त्यांनी आई-वडील व इतर नातेवाईकांच्या नावे 35 ते 40 लाख रूपयांचे कर्ज घेतले असून ते कर्ज पूर्णपणे थकीत आहे. या अध्यक्षांसाठी वर्षापूर्वी स्वीफ्ट कार खरेदी करण्यात आली होती. असे असताना त्यांच्यासाठी 15 लाख रूपये किंमतीची होंडासिटी खरेदी करण्यात आली. सध्या ते हे वाहन वापरत आहेत. अण्णाभाऊ साठे महामंडळावर अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्या बरोबर या अध्यक्षांनी या महामंडळामध्ये रोजंदारीवर असलेल्या श्रीमती वैशाली मंडवाळे यांना वर्ग-2 च्या पदावर थेट नियुक्ती दिली. या नियुक्तीसाठी त्यांनी शासनाची मान्यता घेतली नाही. त्यांनी सदर पद जाहिरात देऊन अथवा कॅटेगिरीच्या उमेदवाराची लेखी परीक्षा घेऊन भरलेले नाही. त्यामुळे नियमबाह्य पद्धतीने सेवेत सामावून घेतलेली नियुक्ती आपण रद्द करणार आहात काय ?

अध्यक्षांच्या कार्यकर्त्यांसाठी महामंडळामध्ये कोणतीही योजना नसताना देखील त्यांनी 2 लाख रूपयांचे वितरण केले आहे. जिल्हा व्यवस्थापनाने लेखी आदेश देण्याची विनंती केली असता थेट 2 लाख रूपयाचा बीज भांडवलाचा धनादेश देण्यास अध्यक्षांनी भाग पाडले आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.विजय गिरकर . . . .

सभापती महोदय, गेल्या पाच वर्षापासून त्यांनी महामंडळामार्फत जवळजवळ 300 ते 400 कर्ज प्रकरणे एनएसएफसी योजनेतून विविध कार्यकर्त्यांच्या नावे श्री.विजय कसबे यांच्या माध्यमातून नांदेड, औरंगाबाद, बीड, जालना, सोलापूर, ठाणे आणि मुंबई येथील केलेली आहेत आणि मी हे पुराव्यानिशी सांगत आहे. त्यांना फक्त 20 ते 50 हजार पर्यंत रक्कम दिलेली आहे आणि उर्वरित रक्कम अध्यक्षांनी घेतलेली आहे आणि जवळजवळ 200 कर्जदारांना त्यांनी सिध्दी एन्टरप्राईजेस फाऊंडेशनचे फॉर्म दिले आहेत.सदर कोटेशनच्या रकमेचे राहिलेले धनादेश महामंडळास देण्यास भाग पाडले. तसेच त्यांनी जवळपास 200 ते 275 लोकांकडून तुम्हाला कर्ज् देतो असे सांगून प्रत्येकी 25 हजार रुपये घेतलेले आहेत.संबंधित लोक पैशाच्या बाबतीत चौकशी करुन थकले आहेत आणि आता त्यांना दमदाटी करण्यात येत आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. एनएसएफडी ला व्याजासह परत केलेल्या रुपये 1 कोटी 2 लाख 42 हजार 100 चा तपशील सदरहू महामंडळाकडे उपलब्धच नाही अशी स्थिती आहे.एनएसएफडी कडून मिळालेला शिलकीच्या खातरजमेच्या वृत्ता-नुसार वर्षभरामध्ये महामंडळा कडून परत मिळालेली रक्कम रु.74 लाख 78 हजार 23 इतकी आहे. पण मंडळाने या रकमेचा मेळ घातलेला नाही असे लेखा परीक्षकाचे म्हणणे आहे.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे.

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण हे दरवेळी भाषण करताना पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याच्या बाबतीत निर्णय झाला आहे त्याबाबत शासनाला धन्यवाद देतात आणि मी देखील धन्यवाद देतो. दि. 6 डिसेंबर 2012 रोजी याबाबतीत घोषणा झाली. परंतु 14 एप्रिल 2013 पर्यंत सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी मुंबईच्या विकास आराखड्याच्या बाबतीत भाषण करताना सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी अजून साधी मान्यता किंवा सीआरझेड ची परवानगी देखील घेण्यात आलेली नाही. म्हणून मी येथे उद्वेगाने बोलतो की, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रामध्ये उभे करण्यासाठी ज्याप्रमाणे समुद्रामध्ये पहाणी करुन जागेचा शोध घेण्यात येत आहे, तसेच हे स्मारक उभे करण्यासाठी आणखी किती वर्षे लागणार आहेत हा प्रश्न आहे. तसेच सदरहू स्मारक उभे करण्याच्या बाबतीत अजून मंजुरी

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

घेण्यात आलेली नाही. तसेच यासाठी सी.आर.झेड.ची परवानगी घेतलेली नाही. शासन सदरहू परवानगी कधी घेणार आहे असा माझा प्रश्न आहे. आपण मला येथे बोलण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

. . . .जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 259 अन्वये विरोधी पक्षाने जो अंतिम आठवडा प्रस्ताव आणलेला आहे, त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, प्रस्तावाच्या पहिल्या भागाबद्दल मी याठिकाणी माझे विवेचन मांडणार नाही.कारण आमचे इतर सहकारी याबाबतीत निश्चितपणे आपली मते मांडतील. कोकण प्रदेश विकासाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष अशा स्वरुपात सुरुवात झालेला हा प्रस्ताव आहे. याठिकाणी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर असे वाटते की, कोकणामध्ये काहीच विकास झालेला नाही काय? कोकणातून गेली अनेक वर्षे जर मागची काही वर्षे सोडली तर तेथील लोकांचे प्रतिनिधीत्व विधान सभेमध्ये कोण करीत होते हे मला वेगळे सांगण्याची गरज वाटत नाही.

सभापती महोदय, याठिकाणी विकास झाला नाही असे म्हटले जाते. परंतु आज माझ्याकडे याबाबत आकडेवारी आहे.महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्याचे पर कॅपेटा इन्कम किती आहे तर मुंबईचे परकॅपेटा इन्कम 1,51,608, ठाण्याचे 1,40,000, रायगडचे 1,18,000 आणि रत्नागिरीचे 77,521, सिंधुदुर्ग 81, 201 इतके आहे. मी राज्यातील इतर जिल्ह्यांची आकडेवारी सांगत नाही. पण ज्यापध्दतीने कॉस्ट ऑफ लिव्हींग आहे त्या पध्दतीने मला वाटते की याठिकाणी जो पर कॅपेटा इन्कम आहे तो इतका मोठा आहे आणि याचाच अर्थ कोकणामध्ये निश्चितपणे प्रगती झालेली आहे. कोकणाच्या जनतेचे रहाणीमान ऊंचावलेले आहे आणि त्यांना वेगवेगळया योजनांचा लाभ निश्चितपणे मिळालेला आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . .. .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, आपण कोकणील जनतेला कॅलिफोर्नियाचे स्वप्न दाखविले. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी सांगितले की, आपणास कोकणाचा कॅलिफोर्निया करायचा आहे. माझे असे म्हणणे आहे की, कोकणाचा कॅलिफोर्निया करण्याची गरज नाही. कोकण हे कोकणासारखे राहिले पाहिजे. कोकणाची वास्तू कोकणच्या पध्दतीची राहू दे. कोकणाचे कोकणपण जपून विकास झाला पाहिजे. त्याचे कारण असे की, आपण तेथे विकासाच्या नावाखाली भरपूर हॉटेल्स, मोठमोठ्या इमारती बांधल्या तर कोकणतील चिरेबंदी वाडा, कौलारु घरे, ज्याचा उल्लेख आपण कवितांतून वाचतो तो राहणार नाही. निसर्गातील वस्तुंचा वापर करुन कोकणाचा ज्या पध्दतीने आधीच्या काळात विकास झाला त्याने ख-या अर्थाने कोकणाला कोकणपण दिले आहे आणि ते कोकणपण जपण्याची आज गरज आहे.

सभापती महोदय, या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अनेक आरोप केले. राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या योजना सामान्य जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम किती लोकप्रतिनिधींनी केले ? लोकप्रतिनिधी शासनाच्या वेगवेगळ्या योजनांची माहिती तेथील लोकांना करुन देणार नसतील, त्यांचे प्रबोधन करणार नसतील आणि योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणार नसतील तर कोकणातील जनतेचा विकास होत नाही असे म्हणण्याचा त्यांना अधिकार नाही.

सभापती महोदय, मी माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्याशी चर्चा करीत होतो. मी त्यांना सांगितले की, कोकणाला समुद्र किनारे लाभलेले आहेत. रायगड जिल्हा मुंबईपासून अगदी जवळ आहे. स्पीड बोटने प्रवास केला तर साधारणत: वीस मिनिटांत आपण् तेथे पोहोचतो. आपणास या किनाऱ्यांचा वापर पर्यटनासाठी चांगल्या पध्दतीने करावयाचा असेल तर हे समुद्र किनारे स्वच्छ ठेवले पाहिजेत.

सभापती महोदय, कोकणचा विकास कशा पध्दतीने करणार आहोत हे आपण ठरविले पाहिजे. कारण कोकणामध्ये उद्योग येत असतील तर त्याला विरोध केला जातो. धरणे बांधायची असतील तर जमिनी देण्यासाठी विरोध केला जातो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी येथे विमानतळ उभारण्यासाठी तीनपट जमीन घेण्यात आली. तसेच सी-वर्ल्ड

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

प्रकल्पासाठी 1400 एकर जमीन घेण्यात आली. एखादा प्रकल्प राबवावयाचा असेल तर पुढील 20-25 वर्षाचा विचार करुन जमिनी संपादित कराव्या लागतात. आज मुंबईतील एअर-पोर्टची काय परिस्थिती आहे ? आपण तेथे विस्तार करु शकत नसल्यामुळे पनवेल येथे एअर-पोर्ट करण्याचा विचार करीत आहोत. आज कोकणच्या सुर्देवाने तीन जिल्ह्यात एअर-पोर्ट आहेत. रत्नागिरी येथे एअर-पोर्ट आहे आणि दोन प्रस्तावित आहेत. रत्नागिरीचा एअर-पोर्ट कोस्टगार्डकडे दिला. कोस्टगार्डने त्या एअर-पोर्टच्या विस्ताराचे काम मोठ्या प्रमाणावर करावयास पाहिजे होते परंतु त्यांनी ते केलेले नाही त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. चिपीच्या एअर-पोर्टचे काम ज्या कंपनीला दिलेले आहे ते काम वेगाने पूर्ण झाले पाहिजे. कोकणातील तीन जिल्ह्यांमध्ये एअर-पोर्ट होणार आहेत. त्याचा लाभ कोकणातील जनतेला निश्चितपणे होणार आहे.

सभापती महोदय, कोकणात पर्यटन वाढवावयाचे असेल, कोकणचा विकास करायचा असेल तर तेथील समुद्रातील वाहतूक वाढण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने लक्ष दिले पाहिजे असे मला वाटते. मुंबई शहराच्या लगत असलेल्या मांडवा येथे बोटीने जायचे असेल तर त्यासाठी एक ते सव्वातास लागतो. त्या ठिकाणी वापरण्यात येणाऱ्या बोटी जुन्या व लाकडाच्या आहेत. या बोटींने आठ-दहा नॉटीकल प्रवासासाठी तास-सव्वातास लागणार असेल तर त्याचा फायदा जनतेला होणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

जल वाहतूक गतिमान झाली पाहिजे. ती नवीन युगाची असली पाहिजे, चांगल्या पध्दतीची असली पाहिजे, चांगल्या दर्जाची असली पाहिजे. चांगल्या दर्जाची जल वाहतूक देण्यासाठी जे कोणी पुढे येतील त्यांना राज्य सरकारने तातडीने परवानगी दिली पाहिजे. आज काही विशिष्ट लोकांच्याच हाती ही वाहतूक आहे. परंतु त्यांच्याकडून या वाहतुकीसंदर्भात काहीच केले जात नाही. जे जुने आहे तेच सुरु ठेवायचे आणि दुसरे नवीन काही द्यायचे नाही असा प्रकार सुरु आहे. त्यामुळे या बाबींना पायबंद घातला पाहिजे. राज्यामध्ये जे गतिमान बोटी आणतील त्यांना तातडीने परवानगी दिली पाहिजे. जेणेकरुन मुंबईच्या समुद्र किनाऱ्यालगत जे पर्यटक येतात त्यांना निश्चितपणे चांगल्या पध्दतीच्या सोयी-सवलती उपलब्ध करुन देता येतील. आज मुंबई लगत असलेल्या रायगडला फाईव्ह स्टार हॉटेल्स आहेत. गतिमान जल वाहतूक उपलब्ध करुन दिली तर अनेकांना त्याचा फायदा होईल.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम या ठिकाणी उपस्थित नाहीत. त्यांचे भाषण ऐकताना मला "कहीं पे निगाहें कहीं पे निशाना" असे वाटले. अपनी निगाहे भी एक ही जगह होनी चाहिएं और निशाना भी उसी जगह होना चाहिए. परंतु ती निगाहें कोकणाच्या विकासासाठी असली पाहिजेत. त्यांनी कोकणातील सिंचनाच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख केला. कोकणातील भौगोलिक परिस्थिती पाहिली तर तो डोंगर-दऱ्यांचा प्रदेश आहे. त्या प्रदेशामध्ये सपाट जमीन अभावानेच पहावयास मिळते. त्या भागात धरणे बांधली जात असताना विरोध होतो. मी या क्षेत्रातील तज्ज्ञ नाही. परंतु पावसाळ्यात डोंगर-दऱ्यांतून जे पाणी वाहून जाते ते पाणी 50-100 लाख रुपयांचे बंधारे बांधून अडवू शकलो तर पाण्याचा प्रश्न मिटू शकेल. कोकणातील पर्यटन वाढवावयाचे असेल, हॉटेल उद्योग वाढवावयाचा असेल तर भूगर्भातील पाणी काढून चालणार नाही. कारण त्या भूगर्भातील पाण्यात हार्डनेस ऑफ वॉटर इतके प्रचंड आहे की, ते पिण्यायोग्य नाही. त्यामुळे कोकणात पर्यटन वाढविण्यासाठी छोटे छोटे बंधारे बांधून ते पाणी पर्यटकांसाठी वापरले तर त्याचा फायदा होईल. त्यामुळे या दृष्टिकोनातून आपण विचार करुन, काम केले पाहिजे, असे मला वाटते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

महोदय, या ठिकाणी जल वाहतुकीचा उल्लेख करण्यात आला. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, जल वाहतूक यशस्वी नाही. कारण ब्रेक वॉटर स्प्रेड केले नाही तर जल वाहतूक 360 दिवस चालणार नाही. कोणताही प्रकल्प व्हायबल व्हावयाचा असेल तर तो प्रकल्प 360 दिवस चालला पाहिजे. 5-6 दिवस त्याला अपवाद असू शकतो.

महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी मांडवा येथील अर्ध्या किलोमीटरचे ब्रेक वॉटर करण्यासाठी 40 कोटी रुपये दिले आहेत. यासाठी त्यांचे मी अभिनंदन करतो.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

महोदय, कोकणातील फूड प्रोसेसिंगबाबत या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. कोकणात भरपूर फूड प्रोसेसिंग करु शकतो. परंतु त्याचे मार्केटींग कसे होऊ शकणार ? त्या भागात फूड प्रोसेसिंगचे उद्योग सुरु झाले, त्यासाठी शासनाने अनेक योजना सुरु केल्या, परंतु मार्केट अभावी ते उद्योग बंद पडले.

महोदय, कोकणातील सर्वात मोठा उद्योग मत्स्य व्यवसाय आहे. मत्स्य व्यवसायाच्या अनुषंगाने प्रोसेसिंग झाले पाहिजे. कारण या व्यवसायाला विदेशी मार्केट मोठ्या प्रमाणावर आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या या संदर्भात अनेक योजना आहेत. एमएमआरडीए च्या माध्यमातून शिवडी-न्हावा शेवा प्रकल्प होत आहे. तशाच प्रकारे कारंजा-रेवस पूल केला तर तो कोस्टल हायवे होऊ शकेल असा प्रकल्प केल्यास रायगड जिल्ह्याचे अंतर तीन तासांनी कमी होईल.

नंतर श्री.बरवड...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ....

सभापती महोदय, पैसे वापरले गेले नाहीत असा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. पर्यावरणाच्या दृष्टीने सीआरझेडचा विषय आहे. त्या संदर्भात सांगावयाचे तर सीआरझेडमध्ये रस्ते करावयाचे असतील तर त्यासाठी परवानगी घ्यावी लागते. आपल्याला टुरिझम वाढवावयाचे असेल तर सीआरझेडच्या बाबतीत राज्य सरकारने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. समुद्राकडे जाणारे ॲप्रोच रस्ते प्राधान्याने करण्याची आवश्यकता आहे. कारण त्यामुळे त्या ठिकाणी ज्या गाड्या येतील, जे विदेशी पर्यटक येतील त्यांना समुद्राकडे जाणे सोपे होईल.

सभापती महोदय, माझी राज्य सरकारला विनंती आहे, समुद्र किनाऱ्यावरील ज्या गावांचे किंवा ज्या ग्रामपंचायतीचे टाऊन प्लॅनिंग करण्याची आवश्यकता आहे अशी गावे आपण आयडेंटिफाय करा. त्या ठिकाणी हॉटेल्स कोठे असली पाहिजेत, सिवरेज ट्रिटमेंट प्लांट कोठे असले पाहिजेत याचे प्लानिंग केले पाहिजे. त्या ठिकाणी जर डेव्हलपमेंट झाले आणि सिवरेज ट्रिटमेंट प्लांट नसेल तर ते सर्व सिवरेज जमिनीमध्ये आणि समुद्रामध्ये जाणार आहे. म्हणून त्याचे सुध्दा प्लानिंग केले पाहिजे. पाच-पाच वर्षे आपण त्याचा विकास आराखडाच फायनल करणार नसाल तर पुढचे कामच होणार नाही. मग त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे होतात. मनाला वाटेल तशी बांधकामे केली जातात. एखादा प्लॉट विकत घेऊन हॉटेल बांधले जाते. त्यामुळे निश्चित प्लानिंग करुन धोरण आखणे आवश्यक आहे.

पहिल्या स्टेजमध्ये हे रस्ते झाले पाहिजेत. दुसऱ्या स्टेजमध्ये वेगवेगळ्या गावांचा विकास आराखडा फायनल झाला पाहिजे. राज्य सरकारने इन्फ्रास्ट्रक्चरवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्या ठिकाणी विजेची सोय असली पाहिजे. त्या ठिकाणी चांगल्या दर्जाचे पाणी मिळू शकेल अशी व्यवस्था केली पाहिजे. अशा प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्याचे काम जर राज्य सरकारने कले आणि त्या ठिकाणी पर्यटनासाठी येणाऱ्या वेगवेगळ्या लोकांना जर सुविधा पुरविण्याचे काम केले, त्या ठिकाणी वेगवेगळ्या योजना दिल्या तर चांगल्या पध्दतीने काम होऊ शकते. मागच्या वेळी आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी ज्या गतीने फलोद्यानची योजना आणून ज्या पध्दतीने कोकणातील जनतेला विकासाची एक नवीन दिशा आणि एक नवीन साधन उपलब्ध करुन दिले त्याच पध्दतीने पुढे घेऊन जाण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून होईल. पर्यावरणाचा समतोलराखत हे पर्यटन त्या ठिकाणी वाढेल तसेच कोकणाचे कोकणपण तसेच राहील असा मला विश्वास आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .....

माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी मला स्पष्टपणे सांगितले की, तुम्हाला हे समुद्र किनारे स्वच्छ करावयाचे असतील तर डीपीडीसीच्या माध्यमातून आमच्याकडे प्रस्ताव पाठवा, त्यावर निश्चितपणे विचार करुन तुम्हाला सहकार्य करु. आपण लोकप्रतिनिधींनी कोठे तरी यामध्ये पुढाकार घेतला पाहिजे. आपण आऊट ऑफ बॉक्स विचार केला पाहिजे. काय केले पाहिजे, कसे केले पाहिजे या बाबत आपण विचार केला पाहिजे. त्या कामासाठी जनतेमध्ये जागरुकता निर्माण करणे, त्यांचे सहकार्य घेऊन त्या माध्यमातून काम करणे अशा पध्दतीने आपण लोकप्रतिनिधींनी आपली जबाबदारी ओळखून काम केले तर पुन्हा विकास झाला नाही म्हणून अशा प्रकारचा प्रस्ताव आणण्याची वेळ येणार नाही.

माझी विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे आपण सर्वांनी या पध्दतीने काम करावे. राज्य सरकार हे कोणत्याही पक्षाचे नाही. ज्यावेळी निवडून येतो त्यावेळी पक्ष म्हणून निवडून येतो परंतु राज्य सरकार हे जनतेचे आहे. जनतेसाठी असलेल्या चांगल्या योजनेला निश्चितपणे सहकार्य मिळत असते. आपणही अनेक वेळा ते अनुभवले आहे. आपले सरकार असताना आम्ही अनेक वेळा अशा पध्दतीने कामे आणली. जे चांगले काम असेल, योग्य काम असेल त्याला सरकार सहकार्य करीत असते. लोकप्रतिनिधींनी जनतेला जागरुक करुन राज्य सरकारच्या योजना, केंद्र सरकारच्या योजना त्यांना समजावून सांगणे, त्यांना प्रोत्साहित करणे, त्यांना मार्गदर्शन करणे, या कामांची जबाबदारी आपण जर योग्य प्रकारे पार पाडली, कामांचा पाठपुरावा केला तर कोकणामध्ये आज जी गती आहे, आज जे 80 ते 85 हजार रुपये पर कॅपिटा इन्कम आहे, हे इन्कम मुंबईच्या तोलामोलाचे आहे त्यापेक्षाही पुढे जाऊ शकेल असा मला विश्वास आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

उप सभापती : या प्रस्तावावरील सदस्यांची भाषणे सकाळी 11.30 पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. त्यानंतर माननीय मंत्र्यांना उत्तरासाठी अर्धा तास लागेल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात मुद्देसूद बोलावे.

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सामाजिक न्याय व आदिवासी कल्याण या विषयाच्या संदर्भामध्ये जो प्रस्ताव आम्ही सभागृहामध्ये चर्चेसाठी सादर केलेला आहे त्यातील काही मुद्यांकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. पहिला भाग असा आहे की, दलितांवर ठिकठिकाणी जे अत्याचार होतात त्या संदर्भात शासनाची भूमिका अत्याचार वाढविण्याची आहे की कमी करण्याची आहे ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

गावामध्ये सलोखा निर्माण करण्याचा प्रश्न माझ्या मनामध्ये आहे.

काही दिवसांपूर्वी खैरलांजी येथे घटना झाल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की, त्या गावामध्ये दलितांच्या अत्याचारासंबंधी कमिट्या नेमल्या पाहिजे होत्या त्या कमिट्याच अनेक ठिकाणी नेमलेल्या नाहीत. काल देखील वाहिन्यांवरुन जालना जिल्ह्यातील एक उदाहरण समोर आलेले आहे. दैतागवाडी गावामध्ये पाण्याचे टँकर जात असताना त्या गावातील दलित महिलांना पाण्याच्या टँकरपर्यंत पोहोचता येत नाही. संपूर्ण गावामध्ये पाणी गेल्यानंतर त्यांच्याकडे टँकर जातात किंवा जात नाहीत. इतकेच नाही तर त्या महिलांना हेटाळणीचाही मुकाबला करावा लागतो. दुष्काळी सारख्या परिस्थितीत गावात सलोखा राहून पाण्याचे वाटप केले पाहिजे. यामध्ये खरा प्रश्न असा आहे की, दलितांच्या अत्याचारासंबंधी कमिट्या व्हावयास पाहिजे होत्या त्याची जबाबदारी महसूल विभागाची असते. त्या कमिट्या नेमल्याच जात नाही. आज कोणतेही गाव घ्यावे, तंटा झ ाल्यानंतरच निदर्शनास येते की, तंटामुक्तीच्या अध्यक्षांनीच मारहाण केलेली आहे किंवा गावामध्ये जातीयतेवरुन पूर्ण फूट पडलेली आहे. दलितांवर अत्याचार होऊ नयेत या दृष्टीकोनातून गावामध्ये सलोखा कसा वाढविता यासंबंधी शासनाचा कोणताही कार्यक्रम दिसत नाही.

सभापती महोदय, महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ, शाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ असेल या महामंडळांवर सरकारने सदस्यच नेमलेले नाहीत. अनेक लोकांना या महामंडळांवर काम करावयाचे आहे. या सरकारची आता 5 वर्षे पूर्ण होत आली आहेत. पुढील वर्षी निवडणुका होतील. त्यावेळी आपण सर्वजण निवडणुकीस सामोरे जाणार आहोत. सरकार साडेचार वर्षे महामंडळांवर सदस्यच नेमत नाही. 12 हजार कार्यकर्ते त्यात काही चांगले असतील काही वाईट असू शकतात, त्याबाबत वेगळी चर्चा होऊ शकते. पण या 12 हजार कार्यकर्त्यांना शासन संधीपासून वंचित ठेवत आहे असा त्याचा अर्थ होतो. शासनाने एकदा जाहीर तरी करावे की, या महामंडळांवर सदस्य नेमले जाणार नाहीत. या महामंडळांचे मंत्री, सचिव व संबंधित कर्मचारी वर्ग यांच्याच सहाय्याने आपण कारभार चालविणार आहोत का ? (अडथळा) सभापती महोदय, सभागृहात खाली बसून बोलले म्हणजे लोकांना कन्व्हीन्स केले आहे असे कोणी समजू

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

नये. अन्यथा वेगवेगळ्या समाजाला आरक्षण मिळावे असा विषय मांडावा लागला नसता, त्यांना आपोआपच न्याय मिळाला असता. जुन्नर तालुक्यातील आणे येथील भाऊसाहेब बोरा अपंग विद्यालय असेल, येवले येथील मांजरीवाडीचे समाजकल्याण विभागाचे वसतिगृह असेल याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. नाशिक येथील समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहाची दुरवस्था झ ाल्यामुळे त्या विद्यार्थ्यांनी स्वत:ला कोंडून घेऊन आंदोलन केले होते. पुण्यामध्ये 3 दिवसांपूर्वी समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहामध्ये अधिकाऱ्यांनी मुलांना कोंडले होते. ती मुले नक्षलवादी आहेत असा त्यांच्यावर आरोप करण्यात आलेला आहे. या विभागाला भरपूर पैसे देत आहोत असे म्हटले जाते. त्याचे मूल्यमापन व संनियंत्रण करण्यासाठी शासनाने लोकांना विश्वासात घेतले पाहिजे. त्यासाठी कमिट्या नेमणे आवश्यक होते त्या कमिट्याच निर्माण केलेल्या नाहीत.

सभापती महोदय, कालच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-2 या महामंडळाचा सन 2008-09 चा अहवाल सभागृहाला सादर करण्यात आलेला आहे. त्या अहवालातील मुद्दा क्रमांक 16 मध्ये असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, संशयित लाभार्थ्यांची कर्ज रक्कम 24 कोटी आहे. त्यात कंपन्यांकडून अप्राप्त रक्कम आहे ती 5 कोटी रुपये दाखविलेली आहे. या महामंडळात केवळ गैरव्यवस्थापनच आहे असे नाही तर या महामंडळामध्ये जो अधिकारी वर्ग बसलेला आहे त्यांना शिस्तीचा बडगा दाखविला जात नाही. त्यामुळे त्यांच्याकडून वेगवेगळ्या माध्यमातून भ्रष्टाचार केला जातो, त्याबाबतही त्यांच्याविरुध्द शिक्षा केली जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हाल होत राहतात. त्यामध्ये पराकोटीची उदाहरणे घडत राहतात. यासबंधी मी पुणे जिल्ह्यातील आणे येथील एक उदाहरण देईन. ती अपंग मुलांची विना अनुदानित शाळा आहे. सन्माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकडे मी निवेदन दिलेले आहे. त्या शाळेतील दोन्ही मुलींना मी भेटलेले आहे. त्या मुलींना स्वत: शिक्षकांनीच त्यांच्या घरी पोहोचविले आणि त्यांना असे सांगितले की, कोणतीही तक्रार करता कामा नये. त्या संस्थेचे प्राचार्य व शिपाई हे सर्वजण जेलमध्ये आहेत.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, बर्डी येथील आदिवासी आश्रमशाळेमध्ये एका मुलीवर अत्याचार झाल्यानंतर शासनाने तदर्थ समिती नेमली होती. त्या समितीने महाराष्ट्रभर दौरे करुन अहवालात शिफारशी केल्या होत्या. आज परिस्थिती अशी आहे की, आदिवासी आश्रमशाळा असोत, समाजकल्याण विभागाच्या शाळा किंवा वसतिगृह असोत, प्रत्येक ठिकाणी त्या विद्यार्थ्यांना जेवण मिळत नाही. शबरी विकास महामंडळामध्येच ताशेरे ओढलेले आहेत. त्यात असे नमूद केले आहे की, 30 ट्रक इतके धान्य पुरवठा व्हावयास पाहिजे होता त्याऐवजी केवळ 15 ट्रकच धान्याचा पुरवठा झालेला आहे. या अहवालात अशी शिफारशी केली आहे की, याबाबत कंत्राटदार दोषी आहेत. परंतु त्यांनाच संरक्षण दिले जात आहे. माननीय सामाजिक न्याय मंत्री वेगवेगळ्या शहरांमध्ये जाऊन घोषणा करीत असतात. त्या घोषणांपैकी किती घोषणांची अंमलबजावणी केली आहे त्याचा एक स्वतंत्र अहवाल तयार केला पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

त्याचा रिपोर्ट मागितला. त्या रिपोर्ट प्रमाणे काय कारवाई केली ? सभागृहामध्ये राजकीय भाषण करण्यापेक्षा कंत्राटदारावर काय कारवाई केली हे समजणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महार वतन जमिनीच्या संदर्भात मी थोडक्यात मुद्दा मांडते. आंबेडकरी चळवळ उभी राहिली. आपण नेहमी दलितांच्या हक्कासंबंधी या ठिकाणी बोलत असता. श्री. प्रकाश आंबेडकर, प्रा. जोगेंद्र कवाडे आणि श्री. रामदास आठवले यांना खासदार म्हणून आपण निवडून आणले नाही. महार वतनाच्या जमिनीचा अहवाल दिल्यानंतर त्या अहवालाचे थडगे केले आणि त्यावर राष्ट्रवादीचा झेंडा लावला. अभ्यास समितीच्या कोणत्या शिफारशी आपण अमलात आणल्या ? प्रत्येक ठिकाणी दलित समाजातील लोकांची पॉवर ऑफ ॲटर्नी घेऊन बिल्डर या महार वतनाच्या जमिनीवर बांधकाम करीत आहेत...

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये राष्ट्रवादी पक्षाचा उल्लेख केलेला आहे तो कृपया वगळण्यात यावा.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये पक्षाचा उल्लेख असेल तर तो वगळण्यात येईल.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मी दलितांच्या हक्कांच्या संदर्भात बोलत आहे. दलितांच्या प्रश्नासंबंधी या शासनाने कोणती अंमलबजावणी केली याचा स्टेटस रिपोर्ट येणे गरजेचे आहे. महार वतनाच्या जमिनीच्या संदर्भात समितीचा अहवाल सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना माहीत नसेल तर तो त्यांनी माहीत करुन घ्यावा. आंबेडकरी चळवळीतील प्रत्येक कार्यकर्त्याची या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा आहे...(अडथळा).. सभापती महोदय, वेळ कमी आहे याची मला जाणीव आहे. शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, आदिवासींच्या जमिनी हस्तांतरित न करण्यासंबंधीचा कायदा केला. बेदखल कुळांच्या संदर्भातील कायद्याची आज देखील अंमलबजावणी होत नाही ही वस्तुस्थिती आहे. माझी अशी सूचना आहे की, ज्या प्रमाणे आदिवासींच्या जमिनीच्या संदर्भात कायदा केलेला आहे त्याप्रमाणे महार वतन जमिनीच्या संदर्भात देखील कायदा करुन त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, विद्यार्थीनींच्या वसतिगृहाची देखरेख चांगल्या प्रकारे व्हावी यासाठी समाजकल्याण विभाग, महिला व बालविकास विभाग आणि आदिवासी विकास विभाग या तिन्ही विभागांची मिळून एक तदर्थ समिती नेमावी अशी माझी सूचना आहे. या तदर्थ समितीमुळे या विद्यार्थींनीच्या वसतिगृहावर, निवासी शाळांवर काही तरी वचक राहू शकेल. या संदर्भात मी आज नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना देखील दिलेली आहे.

सभापती महोदय, आम्हाला सर्वजण असे विचारतात की, तुम्ही कोकणाला काय दिले ? मी याबाबतीत आपणास सांगू इच्छिते की, माननीय साहेबांनी आणि कार्याध्यक्ष श्री. उद्धवजी ठाकरे यांनी कोकणाचा मुख्यमंत्री महाराष्ट्राला दिला. तुमच्यामध्ये हिंमत असेल तर तुम्ही ते करुन दाखवा. तुम्ही फक्त कोकणवासीयांची फसवणूक करीत आहात याकडे मी लक्ष वेधते आणि माझे भाषण संपविते.

--

...नंतर श्री. भोगले..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, काही प्रश्न रुपाने मी माझे मुद्दे मांडू इच्छितो. भारतीय संविधानाच्या आर्टिकल 15 आणि 16 तसेच डायरेक्टीव्ह प्रिन्सिपल्सच्या कलम 46 नुसार काही अधिकार निश्चित केलेले आहेत. आर्टिकल 15 नुसार सरकारला कायदे करण्यापासून कोणाला थांबविता येत नाही. आर्टिकल 16 नुसार सरकारने संधी निर्माण करुन दिली पाहिजे व डायरेक्टीव्ह प्रिन्सिपल्सच्या कलम 46 नुसार कोणी अधिकाराचा भंग केला तर त्याच्यावर कारवाई करण्याची तरतूद आहे. सरकारने या तीनही बाबत सामाजिक न्यायाच्या दृष्टीने सर्वकष धोरण आखल्याचे चित्र दिसत नाही. याबद्दल सरकारने स्पष्टीकरण द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, 12 व्या प्लॅनमध्ये एस.सी.साठी स्ट्रॅटेजी करण्याचे आवाहन केंद्र सरकारने सर्व राज्य सरकारांना केले आहे. त्यानुसार राज्य सरकारने प्रतिपूर्ती केलेली नाही, या संदर्भात सरकारने सभागृहात निवेदन केले पाहिजे. महाराष्ट्र सरकारने सब प्लॅन नक्की केला आहे. परंतु आंध्रप्रदेश सरकारने 2013 मध्ये जो कायदा केला, असा कोणता कायदा महाराष्ट्र सरकार करणार आहे काय याचे स्पष्टीकरण सरकारने दिले पाहिजे. सब प्लॅनची महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी नाही. गुजरात सरकारने सब प्लॅनची अंमलबजावणी करण्यासाठी हाय पॉवर समिती स्थापन केली. त्या समितीचे अध्यक्षपद मुख्यमंत्र्यांनी स्वत: स्वीकारुन काम सुरु केले आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री स्वत:च्या अध्यक्षतेखाली हाय पॉवर समिती स्थापन करुन कामाला सुरुवात करणार आहेत का याचे स्पष्टीकरण सभागृहाला दिले पाहिजे.

सभापती महोदय, ओबीसी विद्यार्थ्यांची 1100 कोटी रुपयांची शिष्यवृत्ती प्रलंबित आहे. केंद्र सरकारची 1998-99 ची योजना राज्य सरकारने 2003 मध्ये लागू केली. ओबीसी विद्यार्थ्यांना त्यांच्या शिष्यवृत्तीचे 1100 कोटी रुपये कधी दिले जाणार आहेत याचे स्पष्टीकरण सरकारने द्यावे.

सभापती महोदय, जिल्हा शाळा फंड दिला जातो. ठाणे जिल्हयाची 8 कोटी रुपयांची मागणी असताना राज्य सरकारने 2 कोटी रुपये मंजूर केले. त्यापैकी प्रत्यक्ष 1.56 कोटी रुपये दिले गेले. जिल्हा परिषदेला कमी मिळणाऱ्या निधीसंबंधी राज्य सरकार कोणती भूमिका घेणार आहे हे सभागृहाला कळले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार.....

सभापती महोदय, सिव्हिल राईट ॲक्टखाली काही गोष्टींची तरतूद करणे आवश्यक आहे. स्पेशल कोर्ट, स्पेशल पोलीस ठाणे स्थापन करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्रात याची अंमलबजावणी झालेली नाही. सिव्हिल राईट ॲक्टनुसार स्पेशल कोर्ट आणि स्पेशल पोलीस ठाणे कधी स्थापन करणार आहात याचे स्पष्टीकरण सभागृहाला दिले पाहिजे. कोर्टात प्रलंबित खटल्यांची संख्या 1544 असली तरी महाराष्ट्रात 744 आहे. इतक्या मोठया प्रमाणात केसेस प्रलंबित आहेत. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने सरकार काय करणार आहे याचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी द्यावे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण हे अतिशय मोठे आहे. जालना जिल्हयात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे सातवी इयत्तेतून आठवी इयत्तेत जाताना गळतीचे प्रमाण 12 टक्के आहे. त्याच पध्दतीने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण 11 टक्के आहे. सातवी इयत्तेतून आठवी इयत्तेत जाताना विद्यार्थ्यांची गळती होत असेल तर सरकारने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून कोणता निर्णय घेणार आहात हे सभागृहात स्पष्ट केले पाहिजे.

सभापती महोदय, आपण सर्वजण नेहमी अपग्रेडेशनबद्दल बोलत असतो. एक हेक्टरपेक्षा कमी जागा असलेले अनुसूचित जमातीमध्ये 86 टक्के लोक आहेत. गुरचरण जागांचा वाद आहे. अन्य गायरान जागा अनुसूचित जमातीच्या लोकांना दिली जाईल का या संदर्भात सरकारने भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या आस्थापनेमध्ये अनुसूचित जातीचा अनुशेष 24779 पदांचा असून अनुसूचित जमातीचा 30010 पदांचा अनुशेष आहे. केंद्र सरकारी नोकऱ्यांचा अनुशेष कसा भरण्यात येणार आहे याबद्दल सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून सरकारने भूमिका स्पष्ट केली पाहिजे. सभापती महोदय, 4 एप्रिल, 2013 रोजी मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिले की, आरटीईनुसार अनुसूचित जाती आणि जमातीच्या प्रत्येक विद्यार्थ्यामागे 10000 रुपये खाजगी अनएडेड शाळांना देणे बंधनकारक आहे. सरकारने याकरिता तरतूद केली आहे का? याबाबत सरकारची भूमिका काय आहे हे स्पष्ट करण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, राज्य सरकारच्या आस्थापनेतील राखीव जागांचा अनुशेष कसा भरण्यात येणार आहे या संदर्भात सर्वंकष भूमिका सरकारने स्पष्ट केलेली नाही. याबाबत मंत्री महोदयांनी सभागृहाला स्पष्टीकरण द्यावे, अशी मी विनंती करतो. सुदैवाने अनुसूचित जाती जमातीमधील स्त्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार.....

पुरुषांचे प्रमाण पाहिले तर महाराष्ट्रात जनरल महिलांचे प्रमाण 922 असले तरी अनुसूचित जातीमध्ये हे प्रमाण 952 इतके आहे. बाय बर्थ हा समाज विचार करीत आहे त्याबद्दल इन्सेटिव्ह देण्यासाठी सरकार कोणता निर्णय घेणार आहे याबाबत भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

या ठिकाणी मी केवळ प्रश्न रुपाने काही मुद्दे मांडले आहेत. त्याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

नंतर क्यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मागासवर्गीय जनतेच्या संदर्भात जो अतिंम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, फुले, शाहू व आंबेडकरांच्या विचाराने पुरोगामी महाराष्ट्राची स्वप्न साकारत आघाडी सरकार या राज्यामध्ये काम करीत आहे. या सभागृहाचे नेते, अर्थमंत्री तसेच या राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेबांनी हा अर्थसंकल्प मांडला आहे. या राज्यावर नैसर्गिक दुष्काळाची तीव्र छाया असतांना लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटमध्ये नियोजन करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील एकमेव पहिले राज्य आहे. या राज्यावर कितीही आर्थिक किंवा नैसर्गिक संकटे आली तरी सुध्दा फुले, शाहू व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होऊन काम करणाऱ्या या सरकारने मागासवर्गीयांच्या विकासास निधीला कोणत्याही प्रकारची कात्री लावली नाही. या बजेटमध्ये अनुसूचित जातीसाठी 5 हजार कोटी रुपये व अनुसूचित जमातीसाठी 4 हजार कोटी रुपये राखून ठेवणारे महाराष्ट्र राज्य हे एकमेव पुरोगामी राज्य आहे. पुरोगामी महाराष्ट्राची परंपरा या शासनाने सुध्दा सुरु ठेवलेली आहे ही अभिमानास्पद बाब आहे.

सभापती महोदय, पूर्वीच्या काळात दलितांना अस्पृश्य म्हणून हेटाळणी केली जात होती. परंतु यासंदर्भात 1935 मध्ये कायदा करण्यात आला व या कायद्यानुसार दलित वर्गाला अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करण्यात आले. भारत देश अनेक जाती धर्माने तयार झालेला आहे. जगामध्ये मागासवर्गीयांच्या बाबतीत जी हेटाळणी होत असते त्यांच्यापेक्षा किती तरी हाल या भारत देशात होत असील असे जगाला वाटत होते परंतु भारतामध्ये 1935 च्या कायद्यानंतर परिस्थिती हळूहळू बदलत गेली.

सभापती महोदय, छत्रपती शाहू महाराजांनी 104 वर्षापूर्वी आरक्षणाची सुरुवात केली होती. छत्रपती शाहू महाराजांनी कांबळे यांना कोल्हापूरमध्ये एक हॉटेल घेऊन दिले होते. कांबळे दलित असल्यामुळे त्यांच्या हॉटेलमध्ये कोणीही चहा पिण्यासाठी जात नव्हते. परंतु छत्रपती शाहू महाराज रोज कांबळे यांच्या हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी जात होते. शाहू, फुले व आंबेडकरांच्या विचाराने काम करणारे हे सरकार आज सुध्दा दलित समाजाच्या विकासासाठी काम करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे.....

सभापती महोदय, शैक्षणिक, सामाजिक व औद्योगिक क्षेत्रामध्ये समाविष्ट असणारा बहुतांशी नवबौध्द समाज, मातंग समाज, चर्मकार समाज व बाकीचे जे काही मागासवर्गीय बांधव आहेत यांच्या विकासासाठी विविध योजना शासनाच्या माध्यमातून राबविल्या जात आहेत. या वर्गाला आरक्षण दिल्यामुळे हा समाज पुढारलेल्या समाजाच्या बरोबर येत असल्याचे चित्र दिसून येत आहे. दलित समाजामध्ये आता डॉक्टर, इंजिनियर, कलेक्टर, मुख्य सचिव होऊ लागले आहेत. या वर्गातूनच या राज्याचे मुख्यमंत्री झालेले आहेत एवढेच नाही तर या देशाचे राष्ट्रपती सुध्दा या समाजातूनच झालेले आहे आणि हे सर्व आरक्षणामुळे झालेले आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, ही सर्वसामान्य जनता आहे. आजही आपल्या राज्यात एस.सी., एस.टी., व्हीजेएनटी यांचा अनुशेष बाकी आहे. तो लवकरात लवकर भरला पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसने मागासवर्गीयांचा मेळावा घेतला होता. आम्ही एक सनद शासनाला सादर केली आहे. त्यात अर्थ खात्याचा भाग होता. सन्माननीय अर्थ मंत्री श्री.अजित पवार यांनी क्षणाचाही विचार न करता 310 कोटी रूपये महात्मा जोतिबा फुले महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, चर्मकार महामंडळ यांना वाटून दिलेले आहेत. वाल्मिकी समाज हा छोटा आहे. त्यांना सुद्धा 10 कोटी रूपये दिलेले आहेत. मी जास्त काही बोलणार नाही. पण मानसिकता बदलण्याची आवश्यकता नाही. आज समाजामध्ये वैचारिक परिवर्तन घडविण्याची आवश्यकता आहे. जो पर्यंत या वर्गाला आपण आपला समजत नाही, जो पर्यंत त्यांच्या मनातून आपल्याला वेगळे समजले जाते ही भावना दूर करू शकत नाही तो पर्यंत आपण यशस्वी झालो असे म्हणता येणार नाही.

मी आपल्याला याचे उदाहरण देणार आहे. मी प्रा.नरेंद्र जाधव यांची टीव्हीवर मुलाखत पाहिली. अमेरिकेमध्ये ते इंडियन स्टुडंटचे नेतृत्व करीत होते. एक जण त्यांना भारतीय प्रोफेसरकडे घेऊन गेले आणि सांगितले की, हे प्रा.नरेंद्र जाधव आहेत. यांना जर आपली शिफारस मिळाली तर अमेरिकेतील शिष्यवृत्ती मिळेल. त्या माणसाने सांगितले की, नंतर बघतो आणि जाण्यास सांगितले. ते जात असताना जो माणूस त्यांच्याकडे घेऊन गेला होता त्यांना ते म्हणाले की, अरे यह तुम किस को लेकर आये हो मेरे पास ? त्यांच्याच शब्दात सांगावयाचे झाले तर तो अमेरिकेतील प्राध्यापक म्हणाला, अरे ये धेड़ के बच्चे को मेरे पास क्यो लेकर आये ? हे वर्णन डॉ.नरेंद्र जाधव यांनी टीव्हीवर सांगितले होते. ते मला खरोखरच बोचले. आज आपण मागासवर्गीय समाजामध्ये आपल्या भावना समाविष्ट करून त्यांना आपलेसे करू या.

दुसरे असे की ॲट्रॉसिटी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. नागपूर येथे पुतळा चौपाटी या ठिकाणी बुद्धीस्ट भीम पार्क हुसेन सागरच्या धर्तीवर तयार करण्यात यावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : परम आदरणीय सभापती महोदय, मी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे.

हे 21 वे शतक आहे. 20 व्या शतकामध्ये तीन महत्वपूर्ण घटना घडल्या आहेत. एक म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळाले. दोन म्हणजे मराठवाडा स्वतंत्र झाला. तीन म्हणजे दिनांक 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. त्यावेळी महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या साडेतीन कोटी होती. आज महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या अकरा कोटी पेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रामध्ये हजारो परंपरा आहेत. मराठवाडा, विदर्भ, खान्देश, कोकण येथील जत्रा, यात्रा, वेगवेगळ्या असून त्यांची संख्या देखील मोठी आहे. पंढरपूरची यात्रा दोन हजार वर्षापासून भरत आहे, असा निष्कर्ष श्री.दामोदर कोसंबी या संशोधकाने काढला आहे. राज्य शासन जत्रा, यात्रासह सर्व परंपरा घेऊन समर्थपणे पुढे जात आहे त्याबद्दल मी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मागच्या वर्षी चिपी विमानतळाच्या कामाचे उद्घाटन झाले. प्रत्यक्ष कामाला यावर्षी सुरूवात झाली. कदाचित आमचे सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम पुढच्या वर्षी विमानात बसून सिंधुदुर्ग पासून प्रवास करू शकतील.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . .. .

कोकणचा तुलनात्मक विकास, स्वातंत्र्यानंतर ज्याप्रमाणात होणे आवश्यक होता, त्याप्रमाणात झाला आहे काय हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये प्रचंड प्रमाणात पाऊस पडतो. संपूर्ण महाराष्ट्राची तहान भागविण्याची क्षमता कोकणामध्ये पडणाऱ्या पावसामध्ये आहे.पण दुर्दैवाने हे सर्व पाणी समुद्राला मिळते. तरी या पाण्याचे नियोजन राज्य शासनाने केले आहे. कोकणला आवश्यक असणारे पाणी आणि उर्वरित पाण्याचा उपयोग महाराष्ट्राला करता येऊ शकेल काय? या दृष्टीने जर नियोजन केले तर मला खात्री आहे की, महाराष्ट्रातील आवर्षण-प्रवण क्षेत्रातील दुष्काळ हटविण्यासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करता येऊ शकेल. त्यामुळे ज्यांनी थडगे उभे केले आणि गाडगे भरले त्यांची ती संस्कृती आहे असे मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छितो. त्या संस्कृतीमध्ये आपण शिरण्याचे कारण नाही, वाईट वाटण्याचे कारण नाही. कोकणामध्ये किनाऱ्यावर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटांची गाज अहोरात्र सुरु आहे. हे नादमय, संगीत आहे. या नादमय संगीतामुळे कोकणाचे नेतृत्व समृध्द झालेले आहे. म्हणून विमानतळाच्या कामाचे उद्घाटन केले आणि पुढील वर्षी हे विमानतळ कार्यरत होणार असल्याने महाराष्ट्राचे माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणेसाहेब यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. तसेच माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांनाही धन्यवाद देतो. आपण वाईट वाटून घेऊ नका.

सभापती महोदय, ऊर्जा खात्यातर्फे माहिती प्रसिध्द केलेली आहे. किनाऱ्यावर आदळणाऱ्या ज्या लाटा आहेत, त्या लाटांपासून वीज निर्मिती करता येऊ शकते. एरवी या लाटांपासून सर्व साधारणपणे 5 ते 8 कि.व्हॅट.वीज निर्माण करता येऊ शकते आणि जेव्हा मौसमी वारे समुद्र किनाऱ्यावर आदळत असतील त्यावेळी 15 ते 20 कि.व्हॅट वीज निर्माण करण्याचे सामर्थ्य कोकणातील समुद्रामध्ये आहे आणि 1 हजार मे.वॅ.वीज निर्माण केली जाऊ शकते. पण त्यांच्या माहिती पुस्तकामध्ये जी माहिती आलेली आहे की, आम्ही विकासाकडून अभिव्यक्तीचे प्रकटीकरण मागविले आहे. आता या अभिव्यक्तीच्या प्रकटीकरणाला कधी प्रतिसाद मिळणार? प्रकटीकरणानंतर प्रत्यक्षात ऊर्जा कधी निर्माण होणार? मग त्याचे पारेषण व वितरण कधी होणार? या सर्व गोष्टींचे विवरण राज्य शासनाकडून दिले तर एक निश्चितपणे कोकणवासियांमध्ये एक चांगला संदेश जाऊ शकेल. मधल्या काळामध्ये ज्यांचे राज्य होते, त्या काळात मी देखील मंत्रीमंडळात होतो. यांच्या ...

. . . . एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . .. .

पेक्षा हे शासन क्रियाशील आहे, कार्य प्रवण आहे असा संदेश जर कोकणामध्ये गेला तर निश्चितपणे तो उपयुक्त ठरु शकेल.

सभापती महोदय, आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकृष्ट करण्याची क्षमता कोकणातील निसर्ग सौंदर्यामध्ये आहे. मी तर अशी कल्पना करतो की, कदाचित कधी काळी प्रत्यक्ष शंकर भगवानाचे हे भ्रमण केंद्र असावे. येथे त्रिशूळा सारखे डोंगर आहेत. डमरु आभाळाशी बोलणारा आहे. गळ्यामध्ये रुद्राक्षाची माळ असावी अशा प्रकारची रुद्राक्षाची माळ हातात धारण करणारे डोंगर आहेत. म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकृष्ट करण्याची क्षमता कोकणातील निसर्गामध्ये आहे. पण दुर्दैवाने आंतरराष्ट्रीय पयर्टक सौष्ठव स्पर्धेमध्ये आम्ही उतरु शकलो नाही म्हणून पर्यटकांचा प्रतिसाद हा त्याप्रमाणात मिळाला नाही.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

यानंतर श्री.अ.शिगम . . .. .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

कोकणामध्ये स्वीत्झर्लंड आहे फक्त ते पाहण्याची दृष्टी पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटें यांच्या सोबत मी किनाऱ्यावरुन कोकण पाहिलेला आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये सहकाराच्या माध्यमातून विकास झाला असता. परंतु दुर्दैवाने कोकणात सहकार विकसित होऊ शकला नाही. "विना सहकार नाही उध्दार" या प्रमाणे कोकणात सहकार रुजला असता तर कदाचित कोकणचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला असता. परंतु तसे झालेले नाही. सहकाराच्या माध्यमातून कोकणचा विकास करता येऊ शकेल काय या दृष्टीने आपण प्रयत्न करावेत अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, सन 2001 मध्ये जी जनगणना झाली. त्यानुसार महाराष्ट्रात आदिवासींची संख्या 85 हजार 78हजार आहे. पण आजही या आदिवासींमध्ये भूकबळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. आदिवासींमध्ये अंधश्रध्दा आहे. आदिवासींमध्ये अशिक्षितांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. याचा परिपाक आणि परिणाम म्हणून त्या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर नक्षलवादी चळवळ उभी राहिली आहे. शासनाकडून मिळणारा निधी प्रत्यक्षात किती खर्च होतो याचा आढावा माननीय मंत्री महोदयांनी घेणे आवश्यक आहे. कारण प्रशासकीय यंत्रणा भ्रष्ट आहे. प्रशासन यंत्रणा सुधारण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासनाने एक रुपया पाठविला असेल त्यातील 10 पैसे देखील खालच्या माणसापर्यंत जातात किंवा कसे याची मला शंका आहे. असे वातावरण असेल तर आदिम काळापासून राहणाऱ्या आमच्या आदिवासींना आम्ही 21 व्या शतकामध्ये काय देणार आहोत हा सर्वात मोठा प्रश्न आहे. ते देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने प्रयत्न करावेत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, आदिवासींना खावटी कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे. आदिवासींना खावटी कर्जाच्या नोटीसा दिलेल्या आहेत. आदिवासींचे हे खावटी कर्ज आज ना उद्या शासनाला माफ करावे लागणार आहे. हे खावटी कर्ज फेडण्याची ताकद आणि क्षमता आज आदिवासींमध्ये नाही. जो निर्णय परवा घेणार आहात तो निर्णय आज जाहीर केला तर ते चांगले होईल. आदिवासींचे खावटी कर्ज माफ करणे हे त्यांच्या उत्कर्षासाठी उपयुक्त आणि पोषक ठरेल असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, नक्षलवादी चळवळीला समर्थपणे तोंड द्यायचे असेल तर राज्य शासनाने आदिवासींचे सुरक्षा दल उभे करावे. हे सुरक्षा दल नक्षलवादी चळवळींचा समर्थपणे मुकाबला करु शकेल. जो हिंसाचार घडत आहे त्याला प्रतिकार करण्याची क्षमता या दलामध्ये आहे. आपण असे दल उभे केले तर ते महाराष्ट्राच्या दृष्टीने निश्चितपणे उपयुक्त ठरेल असे सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी शाहु-फुले-आंबेडकराचे नाव नेहमी घेतले जाते. परंतु शाहू-फुले-आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व ओळखून त्यासाठी प्रयत्न केल्यामुळे पुढील काही वर्षात शिक्षणामध्ये खूप सुधारणा झाल्याचे आढळून येते. परंतु आज समाजामध्ये पूर्णपणे बदल झालेला आहे असे मी बिलकूल म्हणणार नाही.

सभापती महोदय, मला विरोधी पक्षाच्या सदस्यांना एवढीच आठवण करुन द्यायची आहे की, या राज्याने मंडल आयोगाच्या शिफारशी लागू केल्यामुळे राज्यातील दलित, मागासवर्गीय मुख्य प्रवाहात आलेले आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय, माझ्या भाषणापूर्वी अनेक सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली व त्यांनी राज्य सरकारला दूषणे दिली. त्यांच्याकडून खैरलांजी येथे घडलेल्या घटनेचे उदाहरण वारंवार दिले जाते. मुळात या राज्य सरकारने असंख्य दलित, महिला, मागासवर्गीयांना निरनिराळ्या योजनांच्या माध्यमातून विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत. एवढेच नव्हे तर महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण उपलब्ध करुन दिले. माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या प्रयत्नांमुळेच हे शक्य झाल्यामुळे मला त्यांच्या नावाचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. त्यांनी या सर्व घटकांसाठी उल्लेखनीय काम केले आहे.

महोदय, राज्य सरकारच्या माध्यमातून हजारो चांगली कामे केल्यानंतर सुध्दा विरोधकांकडून त्याची दखल घेतली जात नाही. परंतु एखादी चूक झाली तर त्यावर लगेच बोट ठेवले जाते. मराठीमध्ये "निंदकाचे घर असावे शेजारी" अशी म्हण आहे. आमच्या शेजारी निंदकाचे घर असेल तर आम्हाला आनंदच आहे. कारण आमची जितकी निंदानालस्ती केली जाईल तितकी आमच्यात जास्त सुधारणा होऊ शकेल. विरोधी पक्ष आमची निंदानालस्ती करतो म्हणून मला त्यांचे आभार मानले पाहिजे.

महोदय, अनेक शासकीय योजना लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. परंतु त्यासाठी केवळ शासनालाच जबाबदार धरणे चुकीचे आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या भाग भांडवलात माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी 300-350 कोटी रुपयांची वाढ केली आहे. महोदय, मागासवर्गीय, दलित, महिला यांना या महामंडळाच्या योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त फायदा कसा होईल या साठी त्या महामंडळाचे अध्यक्ष अतिशय तत्परतेने आणि चांगले काम करीत आहेत. या महामंडळाच्या अंतर्गत चांगले काम सुरु आहे, हे या निमित्ताने मी निदर्शनास आणून देते.

महोदय, गेल्या 64 वर्षांमध्ये गरिबांसाठी असलेल्या शासकीय योजना उत्तमप्रकारे राबविल्या असत्या तर आज एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोक दारिद्र्यरेषेखाली राहिले नसते. पण कोठे तरी प्रशासन या कामी कमी पडते असे मला वाटते. त्यामुळे ही जबाबदारी केवळ शासनाचीच नसून, सर्व राजकीय पक्ष, कार्यकर्ते यांच्या प्रमाणे प्रशासकीय अधिकाऱ्यांची सुध्दा आहे. या सर्वांनी एकमताने काम केले तर अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये ज्या उणिवांवर बोट ठेवले आहे त्या उणिवा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दूर होऊ शकतात. दलितांना मागासवर्गीयांना, महिलांना, गरिबांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ज्या योजना आहेत त्या योजनांसाठी भरपूर तरतूद केली आहे. ती तरतूद या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न केला तर अशा प्रकारचा प्रस्ताव पुन्हा मांडण्याची गरज पडणार नाही, याची मला खात्री आहे.

महोदय, राज्यात अनेक महानगरपालिका आहेत. त्या महापालिकांनी आपल्या बजेटच्या 5 टक्के रक्कम महिलांसाठी राखून ठेवणे बंधनकारक आहे. मुंबई महानगरपालिका ही सर्वात मोठी महापालिका आहे. 9 राज्यांचे जेवढे बजेट आहे तेवढेच या महापालिकेचे बजेट असते. मुंबई महानगरपालिकेचे बजेट जवळजवळ 31 हजार कोटी रुपयांचे असते. परंतु तरी सुध्दा या महापालिकेकडून बजेटमध्ये महिलांसाठी 2, 5 टक्के रक्कम राखून ठेवली जात नाही. एवढेच नव्हे तर मागासवर्गीय आणि दलित वर्गांसाठी ज्या जागा राखीव असतात त्या सुध्दा भरल्या जात नाहीत. त्यामुळे याचा कोठे तरी विचार केला पाहिजे. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार केला तरच या सर्व गोष्टींमध्ये बदल होईल असे मला वाटते.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानते व वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करते.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, माननीय श्री.विनोद तावडे यांनी या प्रस्तावावर एक तास विवेचन केले. त्यांच्या भाषणातील जवळजवळ 90 टक्के वेळ शासनाच्या कोणत्या योजना आहेत हे सांगण्यावर खर्च झाला. यावरुन हे सिध्द झाले की, महाराष्ट्र शासनाने दलित, आदिवासी, मागासवर्गीय, महिला इत्यादिंसाठी अतिशय चांगल्या प्रकारच्या योजना आखल्या आहेत.

महोदय, महाराष्ट्र शासन हे एकमेव शासन असे आहे की, ज्या शासनाने दलितांच्या लोकसंख्येच्या आधारावर निधीची तरतूद केली आहे. निरनिराळ्या योजनांच्या माध्यमातून याचा प्रत्यंतर आपल्याला पहावयास मिळतो. विशेषत: शिक्षण विषयक योजनांमुळे दलित वर्गातील शिक्षणाच्या प्रमाणात उल्लेखनीयरित्या सुधारणा झाल्याचे दिसून येईल. वास्तविक पाहता ग्लास अर्धा भरलेला आहे की, अर्धा रिकामा आहे यात वाद न घालता, तो अर्धा भरलेला आहे याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे ....

अर्थात जी बाजू कमकुवत आहे त्यासाठी निश्चितपणे आपल्याला अधिक लक्ष दिले पाहिजे. सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांना मी काही महत्वाच्या गोष्टी या ठिकाणी सांगणार आहे.

सभापती महोदय, व्यावसायिक शिक्षणाच्या शिष्यवृत्तीच्या बाबतीत आपण जवळजवळ 1800 कोटी रुपये देतो. परंतु ही शिष्यवृत्ती वेळेवर येत नाही त्यामुळे संस्था आणि विद्यार्थी या दोघांनाही वेठीस धरले जाते. संस्थांनाही खूप त्रास होतो. काही ठिकाणी विद्यार्थ्यांचे निकाल दिले जात नाही. अशा पध्दतीने विद्यार्थ्यांची अडवणूक म्हणता येणार नाही पण त्यांनाही त्रास होतो. त्या संस्थांचाही नाईलाज असतो. आपला नियतव्यय ठरलेला आहे त्यामुळे शिष्यवृत्ती वेळेवर मिळावी यादृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत. आपण थेट ऑनलाईन शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था केली आहे पण अजूनही त्या व्यवस्थेमध्ये बरेच दोष आहेत. ऑनलाईन पध्दतीने मुलांना शिष्यवृत्ती मिळत नाही. ते चेक शाळांकडे जातात आणि शाळेकडून वेगवेगळ्या पध्दतीने उशिरा मुलांना पैसे मिळतात.

सभापती महोदय, मुलींनी शाळेत यावे म्हणून मागासवर्गीय मुलींसाठी सावित्रीबाई फुले योजना सुरु केलेली आहे. त्यांना वर्षाला फक्त 500 रुपये देतो. ही रक्कम खूप कमी आहे. आताच उल्लेख करण्यात आला की, गळतीचे प्रमाण खूप आहे. अशिक्षितांचे प्रमाण पाहिले तर त्यामध्ये मागासवर्गीयांचे, आदिवासींचे प्रमाण जास्त आहे आणि त्यातही मुलींचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे माझी आग्रही मागणी आहे की, सावित्रीबाई फुले योजनेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या अनुदानामध्ये अधिक वाढ करण्यात यावी.

सभापती महोदय, वसतिगृहांच्या बाबतीत मी जास्त बोलणार नाही पण शासकीय वसतिगृहांची अवस्था खरोखर चांगली नाही. मध्यंतरी नाशिकमध्ये विद्यार्थ्यांनी स्वत:ला कोंडून घेण्याचे आंदोलन केले होते. या बाबतीत एक अभ्यासगट नेमला पाहिजे असे मला वाटते. मध्यंतरी अपंगांच्या प्रश्नावर बोलत असताना मी सांगितले होते की, आपल्या योजना खूप आहेत पण त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. यासाठी खऱ्या अर्थाने एक अभ्यास गट निर्माण करण्याची आवश्यकता आहे. बाहेर जे लोक खऱ्या अर्थाने या संदर्भात अतिशय चांगले काम करतात त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे .....

त्यामध्ये घेण्याची गरज आहे. रयत शिक्षण संस्थेसारखी संस्था आहे त्यांची मदत घेण्यास हरकत नाही. त्यामुळे आपल्या योजना चांगल्या पध्दतीने राबविता येतील.

सभापती महोदय, कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या नावाने भूमिहिनांना जमीन देण्याची योजना केली आहे. परंतु आता जमिनीच्या किंमती खूप वाढलेल्या आहेत. आपण एकरी 3 लाख रुपयांची मर्यादा घालून दिलेली आहे. आता जमिनीचा एवढा कमी दर नसून किंमती खूप वाढलेल्या आहे. ही योजना जरी चांगली असली तरी त्याचा लाभ या मर्यादेमुळे मिळू शकत नाही. त्यामुळे याचाही पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, घरकुल योजनेबद्दल एक महत्वाचा विषय मला या ठिकाणी मांडावयाचा आहे. या घरकुलासाठी आपण 70 हजार रुपये देतो. पूर्वी 1 लाख रुपये देत होतो. आता इंदिरा आवास योजनेमधून 70 हजार रुपये दिले जातात. ही रक्कम खूप कमी आहे असे मला वाटते. तेवढ्या रकमेमध्ये चांगल्या पध्दतीचे घर होऊ शकत नाही. त्याशिवाय आपण जमिनीसाठी त्यांना 10 हजार रुपये देतो. आता 10 हजार रुपयांमध्ये ग्रामीण भागामध्ये सुध्दा जागा मिळत नाही. जवळजवळ 50 टक्के मागासवर्गीयांना स्वत:ची जागा नाही. ग्रामीण भागामध्ये सुध्दा मागासवर्गीयांकडे जागा नाही. ही योजना जरी चांगली असली तरी माझी अशी मागणी आहे की, ही मर्यादा वाढविली पाहिजे. शहरी भागात तर खूप अडचणी आहेत. त्या ठिकाणी 10 टक्के लाभार्थ्यांपर्यंत सुध्दा ही योजना पोहोचत नाही. कारण त्या ठिकाणी लोकांकडे जागाच नसते आणि ज्या जागा आहेत त्यांना आपण एन.ए.ची अट घातलेली आहे. ही एन.ए.ची अट तातडीने रद्द केली पाहिजे. या वर्षी अहमदनगर जिल्ह्यातून घरकुल योजनेचे 9 कोटी रुपये परत गेलेले आहेत. ही योजना आपण प्रत्यक्षात राबवू शकत नाही. त्यासाठी आपल्याला हा बदल केला पाहिजे.

सभापती महोदय, आपण मागासवर्गीय गृहनिर्माण सोसायट्या स्थापन केल्या. त्यासाठी जमिनीकरिता अनुदान दिले आणि जमिनी खरेदी करण्यात आल्या. जमिनी खरेदी केल्यानंतर त्या योजना तशाच थांबलेल्या आहेत. यामध्ये सुध्दा बदल करुन वैयक्तिक लाभाची योजना घेतली तर चांगले होईल असे मला वाटते. आपल्याकडे दलित वस्ती सुधार योजना आहे. त्यासाठी विशेष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे .....

घटक योजना असते. डीपीडीसीतून जो खर्च करता केला जातो त्यापैकी जवळजवळ 55 टक्के खर्च दलित वस्ती सुधार योजनेसाठी केला जातो. त्यामधून गटारांची कामे घेतली जातात. त्या कामांचा दर्जा कसा असतो हे आपल्यालाही माहीत आहे. त्यामुळे ज्या वैयक्तिक लाभाच्या योजना आहेत त्या बाबतीत मी एका जिल्ह्याची आकडेवारी सांगतो. त्या जिल्ह्यामध्ये दलित वस्ती सुधार योजनेसाठी 3 कोटी 68 लाख रुपये देण्यात आले आणि पशुसंवर्धनामध्ये वैयक्तिक लाभार्थ्यांना ज्या दुधाळ गाई द्यावयाच्या आहेत त्यासाठी अवघे 34 लाख रुपये खर्च करण्यात आले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

सभापती महोदय, आपल्याला आर्थिक स्तर उंचवावयाचा असेल तर त्यामध्ये वैयक्तिक लाभाची टक्केवारी ठरविली पाहिजे नाही तर दलित वस्ती सुधारणेच्या अंतर्गत जी कामे करतो त्याचा खरोखर दलितांना किती उपयोग होतो हा प्रश्न देखील महत्वाचा आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मी एका गोष्टीसाठी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. अनेक राष्ट्र पुरुषांचे शासनाने अंक प्रकाशित केलेले आहेत. शासनाने शाहू महाराज, महात्मा फुले यांचे सुंदर अंक प्रकाशित केलेले आहेत. त्याचप्रमाणे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी देखील सामाजिक चळवळीत चांगले काम केलेले असल्यामुळे त्यांच्या जीवनवरील अंक तसेच वामनदादा कर्डक या महान व्यक्तिमत्वाचे लिखाणही शासनाने प्रकाशित करावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण थांबवितो.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव सभागृहासमोर मांडलेला आहे. या प्रस्तावाच्या चर्चेला उत्तर देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जवळपास 50 मिनिटे भाषण केलेले आहे. त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी अनेक चांगले मुद्दे मांडले होते. परंतु त्यांचा काही तरी गैरसमज झाल्याचे मला जाणवले आहे. त्यांचा गैरसमज दूर करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांसह 10 सन्माननीय सदस्यांनीही चांगले विचार व्यक्त केलेले आहेत. सामाजिक न्याय विभागाला निधी मिळत नाही आणि मिळाला तरी तो निधी इतरत्र वळविला जातो. श्रीमती सोनिया गांधी यांनी योजना आयोगाला डायरेक्टिव्हज् दिल्या होत्या की, लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटमध्ये तरतूद केली पाहिजे. मग अनुसूचित जातीचे लोक असोत की अनुसूचित जमातीचे लोक असोत.

2008-09 या वर्षात बजेटमध्ये 9.3 टक्के तरतूद केली होती. इतर वर्षांमध्ये 10.5 टक्के एसबीसीसाठी तरतूद केलेली आहे. सन 2010-11 मध्ये 90 टक्के खर्च केलेला आहे. सन 2011-12 मध्ये 90.58 म्हणजे 91 टक्के खर्च केलेला आहे. सन 2012-13 मध्ये 94 टक्के खर्च केलेला आहे. यावरुन हा पैसा डायव्हर्ट केला जात नाही हे दिसून येईल. हा पैसा एरिया डेव्हलपमेंटचा नाही तर वैयक्तिक लाभाच्या योजनांचा पैसा आहे. मध्यंतरी अनुसूचित जाती/जमातीच्या आयोगाचे अध्यक्ष मुंबईला दोन दिवस आले होते. त्यांनी या विभागाचा आढावा घेतला होता. त्यानंतर दिल्लीला ते परत गेल्यानंतर त्यांनी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्र्यांना असे सांगितले की, महाराष्ट्र राज्यात सामाजिक न्याय विभागासाठी भरीव तरतूद करुन संपूर्ण निधी खर्च केला जातो. त्यामुळे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या विभागामार्फत पैसा खर्च होत नाही असे म्हटलेले आहे ते सयुक्तिक वाटत नाही.

सभापती महोदय, युतीच्या काळात सन 1998-99 मध्ये सामाजिक न्याय विभागाद्वारे 5.24 टक्के खर्च करण्यात आला होता. आमच्याही काळात 6 ते 7 टक्के खर्च होत होता. परंतु आता शासनाने नवीन धोरण स्वीकारलेले आहे. गुजरात राज्यातही आपल्या इतका निधी खर्च होत नाही. अनुसूचित जाती/जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात खर्च करणारे देशात एकमेव आपले

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.शिवाजीराव मोघे.....

राज्य आहे. वसंतराव नाईक सबलीकरण योजना नवीन आहे. या योजनेवर खर्च 50 टक्क्यांपेक्षा कमी खर्च करण्यात आला हे मी मान्य करतो. या योजनेंतर्गत एका व्यक्तीला घर बांधून दिले जाते आणि 5 गुंठे जागाही दिली जाते व जात आहे. विमुक्त भटक्या जाती व जमातीचे लोक खुल्या जागेवर पाल्यात राहतात. त्यांच्यासाठी यशवंतराव मुक्त वसाहत योजना राबविली जाते. या लोकांसाठी ही विशेष योजना तयार केलेली आहे. या योजनेचाही पैसा गेल्या वर्षी पूर्ण खर्च झाला नसला तरी यावर्षी बराच खर्च केलेला आहे. पुढील वर्षात या योजनेवरील संपूर्ण निधी खर्च केला जाईल. व्यसन मुक्ती योजनेसाठी 18 कोटी रुपयांची तरतूद केली होती. परंतु वित्त विभागाने काही जी.आर.पूर्तता करण्यास सांगितल्याने ही योजना राबविण्यास विलंब झाला. त्यामुळे या योजनेवर केवळ 5-6 कोटी रुपये खर्च करता आला. ही गोष्ट मलाही मान्य आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे मांडले आहेत. परंतु वेळेअभावी मी प्रत्येक मुद्याला उत्तर देऊ शकणार नाही. पण कॉमन विषयाला मी जरुर उत्तर देईन. सहकारी सूत गिरण्यांवर पैसा खर्च झाला नाही असे सांगण्यात आले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन 2012-13 या वर्षामध्ये मूळ तरतूद 25 टक्के होती. आपणास माहीतच आहे की, 20 टक्के कपात लागली होती. त्यामुळे 80 टक्के रक्कम वितरित झालेली असून ती खर्च देखील झालेली आहे.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांसाठी काय दिले, विद्यार्थ्यांसाठी काय दिले अशी विचारणा या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केली. मी सांगू इच्छितो की, सामाजिक न्याय विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी जेवढा खर्च केला जातो तेवढा खर्च अन्य ठिकाणी कुठे होत नसेल. मागासवर्गीयासाठी एक हजारापेक्षा जास्त शाळा आहेत. अन्यत्र कुठे इतक्या शाळा असतील असे मला वाटत नाही. आपण शाळांच्या इमारती बांधत आहोत, वसतिगृहे बांधत आहोत. विद्यार्थ्यांसाठी ज्या ज्या गोष्टी आपण करीत आहोत त्यामध्ये आपण देशात पहिल्या क्रमांकावर आहोत.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षामध्ये भाग घ्यावा यासाठी आम्ही एक नवीन योजना सुरु केलेली आहे. क वर्ग नगरपरिषदेमध्ये किंवा खेडयामध्ये शिक्षण घेणारी मुले स्पर्धा परीक्षेसाठी तयार व्हावीत म्हणून 28 ठिकाणी सेंटर्स उघडलेली आहेत. या विद्यार्थ्यांच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था देखील केली जाते. या सेंटरमध्ये विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांचे ट्रेनिंग दिले जाते. वर्षभरामध्ये ते विद्यार्थी अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेऊ शकतात.

सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचा आभारी आहे. त्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, महामंडळा मार्फत जे कर्ज देण्यात येते, ज्या सवलती देण्यात येतात त्या केवळ सग्यासोय-यांना, जवळच्या माणसाना दिल्या जातात. आता आम्ही कितीही चांगल्या गोष्टी केल्या तरी त्याबाबतीत आरोप हे होतच असतात. आता आम्ही कर्ज देण्यासंबंधी नवीन पध्दत अवलंबिलेली आहे. 5 लाखापर्यंतचे कर्ज लॉटरी पध्दतीने देण्यात येणार आहे. जे लोक कर्जासाठी पात्र असतील अशा पात्र लोकांच्या चिठ्ठया टाकून लॉटरी पध्दतीने निवड करुन त्यांना कर्जाचे वितरण करण्यात येईल. या पध्दतीमुळे जवळच्या माणसाला कर्ज दिले जाते अशा प्रकारचा आरोप कुणाला करता येणार नाही. हे कर्ज देताना कुणाच्याही शिफारशीचा प्रश्न येणार नाही. यापूर्वी देखील अशा प्रकारे सिलिंगच्या जमिनी वाटलेल्या आहेत. सर्व महामंडळामध्ये अशा प्रकारे कर्ज देण्याची पध्दत अवलंबिण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे...

सभापती महोदय, पॉवर ट्रिलर देण्याची योजना केली होती. त्या पॉवर ट्रिलरचा उपयोग होत नव्हता म्हणून ती योजना बंद केली आणि त्याऐवजी मिनिट्रॅक्टर देण्याची योजना सुरु केलेली आहे. मिनिट्रॅक्टरची किंमत साधारणत: 3.5 लाख रु आहे. त्यापैकी 10 टक्के रक्कम बचत गटाने भरावयाची आहे. आपल्या राज्यामध्ये महिला बचत गट खूप यशस्वी झालेले आहेत. या योजनेचा महिला बचत गटांना खूप मोठा फायदा होईल. यामध्ये देखील आम्ही अ, ब, क असे गट ठेवलेले नाही. जर जिल्ह्याला 10चा कोटा असेल आणि 15 पात्र अर्ज आले असतील तर लॉटरी पध्दतीने ते मिनी-ट्रॅक्टर दिले जातील. त्यामध्ये देखील अनुसूचित जातीचे 80 टक्के आणि अन्य समाजाचे 20 टक्के असे 80:20 प्रमाण ठेवलेले आहे.

ई-स्कॉलरशीप बाबत आपल्या राज्याला तीन वेळा ॲवार्ड मिळाले आहे. केन्द्र शासनाचे दोन वेळा ॲवार्ड मिळालेले आहे. ई-स्कॉलरशीपच्या बाबतीत काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दूर करण्यात येतील. ॲडमिशन घेण्यासाठी खूप मुले होती, परंतु प्रत्यक्षात परीक्षेला कमी मुले बसली. यामध्ये काही गडबड आहे असे समजल्यावर चौकशी समिती नेमण्यात आली.

सभापती महोदय, राज्यामध्ये इंदिरा आवास योजना चांगल्या प्रकारे राबविण्यात आलेली आहे. या योजनेमध्ये केन्द्र शासनाचा पैसा मर्यादित असतो. ज्या गावामध्ये बीपीएलची घरे कमी आहेत त्या गावामध्ये ही योजना प्राथम्याने राबिविली जाते. याच धर्तीवर आमच्या विभागाने रमाई योजना सुरु केलेली आहे. या योजनेअंतर्गत जून पर्यंत 3 वर्षामध्ये 3 हजार कोटी रुपये खर्च करुन 2 लाख घरे बांधलेली आहेत. या घरांची किंमत कमी आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. या घरांची किंमत 70 हजार रु. आहे. परंतु या वर्षापासून या घरांची किंमत एक लाख रुपयापेक्षा अधिक होणार आहे. या घरांसाठी केन्द्र शासनाकडून देखील काही आर्थिक मदत होणार आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मागासवर्गीयांसाठी वाल्मिकी योजना राबविण्यात आली.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

आता आपल्याकडे इंदिरा आवास योजना आणि इतर घरकुलाच्या योजना आहेत. सामाजिक न्याय विभागाच्या योजनेंतर्गत घरकूल बांधण्यासाठी एन.ए.ची आवश्यकता असते. इतर योजनांमध्ये एन.ए.ची आवश्यकता भासत नाही. याकरिता आम्ही महसूलमंत्र्यांबरोबर बैठक घेतली आणि सांगितले की, सामाजिक न्याय विभागाच्या योजनेसाठी परवानगी द्यावी म्हणजे शहरामध्ये घरे बांधली जातात त्याच प्रकारची घरे ग्रामीण भागातही बांधता येतील. इतर योजनेतील घरांबाबत मजला वाढविण्याची अनुमती आहे. परंतु सामाजिक न्याय विभागाच्या योजनेला चालत नाही. शासनाने चांगल्या योजना करुन जास्तीत जास्त पैसा खर्च केला आहे. घरकूल योजनेबाबत एकही तक्रार नाही. कोणतेही एजंट नेमलेले नाहीत. डीआरडीएकडे लाभार्थ्यांची यादी दिलेली असते. लाभार्थी स्वत: काम करतात. 70 हजार रुपये उपलब्ध करुन दिले जात असले तरी स्वत:चे घर होणार आहे त्यामुळे लाभार्थी स्वत:ची रक्कम घालून 1.25 ते 1.5 लाखाचे घर बांधतात.

सभापती महोदय, जात प्रमाणपत्राचा विषय अनेकदा चर्चेला आला आहे. या संदर्भात विधानसभेमध्ये देखील चर्चा झाली होती. योजनेमध्ये खूप गडबड होते. वेळ कमी होता. बोगस प्रमाणपत्र देणे म्हणजे केवळ महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यावर अन्याय होत नाही तर देशाच्या पातळीवर अन्याय होतो. ओबीसीचे प्रमाणपत्र आपल्याकडून दिले गेले तर तो लाभार्थी देशाच्या पातळीवर कॉम्पिट करतो. 15-20 वर्षापूर्वी माधुरी पाटील विरुध्द महाराष्ट्र शासन ही केस सुप्रीम कोर्टात दाखल झाली होती. महाराष्ट्र शासनाने जे कास्ट व्हॅलिडेशन केले होते ते सुप्रीम कोर्टाने मान्य केले. परंतु त्यांनी असे सुचविले की, उप जिल्हाधिकारी दर्जाचे किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाचे अधिकारी नेमून जात प्रमाणपत्र दिले जावे, यासाठी समिती करावी. सुप्रीम कोर्टाने जरी सुचविले असले तरी कास्ट व्हॅलिडेशन महाराष्ट्रामध्ये केले जाते. आंध्रप्रदेश राज्यात होत नाही. याचे कारण म्हणजे आपण याबाबत बारकाईने पाहतो. त्यात पूर्वी त्रुटी होत्या. आता खूप चांगली व्यवस्था केली आहे.

सभापती महोदय, आश्वासन दिले होते त्यानुसार ऑनलाईनची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना फॉर्म कसा भरावा याची माहिती दिली जाते. एसएमएसद्वारे त्यांच्या अर्जाची स्थिती काय आहे, कोणत्या तारखेला प्रमाणपत्र मिळणार आहे हे कळविले जाते. यापुढील काळात घरपोच प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

करु. अर्जदाराची फसवणूक केली जाणे, हस्तक्षेप केला जाणे हे सर्व प्रकार आता बंद झाले आहेत. टोल फ्री हेल्पलाईनची व्यवस्था केलेली आहे. पूर्वी स्टाफ कमी होता. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याचे पद निर्माण करायचे झाले तरी कॅबिनेटची मंजुरी घ्यावी लागते. म्हणून आम्ही बार्टी या स्वायत्त संस्थेची नेमणूक केली आहे. त्यांना आम्ही निधी उपलब्ध करुन देतो. त्यांना आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून एका वर्षाकरिता, दोन वर्षाकरिता पदे भरण्याचा अधिकार दिलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे मागील सहा महिन्यांच्या काळात 2.68 लाख प्रमाणपत्रे दिली गेली आहेत. आम्ही मोहीम सुरु केली आहे. त्या माध्यमातून न्याय देण्याचे काम करीत आहोत. बार्टी संस्थेमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. त्यांच्याकडून समितीच्या कामावर देखरेख ठेवली जाते. सहा महिन्यापासून, दोन वर्षापासून प्रमाणपत्र मिळाले नाही अशी तक्रार केली जाते. मी खालच्या सभागृहात सांगितले, हे खरे असू शकते. काही लोक वेळेवर कागदपत्रे सादर करीत नाहीत. म्हणून आम्ही त्यांना नोटीस देतो. सहा महिन्याच्या आत त्यांनी कागदपत्रे सादर केली नाहीत तर जो नियम असेल त्याप्रमाणे निकाल देण्यात यावा. मात्र प्रकरण प्रलंबित ठेवायचे नाही. कागदपत्रांमुळे निकाल देण्यास वाट पहायची नाही. यस ऑर नो जो काही निकाल असेल तो कळवायची व्यवस्था केल्यामुळे प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत. अशाप्रकारे जात वैधता प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत.

सभापती महोदय, वसतिगृहामध्ये चांगली व्यवस्था नाही असे सांगितले गेले. मागील तीन साडेतीन वर्षाच्या काळात या व्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल केला आहे. 100 वसतिगृहे मंजूर झाली होती. परंतु एकही सुरु झाले नव्हते. आम्ही ही सर्व 100 वसतिगृहे सुरु केली आहेत. इमारती पूर्ण होईपर्यंत वाट पहायची नाही. भाड्याची जागा घेऊन वसतिगृह सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सर्व वसतिगृहे सुरु झाली आहेत. दोन वर्षापूर्वी निवासी शाळांसाठी 64 इमारती मंजूर झाल्या, त्या सर्व इमारती बांधून पूर्ण केल्या आहेत. व्यवस्था बरोबर नाही म्हणून काही तक्रारी जरुर असतील. आम्ही 2010-11 मध्ये तत्कालीन मुख्य सचिव श्री.रत्नाकर गायकवाड यांच्या काळात एक जीआर काढला होता. वर्षभरात 100 कोटी रुपये खर्च करीत असताना प्रत्येक विद्यार्थ्यामागे अमुक ग्रॅम गहू, अमुक ग्रॅम तेल.....

नंतर झेड.1...

अशुद्धीसह प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे ....

अशी पध्दत होती परंतु आता वसतिगृहातील मुलांना पोटभर जेवणाची व्यवस्था करण्यात आली असून वसतिगृहातील मुलांना सकस आहार दिला जात आहे. अगोदर वसतिगृहाचे दोन तीन महिन्याचे टेंडर काढले जात होते परंतु आता या वर्षापासून वर्षाचे टेंडर काढले जाणार आहे.

सभापती महोदय, वसतिगृहासाठी रंगीत टीव्ही, संगणक, गरम पाण्याची व्यवस्था, लायब्ररी, वॉटर स्टोअर, आग प्रतिबंधक यंत्रणा अशा अनेक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. या वसतिगृहातील मुलांसाठी नॉन व्हेज आठवडयातून दोन वेळा दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी आपण ही सर्व व्यवस्था केली आहे.

सभापती महोदय, पूर्वी मुले आणि मुलींची निवासी शाळा एकत्र होत्या परंतु आता मुला-मुलींच्या निवसी शाळा वेगवेगळया राहणार आहेत. अनुदानित निवासी शाळेसाठी महिला अधीक्षिकांची सुध्दा नेमणूक केलेली आहे.

सभापती महोदय, एससी व एसटीसाठी ॲट्रॉसीटीचा एकच कायदा आहे. परंतु एससी आणि एसटीसाठी ॲट्रॉसीटीचा वेगवेगळा कायदा करण्यात यावा अशी सूचना या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. परंतु ॲट्रॉसीटीचा कायदा छोटा असून कायदा राबविण्याचे काम गृह विभागच करीत असल्यामुळे या दोन समाजासाठी वेगवेगळा ॲट्रॉसीटीचा कायदा करण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, महाराष्ट्रात आता सहा नवीन न्यायालये सुरु होणार आहेत. न्यायालयासाठी जागा आणि स्टाफची सुध्दा व्यवस्था करण्यात आलेली आहे. यासंदर्भात कॅबिनेटने निर्णय घेऊन सात-आठ महिने उलटूनही गेलेले आहेत. या विषयाच्या संदर्भातील अंमलबजावणी दोन महिन्यात होईल असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी ई-स्कॉलरशिप, घरकुलांची माहिती दिलेली आहे. मागासवर्गीय वस्तीमध्ये अगोदर 5 वर्षात केवळ 10 लाख रुपये खर्च करता येत होते परंतु यासंदर्भात मागील वर्षी मर्यादा 20 लाख रुपये केलेली आहे. अगोदर एका कामासाठी केवळ 2 लाख रुपयेच खर्च करता येत होते. परंतु आता एका कामासाठी 7 लाख रुपये खर्च करता येणार आहे.

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे ....

सभापती महोदय, अपंगाच्या संस्था असो, शाहू महाराज योजना असो, सावित्रीबाई फुले स्कॉलरशिप असो या सर्व योजना आता ऑनलाईन करण्याच्या निर्णय घेण्यात आलेला आहे. ऑनलाईनची प्रक्रिया येत्या दोन तीन महिन्यात सुरु होणार असून ऑनलाईन प्रक्रियेमुळे गडीबडीला वाव राहणार नाही. दादासाहेब गायकवाड योजनेला पूर्वी 1.5 लाख रुपये दिले जात होते परंतु आता आम्ही 3 लाख रुपये केलेले आहे. या वर्षी बरीचशी जमीन खरेदी झालेली आहे. सर्व जमिनींची खरेदी झाली नाही हे मी मान्य करतो. शासनाने अनेक गोष्टी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, आता आम्ही लॉटरी सिस्टम सुरु केलेली आहे. एससीसाठी तीन महामंडळे आहेत. या महामंडळाच्या संदर्भात बैठक झालेली आहे. अगोदर महामंडळासाठी कमी अंशदान दिले जात होते परंतु आता महात्मा ज्योतिबा फुले विकास महामंडळाला 150 कोटी रुपये वाढवून दिले आहे.संत रोहिदास महामंडळाला 75 कोटी रुपये वाढवून दिले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाला 75 कोटी रुपये वाढवून दिलेले आहे. यासाठी आम्ही केंद्रशासनाकडून 585 कोटी रुपयांची गॅरंटी घेत आहोत व त्यामाध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहोत. बऱ्याचशा महामंडळांवर अध्यक्षांची नेमणूक झालेली आहे. या महामंडळावर एक दोन व्यक्तींचीच रिअपॉईंटमेंट झालेली आहे बाकीच्या महामंडळावर रिअपॉईंटमेंट करण्याचा प्रयत्न करण्यात येईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

...3..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी महार वतन जमिनीच्या हस्तांतरणाच्या संदर्भात पुणे आणि नाशिक जिल्हयातील काही प्रकरणांचा उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...

त्याच प्रमाणे सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आदिवासी जमीन हस्तांतरण निर्बंधाच्या धर्तीवर महार वतन जमीन निर्बंध कायद्याची आवश्यकता आहे संदर्भातील उल्लेख येथे केला आहे.

सभापती महोदय, आपण वतन जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया सन 2002 मध्ये अत्यंत सुटसुटीत केली आहे. अनुसूचित जातीच्या व्यक्तींच्या हिताच्या रक्षणासाठी व त्यांची महार वतन जमिनीच्या बाबत फसवणूक टाळण्याकरिता विभागीय आयुक्तांच्या मान्यतेने जिल्हाधिकाऱ्याने मान्यता द्यावी अशा प्रकारची तरतूद केलेली आहे. आदिवासींच्या जमिनीची पॉवर ऑफ ॲटर्नी घेऊन किंवा डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट करून हक्क घेण्याचे प्रकार उघडकीस आलेले आहेत. कोणला अशा प्रकारचे हक्क पाहिजे असतील तर ते शासनाच्या मान्यतेने घेता येतील अशा प्रकारचा बदल आपण अलीकडे केलेला आहे. अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या बाबतीत असे घडत असेल तर तसा बदल करण्यासंबंधीचा विचार आम्ही निश्चितपणे करू हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. हस्तांतरणासंबंधी सर्वंकष अभ्यास करण्यासाठी निवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री.गवई यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीचा अहवाल अद्याप आलेला नाही. त्यास गती देण्यासंबंधीचा प्रयत्न निश्चितपणे करण्यात येईल हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी गायरान जमीन अनुसूचित जातीसाठी देणार काय, अशा प्रकारचा उल्लेख भाषणात केला आहे. आपला 1991 सालातील एक जीआर आहे. 1991 पूर्वीची अतिक्रमणे नियमित कशी करता येतील यासंबंधीचा उल्लेख त्यामध्ये आहे. ते अभ्यासू सदस्य आहेत. त्यामुळे त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, दिनांक 12 जुलै 2011 रोजीच्या जी.आर.चा त्यांनी अभ्यास करावा. हा जी.आर. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये कोणते हस्तांतरण करता येईल व कोणते करता येणार नाही हे नमूद केले आहे. गायरान जमिनीसंबंधी खूप निर्बंध सुप्रीम कोर्टाच्यावतीने आलेले आहेत. त्याला अनुलक्षून सध्या काम केले जात आहे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय आल्यामुळे बंधने आलेली आहेत. यातील काही बाबी ह्या अनुसूचित जातीच्या मदतीसाठी देखील आलेल्या आहेत. एवढा खुलासा करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) :सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव आणला आहे. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य ॲड.जयदेवजी गायकवाड, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, सुभाष चव्हाण, भाई गिरकर, प्रकाश बिनसाळे, ॲड.आशिष शेलार, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, प्रा.सुरेश नवले, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

सभापती महोदय, येथे कोकण विकास कार्यक्रमावर प्रामुख्याने चर्चा झाली आहे. कोकण विकास कार्यक्रमाला 2009 मध्ये मंजुरी देण्यात आली आहे. साधारणत: पाच हजार कोटी रूपयाच्यावरील कार्यक्रम शासनाने मंजूर केलेला आहे. मला सांगताना आनंद होतो की, कोकणाच्या विकासाकडे राज्य शासनाने पूर्ण ताकदीने लक्ष दिले आहे. मागील तीन वर्षात 4200 कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत. पर्यटन, पायाभूत सुविधा या सर्वांवर निधी खर्च करण्याचा राज्य शासनाने प्रयत्न केला आहे. शासनाच्या प्लॅन, नॉन प्लॅन, जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून विकास कार्यक्रमावर पैसा खर्च करण्यात आलेला आहे. हा 5311 कोटी रूपयांचा प्लॅन होता. पर्याटनावर 150 कोटी, पर्यावरणावर 3.60 कोटी, गृह आणि बंदरे यावर 67 कोटी, साकव बांधकामावर 201 कोटी, जलसंपदा विभागाच्या कामावर 1243 कोटी रूपये खर्च करून 4328 कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत.

तालिका सभापती : सभागृहाची वेळी दहा मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक . . . .

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी चांगल्या सूचना केल्या.त्यांनी या चर्चेच्या माध्यमातून अनेक विषय मांडले. त्यांनी अशी विचारणा केली की, शासन सीआरझेड बाबत काय निर्णय घेणार आहे? पर्यटनाच्या माध्यमातून महाराष्ट्राची जी कोस्टल लाईन आहे त्यामध्ये प्रामुख्याने कोकणाचा भाग पूर्णपणे येतो आणि सीआरझेड चे काही विषय आहेत यासंदर्भात त्यांनी काही सूचना केल्या. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडे दि. 6-1-2000 च्या सूचनेनुसार सीआरझेडच्या क्षेत्रात 1 टू 4 भागात वर्गीकरण करण्यात आले. सीआरझेड-2 या क्षेत्रात समुदाच्या उच्चतम भरती रेषेपासून हाय टाईड लाईनपासून जमिनीकडील 200 मी.पर्यंत हॉटेल व बीच रिसोर्टचे बांधकाम अनुज्ञेय करण्यात आले.

सभापत महोदय, कोकणातील पिकांवर प्रक्रिया करण्याच्या संदर्भात त्यांनी उल्लेख केला. उदाहरण द्यावयाचे तर आंबा, काजू यावर प्रक्रिया करण्याबाबत उल्लेख केला. कोकणामध्ये 19 कृषी प्रक्रिया सहकारी संस्था परिपूर्ण करुन प्रस्ताव सादर केलेला आहे आणि संस्थांना 11 कोटी रुपये सदरहू प्रक्रिया करण्यासाठी देण्यात आले आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विमानतळाच्या बाबतीत उल्लेख केला. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये चिपी-परुळे ता.वेंगुर्ले याठिकाणी विमानतळाचे बांधकाम बी.ओ.टी.तत्वावर देण्यात आले आहे. मेसर्स सिंधुदुर्ग एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड या विमानतळाचे काम दि.19-2-2013 पासून सुरु करण्यात आले.सन्माननीय सदस्यांनी आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे साहेबांनी कोकणासंबंधी काही चांगल्या सूचना केल्या. त्याबाबतीत सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश बिनसाळे साहेब, सुभाष चव्हाणजी यांनी देखील सूचना केल्या. राज्य शासनाचा निश्चितपणे हा विचार आहे की, येणाऱ्या काळामध्ये संपूर्ण देशामध्ये सर्वात चांगली आणि पूर्णपणे डेव्हल्प झालेली कोस्टल लाईन ही महाराष्ट्रातील कोकणामध्ये असेल. मी आपल्याला सांगू इच्छितो की, एवढी चांगली कोस्टल लाईन या देशामध्ये कुठेच नाही. यामुळे आपण मुंबई पासून 15 मिनिटांमध्ये कोकणामध्ये पोहचू शकतो इतकी ही कोस्टल लाईन आपल्याला जवळ आहे. जर आपण गेटवे पासून स्पीड बोट घेतली तर साधारणत:15 मिनिटांमध्ये ही कोस्टल लाईन सुरु होते आणि ती अलिबाग पासून थेट गोव्यापर्यंत जाणारी आहे.म्हणून चांगली फाईव्ह स्टार, सेव्हन स्टार कॅटॅगरीतील हॉटेल्स् तेथे यावीत, तेथील पायाभूत सुविधा चांगल्या व्हाव्यात, रस्त्याचे

2 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

चौपदरीकरण व्हावे आणि पर्यटनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा तेथे निर्माण करु या. संदर्भात सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी अनेक सूचना केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे साहेब, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी तर अत्यंत चांगल्या सूचना केल्या आहेत.

सभापती महोदय, काही नवीन पध्दतीने आपण तेथे कशा प्रकारची डेव्हलपमेंट करु शकतो, आकर्षण कसे निर्माण करु शकतो आणि पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणामध्ये आपण रेव्हेन्यू कसा जनरेट करु शकतो आणि त्या भागामध्ये लोकांना रोजगार कसा उपलब्ध करता येईल यासंदर्भात त्यांनी सूचना दिल्या आहेत. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.17 चे चौपदरीकरण करण्याच्या संदर्भात येथे उल्लेख करण्यात आला. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.17 ची एकूण लांबी साडेचारशे कि.मी. आहे. त्यापैकी पळस्पे ते इंदापूर या 84 कि.मी.लांबीच्या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच झारप ते पत्रादेवी म्हणजे गोव्याच्या हद्दीपर्यंत या रस्त्याच्या लांबीचे चौपदरी करणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. इंदापूर ते झारप या 360 कि.मी.च्या चौपदरीकरणाच्या कामाच्या संबंधातील सुसूत्रता अहवाल केंद्र शासनाकडे दिनांक 16-10-2005 रोजी सादर करण्यात आला आणि केंद्र शासनाकडून मंजुरी आल्यावर हे काम आपण हाती घेणार आहोत.

सभापती महोदय, याठिकाणी सिंचनाच्या प्रकल्पाबाबत देखील उल्लेख करण्यात आला. सिंचनाचे जे मंजूर प्रकल्प आहेत, ते वेगाने पाहिजेत म्हणून केंद्र शासनाची ए.आय.बी.पी.ची योजना असेल किंवा राज्य शासनाच्या स्वत:च्या पूल मधील पैसा असेल, अशा सर्व निधीच्या माध्यमातून प्रकल्प पूर्ण करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक...

सभापती महोदय, कोयना धरणातील पाणी समुद्राला मिळू नये याकरिता ते पाणी बंधारे किंवा इतर माध्यमांतून अडवून मुंबईत कसे आणता येईल व त्यातून सिंचनाची व्यवस्था कशी करता येईल या संदर्भात सर्व्हे करण्यात आलेला आहे. सॅटेलाईट सर्व्हेच्या माध्यमातून डाटा उपलब्ध झालेला आहे.

सभापती महोदय, कोकण विकासाचे 1900 कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत. मी आपल्या माध्यमातून सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हे सर्व पैसे खर्च करण्यासाठी शासन कटिबध्द आहे. या आर्थिक वर्षामध्ये विविध स्त्रोतांतून खर्च करुन कोकणचा विकास करण्यात येईल एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम व सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आदिवासी विकास विभागासंबंधी काही मुद्दे उपस्थित केले.

सभापती महोदय, सन 1993-94 पासून आदिवासी विकास विभागासाठी स्वतंत्र निधी देण्यास सुरुवात झाली. लोकसंख्येच्या प्रमाणात या विभागाला निधी मिळालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आदिवासी विकास विभागाचा निधी अन्यत्र वळविण्यात आला. परंतु तसा प्रकार झालेला नाही. आदिवासी विकास विभागाची तरतूद कमी झालेली नाही. मागील तीन वर्षात आदिवासी विकास विभागाने 97 ते 98 टक्के निधी खर्च केलेला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी आश्रमशाळांचा उल्लेख करण्यात आला. शासनाने वेगवेगळ्या योजना राबविल्यामुळे तसेच आश्रमशाळा आणि वसतिगृहे सुरु केल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या 18 लाख 46 हजारांवर गेली आहे. त्यांना व्यवस्थित शिक्षण देण्यात येत असून चांगल्या प्रकारे मदतही करण्यात येत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी खावटी कर्जाचा उल्लेख करण्यात आला. मागील तीन वर्षात शासनाने 9 लाख कुटुंबाना खावटी कर्जाचे वाटप केलेले आहे. ज्यांनी खावटी कर्ज देण्यास उशीर केलेला आहे त्यांना 30 लाख रुपयांचा दंड केलेला आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाला मिळणाऱ्या रकमेपैकी 60 टक्के रक्कम डीपीडीसीला देण्यात येते. त्याशिवाय अन्य 22 विभागांना निधी देण्यात येतो. आमच्याकडे वेगळी यंत्रणा नाही. शिक्षकांच्या जागा लवकर भरण्यात येतील. एवढे बोलून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय समाजकल्याण मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, अनुसूचित जाती उप योजनेतील अनुशेष 7 हजार कोटी रुपयांचा आहे. मागील दहा वर्षात ज्या ज्या विभागांनी हा निधी खर्च करणे अपेक्षित होते तो त्यांनी केलेला नाही. मी या ठिक्राणी जी माहिती दिली ती असत्य असेल तर आपण जे म्हणाल ते करायला माझी तयारी आहे. परंतु माझी माहिती खरी असेल तर आपण राज्य सरकारवर ॲट्रॉसिटी दाखल करणार काय ?

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी समाज कल्याण योजनां संबंधी जी माहिती दिली त्यामध्ये तथ्य असेल, परंतु माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार आपल्या विभागाकडून निधी मिळाल्यानंतर काही विभागांकडून तो निधी खर्च झालेला नाही. हा निधी 7 हजार कोटी रुपये आहे आणि शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेणाऱ्या राज्यातील हे वास्तव आहे.

सभापती महोदय, राज्यातील विविध विभागांमध्ये विशेष घटक योजना मान्य केली. त्यानंतर तो निधी खर्च व्हावयास पाहिजे तो झालेला नाही आणि तो अनुशेष 7 हजार कोटी रुपयांचा आहे असे माझे म्हणणे आहे. तेव्हा सेक्शन 3 नुसार शासनावर ॲट्रॉसिटी लागू करणार काय ?

सभापती महोदय, महार वतनाच्या किंवा आदिवासींच्या जमिनी डेव्हलपमेंट राईटस घेऊन मोठ्या प्रमाणावर विकसित होत आहेत. आदिवासींना काहीतरी तुकडा देऊन या जमिनी घेतल्या आहेत. डेव्हलपमेंट राईटस घेताना त्यामध्ये काही टक्के शेअर पार्टनरशीप आदिवासींना दिल्यास त्यांचे उत्थान होईल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आता विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. आदिवासी भागापर्यंत कन्स्ट्रक्शन, फॉर्महाऊसेस होत आहेत.

तालिका सभापती : सभागृहाची वेळ 5 मिनिटांनी वाढविण्यात येत आहे.

श्री.विनोद तावडे : महोदय, या निमित्ताने मी एवढेच विचारतो की, आपण विभागाची एखादी योजना घोषित करणार काय आणि मी सांगितलेल्या चार प्रकरणांची स्पेसिफिक चौकशी करणार काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, मी उत्तरामध्ये चार वर्षांची आकडेवारी टक्क्यानिशी सांगितली आहे. या अंतर्गत किती पैसे दिले आणि किती खर्च झाला याची माहिती मी दिलेली आहे. जो खर्च झालेला आहे तो नियमात झालेला आहे. तो खर्च नियमाच्या बाहेर जाऊन झालेला नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मॅजिक आकडा काढलेला आहे त्याची चौकशी करण्यात येईल. तसेच ॲट्रॉसिटी दाखल करण्याचा प्रश्नच येत नाही, एवढेच या निमित्ताने सांगतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, माझ्या विभागाशी संबंधित केवळ दोन मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पुण्यातील केसेस बाबतचा मुद्दा मांडला. त्याबाबत चौकशी केली जाईल. तसेच आमच्या विभागाने आदिवासींच्या विकास हक्कांवर काही बंधने घातल्याचे सांगण्यात आले. अनुसूचित जातीकरिता बंधन घालणे आणि त्यांचा हक्क ठेवून त्यांच्या हक्काचे आणि हिताचे रक्षण झाले पाहिजे या दृष्टिकोनातून आम्ही संशोधन करु व त्या अनुषंगाने आवश्यक ते बदल केले जातील..

तालिका सभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12 वाजून 35 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.26 ते 12.35 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

सभापती : आता दिनांक 16 एप्रिल, 2013 रोजी उत्तरीत झालेल्या यादीतील माननीय सभापतींच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक 38415 चर्चेला घेण्यात येईल.

सुपर स्पेशालिटी रुग्णालय (जि.अमरावती) येथील सरकारी अनुदानाचा गैरफायदा घेणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

(२) * ३८४१५ श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील सुपर स्पेशालीटी रुग्णालयामध्ये कार्यरत काही डॉक्टर सर्रास सरकारी अनुदान घेत असून छोटया छोटया ऑपरेशनासाठी लाखो रुपयांची बिले काढत असल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सरकारी अनुदान घेत असलेल्या डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कारवाई झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.सुरेश शेट्टी : (१) विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये अतिविशिष्ट वैद्यकीय सेवा देण्याकरिता नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध न झाल्यास कंत्राटी पध्दतीने या सेवा उपलब्ध करुन घेतल्या जातात. या सेवांसाठी दिनांक १८.९.२०१० च्या शासन निर्णयानुसार दर निश्चित करण्यात आले आहेत. या दरांनुसार विशेषज्ञांना मानधन दिले जाते.

तथापि, प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून, समितीच्या अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता प्र. क्र. 38415 ....

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये 50 हजार शस्त्रक्रियेचा रेकॉर्ड केल्याबद्दल सर्वप्रथम मी त्यांचे आणि शासनाचे अभिनंदन करु इच्छितो.

सभापती महोदय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या संदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आऊटसोर्सींग करण्याची आवश्यकता का भासली आणि असे धोरण प्रत्येक ठिकाणी करु इच्छिता त्याचे कारण काय आहे ? माझा दुसरा जो राज्यव्यापी परंतु गंभीर प्रश्न आहे त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. आज महाराष्ट्रामध्ये डॉक्टर्सची जेवढी आवश्यकता आहे त्यानुसार माझ्या माहितीप्रमाणे किमान 1450 डॉक्टर्सची आवश्यकता असताना आपल्याकडे त्यापैकी 850 पदे रिक्त आहेत. ती पदे भरण्यासाठी शासन प्रयत्नशील असेलही परंतु आज जी रिक्त पदे आहेत त्यामुळे ग्रामीण भागामध्ये योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम होत आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना शहरी भागामध्ये यावे लागत आहे. म्हणून मी या संदर्भात मूलभूत प्रश्न उपस्थित करीत आहे. मी माननीय आरोग्य मंत्र्यांचे अभिनंदनही केले आहे. त्यांनी या बाबतीत सकारात्मक भूमिका घेऊन या प्रश्नांची उत्तरे द्यावीत अशी विनंती करतो.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ज्या शस्त्रक्रिया करावयाच्या आहेत त्या आऊटसोर्सींगने का केल्या असा प्रश्न विचारलेला आहे. आपल्या राज्यात आपण 2006 मध्ये नाशिक आणि अमरावती येथे 2 सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करण्याचा निर्णय घेतला आणि ती हॉस्पिटल्स सुरु केली. पण तेव्हापासून त्या ठिकाणी आपण सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर्सची पदे निर्माणच केलेली नाहीत. त्यांचे रिक्रुटमेंट रुल्स केले नाहीत आणि त्यांची रिक्रुटमेंट केली नाही. म्हणून शासनाने असा निर्णय घेतला की, हे जे नेफ्रॉलॉजिस्ट, न्युरॉलॉजिस्ट, सिनिअर निओनेटल सर्जन, प्लास्टीक सर्जन ही पदे आपल्या शासनाच्या खात्यामध्ये एक्झिस्टींग नाहीत. त्यासाठी या दोन हॉस्पिटल्समध्ये हे डॉक्टर्स मानधनावर नेमून प्रत्येक शस्त्रक्रियेसाठी चार्जेस निश्चित केले होते. त्याप्रमाणे नाशिक आणि अमरावती या दोन्ही ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल्समध्ये शस्त्रक्रिया होत होत्या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/

ता. प्र. क्र. 38415 .... श्री. सुरेश शेट्टी .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न रिक्त पदांच्या संदर्भात विचारलेला आहे. तो विषय या प्रश्नाशी संबंधित नाही तरी सुध्दा मी सांगू इच्छितो की, आपण भरती प्रक्रिया चालूच ठेवत आहोत. प्रत्येक वेळी जेव्हा आपण जाहिरात देतो आणि जेवढ्या डॉक्टर्सना नेमणुका देता त्यापैकी फक्त 50 टक्के डॉक्टर्स रिपोर्ट करतात. दर सहा महिन्याने आपल्याला ही प्रक्रिया चालूच ठेवावी लागेल. आता सुध्दा स्पेशालिस्टच्या एका लॉटचे अपॉइन्टमेंट लेटर्स काढले, 500 नर्सेसचे अपॉन्टमेंट लेटर्स काढले तसेच एक दोन दिवसात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एक हजार पदांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभागाकडून परवानगी मिळणार आहे. ही पदे सुध्दा भरण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाशिक येथील जय आनंद अनाथ बालकाश्रमातील
मुलींचे शोषण होत असल्याबाबत

(२) अल्पसूचना प्र.क्र. ४१५२२ **डॉ. नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1) नाशिक पेठेरोडवरील तवली फाटा येथील जय कालिकामाता शैक्षणिक संस्था संचलित जय आनंद अनाथ बालकाश्रमातील 34 मुलींचे शोषण होत असल्यची घटना दिनांक 26 मार्च, 2013 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

2) असल्यास, या प्रकरणी पंचवटी पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे हेही खरे आहे काय,

3) असल्यास, या प्रकरणात आतापर्यंत किती जणांना अटक कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

4) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटीइल, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता : 1), 2) व 3) होय. सदर प्रकरणी दि. 25.3.2013 रोजी पंचवटी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.117/2013, भा.दं.वि.कलम 354(अ)(1)(2), 354(क), 506, 323 सह लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, 2012 चे कलम 9(ड), 10, 12, 17 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात 5 आरोपींना अटक केली असून ते 25.4.2013 पावेतो न्यायालयीन कोठडीत आहेत.

4) प्रश्न उदभवत नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, राज्यामध्ये ज्या घटना घडतात त्यामध्ये नाशिकमध्ये तवलीफाटा येथील 34 मुलींनी या संदर्भात जी तक्रार केलेली आहे त्यामध्ये गेले अनेक महिने हा प्रकार चालू होता.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पसूचना प्र.क्र.41522.... डॉ.नीलम गोऱ्हे.....

या घटनेत बलात्कार झाला नाही ही चांगली गोष्ट आहे. परंतु यामध्ये संस्थेची जबाबदारी काय आहे ? जेथे निवासी संस्था आहेत तेथे पोलीस स्टेशनशी संलग्न दक्षता समित्या आहेत. त्या दक्षता समित्यांमध्ये स्वयंसेविका चांगले काम करीत असल्याचा रिपोर्ट आहे. दक्षता समितीमार्फत निवासी संस्थांमधील मुलींच्या काही तक्रारी आहेत काय, विशाखा समिती स्थापन झालेली आहे काय याची तपासणी केली आहे काय, तेथे महिला अधीक्षिकांची नेमणूक केली आहे काय ? यासंबंधी संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला जाईल काय ? या केसमधील आरोपींना पकडले असले तरी संस्था चालकांनी जो खुलासा केला आहे त्यात काय नमूद केले आहे ? खरे तर संस्था चालकांच्या संरक्षणामुळेच हे आरोपी मुलींना उघड्यावर आंधोळ करण्यास भाग पाडत होते. बाथरुममध्ये डोकावून बघत होते. ह्याबाबत तक्रारी करुनही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. या प्रकरणी वेळ पडल्यास संस्था चालकांनाही सहआरोपी करावे. या दृष्टीने शासन काही पावले उचलेल का ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, संबंधित खात्याच्या अंतर्गत हे हॉस्टेल येते त्यांना निश्चितपणे सूचना देण्यात येतील. ज्या आरोपींची नावे समोर आलेली आहेत. त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेला आहे. काही सहआरोपी केलेले आहेत. जेथे संस्था चालकांचा सहभाग दिसून आलेला आहे त्याबाबत त्यांच्यावर कारवाई केलेली आहे आणि अजूनही त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका घेतली जाईल.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

मुंबईतील वडाळा येथील जे.के.नॉलेज सेंटर मधील शिक्षकांनी विद्यार्थीनींशी केलेले गैरवर्तन

(1) * 38118 **श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रमेश शेंडगे, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्रीमती अलका देसाई, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील वडाळा येथील जे.के.नॉलेज सेंटर मधील शिक्षकांनी विद्यार्थीनींशी अश्लील चाळे तसेच जुन्या शिक्षकांवर अन्याय केल्याप्रकरणी तीन शिक्षकांना पोलिसांनी माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान अटक केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1), (2) व (3) दिनांक 08/01/2013 रोजी पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून वडाळा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.05/2013 भा.दं.वि. कलम-354, 509, 323, 506, 34 प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्ह्यातील 3 आरोपींना त्याच दिवशी अटक करण्यात आली असून ते सध्या जामिनावर मुक्त आहेत. गुन्ह्याच्या तपासात दि. 19/2/2013 रोजी प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्स्युअल ऑफेन्सेस ॲक्ट 2012 नुसार कलम-8 व 12 हे वाढविण्यात आले आहे. तसेच अटक आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच जुन्या शिक्षकांवर अन्याय केल्याप्रकरणी कोणतीही तक्रार नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर विषय आहे. वडाळा पूर्व येथील बी.पी.टी.वसाहतीत ग्रामीण पुनर्वसन संस्था चालवित असलेली जे.के.नॉलेज सेंटर ही शाळा आहे. ही शाळा विना अनुदानित आहे. या शाळेतील जवळजवळ 9 मुलींना व 6 मुलांना वर्गात कोंडून ठेवले होते. या संदर्भात विद्यार्थ्यांच्या पालकांनी तक्रार केल्यानंतर हे प्रकरण बाहेर आलेले आहे. लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, फिर्यादीवरुन वडाळा पोलीस ठाण्यामध्ये या प्रकरणी संबंधितांविरुध्द कलमे लावून गुन्हा नोंदविलेला आहे. परंतु या प्रकरणी या लोकांवर कलमे लावून काहीही होणार नाही. हे लोक आता जामिनावर सुटलेले आहेत. त्यांना जामीन मिळू नये यासाठी शासनाने काही तरी करावयास पाहिजे होते. या प्रकरणात केवळ शिक्षकच सामील आहेत असे

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही तर अनेक संशयित सुध्दा सामील आहेत. त्यात संस्था चालकांचाही समावेश आहे. हे सर्व प्रकरण संशयास्पद आहे. पोलिसांनी हे प्रकरण नीट हाताळल्याचे निष्पन्न झाले आहे काय ? त्या शाळेत अनेक गैरप्रकार चालू असल्यामुळे शासन ती शाळा ताब्यात घेईल काय ? संस्था चालकांची नीट चौकशी करुन त्यांच्यावर आरोपपत्र दाखल केले जाईल का ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी तक्रार आल्यानंतर संबंधितांवर गुन्हा दाखल केलेला आहे, त्यांना अटकही केलेली आहे. त्या लोकांना कोर्टाने जामीन दिला असला तरी त्यांना शिक्षा होण्यासाठी नवीन कायद्यातील कलमे लावलेली आहेत. संस्था चालकांचा यामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले तर त्यांच्यावरही कारवाई करण्याची भूमिका घेतली जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मुलींच्या संदर्भात एवढे गंभीर आरोप झालेले असताना त्या आरोपींना तुरुंगात ठेवलेले नाही. इतर प्रकरणांमध्ये आरोप नसताना संबंधितांना तुरुंगात ठेवले जाते. पोलिसांनी हे प्रकरण कमकुवत केल्यामुळे या आरोपींना लगेच जामीन मिळालेला आहे. पोलिसांनी त्यांना जामीन न मिळण्याची दक्षता का घेतली नाही आणि संचालकांना सहआरोपी केले जाईल काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी भा.दं.वि.कलम 354, 509, 323, 506 व 34 अंतर्गत गुन्हा नोंदविलेला आहे. तसेच प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्स्युअल ऑफेन्सेस ॲक्ट, 2012 या कायद्यातील कलमेही लावलेली आहेत. त्यामुळे पोलिसांनी तपासामध्ये कमतरता ठेवली आहे असे निष्पन्न होत नाही. संस्था चालकांचा सहभाग दिसून आला तर निश्चितपणे त्यांच्यावरही कारवाई केली जाईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : या गुन्ह्यामध्ये अटक झालेल्या आरोपींची नावे काय आहेत ? आरोपपत्र दाखल झाल्यानंतर आरोपींना केव्हा अटक करण्यात आली ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : मदन पांडुरंग कुळेकर, दीपक पोपटराव आवारे, किशोर बाळगर अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. दुपारी 4.00 वाजता गुन्हा दाखल झाल्यानंतर सायंकाळी त्यांना अटक करण्यात आली. या तिघांनाही संस्थेने सेवेतून मुक्त केलेले आहे.

श्री. हेमंत टकले : अशा प्रकारे शिक्षण संस्थांमधील शिक्षक विद्यार्थीनींशी अश्लील चाळे करतात, त्यांच्यावर आरोपपत्र दाखल होते, आरोपींना जामीन मिळतो, जामिनावर आरोपी मुक्त होतात. ते जामिनवर सुटल्यानंतर बाधित विद्यार्थीनींवर किंवा पालकांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते. या गुन्ह्याचा तपास महिला पोलीस अधिका-याकडून करण्यात आला होता काय ? या घटनेची वस्तुस्थिती योग्य प्रकारे समजून घेऊन पोलीस खात्यामार्फत जे आरोपपत्र दाखल केले गेले आहे ते दाखल करताना जी कलमे लावलेली आहेत त्यामध्ये जामीन न मिळण्याची कलमे लावलेली होती काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : नवीन कायद्याप्रमाणे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. जामीन कोर्टातून मिळालेला आहे. साक्षीदारावर दबाव येऊ नये याची दक्षता निश्चितपणे घेण्यात येईल.

ॲड. आशिष शेलार : प्रश्न गंभीर आहे. या प्रकरणी दोषारोपपत्र दाखल झालेले आहे. चार्जशीट झालेली अहे. हा कंटिन्युअस ऑफेन्स होऊ शकतो. या प्रकरणी अेसीपी प्रोसिडिंग्ज सुरु करण्यात येणार आहे काय ? संस्थाचालक सह आरोपी असतील तर त्यांनी पोलीस स्टेशनला हजेरी लावावी अशा प्रकारचा अर्ज कोर्टासमोर करण्यात येईल काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : या गुन्ह्याच्या बाबतीत जी काही कलमे लावायला पाहिजेत ती सर्व कलमे लावलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे आवश्यकता वाटली तर ती देखील कारवाई करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड : अशाच प्रकारचा अल्पसूचना प्रश्न या ठिकाणी चर्चिला गेलेला आहे. गेल्या काही दिवसापासून विद्यार्थीनींशी गैरप्रकार करण्याचे प्रकार राज्यभर वाढत आहेत. शिक्षण संस्था त्यांचे नाव टिकविण्यासाठी शिक्षकांना पाठीशी घालतात. नाशिकमध्ये तीन महिन्यापूर्वी एका शिक्षण संस्थेतील शिक्षकाने विद्यार्थीनीशी गैरवर्तन केले. त्या शिक्षकाची बदली मुलींच्या दुस-या शाळेत केली. ही घटना टीव्हीवर देखील दाखविली गेली होती. त्या शिक्षकाची केवळ बदली केली. माझा प्रश्न असा आहे की, या प्रकारणी पोलिसांना सूचना देऊन अशा शिक्षकाला संस्थेतून निलंबित करण्याचे आदेश शिक्षण संस्थेला देण्यात येतील काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : जेव्हा तक्रारी येतात त्यावेळी पोलीस कारवाई करीत असतात. अशा प्रकारची घटना समोर आली तर पोलीस कारवाई करायला कुठेही कमी पडणार नाहीत.

श्री. रमेश शेंडगे : वडाळा (पूर्व) येथील बीपीटी वसाहतीमध्ये भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेची ही विनाअनुदानित शाळा आहे. त्या शाळेमध्ये इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतचे सहा वर्ग आहेत. तीन शिक्षकांनी विद्यार्थीनीवर अन्याय आणि अत्याचार केलेला आहे. या संस्थेच्या संचालकांना सहआरोपी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. तसे दिसून आले तर त्यांना सहआरोपी करायला पोलीस कमी पडणार नाहीत.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शिक्षणासाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, शिक्षकांकडून विद्यार्थीनींवर होणाऱ्या अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत आहे ही दुर्दैवी गोष्ट आहे. शिक्षकांना गुरु म्हटले जाते. पूर्वीच्या काळात शिक्षकांकडून विद्यार्थीनींवर वाईट नजर ठेवली जात नव्हती. आता घडणाऱ्या घटना बघितल्यानंतर मुली शाळेत सुध्दा सुरक्षित नाहीत हे स्पष्ट होते. या संदर्भात शासनाने कडक उपाययोजना करणे आवश्यक आहे. डी.एड, बी.एड अभ्यासक्रमाच्या माध्यमातून चारित्र्यसंपन्न शिक्षक घडविण्यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, समाजामध्ये शिक्षकाला आदराचे स्थान असते. शिक्षकांकडून किमान अशा गोष्टी घडू नयेत अशी समाजाची अपेक्षा असते. ज्यावेळी अशा घटना घडतात त्याची दखल घेऊन त्वरित कारवाई केली जाते. शिक्षण खात्याला विनंती करण्यात येईल की, अशा पध्दतीचे सेन्सेटायझेशन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बावी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील तरुणीवर बलात्कार केल्याप्रकरणी आरोपी व दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(२) * ३७९१४ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.विनायक राऊत : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील तरुणीवर दिनांक २८ ऑगस्ट, २००६ रोजी वा त्या सुमारास बलात्कार करणारा आरोपी किशोर माणिक लवटे व या प्रकरणातील दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व अध्यक्ष, स्त्री आधार केंद्र यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर. पाटील : (१) होय.

(२) दिनांक २९/४/२००८ रोजी फिर्याद दिल्यामुळे उस्मानाबाद शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २००८/१२३.भा.दं.वि.कलम-५०६, ३२३, ५०४, (१) ३७६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्यातील आरोपीने मा. उच्च न्यायालयातून अटकपूर्व जामीन घेतल्यामुळे त्यास दि.२१/६/२००८ रोजी अटक करुन तपास करण्यात आला तसेच गुन्ह्याचे तपासाअंती त्याच्याविरूध्द उस्मानाबाद येथील मा. न्यायालयात (Fast Track Court) दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. आरोपीस सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणातील तत्कालीन तपास अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पीडित मुलगी एमपीएससीच्या परीक्षेला बसली असून ती द्विपदवीधर आहे. २००८ साली घडलेल्या घटनेबाबतची केस फास्ट ट्रॅक कोर्टात पाठवून २०१३ सालात देखील प्रलंबित आहे. स्लो लोकल ट्रेनप्रमाणे कारभार सुरु आहे. तक्रार नोंदवायला विलंब झाला. २००७ मध्ये घटना घडली असली तरी २००८ मध्ये तक्रार नोंदविली होती. गृह विभागाचे वडजे नावाचे जे पोलीस अधिकारी आहेत त्यांनी आरोपीची गडचिरोली येथे उप निरीक्षक या पदावर बदली केली. त्यामुळे पीडित मुलीला गडचिरोलीला जाऊन गुन्हा नोंदविण्यास सांगण्यात आले. या महिलेसह मी स्वत: माननीय गृहमंत्र्यांची भेट घेतली होती. ही मुलगी गडचिरोली येथे गुन्हा नोंदविण्यास गेली असता तिला उस्मानाबाद येथे जायला सांगितले. उस्मानाबाद येथे श्री.दत्तात्रय मंडलिक यांच्यापुढे तिने तक्रार मांडल्यानंतर एफआयआर नोंदविला गेला. तक्रार नोंदविण्यास विलंब का होतो हे मंत्री महोदयांनी लक्षात घेतले पाहिजे. मुलीकडून तक्रार नोंदविण्यास विलंब व्हावा म्हणून ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी चुकीचे वर्तन केले त्यांच्याविरुध्द काय कारवाई केली? तिला पुण्याला केस ट्रान्सफर करुन पाहिजे, त्याची वास्तविकता काय आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संपूर्ण घटना लक्षात घेतली तर असे दिसून येईल की, आरोपी किशोर लवटे आणि ही मुलगी एकत्रितपणे बार्शी येथे एमपीएससीच्या परीक्षेचा अभ्यास करायचे. दोघांनी एकमेकांना आणाभाका दिल्या किंवा लग्नाचे आमिष दाखविले. त्याच्यातून त्यांच्यात शारीरिक संबंध जुळून आले. लग्न करायचे नाही हे ऐकल्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून बळजबरीने बलात्कार केल्याची तक्रार दोन वर्षानंतर दाखल करण्यात आली. दोन वर्षानंतर तक्रार आल्यानंतर पोलिसांनी तपास काय करायचा, कसा करायचा हा प्रश्न निर्माण झाला. फसवणूक नक्की झाली आहे. लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केला असेल किंवा शारीरिक संबंध ठेवले म्हणून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या त्या मुलीला घेऊन मला भेटल्या होत्या. त्यांच्या सूचनेप्रमाणे या केसमध्ये सरकारकडून वकील देण्याची भूमिका घेतली असून केस फास्ट ट्रॅक कोर्टात पाठविली आहे. आता ती केस उस्मानाबाद येथून पुण्याला ट्रान्सफर करावी अशी विनंती केली आहे. कोर्टाच्या मान्यतेनेच याचा निर्णय करावा लागेल. ही बाब सरकारच्या अधिकारात नाही. वर्ष दोन वर्षानंतर लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केला अशी तक्रार आल्यामुळे तपास करण्यामध्ये विलंब झाला. फास्ट ट्रॅक कोर्टात केस पाठविली आहे, त्यात कसूर ठेवलेली नाही.

नंतर २आय.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 37914.....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, लग्नाचे आश्वासन देऊन महिलांची फसवणूक केली जाते. या प्रकरणामध्ये या महिलेला गडचिरोली येथे न पाठविता फसवणुकीचा गुन्हा नोंदवावयास पाहिजे होता. कायद्याने लग्नाचे आश्वासन देऊन फसविण्याला परवानगी दिलेली नाही. या महिलेने बलात्काराची केस नोंदविल्यानंतर त्यासंदर्भातील साक्षी पुरावे तपासून संबंधित महिलेची फसवणुकीची तक्रार नोंदवून घ्यावयास पाहिजे होती. उलट पोलिसांनी या प्रकरणात फसवणुकीची सुध्दा तक्रार नोंदवली नाही त्यामुळे बलात्काराची केस नोंदवून घेण्याचा प्रश्नच येत नाही. श्री. वडजे यांनी या महिलेला गडचिरोली येथे पाठविले होते त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात ? तसेच या प्रकरणात ज्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केलेली आहे त्यांच्यावर तुम्ही कोणती कारवाई करणार आहात ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, एक दोन वर्ष शारिरिक संबंध आले असतील, त्यांचे लग्नाचे ठरले असेल आणि त्यामध्ये कोणी तक्रार करण्यासाठी आले असेल तर पोलीस मानवतेच्या दृष्टिकोनातून सांगत असतात की, "तुमचे काही मिटते आहे का, लग्न जमते का"? अशा प्रकारे जर पटकन ॲरेस्ट केले तर होणारे लग्न सुध्दा तुटून जाईल. पोलिसांनी यासंदर्भात प्रयत्न केले म्हणजे पोलिसांनी चूक केली असा त्याचा अर्थ होत नाही. या केसमध्ये या महिलेने मला तक्रार करावयाचीच आहे अशी भूमिका घेतली त्यावेळेस पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा नोंद केला आहे. ज्या ज्या ठिकाणी बलात्कार केला म्हणून सांगण्यात आले त्या त्या ठिकाणी तपासणी केली गेली आहे. लॉजमध्ये सुध्दा तपास करण्यात आला. खरे म्हणजे हे सर्व संमतीनेच झाले होते. परंतु आता ही केस बलात्कारात कन्व्हर्ट करुन फास्ट ट्रॅक कोर्टात पाठविलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे सदोबा सावळी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाबाबत

(३) * ३७२३७ श्री.संदिप बाजोरिया, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सदोबा-सावळी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील रस्त्याच्या डांबरीकरणाचे सुमारे ९९० लक्ष रुपयाचे काम ६० किलोमीटरच्या आत असताना कंत्राटदाराने आपला हॉट मिक्स प्लँट ६० किलोमीटरच्या रेंजमध्ये शिफ्ट न केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री. छगन भुजबळ यांच्या करिता : (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती यांनी चौकशी केली आहे.

सदर चौकशीमध्ये संबंधित कंत्राटदार दोषी आढळून आल्याने त्यांच्यावर प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

श्री. संदिप बाजोरिया : सभापती महोदय, मी जो पहिला प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे उत्तरच देण्यात आलेले नाही. मी पहिल्या प्रश्नात हॉट मिक्सचा प्लँट शिफ्ट केला आहे काय असा प्रश्न विचारला होता परंतु विभागाकडून असे उत्तर देण्यात आले आहे की, "चौकशी केली असून चौकशीत दोषी आढळले". असे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यामुळे हॉट मिक्सचा प्लँट शिफ्ट केला आहे की, नाही एवढे सांगितले असते तरी योग्य झाले असते. कार्यकारी अभियंता श्री. धोत्रे यांनी आम्हाला माहितीच्या अधिकारात "सदर हॉट मिक्स प्लँट शिफ्ट झाला आहे" अशी माहिती दिलेली आहे. परंतु २९ ऑक्टोबरला त्यांच्याच उप विभागीय अधिकाऱ्याने सांगितले आहे की, हे प्लँट अद्यापही शिफ्ट झालेले नाही. त्यामुळे चुकीची माहिती दिलेल्या कार्यकारी अभियंत्यांची चौकशी करुन त्याला निलंबित केले जाणार आहे काय ? चौकशीमध्ये काय आढळून आले ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, जेव्हा वर्क ऑर्डर दिली जाते तेव्हा ६० कि.मी.च्या परिसरात हॉट मिक्सचा प्लँट असणे आवश्यक असते. असे झाले नाही तर अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट घेऊन एक महिन्याच्या आत हॉट मिक्सचा प्लँट शिफ्ट केला पाहिजे. जेव्हा आपण रस्त्याच्या डांबराचे काम करतो तेव्हा ते डांबर गरम रहावे यासाठी ६० कि.मी.च्या परिसरात हॉट मिक्सचा प्लँट ठेवत असतो. या प्रकरणामध्ये हॉट मिक्सचा प्लँट शिफ्ट झाला नव्हता, बाजूच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : ३७२३७ .....

श्री. रणजित कांबळे.....

ठिकाणी काम सुरु असल्यामुळे प्लँट शिफ्ट करण्यामध्ये विलंब झालेला आहे. कार्यकारी अभियंत्यांनी संबंधितांकडून सिक्युरिटी डिपॉझिट घेतले होते.

या कामामध्ये दोन मोठे पूल, आठ मोरी तसेच रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाचाही समावेश होता. या कामामध्ये हॉट मिक्सच्या प्लँटचा काही एक संबंध नसतो अगोदरचे काम सुरु झाले होते. खरे म्हणजे हॉट मिक्सचा हा प्लँट शिफ्ट व्हावयास पाहिजे होता परंतु यामध्ये फक्त ५ कि.मी.चे जास्त अंतर होते. प्लँट शिफ्ट करण्यामध्ये विलंब झाला यामध्ये दुमत असण्याचे काहीच कारण नाही. हा प्लँट एक महिन्याच्या आतमध्ये शिफ्ट व्हावयास पाहिजे होता परंतु एक महिन्याच्या आत हा प्लँट शिफ्ट झाला नाही ही वस्तुस्थिती आहे. जे काम प्रगतीपथावर होते त्या कामाचा आणि हॉट मिक्सचा प्लँटचा काही एक संबंध नसल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात आली नाही. या शिवाय या ठिकाणी बायपासचे काम सुरु होते. हॉट मिक्सच्या प्लँटच्या परिसराची जी मर्यादा आहे त्यामध्ये केवळ ५ कि.मी.अंतराचाच फरक येत होता त्यामुळे यासंदर्भात कारवाई करण्यात आली नव्हती. परंतु आता हॉट मिक्सचा प्लँट शिफ्ट करण्यात आलेला असून संबंधितांनी बिटमेनचे काम सुरु केले आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, "संबंधित कंत्राटदार दोषी आढळून आले आहेत, त्यांच्यावर प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे". त्यामुळे सदर कंत्राटदारावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, यासंदर्भात आपण ॲडिशनल ५ लाख रुपये अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉजिट घेत असतो. ठरलेल्या वेळेत हॉट मिक्सचा प्लँट शिफ्ट झाला नाही तर ॲडिशनल सिक्युरिटी डिपॉझीट जप्त केले पाहिजे होते. परंतु ॲडिशनल सिक्युरिटी डिपॉझीट वेळेवर जप्त न केल्यामुळे संबंधितांवर ॲक्शन घ्यवयाची होती आता ॲडिशनल सिक्युरिटी डिपॉजीट जप्त करण्यात आलेले आहे.

श्री. संदिप बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चुकीचे उत्तर दिलेले आहे. हॉट मिक्स प्लँट कशासाठी लावायचा आहे हे मी विचारलेच नव्हते तर हा प्लँट शिफ्ट का केला नाही असा प्रश्न मी विचारला होता. यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37237.....

श्री.संदीप बाजोरिया....

सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी मोघम उत्तर दिलेले आहे. हॉटमिक्स प्लांट शिफ्ट झालेला नाही तर मग डांबरासाठी रूपये 68 लाख काम सुरू न करता कसे काय दिले आहेत, असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. हा कंत्राटदार दोषी आढळलेला आहे. त्याचे डिपॉझिट जप्त का करण्यात आले नाही ? त्या कार्यकारी अधिकाऱ्याची शासन उच्चस्तरीय चौकशी करणार आहे काय ? त्या ठेकेदाराला आपण काळ्या यादीमध्ये का समाविष्ट करत नाही ? त्याचे आणि अधिकाऱ्याचे काही संबंध आहेत काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील प्रत्येक तालुक्यात महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत

(4) * 37348 श्री.दिपकराव साळुंखे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात महिलांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराबाबत प्रत्येक तालुक्यात तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याचा निर्णय शासनामार्फत माहे जानेवारी, 2013 च्या दुसऱ्या सप्ताहात घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर निर्णयानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) व (2) राज्यात महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराबाबत प्रत्येक तालुक्यात तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे नाही.

परंतु पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. 03/10/2012 च्या परिपत्रकान्वये प्रत्येक पोलीस स्टेशनला महिला पोलीस कक्ष स्थापन करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सध्या 925 पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष स्थापन केले असून, उर्वरित ठिकाणी महिला पोलीस कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. 03/10/2012 च्या परिपत्रकान्वये प्रत्येक पोलीस स्टेशनला महिला पोलीस कक्ष स्थापन करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सध्या 925 पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष स्थापन केले आहेत असे उत्तरात नमूद केले आहे. सदर महिला पोलीस कक्ष कोणत्या जिल्ह्यांमध्ये स्थापन केले असून सोलापूर जिल्ह्यातील कोणकोणत्या तालुक्यांमध्ये महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आले आहेत ? सदरील महिला पोलीस कक्ष कर्मचाऱ्यांची नियुक्ती कशा प्रकारे केली आहे, सदर कर्मचाऱ्याने कोणकोणती कामे करणे आवश्यक आहेत ? असे माझे स्पेसिफिक प्रश्न आहेत.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, 925 पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये आपण महिला पोलीस कक्ष स्थापन केले आहेत. सोलापूर आयुक्तालयात 7 ठिकाणी महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, महिलांवरील अत्याचार, अन्याय वाढत आहेत ही अतिशय गंभीर बाब आहे. यामध्ये केंद्र शासनाने विशेष लक्ष घालून नवीन कायदा आणलेला आहे. माझी शासनाला विनंती आणि प्रश्न आहे की, दलित महिलांवर वारंवार अत्याचर होत आहेत. त्यास आपले कायदे अपुरे पडत आहेत. दलित महिलांवर होणाऱ्या अत्याचार, अन्यायाबाबत आपण मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करणार आहात काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, नवीन आलेला कायदा परिपूर्ण आहे. याबाबत देश पातळीवर चर्चा करण्यात आली असून प्रत्येक राज्यांमधून सूचना मागविल्या होत्या. महिला अत्याचार विरोधासंबंधातील हा कायदा आहे. या कायद्यात कठोर शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आपण योग्य ती कारवाई निश्चितपणे करत राहू. यासाठी वेगळा कायदा करण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आज सर्वच ठिकाणी महिला पोलीस कक्ष नाही हे शासनाने मान्य केले आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी हे तातडीने करणे आवश्यक आहे. किती दिवसात सदर कार्यक्रम शासन पूर्ण करणार आहे ? पूर्वी महिला सुरक्षा कमिट्या कार्यरत होत्या. त्या पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर कार्यान्वित करण्याची आवश्यकता आहे. त्या चांगले काम करीत होत्या. या समित्यांच्या दर तीन महिन्यांनी बैठका होत होत्या. तसेच, सहा महिन्यांनी पीडित महिलेल्या बोलावून जिल्हा स्तरावर बैठका घेण्यात येत होत्या. महिलांवर अन्याय झाला असेल तर त्यांना महिला सुरक्षा समिती पुढे नेण्यात येत होते. अशा प्रकारची या समितीची कार्यपद्धती होती. सध्या या समित्या कार्यान्वित नाहीत. तेव्हा महिला सुरक्षा कमिट्या पुन्हा कार्यान्वित करून त्यात अत्याचारित महिलांना आपण सामावून घेणार आहात काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, महिला सुरक्षा कमिट्या कार्यान्वित आहेत. या बैठका वेळोवेळी होतात की नाही याचा पुन्हा एकदा आढावा घेण्यात येईल. तालुक्याला तक्रार निवारण कक्ष नाही असे आपण म्हटलेले आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनला कक्ष केल्यामुळे तालुक्याला वेगळा कक्ष करणे आवश्यक नाही. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये आपण हा कक्ष निर्माण केला आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "परंतु पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 03-10-2012 च्या परिपत्रकान्वये प्रत्येक पोलीस स्टेशनला महिला महिला पोलीस कक्ष स्थापन करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सध्या 925 पोलीस स्टेशनमध्ये महिला कक्ष स्थापन केले असून उर्वरित ठिकाणी महिला पोलीस कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे." आता एप्रिल महिना सुरु असून महिला पोलीस कक्ष सुरु करुन पाच महिने झाले आहेत. उर्वरित ठिकाणी ते स्थापन होतील. या पाच महिन्यामध्ये आपण स्थापन केलेल्या या महिला पोलीस कक्षाच्या कामकाजाचा आढावा आपण कोणत्या उच्चस्तरीय पातळीवरुन घेणार आहात? त्यामध्ये काही कक्ष स्थापन केल्यानंतर कामकाज करण्याच्या संबंधात त्यांना काही अडचणी आल्या आहेत काय? त्यासंदर्भात त्यांनी काही सूचना केल्या आहेत काय किंवा त्या अधिक सक्षम होण्यासाठी आपल्याला काही अधिक करण्याची आवश्यकता आहे काय? अशा पध्दतीचा अहवाल वरीष्ठ स्तरावरुन आपल्या विभागाने घेतला आहे काय?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, याबाबतीत नव्याने सुरुवात झालेली आहे, त्यामुळे निश्चितपणे याचा आढावा आपण जिल्हा स्तरावर घेतच असतो आणि राज्य स्तरावर अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये या विषयाचा आढावा घेतला जातो आणि त्यामध्ये काही त्रुटी दिसून आल्या तर त्या बदलण्याची भूमिकाशासन वेळोवेळी घेत राहील.

. . .. 2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यातील महिलांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

(५) *३७१४९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री व्यंकटेश्वरा उद्योग समुहाचे संचालक असल्याचे भासवून बीड जिल्ह्यातील महिलांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत बीड शहर पोलीस ठाण्यात दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले तसेच फसवणूक झालेल्या गोरगरीब महिला व महिला बचत गटांच्या रु. ७० लक्ष रकमेचा अपहार झाल्या प्रकरणी केलेल्या तपासाचे निष्कर्ष काय आहेत,

(४) तसेच आरोपीकडून अपहारीत रक्कम वसुल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) सदर प्रकरणी दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजी बीड शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.११/२०१३ कलम ४०६, ४२०,४६७,४६८,३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) होय, आरोपींनी त्यांची संस्था शासनमान्य असून प्रत्येक सभासदाने ४,०००/- रु.भरायचे व त्यानंतर वृध्दी प्रमाणे ३ ते ४ वर्षांनी ३०,०००/- रु.परत देण्यात येतील व उर्वरीत रक्कम सामाजिक कार्यासाठी खर्च करण्यात येईल असे आमिष दाखवून १६५० लोकांकडून प्रत्येकी ४,०००/- रु.प्रमाणे एकूण ६६,००,०००/- रुपये घेऊन अपहार केला आहे. या गुन्ह्यात एकूण १० आरोपींपैकी २ आरोपींना अटक करण्यात आली आहे तर ८ आरोपींचा शोध सुरु आहे.

तसेच उपरोक्त गुन्ह्यातील आरोपींविरुध्द अन्य एक गुन्हा दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२९/२०१३ कलम ४२०,४६७,४६८,४७१,३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद आहे. सदर गुन्ह्यात आरोपींनी २२,८०,०००/- रु.चा अपहार केला आहे. सदर दोन्ही गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

(४) या प्रकरणी आरोपींनी अपहारीत रक्कमेतून स्थावर, जंगम मालमत्ता खरेदी केली असल्याने ती प्रतिबंधित करुन कायदेशीर बाबींची पुर्तता झाल्यानंतर प्रतिबंधित मालमत्तेचा लिलाव करुन फसवणूक झालेल्या लोकांना रक्कम देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, उत्तरामध्ये हे मान्य केले आहे की, याबाबतीत 17 जानेवारी 2013 रोजी गुन्हा नोंदविलेला आहे. याचे गांभीर्य पहाता साधारणपणे यामध्ये 66 लाख रुपयांचा अपहार झाला आहे. तो करीत असताना ग्रामीण भागात काम करीत असलेल्या बचत गटातील महिलांनी वर्तमानपत्रातील जाहिराती नुसार अर्ज केला आणि तेथील लोकांना जाऊन भेटल्या. जेव्हा हा प्रश्न चौकशीसाठी आला तेव्हा बीड जिल्ह्यातील जेवा पिंपरीच्या श्री.विलास इ ानोबा गायकवाड आणि श्रीमती गायकवाड यांच्यावर 17 जानेवारीला गुन्हा नोंदविला आहे.परंतु या 8-10 दिवसाच्या दरम्यान त्यांना अटक करण्यात आली आणि आज ते पीसीआर मध्ये बिंदरुड

2 के-3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते पीसीआर मध्ये बिंदरुड पोलीस स्टेशनमध्ये आहेत आणि तेथून ते त्या महिलांना फोन करतात. बीड, उस्मानाबाद आणि जालना जिल्ह्यातील या बचत गटाच्या महिला आहेत आणि येथून पुढे तुम्ही जर वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटलात तर आम्ही तुमच्यावर अमुक करु, तमुक करु. असे तेथून फोन करतात. माझा असा प्रश्न आहे की, आरोपींना जामीन मिळण्याच्या हेतूने ही परिस्थिती तयार करण्यात येत आहे काय, कारण ते स्वत: जबाबदारीने सांगत आहेत की, आमचा जामीन 8 दिवसात झाल्यानंतर आम्ही तुमच्याकडे पाहू. 66 लाख रुपयांचा अपहार झाला असून, यांना जामीन न मिळण्याच्या हेतूने पोलिसांनी तातडीने एफआयआर दाखल करणे गरजेचे आहे आणि दुसरे म्हणजे श्री.विलास गायकवाड व श्रीमत गायकवाड यांची व्यंकटेश उद्योग समुहाची जी वेब साईट आहे, ती आजही कार्यरत आहे. आजही ऑन-लेग असणाऱ्या या वेबसाईटमध्ये महिला बचत गटाच्या सुशिक्षित मुली अर्ज दाखल करीत आहेत.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या वेबसाईट बाबत तातडीने पोलिसांना कळवून ऑन लाईन चालू असणारी ही वेब साईट बंद करणे गरजेचे आहे. यासाठी पोलीस खात्याकडून तातडीने उच्च पदस्थ अधिकाऱ्याची नेमणूक करुन ही वेबसाईट बंद करण्याच्या हेतूने कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन हा विषय याठिकाणी आला नाही. त्यांनी ही संस्था स्थापन करुन तेथे 40 एजन्टस् नेमून, गावोगावी फिरुन चार हजार रुपये गोळा करुन त्याचे आम्ही परत तुम्हाला 30 हजार रुपये देऊ अशा प्रकारची योजना याठिकाणी आणली.याबाबतीत ज्यादिवशी तक्रार आली, त्यादिवशी ताबडतोब कारवाई केली. याठिकाणी बीड शहर आणि माजलगाव येथील विषय वेगवेगळे आहेत. बीड शहरामधून देखील ही तक्रार आल्यानंतर आपण तेथे कारवाई केली आणि आरोपींना अटकही केली आहे. निश्चितपणे गरिबांना फसविण्याच्या दृष्टीने अशा वेगवेगळया योजना घेऊन लोक समोर येत आहेत. त्याचे सेन्सेटायजेशन करण्याच्या दृष्टीने गृह विभागाच्या वतीने आम्ही निश्चितपणे प्रयत्नशील रहाणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी वेब साईटचा जो उल्लेख केला आहे त्याबाबत सांगावयाचे तर ती देखील बंद करण्याच्या सूचना सायबर सेलला देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37149 . . ..

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, व्यंकटेश्वरा उद्योग समुहाच्या संचालकांकडून बीड जिल्ह्यातील महिलांची घोर फसवणूक झालेली आहे. याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, दोन आरोपींना अटक केलेली आहे आणि आठ आरोपी अजूनपर्यंत मोकाट आहेत आणि ते बीड जिल्ह्यामध्ये फिरत आहेत. या आठ आरोपींना आपण किती दिवसामध्ये अटक करणार आहात ? असा माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37149...

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणातील मुख्य आरोपी तसेच अन्य दोघा जणांना अटक केलेली आहे. अन्य आठ जण एजंट म्हणून काम करीत होते. त्यांचा देखील तपास सुरु आहे. तपासामध्ये दोषी आढळून आल्यास त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, ज्यांनी अपहार करुन मालमत्ता खरेदी केली ती प्रतिबंधित करुन लिलाव करण्यात येणार आहे. प्रश्न प्रतिबंधित मालमत्तेचा नाही. माझा प्रश्न आहे की, संबंधितांच्या एकूण संपत्तीची चौकशी करुन त्या संपत्तीचा लिलाव करुन या महिलांना न्याय देण्यात येईल काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, संबंधित आरोपींची मालमत्ता जप्त केलेली आहे. महसूल विभाग व जिल्हाधिकाऱ्यांना सांगून श्री.विलास नायकवडे यांचा 30 लाख रुपयांचा बंगला सील केलेला आहे. बँकेतील 18 लाख रुपये सील केलेले आहेत. अपहार केलेल्या पैशातून त्यांनी 10 लाख रुपयांची जमीन खरेदी केली होती, त्यासंबंधी देखील कार्यवाही केलेली आहे. कोर्ट प्रोसिजरप्रमाणे या सर्व प्रॉपर्टीज विकून संबंधितांचे पैसे परत कसे करता येतील अशी शासनाची भूमिका निश्चितपणे राहील.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, दिनांक 17 जानेवारी रोजी गुन्ह्यांची नोंद झाली. माननीय मंत्री महोदयानी श्री.नायकवडे यांच्या प्रॉपर्टीची माहिती सांगितली त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने त्यांची प्रॉपर्टी आहे. ज्या दिवशी महिलांनी तक्रार केली त्या दिवसापासून आजतागायत संबंधितांनी जी प्रॉपर्टी खरेदी केलेली आहे ती जप्त करण्यात येईल काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या अनुषंगाने त्यांनी जी जी प्रॉपर्टी केली असेल त्याची चौकशी करुन त्याप्रमाणे जप्तीचे आदेश काढण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बिरवाडी आणि ढालकाठी (जि.रायगड) विभागातील अनेक गावांना जोडणारा पूल अरुंद असल्याबाबत

(6) * 38472 श्री.संजय दत्त, श्रीमती अलका देसाई, श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बिरवाडी आणि ढालकाठी (जि.रायगड) विभागातील अनेक गावांना जोडणारा अतिशय महत्वाचा पूल अरुंद असल्याने वाहतुकीच्या कोंडीमुळे प्रवासी व वाहनचालकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या ठिकाणी होणारे अपघात टाळण्यासाठी पर्यायी पुलाची मागणी नागरिकांनी व वाहनचालकांनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त ठिकाणी पर्यायी पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे,श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (1) प्रश्नाधीन पूल 4.25 मीटर रुंदीचा असल्याने वाहतुकीची गैरसोय होते, हे खरे आहे.

(2) व (3) होय, लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार प्रश्नाधीन अरुंद पुलाच्या जागी नवीन पुलाचे बांधकाम सन 2009-10 ला रु.2.00 कोटी इतक्या रक्कमेस मंजूर झाले.

संकल्पचित्र मंडळ, नवी मुंबई यांनी प्रश्नांकित पुलाच्या सर्वसाधारण मांडणी नकाशास मंजुरी दिली आहे. त्यानुसार सदर कामास सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे. प्रश्नांकित कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या कामासाठी सन 2009-2010 या वर्षात दोन कोटी रुपये मंजूर झाले होते. माझा प्रश्न आहे की, कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत, सन 2013-2014 या वर्षात हे काम पूर्ण होईल काय ? माननीय मंत्री महोदय हे ज्येष्ठ, अनुभवी व अभ्यासू आहेत. मुंबई-गोवा हाय-वे रस्त्यावर ब्रिटीश काळातील अरुंद पूल आहेत. या अरुंद पुलामुळे दुर्घटनांचे प्रमाण खूप वाढले आहे. माननीय मंत्री महोदयांनी या पुलांचा अभ्यास केलेला आहे. तेव्हा या अरुंद पुला संदर्भात शासन कोणत्या ठोस उपाय योजना करणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38472....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या पुलाच्या कामासाठी सन 2009-2010 या वर्षात दोन कोटी रुपये मंजूर झाले होते. मूळ पूल 4.25 मीटरचा आहे. सुरुवातीला या पुलाचा नकाशा 115 मीटर लांब 11.5 मीटर रुंद असा करण्यात आला होता. नंतर या डिझाईनची रुंदी फार कमी आहे असे लक्षात आल्यानंतर रस्त्याची टू-लेन करणे आवश्यक आहे म्हणून पुन्हा नवीन डिझाईन करण्यात आहे. त्यामुळे कामाची किंमत 4 कोटी 75 लाख झाली. इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्यानंतर त्यास सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक होते म्हणून या कारणासाठी कामास विलंब झालेला आहे. आता त्यास मान्यता दिलेली आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे तो या प्रश्नाशी संबंधित नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, "लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार प्रश्नाधीन अरुंद पुलाच्या जागी नवीन पुलाचे बांधकाम सन 2009-2010 ला रुपये 2 कोटी इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आली आहे." हा प्रश्न चर्चेला आल्यानंतर विभागाने कोकणातील संपूर्ण पुलांची माहिती घेणे आवश्यक होते. माझा प्रश्न आहे की, त्याठिकाणी किती अरुंद पूल आहेत आणि त्या पैकी किती पुलाच्या रुंदीकरणाचे प्रस्ताव तयार केले आहेत ?

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.38472....

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, कोकणातील संपूर्ण रस्ते व पुलांची माहिती माझ याकडे आज उपलब्ध नाही. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात वेगळा प्रश्न विचारावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण होत आहे. बिरवाडी हे पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र आहे. त्या परिसरातील ग्रामीण भागात असलेला हा पूल अरुंद आहे. 2009-10 या आर्थिक वर्षात या पुलासाठी तरतूद करण्यात आली होती. आज 2013-14 हे आर्थिक वर्ष सुरु आहे. त्यामुळे तरतूद केलेली रक्कम लॅप्स झाली आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, या पुलाचे डिझाईन बनविण्यास इतका विलंब का लागला, तसेच ज्यांनी या कामी दिरंगाई केली त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री.छगन भुजबळ : महोदय, सध्या अस्तित्वात असलेला पूल 4.25 मीटर रुंद आणि 115 मीटर लांबीचा आहे. हा पूल 1981 मध्ये जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून बांधण्यात आला. सध्या हा पूल उत्तम स्थितीत आहे. परंतु तो पूल अरुंद असल्यामुळे त्यावरुन एकाच वेळी दोन ट्रक जाऊ शकत नाहीत. त्यामुळे त्या ठिकाणी आणखी दुसरा पूल बांधण्यात यावा अशी मागणी त्या भागातील लोकप्रतिनिधींनी केल्यानंतर, त्या ठिकाणी तशाच प्रकारचा 4.25 मीटर रुंदीचा दुसरा पूल करण्यासाठी संकल्पचित्र तयार करण्यात आले. जेणेकरुन दोन पूल हे ये-जा करण्यासाठी वापरता येतील. तद्नंतर मुंबईच्या संकल्पचित्र विभागाकडे सदरहू पुलाचे संकल्पचित्र तपासणीसाठी आले. त्या वेळी असे आढळून आले की, आपण स्टेट हायवे करीत आहोत. तसेच हा पूल मर्सीबल आहे. त्या पुलावरुन दोन वेळा पाणी वाहून गेले असले तरी तो पूल चांगला असल्यामुळे त्या पुलाची उंची वाढवून एकच 7.50 मीटर रुंदीचा पूल केला तर ये-जा चांगल्या प्रकारे होऊ शकेल असे ठरविले गेले. दोन पुलांऐवजी एकच पूल बनवायचा असल्यामुळे पुन्हा दुसरे संकल्पचित्र तयार करावे लागले. वास्तविक पाहता पुलाच्या लांबी व रुंदीमध्ये वाढ झाल्यामुळे साहजिकच कामाची किंमत वाढणार आहे. त्यामुळे या पुलाचे संकल्पचित्र तयार करुन व या पुलासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करुन सदरहू पुलाचे काम लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आपल्याकडे प्रश्न विचारण्याची प्रोसिजर अशी आहे की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38472....

श्री.संजय दत्त....

प्रश्न हा स्पेसिफिक घटनेवरच विचारावा लागतो. तरच त्या प्रश्नाला मान्यता मिळते. ज्या वेळी सभागृहात एखाद्या प्रश्नावर चर्चा उपस्थित होते त्या वेळी त्या प्रश्नाशी व्यापक प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला जातो. ज्येष्ठ व संवदेनशील असलेल्या माननीय मंत्र्यांकडून अपेक्षा असते की, त्यांनी त्या प्रश्नांना उत्तरे द्यावीत. महोदय, हा पूल अरुंद असल्यामुळे त्या पुलावर दुर्घटनेचे प्रमाण वाढले आहे. माननीय मंत्र्यांना निधी वा अन्य अडचण असेल तर त्यांनी सभागृहाला विश्वासात घ्यावे. कारण त्या भागातील जनता या पुलाच्या बाबतीत सरकारकडून अपेक्षा करीत आहे. त्यामुळे....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त आपण पाच मिनिटे फिरुन आल्यानंतर ही बाब निदर्शनास आणून दिली. मला वाटते ही बाब दोन मिनिटात सांगणे शक्य होते. आपण स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, त्या पुलावर दुर्घटनांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे या दुर्घटनांना आळा घालण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : महोदय, 2009 पासून या पुलावर एकही अपघात झाल्याची नोंद नाही. कोकणात काही पूल अतिशय चांगल्या स्थितीत आहेत. काही पूल अरुंद असून काही ठिकाणी अपघात होतात हे खरे आहे. त्यामुळे निधीच्या उपलब्धतेनुसार अरुंद असलेले पूल व रस्ते रुंद करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील काही औषध विक्रेते फार्मासिस्टशिवाय औषधांची विक्री करीत असल्याबाबत

(७) * ३८५४२ श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही औषध विक्रेते फार्मासिस्टशिवाय औषधांची विक्री करीत असून कोऱ्या बिलांवर फार्मासिस्टच्या सह्या आधीच घेऊन मोजकीच बिले देत असल्याचे मुंबईतील बाबुलनाथ येथील सिटीजान केमिस्ट ॲन्ड जनरल स्टोअर्सच्या घटनेवरुन माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने जबाबदार असणारे अन्न व औषधे प्रशासन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच संबंधित दुकानदारांवर व फार्मासिस्टवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच नागरिकांच्या जीविताचा प्रश्न असल्याने अशा घटनांना आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.मनोहरराव नाईक यांच्याकरिता : (१) होय.

(२) सदर तपासणीमध्ये फार्मासिस्ट हजर नसल्याने व आढळलेल्या त्रुटीवरुन सदर कार्यक्षेत्रातील सहायक आयुक्त परीमंडळ ०१, बृहन्मुंबई यांना निलंबित करण्यात आले असून सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे. मे.सिटीजन केमिस्ट बाबुलनाथ या औषधी दुकानदाराचे औषधी विक्री परवाने सर्व बाबींचा विचार करुन ६० दिवसांकरिता निलंबित करण्यात आले असून फार्मासिस्ट यांचे विरुध्द महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सीलकडे कारवाई करण्याबाबत प्रस्तावीत केले आहे तसेच पुढील योग्य ती कार्यवाही सुरु आहे.

(३) अधिकारी/कर्मचारी यांच्यावर होणाऱ्या आरोपाबाबत कायमस्वरुपी नियंत्रण रहावे म्हणून सह आयुक्त (दक्षता) या वरीष्ठ पदांतर्गत दक्षता विभागाच्या कार्यपध्दतीत सन २०१२ पासून आमूलाग्र बदल करण्यात आला आहे. गुप्तवार्ता विभाग, मुख्यालय व विभागीय स्तरावर काम करणाऱ्या गुप्तवार्ता विभागातील अधिकाऱ्यांना दक्षता विषयक कामकाजाचे प्रशिक्षण देण्यात येवून त्यांना क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे भ्रष्टाचाराबाबत अनियमितता, दिरंगाईबाबत चौकशी करण्याच्या सूचना माहे डिसेंबर २०१२ रोजी निर्गमित करण्यात आल्या आहेत. तद्नुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

तसेच किरकोळ विक्रेत्यांकडील रजिस्टर्ड फार्मासिस्टच्या उपस्थितीबाबत व कायद्यातील इतर मुद्यांबाबत नियमित तपासण्या करुन रजिस्टर्ड फार्मासिस्ट गैरहजर असलेल्या पेढ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील औषध विक्रेत्यांसंदर्भातील हा प्रश्न आहे. या प्रकरणी दुर्लक्ष केल्याबद्दल विभागाच्या सहायक आयुक्त यांच्या बाबतीत सुरु असलेल्या चौकशीत काय आढळून आले ?

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व त्यानुसार कोणती कठोर कारवाई केली आहे ? किरकोळ विक्रत्यांकडे रजिस्टर्ड फार्मासिस्ट किती ठिकाणी गैरहजर आढळून आले व त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? किरकोळ विक्रेत्यांवर औषधांच्या पावत्या देण्याची सक्ती करणार का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, रजिस्टर्ड फार्मासिस्टकडून औषध विक्री झाली पाहिजे असा आपला नियम आहे. त्यादृष्टीने इन्स्पेक्शनमध्ये संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. राज्यामध्ये जवळजवळ 47 हजार 659 इन्स्पेक्शन्स केले. जवळजवळ 1 हजार 18 लोकांच्या बाबतीत कॅन्सलेशनची कारवाई केली. जवळजवळ 3677 लोकांवर निलंबनाची कारवाई केली तसेच 572 लोकांवर वॉर्नींग देण्याची नोटीस बजावलेली आहे. रिटेल शॉप असेल किंवा कोणतेही औषध दुकानदार असतील त्यांनी त्या ठिकाणी फार्मासिस्ट ठेवणे बंधनकारक आहे. मुळात परवानगी देतानाच फार्मासिस्ट असल्याशिवाय परवानगी देत नाही. कारण औषध देत असताना त्यामधील ज्ञान असणाऱ्या फार्मासिस्टने ते द्यावे जेणेकरुन रुग्णांना दुसरे औषध जाऊ नये, अशी राज्य शासनाची भूमिका आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, संबंधित केमिस्टचे लायसन्स 60 दिवसांकरिता निलंबित केलेले आहे आणि त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सीलकडे कारवाई करण्याबाबत प्रस्तावित केले आहे. आपल्या खात्याचे अधिकार काय आहेत आणि महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सीलचे अधिकार काय आहे ? याबाबत पुढची कारवाई सुरु आहे म्हटल्यानंतर ती कारवाई आपल्या खात्यामार्फत होणार आहे की, कौन्सीलमार्फत होणार आहे ? जर ती कारवाई कौन्सीलमार्फत होणार असेल तर याप्रमाणे सर्व ठिकाणी सुसूत्रता आणण्यासाठी आपले खाते आणि फार्मसी कौन्सील यांच्यामध्ये निश्चितपणे कोणत्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सील कार्यान्वित आहे. जे फार्मासिस्ट रजिस्टर्ड नाहीत तसेच फार्मासिस्ट कोठे नोकरी करतात याची अद्ययावत माहिती कायम त्यांच्याकडे उपलब्ध असते. आमच्या असे निदर्शनास आले आहे की, एका दुकानामध्ये एक फार्मासिस्ट काम करतो पण त्याचे नाव दुसरीकडे सुध्दा असण्याची शक्यता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाकारता येत नाही. तो फार्मासिस्ट नावासाठी दुकानामध्ये आपले लायसन्स देत असतो आणि दुसरीकडे नोकरी करीत असतो. एम.आर. म्हणून नोकरी करतो किंवा इतर दुकानांमध्ये नोकरी करतो. त्याचे लायसन्स कॅन्सल करावे म्हणून त्यांच्या विरुध्द फार्मसी कौन्सीलकडे तक्रार दाखल करतो. फार्मसिस्ट म्हणून जो ग्रॅज्युएट होतो त्याने दोन ठिकाणी काम करु नये असा यामध्ये उद्देश आहे. जी कारवाई केली जाते ती आमच्या ड्रग डिपार्टमेंटच्या माध्यमातून होत असते.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, गेल्या महिन्यामध्ये देखील राज्यातील औषध विक्रेत्यांनी संप करण्याची धमकी दिली. फार्मासिस्ट नसल्यामुळे अनेकांचे लायसन्स रद्द केल्यामुळे राज्यातील जनतेला वेठीस धरुन केवळ सरकार नियमाप्रमाणे काम करते म्हणून मेडिकल स्टोअर्स बंद करण्याची धमकी दिली. एवढेच नव्हे तर कोणत्या कंपनीची औषधे विकली पाहिजे याकरिता त्यांची जी ऑर्गनायझेशन आहे ती कोणाला एजन्सी द्यावी याबाबत कंपन्यांवर दबाव आणते अशा प्रकारचे चित्र आहे. या गोष्टी माननीय मंत्र्यांच्याही निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. सध्या एफडीएचे जे कायदे अस्तित्वात आहेत त्याच्या अंमलबजावणीकरिता कठोर कार्यवाही करुन कोणत्याही परिस्थितीमध्ये फार्मसिस्टशिवाय मेडिकल स्टोअर्स चालू नयेत या बाबतीत सरकार दक्ष राहणार आहे का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या राज्यात इतिहासामध्ये जेवढ्या कारवाया झाल्या नव्हत्या तेवढ्या कारवाया गेल्या दोन वर्षात केलेल्या आहेत. फार्मासिस्ट असलाच पाहिजे ही राज्य शासनाची भूमिका आहे. 'नो फार्मासिस्ट, नो शॉप' असे आमचे धोरणच असणार आहे. त्यामुळे फार्मासिस्ट असणे बंधनकारक आहे. काही विषयांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी मला देखील कल्पना दिलेली आहे. तशी काही ठिकाणी मागणी असेल आणि त्या ठिकाणी संघटनेच्या माध्यमातून विरोध होत असेल तर तो विरोध मोडून काढून त्यांना मदत करण्याची भूमिका निश्चितपणे स्वीकारली जाईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, विक्रेत्याकडे रजिस्टर्ड फार्मासिस्ट असावा हा नियम आहे. यामुळेच सहायक आयुक्त, परिमंडळ-1 यांना आपण निलंबित केले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38542.... श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी या सभागृहात चर्चा झालेली आहे. शासनाने 47 हजार इन्स्पेक्शन्स केली आहेत आणि 18 हजार इन्स्पेक्शन्सबाबत कारवाई केलेली आहे. यावरुन या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात येईल. अन्न व औषधी द्रव्ये निरीक्षकांची 600 पदांची आवश्यकता असताना केवळ 144 निरीक्षक कार्यरत आहेत हे खरे आहे काय, उर्वरित पदे भरली जातील काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : या विभागात 161 पदे मंजूर आहेत आणि 137 पदे भरलेली आहेत. 24 पदे रिक्त आहेत. ही पदेही भरण्याची कारवाई केली जात आहे. अनेक वर्षापासूनची या विषयाची व्याप्ती बघता आणखी काही पदे निर्माण करण्याची भूमिका शासनाची आहे.

श्री.संजय दत्त : या प्रकरणाच्या चौकशीत आढलेल्या त्रुटींचे स्वरुप काय आहे ? मी मंत्री महोदयांचे कौतुक करतो. त्यांनी या विभागाचा पदभार सांभाळल्यानंतर खूप तत्परतेने यासंबंधीची कारवाई केलेली आहे. या विभागाचे मॉनेटरिंगचे काम वाढलेले आहे. मंत्री महोदयांनी असे म्हटले आहे की, नो फार्मासिस्ट, नो शॉप्स. त्यामुळे मॉनेटरिंग करण्यासाठी आणखी मनुष्यबळाची आवश्यकता आहे. रिक्त पदे भरण्यासाठी व आवश्यकता भासल्यास नवीन पदे रिक्त करण्याची शासनाची कोणती योजना आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, विभागाने चांगल्या प्रमाणात कारवाई केल्यामुळेच राज्यात 2,530 लोकांनी आपले परवाने परत केलेले आहेत. इतके वर्ष त्या दुकानांमध्ये फार्मासिस्ट नव्हते, ते उपलब्ध होऊ शकत नाहीत हे त्यांच्याही लक्षात आलेले आहे. ही ऑन लाईन प्रोसेस आहे. ड्रग इन्स्पेक्टर्सची पदे वाढविण्याचा निश्चितपणे प्रयत्न करणार आहोत. औषध दुकानदारांच्या संघटनांबरोबर शासनाने चर्चा केलेली आहे. दुकानात फार्मासिस्ट असला पाहिजे अशी त्यांचीही भूमिका आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्यातील मिरारोड येथील दोघांनी नागरिकांची केलेली फसवणूक

(8) * 39144 श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, श्री.विक्रम काळे, श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्ह्यातील मिरारोड येथील योगेश कारंडे व त्याची पत्नी प्रीती कौर यांनी बँकांनी जप्त केलेली घरे 500 नागरिकांना निम्यादरात देण्याचे अमिष दाखवून 50 कोटी रूपयांची फसवणूक केल्याची घटना दिनांक 8 जानेवारी, 2013 रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1), (2), (3) व (4) बँकांनी जप्त केलेली घरे कमी दरात देण्याचे अमिष दाखवून नागरिकांची फसवणूक केल्याप्रकरणी पुढीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत :-

1) फिर्यादी महिला यांचेसह 65 लोकांची सुमारे 3,56,19000/- रुपयांची फसवणूक केल्याबाबत दि.30/12/2012 रोजी मिरारोड पोलीस स्टेशन गु.र.नं.433/2012 भा.दं.वि. कलम 420,465,467,468,471,34 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या तपासात दोन आरोपीतांना अटक करण्यात आली असून उर्वरित दोन आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

2) एकूण रु.24,60,000/- इतकी फसवणूक केल्याबाबत दि.31/12/2012 रोजी माणिकपूर पोलीस स्टेशन गु.र.नं.262/2012 भा.दं.वि. कलम 420, 406,342,504,506 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या तपासासाठी आरोपी योगेश कारंडे यास मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली असून त्याचे 4 व्यवस्थापक यांनाही अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील आरोपी यांचेकडून रोख रक्कम 17,00,000/- आरोपींनी विविध ठिकाणी विकत घेतलेले फ्लॅट व एक कार जप्त करण्यात आली आहे.सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

3) रु.2,40,000/- रकमेची फसवणूक केल्याने दि.02/02/2013 रोजी नालासोपारा पोलीस स्टेशन गु.र.नं.75/2013 भा.दं.वि. कलम 420, 34 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

4) एकूण 38 जणांची एकूण 2,00,65,000/- रुपयांची फसवणूक केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दि.08/01/2013 रोजी वाशी पोलीस ठाणे गु.र.नं.06/2013 भां.दं.वि. कलम 420, 467, 468, 471, 34 व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम 66 (अ), (ब) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात आरोपी सूरज राकेश चौबे व योगेश रघुनाथ कारंडे यांना अटक करण्यात आली असून रोख रक्कम 3,25,000/- रुपये व रु.40,000/- किंमतीचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

गुन्ह्यातील इतर आरोपींच्या शोध घेण्यात येत आहे.

5) एकूण 18 जणांची रु.83,50,000/- ची फसवणूक केल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दि.10/01/2013 रोजी सीबीडी पोलीस ठाणे गु.र.नं.03/2013 भा.दं.वि. कलम 420, 406, 471, 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपासात स्वरुप ठक्कर उर्फ क्लिफटन रोनाल्डो मथाइज व योगेश रघुनाथ कारंडे यास अटक करण्यात आली असून रोख रक्कम, सोन्याचे दागिने व इतर असा रु.15,16,240/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39144....

6) रु.5,10,000/- ची फसवणूक केल्याबाबत दि.17/01/2013 रोजी नेरुळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.09/2013 भा.दं.वि. कलम 420, 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपासात एका आरोपीस अटक करण्यात आली असून त्याचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे इतर आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

श्री.हेमंत टकले : या सभागृहामध्ये अनधिकृत बांधकामे व त्याच्या धोक्यामुळे झालेले मृत्यू यासंबंधी चर्चा झालेली आहे. या प्रश्नामुळे जो विषय समोर येत आहे त्यामध्ये ही घरे बँकांनी जप्त केली म्हणजे कर्ज वसूल न झाल्यामुळे जप्त केली असावीत. योगेश कारंडे व त्यांची पत्नी प्रीती कौर यांची ही खरी नावे आहेत की नाही हे माहीत नाही. परंतु सामान्य नागरिकांची फसवणूक करण्याचा नवीन प्रकार वाढल्याचे दिसून येत आहे. या प्रश्नामध्ये 50 कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे नमूद केले होते. परंतु लेखी उत्तरामध्ये त्यापेक्षा कमी रकमेची फसवसणूक झाल्याचे म्हटलेले आहे. या प्रकरणी लोकांकडून कशा स्वरुपात रक्कम घेतली गेली आणि आरोपींकडून काय जप्त करण्यात आले तेही सांगितले आहे. बँकांनी जप्त केलेली घरे बँकांच्या ताब्यातच राहण्याची काळजी घेतली होती काय, त्याची कागदपत्रे या लोकांना कोठून मिळाली आणि कोणत्या कागदपत्रांच्या आधारे जनतेची फसवणूक करुन लुबाडणूक केलेली आहे याबाबत अधिक माहिती मंत्री महोदयांकडे आहे काय ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : बँकांनी जप्त केलेली कोणतीही घरे त्यांच्याकडे नव्हती. या लोकांनीच काही फ्लॅट विकत घेतलेले होते. बँकांनी जप्त केलेली घरे तुम्हाला कमी किंमतीमध्ये देऊ अशा प्रकारची जाहिरात सांकेतिकस्थळा वरुन केली. ज्या गरजू लोकांना घरे पाहिजे होती अशा लोकांनी या लोकांकडे गुंतवणूक केली. यांनी कुणालाही घरे दिलेली नाहीत. आतापर्यंत 131 नागरिकांनी फसवणूक झाल्याच्या तक्रारी केलेल्या आहेत. पोलिसांनी अतिशय चांगल्या प्रकारे तपास केलेला आहे. जवळ जवळ 6 कोटी 72 लाख रु.ची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्यांची मालमत्ता देखील पोलिसांनी जप्त केलेली आहे. जप्त केलेल्या मालमत्तेतून पैसे परत देण्याचा प्रयत्न आहे. वेगवेगळया पोलीस स्टेशनमध्ये तक्रारदारांची संख्या वाढत चालली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाशिक जिल्ह्यातील इमू पालनाच्या नावाने केलेली फसवणूक

(९) * ३९३५७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील इमू पालनाच्या नावाखाली केलेल्या फसवणूक प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याचे माहे जानेवारी २०१३ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२) सदर प्रकरणी एकूण ६ गुन्ह्यांचा राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, नाशिक यांचेकडे तपास सुरु आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी व इतर ३ असे एकूण ४ आरोपींना देवळाली कॅम्प पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १६/२०११, भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, ३४ या गुन्ह्यात मा.न्यायालयाकडून दि.२५/०३/२०११ रोजी अटकपूर्व जामीन मिळाल्यापासून ते फरार झाले आहेत. फरार आरोपींचा शोध सुरु असून सदर गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जयवंतराव जाधव : आजच्या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये जे प्रश्न विचारले गेले त्यावरुन असे दिसून येते की राज्यामध्ये आर्थिक फसवणुकीचे गुन्हे मोठ्या प्रमाणावर घडत आहे. नाशिक जिल्हयामध्ये झालेल्या इमू घोटाळयामध्ये सर्वसामान्य नागरिकांची मोठया प्रमाणावर फसवणूक झाली. या संदर्भात मी 2011मध्ये या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या घोटाळया बाबत काय कारवाई करणार असा प्रश्न शासनाला विचारला होता. त्यावेळी या प्रकरणी एसपी दर्जाच्या अधिका-याकडून तपास केला जाईल असे मंत्री महोदयांकडून आश्वासन दिले गेले होते. 25.3.2011 पासून कोणत्या संबंधित एस.पी.कडे त्या प्रकरणाची तपासणी करण्याची जबाबदारी सोपविली आहे, त्यांनी कोणता तपास केला आहे, कोणत्या आरोपींना अटक करण्यात आलेली आहे ? अशा प्रकारचे गुन्हे नाशिक जिल्ह्यामध्ये वारंवार होत असताना पोलीस यंत्रणा जागरुक राहून अशा प्रकारचे गुन्हे घडणार नाहीत, याबाबतीत काही कारवाई करण्यात येणार आहे काय ? तसेच या प्रकरणाचा तपास संबंधित एस.पी.दर्जाचा अधिकारी कधी पूर्ण करणार आहे ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : हा तपास मी सदनामध्ये सांगितल्याप्रमाणे सीआयडीकडे सोपविण्यात आला होता. आरोपीला कोर्टाकडून जामीन मिळाल्यानंतर तो फरार झाला. आरोपी अद्याप सापडलेला नाही. या प्रकरणी झालेली फसवणूक मोठी आहे. या प्रश्नाची माहिती घेताना आजच ही बाब माझ्या लक्षात आली. मी राज्याच्या सीआयडीच्या प्रमुखांना बोलावून घेतलेले आहे. तसेच नाशिकच्या पोलीस आयुक्तांना देखील सूचना दिलेल्या आहेत. एक टीम तयार करुन या प्रकरणातील दोषींना लवकरच पकडण्याची कारवाई केली जाईल.

श्री. जयंवतराव जाधव : इमू घोटाळा हा एक विषय आहे. परंतु आजही शहरामध्ये अधिक पैसे देण्याचे आमिष दाखवून लोकांची फसवणूक करणा-या विविध संस्था कार्यरत आहेत. अशा संस्थांचा संबंधित अधिका-यांकडून तपास करण्यात येईल काय ?

श्री. आर.आर. पाटील : आम्ही ही चौकशी करीतच असतो. अशा फसवणूक करणा-या संस्था किंवा कंपन्या जेव्हा निदर्शनास येतात त्यावेळी पोलीस सुमोटो कारवाई करीत असतात. पण या संस्थांनी किंवा कंपन्यांनी केन्द्र सरकारच्या कंपनी कायद्या अंतर्गत रजिस्ट्रेशन केले असेल, धर्मादाय आयुक्तांकडे रजिस्ट्रेशन केले असेल, सहकार कायद्या अंतर्गत संस्था रजिस्टर करुन घेतली असेल तर तेथे पोलिसांनी हस्तक्षेप करणे योग्य ठरत नाही. म्हणून तक्रार येईपर्यन्त पोलिसांना देखील संस्थेची चौकशी करण्याच्या मर्यादा येतात. पोलीस आपले काम करतील. परंतु गुंतवणूकदारांनी देखील जागरुक राहून गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. आज अशा घटनांचे जास्त प्रश्न आहेत. चार हजार रुपयाचे तीन वर्षामध्ये 30 हजार रुपये मिळतील असे आमिष दाखवून लोकांकडून पैसे घेतले गेले. एवढा नफा कोणत्या व्यवसायामध्ये असू शकतो. अवाढव्य नफा, अवाढव्य व्याज मिळणा-या ज्या स्कीम असतात त्याबाबतीत लोकांनी जागरुक राहून गुंतवणूक केली पाहिजे. अशा संस्थेबद्दल संशय आला आणि पोलिसांकडे तक्रार करण्यात आली तर ही फसवणूक थांबवली जाऊ शकते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गडचिरोली व नजिकच्या जिल्ह्यामध्ये थक्कलपल्ली वासुदेव राव हा नक्षलवादी घातपाती कारवाया करण्यासाठी सक्रीय असल्याबाबत

(१०) * ३९४०५ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रतिबंधीत माओवादी संघटनेच्या सेंट्रल मिलीटरी कमिशनचा सदस्य व दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीचा सदस्य मोस्ट वॉन्टेड नक्षली थक्कलपल्ली वासुदेव राव हा घातपाती कारवाया करण्यासाठी सध्या गडचिरोली व नजिकच्या जिल्ह्यांमध्ये सक्रिय असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान पोलीसांनी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने संबंधित दोषीला अटक करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) माहे जानेवारी, २०१२ मध्ये थक्कलपल्ली वासुदेव राव हा घातपाती कारवाया करण्याकरिता गडचिरोली, गोंदिया येथे येऊन गेल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) होय. माहे जानेवारी, २०१२ मध्ये छत्तीसगढ राज्यातील माड डिव्हीजन येथील नक्षल्यांचे विशेष प्लाटून दलम छत्तीसगढ-महाराष्ट्र राज्याच्या सिमेलगत गडचिरोली गोंदिया क्षेत्रात येऊन गेल्याचे निदर्शनास आले आहे. माहे फेब्रुवारी, २०१२ दरम्यान प्राप्त गुप्तवार्ता माहितीवरुन पोलीस दलातील सर्व युनिटला सतर्क करण्यात आले आणि सदर दलमच्या ठावठिकाणा शोधून यातील नक्षल सदस्यांना अटक करण्यासाठी गुप्तवार्ता यंत्रणा सक्रिय करण्यात आली आहे. थक्कलपल्ली वासुदेव राव याचे सविस्तर वर्णन व फोटो असणारी भित्तीपत्रके लावण्यात आली असून उपयुक्त माहिती देणाऱ्यास रुपये १ लाखाचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस, सी.आर.पी.एफ., विशेष अभियान पथक, स्पेशल ॲक्शन ग्रुप माध्यमाने नक्षल शोध अभियाने, लांब पल्ल्याचे अभियानासह शेजारी जिल्हा व राज्य पोलिसांसोबत संयुक्त अभियान राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : जानेवारी २०१२ ला थक्कलपल्ली वासुदेव राव हा त्या ठिकाणी येणार असे समजल्यानंतर आपण मोठया प्रमाणावर बंदोबस्त केला ही गोष्ट खरी असली तरी हा इसम कोणत्या क्षेत्रामध्ये काम करीत आहे याची पोलिसांनी चौकशी केलेली आहे काय ? या इसमाने कोठे कोठे मिटींग घेतल्या यांची नोंद पोलिसांकडे आहे काय ? पोलीस नक्षलविरोधी यशस्वी अभियान चालवित असले तरी वाढीव पोलीस दल देऊन नक्षलवाद्यांचा कडेकोट बंदोबस्त करण्यासाठी पोलीस भरती करण्यात येणार आहे काय ?

..नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39405....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागामध्ये पोलीस भरतीच्या संदर्भात सांगू इच्छितो की, मागील दोन वर्षात 2750 इतक्या पोलिसांची भरती केली आहे. त्याचबरोबर सेंट्रल फोर्सकडून 4 हजार लोकांचे मनुष्यबळ आपल्याला उपलब्ध करुन दिले आहे. आज आपल्याला संख्येची अडचण नाही. त्यांच्या सेंट्रल मिलिटरी कमिशनचा मुख्य जो आहे तो कुठे आहे याची माहिती नाही. येऊन कोणाला तरी भेटून गेल्याची माहिती पोलिसांकडे आहे. पोलीस त्याच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून आहेत.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील विविध शहरात परवडणाऱ्या घरांसाठी भागीदारी तत्वावर पुनर्विकास प्रकल्प राबविण्याच्या निर्णयाबाबत" या विषयावरील सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते, प्रकाश बिनसाळे, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 30670 ला दिनांक 18 जुलै, 2012 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सिंधुदुर्ग जिल्हयाच्या पर्यटन विकासाबाबत टाटा कन्सल्टन्सीने शासनास सादर केलेल्या 365 कोटी रुपयांच्या आराखड्याबाबत" या विषयावरील मेजर सुधीर सावंत, श्री.अनंत तरे, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 5064 ला दिनांक 5 एप्रिल, 2005 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (मत्स्य व्यवसाय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सिंधुदुर्ग जिल्हयात परप्रांतीय मच्छीमार ट्रॉलर्सकडून वेंगुर्ला, शिरोडा, वेळागार, तिवती या ठिकाणी घुसखोरी झाल्याबाबत" या विषयावरील श्री.रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री सुभाष चव्हाण, चरणसिंग सप्रा, वि.प.स व सर्वश्री परशुराम उपरकर, राजन तेली, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 12782 ला दिनांक 7 एप्रिल, 2011 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "बीड जिल्हयातील परळी वैजनाथ शहरातून बाहेर जाणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत" या विषयावरील श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 34163 ला दिनांक 11 डिसेंबर, 2012 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार पाहणी अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : पाहणी अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

(प्रेस : येथे पाहणी अहवाल छापावा.)

नंतर 2आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तराची बारावी, तेरावी, चौदावी,पंधरावी व सोळावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी व सोळावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तराची बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी व सोळावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस: येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 या अधिनियमामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) अधिनियम, 2010 (सन 2011 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 10) च्या कलम 13 च्या पोट-कलम (1) अन्वये शासनाने निर्गमित केलेले आदेश क्रमांक टीपीएस-1812/प्र.क्र. 299/13/नवि-13, दिनांकित 1 एप्रिल, 2013 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : आदेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन 2011-2012 या वर्षाचे (1) वित्तीय लेखा अहवाल (खंड एक व दोन), (2)विनियोजन लेखा अहवाल, (3) सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल, (4)राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल, (5) महसुली जमावर अहवाल, (6)सार्वजनिक उपक्रम अहवाल, (7) आर्थिक क्षेत्र अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचा वार्षिक अहवाल"सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2006-2007, 2007-2008, 2008-2009 या वर्षाचा अनुक्रमे तिसावा, एकतिसावा व बत्तिसावा वार्षिक अहवाल"सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, या सभागृहात आपण वारंवार निदेश देऊन सुध्दा महामंडळांचे अहवाल 5-5,6-6 वर्षे येत नाहीत. महात्मा फुले मागासवर्ग महामंडळाने सन 2006-2007 चे अहवाल आता आलेले आहेत. वार्षिक अहवाल विलंबाने येत असल्यामुळे व्यवस्थापकीय संचालकांवर कारवाई होणे आवश्यक आहे.

सभापती : आपण म्हणता त्या प्रमाणे कारवाई करणे शक्य वाटते. परंतु काही महामंडळांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. काही महामंडळांकडे हजारो अहवाल छापण्याकरिता पैसे नाहीत अशीही परिस्थिती आहे. ज्या महामंडळाची आर्थिक परिस्थिती चांगली आहे त्यांनी प्रत्येक वर्षी सभागृहासमोर अहवाल दिले पाहिजेत. ज्या महामंडळाची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही अशा महामंडळांनी अन्य पर्याय शोधून काढला पाहिजे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या महामंडळांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे ते आपल्या महामंडळाचे अहवाल छापू शकत नाहीत, अशा महामंडळाचे वार्षिक अहवाल छापण्यासाठी आर्थिक तरतूद राज्य शासन करु शकत नाही अशी महामंडळे बंद करण्यात येतील काय ?

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात मागे चर्चा झाली होती. मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ज्या महामंडळाची आर्थिक परिस्थिती चांगली नसेल अशा महामंडळानी अहवाल छापण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणे जरुरीचे आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

अशुध्दीत प्रत / परिशुध्दीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

सभापती : विधान परिषदेने संमत केलेल्या विधेयकाला विधानसभेची संमती व दोन्ही सभागृहाने संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी सहसचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : (अ) खालील विधेयक विधानसभेने कोणत्याही सुधारेणशिवाय संमत केले :-

सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 1- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2013

(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

(1)सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7- महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाथ्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक, 2012

(2)सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 2-महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, 2013

(3)सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 4- महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, 2013

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री.सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

.....

पृ.शी./मु.शी.: उप विधान समितीचा अहवाल सादर करणे

ॲड.जयदेव गायकवाड (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उप विधान समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : उप विधान समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विनंती अर्ज सादर करणे

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, "कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणबी समाजातील शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय" संबंधी सर्वश्री सुरेश भायजे, नंदकुमार मोहिते यांच्या स्वाक्षरीचा विनंती अर्ज मी आपल्या अनुमतीने सभागृहास सादर करतो.

सभापती महोदय,कोकणात विशेषत: रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बहुतांशी रहिवाशी कुणवी समाजाचे असून ते अल्पभूधारक व मोलमजुरी करणारे आहेत. ज्या जमिनी कुणबी समाज वषानुवर्षे कसत असून त्या जमिनीवर मालकांचे विशेषत: खोत समाजाचे वर्चस्व असून त्यांना राबविले जात आहे. कसत असलेल्या जमिनीवरील शासनाचे कायदे अंमलात येऊनसुद्धा त्यांच्या नावांची नोंद जमिनीच्या रेकॉर्डला झालेली नसल्यामुळे प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या नागरिकांच्या शेतजमिनीची फेरमोजणी करण्यात यावी. ही फेरमोजणी झाल्यास त्यांना शासनाकडून शासकीय लाभ मिळून शेतजमिनीवर घर बांधणीपासून ते लघुउद्योग करण्यासाठी कर्जाची सोय उपलब्ध होऊ शकेल. जमीनदार व कूळ अशा संबंधातून निर्माण झालेली शोषण पद्धती आजही सुरूच आहे. आजही अनेक गावांमध्ये पिढ्यानपिढ्यापासून कुळवहिवाट शेतकऱ्यांच्या राहत्या घरांखालील जमिनींची मालकी कुळांकडे न राहता जमीनदारांकडेच असल्यामुळे प्रत्यक्ष स्वत:च्या उपजीविकेसाठी कसत असलेल्या जमिनीची तात्काळ फेरमोजणी करावी तसेच कोकणातील जमीन मालकी हक्कांसाठी प्रभावी कायदा करण्यात यावा, अशी मागणी सर्वश्री सुरेश भायजे, नंदकुमार मोहिते व इतर ग्रामस्थांनी केली असून तत्संबंधातील विनंती अर्ज मी सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती : विनंती अर्ज सभागृहास सादर झाला आहे. हा विनंती अर्ज प्रतिवृत्त सादर करण्याकरिता विनंती अर्ज समितीकडे सोपविण्यात येत आहे. प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाल्यावर त्याची प्रत प्रत्येक सदस्याकडे पाठविली जाईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचने संबंधी

सभापती : माझ्याकडे एकंदर दोन 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचना आलेल्या आहेत. माझ्याकडे काल नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची एक सूचना आली होती. त्यावर मी निर्णय देऊ शकलो नव्हतो. आज माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची एक सूचना आली आहे.

आज सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "राज्यात आदिवासी, शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, समाजकल्याण, महिला व बालकल्याण या विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थीनींच्या असहायतेचा फायदा घेऊन त्यांच्यावर लैगिंक अत्याचार करण्यात येत असल्या संबंधातील नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना या प्रस्तावाच्या सूचनेवर थोडक्यात म्हणणे मांडण्यास अनुमती देत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आदिवासी विभागातील मुलींनी शिक्षण घ्यावे, त्यांनी उच्च व तंत्र शिक्षण घेऊन मोठ्या प्रमाणावर पुढे यावे याकरिता समाजकल्याण, महिला व बालकल्याण या विभागामार्फत निवासी आश्रमशाळा चालविण्यात येतात. मात्र, या आश्रमशाळांचे संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आश्रमशाळेतील विद्यार्थीनीच्या असहायतेचा फायदा घेऊन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करीत असून त्याचा बोभाटा करू नये म्हणून त्यांना जिवे मारण्याची धमकी देतात.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

अशा पध्दतीने विदर्भातील वाशिम येथील अंध शाळेतील रखवालदार याने बलात्कार केल्याची घटना असेल, नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, पळसकर, पेठ, कळवण, पंचवटी येथील आश्रमशाळेतील अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाला असेल किंवा जुन्नर जि.पुणे येथील आश्रमशाळेतील शिपायाने दोन अपंग विद्यार्थीनीवर केलेला बलात्कार असेल, तसेच तळेगाव जि. पुणे येथील वेदावती आश्रमशाळेत शिपायाने एका महिलेचे लैंगिक शोषण केले असेल अशा पध्दतीच्या मोठ्या प्रमाणावर केसेस याठिकाणी होत आहेत. आम्ही वारंवार मागणी करुन सुध्दा अजून पर्यंत महिला अधीक्षक नेमल्या जात नाहीत. 600 अधीक्षकांचा प्रश्न आम्ही वारंवार उपस्थित करीत असतो. परंतु त्याबाबतीत काही होत नाही. त्याठिकाणी मुलींचे होणारे लैंगिक शोषण थांबविण्याबाबतचा हा विषय अतिशय महत्वाचा आहे. म्हणून याठिकाणी मी आपल्याला विनंती करते की, आज सदनाचे सर्व कामकाज थांबवून या विषयाच्या अंतर्गत चर्चा करण्यात यावी.

सभापती : काल सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती आणि आज आपण त्यावर चर्चा करीत आहोत. आजच्या कामकाज पत्रिकेतील कोणत्याही बाबीशी हा विषय संबंधित नसल्यामुळे आज मला सदरहू चर्चा घेता येणार नाही. त्यामुळे मी ही प्रस्तावाची सूचना नाकारीत आहे. नंतरच्या काळामध्ये मी या विषयावर जरुर चर्चा घेईन.

---

2 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री.भगवान साळुंखे, रामनाथ मोते, नागो पुंडलिक गाणार, चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील, वि.प.स. यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते आपण ही सूचना मांडणार आहात काय?

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे ही सूचना मांडतील.

सभापती : ठीक आहे. मात्र सन्माननीय सदस्यांनी सदरहू प्रस्ताव दोन-तीन मिनिटांमध्ये मांडावयाची आहे.

श्री.भगवान साळुंखे सभापती महोदय, राज्यामध्ये सन 2002 पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या 2000 प्राथमिक शाळा व 2500 माध्यमिक शाळा चालविल्या जात आहेत. या शाळांमधून लाखो विद्यार्थी शिकत असून सुमारे 50,000 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भविष्यात शाळा अनुदानित होईल व वेतन मिळेल या भाबड्या आशेवर गेली 10-15 वर्षापासून उपाशी पोटी राबत आहेत. दिनांक 20 जुलै 2009 रोजी शासनाने (कायम) शब्द काढला असून सन 2012 मध्ये अनुदान देण्याचे मान्य केले. परंतु दिनांक 15 नोव्हेंबर 2011 रोजी मूल्यांकनाचे जाचक निकष लावून केवळ 214 प्राथमिक व 56 माध्यमिक शाळा निकषपात्र ठरल्या. त्यामुळे निराश झालेले हजारो शिक्षक गेले 2 महिने आझाद मैदानावर ठिय्या आंदोलन करीत आहेत. मूल्यांकनाचे निकष शिथिल करुन पुरवणी यादी घोषित करावी व याच अर्थसंकल्पीय अधिवेशनात आर्थिक तरतूद करावी या मागणीसाठी ते आत्मदहनाच्या तयारीत आहेत. या संदर्भात शासनाने गेल्या 5 आठवड्यांच्या अधिवेशनामध्ये कोणताही स्पष्ट निर्देश दिलेला नसल्याने राज्यातील जनतेमध्ये व शिक्षकांमध्ये चुकीचा संदेश जात आहे.सारांश आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी दैनंदिन कामकाज बाजूला ठेऊन या विषयावर चर्चा करावी अशी विनंती करतो.

सभापती : याबाबतीत माझा निर्णय असा आहे की, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये अशा प्रकारचा कोणताही विषय नाही. त्यामुळे मी या प्रस्तावाची सूचना नाकारीत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेतील क्रमांक दहा वर म.वि.प.नियम 97 अन्वये मराठा समाजाच्या आरक्षणा संदर्भातील प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. त्या अगोदर नियम 93 अन्वयेच्या सूचना त्यानंतर लक्षवेधी सूचना व विशेष उल्लेख असा कार्यक्रम दाखविण्यात आलेला आहे. हे सर्व कामकाज पूर्ण होईपर्यंत खूप वेळ जाणार आहे आणि हे कामकाज संपल्यानंतर आपण म.वि.प.नियम 97 अन्वये मराठा समाजाच्या आरक्षणा संदर्भातील चर्चा सुरु केल्यास त्या चर्चेला न्याय मिळू शकणार नाही. राज्यातील सर्व मराठा समाजाच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा विषय आहे. आपणास या प्रश्नाची जाणीव असल्यामुळे आपण या प्रश्नाला न्याय मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहात. आजही आम्हाला आपल्याकडून न्यायाची अपेक्षा आहे. नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने आणि लक्षवेधी सूचनांवरील कामकाज बाजूला ठेवून मराठा आरक्षणा संदर्भातील चर्चा प्रथम घ्यावी त्यानंतर अन्य कामकाज घ्यावे अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, आजच्या सकाळच्या विशेष बैठकीत मराठा आरक्षणा संदर्भातील विषयावर चर्चा घ्यावी अशी काल चर्चा झाली होती. परंतु माननीय विरोधी पक्ष नेते...नंतर काय चर्चा झाली त्यावर मी भाष्य करणार नाही. परंतु सकाळच्या सत्रात चर्चा झाली असती तर या विषयाला न्याय मिळाला असता. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण मराठा आरक्षणा संदर्भातील चर्चा प्रथम घ्यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी विरोधी पक्ष नेते असे बोलून पुढील शब्द अर्धवट ठेवले म्हणून मी लगेच काही बोललो नाही. मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, माननीय सभापतींकडे कामकाजा संदर्भात चर्चा होते त्यावेळी आपल्या पक्षाचे गटनेते देखील असतात. त्यांना कार्यक्रम बदलाची माहिती असते.

सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाला एक वेगळे महत्व आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावर माननीय मंत्री महोदयांकडून सविस्तर उत्तर मिळणे अपेक्षित असते. काल आपण उशिरापर्यंत सभागृह चालवावे असा मी आग्रह धरला होता. परंतु ही चर्चा उशिरापर्यंत चालविण्यास दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची तयारी नव्हती. तेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी विशेष बैठकीत दोन तास अंतिम आठवडा प्रस्तावासाठी व दुपारी 2.30 ते 3.30 पर्यंत मराठा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

समाजाच्या आरक्षणासंबंधी चर्चा घ्यावी असे ठरविले. आपण दुपारी 2.30 वाजेपर्यंत जितक्या लक्षवेधी सूचनांवर चर्चा होईल तितक्या घ्याव्यात. दुपारी 2.30 वाजता मराठा समाजाच्या आरक्षणासंबंधी चर्चा घेऊन ती दुपारी 3.30 पर्यंत करायवी आणि त्यानंतर पुन्हा उर्वरित काम सुरु करावे.

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेले सर्व कामकाज मला पूर्ण करावयाचे आहे. याचा अर्थ नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा देखील होणार आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांच्या मनातील शंका दूर झालेली आहे. काल अंतिम आठवडा प्रस्तावावरील सर्व भाषणे पूर्ण करायची होती, परंतु आपणास दहा भाषणे पूर्ण करता आली नाहीत. तेव्हा आज सकाळी 10.00 वाजता मराठा समाजाला आरक्षण मिळण्या संदर्भातील चर्चा होणार होती त्याऐवजी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा घेऊन ती दुपारी 12.00 वाजेपर्यंत पूर्ण करावी असे ठरले. त्याप्रमाणे आपण कामकाज केलेले आहे. सन्माननीय सदस्यांचा जो प्रस्ताव आहे त्यावर चर्चा होणार आहे. फक्त त्याचा क्रम थोडा खाली गेला आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मागील पावसाळी अधिवेशनामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधीचा विषय आला होता. नंतर तो प्रस्ताव मध्येच थांबवावा लागला होता, त्यावेळी आम्ही काही करु शकलो नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांचा थोडा गैरसमज झालेला आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी दोन्ही बाजूचे सदस्य प्रयत्न करीत आहेत. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची मते सारखीच आहेत. तेव्हा आज या विषयावर नक्की चर्चा होईल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये अर्धा-तास चर्चा कामकाजपत्रिकेवर दाखवून सुध्दा दुर्दैवाने वेळे अभावी त्यावर चर्चा होऊ शकली नाही. यामध्ये बीड जिल्ह्याशी संबंधित अनेक महत्त्वाच्या अर्धा-तास चर्चांचा समावेश होता. परंतु.....

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माझ्या दालनात मी सांगितले होते की, कोणत्याही परिस्थितीत कोणतेही कामकाज मी लॅप्स करीत नाही. त्यामुळे लक्षवेधी सूचना व अर्धा-तास चर्चा मी लॅप्स केलेल्या नाहीत. यावर आज चर्चा झाली नाही तरी त्या बाबी पुढील अधिवेशनात प्राधान्याने घेतल्या जातील.

तसेच मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, अचानक उद्‌भवलेल्या कामकाजाचा परिणाम नियमित कामकाजावर होतो. परिणामी कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेले कामकाज पुढे जाते.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, कदाचित माझ्याकडून अवज्ञा होत असेल, परंतु मला माझे म्हणणे आपण मांडू द्यावे. काही विशिष्ट मुद्दे मांडण्यासाठी अधिक वेळ दिल्यामुळे कदाचित अर्धा-तास चर्चांना वेळ मिळत नसेल. आपण अर्धा-तास चर्चा लॅप्स न केल्यामुळे व पुढील अधिवेशनात घेण्याचे मान्य केल्यामुळे मी आपले आभार मानतो.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित, आपण ज्या वेळी प्रश्न विचारण्यासाठी उभे राहता त्या वेळी प्रश्न डेव्हलप करण्यासाठी काही वेळ घेता आणि मुख्य प्रश्न बाजूला राहतो. असो. याचा सर्वच सन्माननीय सदस्यांनी विचार करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बॉम्बस्फोटातील आरोपी पकडलेल्या पोलिसांचे अभिनंदन करण्याबाबत

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, ज्या वेळी पोलिसांच्या बाबतीत सभागृहात प्रश्न उपस्थित होतो त्या वेळी पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन कधी करणार, त्यांच्यावर कारवाई कधी करणार अशा प्रकारची मागणी सन्माननीय सदस्यांकडून केली जाते. परंतु मी अशा प्रकारची मागणी करण्यासाठी नव्हे तर पोलीस दलातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे.

महोदय, पुणे येथे दि.13 फेब्रुवारी, 2010 रोजी जर्मन बेकरी परिसरात बॉम्बस्फोट झाले. त्यात 17 व्यक्ती मृत्युमुखी व 56 व्यक्ती जखमी झाल्या. त्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस दलाने खूप प्रयत्न केले. तपास कामामुळे काही पोलीस अधिकारी 3-3, 6-6 महिने आपल्या घरी जाऊ शकले नाहीत. त्यांनी सातत्याने या प्रकरणाचा तपास केला. महोदय, देशाच्या इतर राज्यातील पोलीस जो तपास करु शकले नाही तो तपास आपल्या राज्यातील पोलिसांनी केला. आपल्या राज्याच्या पोलीस दलाने तपास करुन या घटनेशी निगडित असलेली इंडियन मुजाहिदीन ही दहशतवादी संघटना शोधून काढली. दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख श्री.राकेश मारिया यांच्या अखत्यारीतील पोलीस दलाने कोलकाता, बेंगलोर, दिल्ली अशा निरनिराळ्या ठिकाणी जाऊन तपास केला. श्री.दिनेश कदम, एसीपी कदम आणि त्यांच्या टीमने इतर राज्यामध्ये जाऊन तेथे चौकशी करुन इंडियन मुजाहिदीन ही दहशतवादी संघटना शोधून काढली.

महोदय, 1993 मध्ये मुंबईत साखळी बॉम्बस्फोट झाले. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी 70 अधिकारी आणि 162 जणांची टीम तयार केली होती. मुळात त्या वेळी अत्याधुनिक साधनसामुग्री नव्हती. त्या काळात मोबाईल नसताना सुध्दा आरोपींचा शोध लावला. त्या वेळी 4 हजार साक्षीदारांच्या साक्षी घेऊन 9 हजार पानांचे आरोप पत्र दाखल करण्यात आले. वास्तविक पाहता प्रत्येक अधिकाऱ्यांनी जीव लावून तपास केलेला असतो. मुळात चौकशी करणाऱ्या पोलीस दलाला आरोपींना शिक्षा झाल्यानंतर खऱ्या अर्थाने आनंद होतो. काल इंडियन मुजाहिदीनच्या हिमायत बेग या आरोपीला शिक्षा ठोठावली आहे. या निमित्ताने माझी मागणी आहे की, अशा घटनांतील आरोपींचा शोध लावणाऱ्या अधिकाऱ्यांना शाबासकी मिळाली पाहिजे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

महोदय, मुंबईत घडलेल्या 1993 च्या बॉम्बस्फोट प्रकरणी 123 जणांविरुध्द आरोपपत्र दाखल करण्यात आले. त्यातील 100 आरोपींना शिक्षा ठोठावण्यात आली. 1993 आणि 2010 या दोन्ही बॉम्बस्फोटांचा तपास करणारी टीम एकच आहे. श्री.राकेश मारिया, श्री.दीनेश कदम हे दोन्ही घटनांमध्ये तपास काम करीत होते. शिवाय मध्यंतरी मी कॉन्स्टेबल श्री.जाधव यांचे प्रकरण सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले होते.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

5 गोळ्या लागल्यानंतरही ती व्यक्ती सांगते की मला पुन्हा एटीएसमध्ये काम करावयाचे आहे. माननीय श्री. छगन भुजबळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी त्यांना तातडीने एटीएसमध्ये नेमले. बॉम्बस्फोटाच्या स्क्वॉडमध्ये, एटीएसमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या अभिनंदनाचा ठराव पास करण्यात यावा अशी मी विनंती करतो.

सभापती : मी माननीय पर्यावरण मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण याबाबत नोंद घेऊन ही बाब राज्य शासनाच्या नजरेस आणावी. माननीय गृह मंत्र्यांना आपल्या सहीने या बाबतीत एक प्रस्ताव पाठवावा.

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, होय.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. या वर्षी गणित आणि भूमिती हे विषय वगळता इयत्ता दहावीचा सर्व विषयांचा अभ्यासक्रम बदलण्यात आलेला आहे. त्याची पुस्तके छापून अजून बाजारात आलेली नाहीत. खरे म्हणजे इयत्ता नववीची परीक्षा संपली की, ते विद्यार्थी दहावीची पुस्तके घेऊन अभ्यास करतात कारण त्यांना पुढे अभ्यासासाठी फक्त आठ महिने शिल्लक असतात. मी दिनांक 2 एप्रिल, 2013 रोजी या संदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी आपण असे निदेश दिले होते की, या बाबतीत शासनाने लवकरात लवकर निवेदन करावे. दहावीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी फक्त 8 महिने असताना सुट्टीमध्ये अतिरिक्त वर्ग घेऊन हे अभ्यासक्रम पूर्ण केले जातात. एकीकडे आपण सीबीएसईच्या शाळांशी स्पर्धा करण्याच्या गप्पा मारतो परंतु आपल्याला साधी पुस्तकांची छपाई वेळेवर करता येत नाही. माझ्या औचित्याच्या मुद्याबाबत तसेच आपण दिलेल्या निदेशाबाबत शासनाने काय कार्यवाही केली असा माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी सांगू इच्छिते की, माननीय सभापती महोदयांनी असे निदेश दिलेले नाहीत. आमच्याकडे विधान भवनाकडून लेखी पत्र आले की, पंधरा दिवसांच्या आत सन्माननीय सदस्यांना कळविण्यात यावे. त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात येईल. ही पुस्तके छापलेली आहेत, काही ठिकाणी पुस्तके गोडाऊन्समध्ये गेलेली आहेत आणि आता लगेच एप्रिलमध्ये ही पुस्तके उपलब्ध होतील.

श्री. मोहन जोशी : माननीय सभापती महोदयांनी सांगितले होते की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करावे. आपल्या प्रोसीडींगमध्ये आहे. आजच्या महाराष्ट्र टाईम्समध्ये खूप मोठी बातमी छापून आलेली आहे. आता एप्रिल महिना संपत आला आहे तरी शासन पुस्तके बाजारामध्ये आणू शकत नाही आणि माननीय मंत्री महोदयांनी असे निवेदन करावे हे योग्य नाही. दहावीच्या विद्यार्थ्यांवर हा अन्याय आहे.

सभापती : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची बाब आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांनी सुट्टीमध्ये अगोदर अभ्यास करण्याचे ठरविले तरी शैक्षणिक पुस्तकेच नसतील तर तो अभ्यास करता येण्याची शक्यता नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, पुस्तके छापलेली आहेत. गोडावून्समध्ये पण पुस्तके गेलेली आहेत. एप्रिलमध्ये पुस्तके उपलब्ध होतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, त्यांची एप्रिलची व्याख्या काय आहे ? आज 18 एप्रिल आहे.

सभापती : एप्रिलमध्ये म्हणजे एप्रिल अखेरपर्यंत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय कामकाजाबाबत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी एका बाबतीत सातत्याने मागणी करतो त्याचे हे तिसरे अधिवेशन आहे. त्या संदर्भात मी सातत्याने मागणी करीत आलेलो आहे आणि नागपूरच्या अधिवेशनामध्ये सुध्दा शेवटच्या दिवशी मी मागणी केली होती. गेल्या तीन चार अधिवेशनांपासून सातत्याने सभागृहामध्ये अशासकीय कामकाज होत नाही. अशासकीय कामकाजामध्ये जी अशासकीय विधेयके चर्चेला येतात त्या माध्यमातून वेगळे विचार सभागृहासमोर येतात आणि त्या अनुषंगाने काही कायद्यांमध्ये बदल केल्याची नोंद आहे. म्हणून मी पुन्हा यावेळी चौथ्यांदा या अधिवेशनात आपल्याला विनंती करतो की, पुढच्या वेळी तरी आठवड्याच्या शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाज ते सातत्याने घेतले पाहिजे. हे अधिवेशन जवळजवळ सहा आठवडे चालले या सहा आठवड्यामध्ये एकही दिवस अशासकीय कामकाज झाले नाही हा एक रेकॉर्ड आहे. माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, पुढील अधिवेशनामध्ये आठवड्याच्या शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाज व्हावे.

सभापती : एक बाब अशी आहे की, कोणत्याही प्रस्तावावरील कामकाज असेल त्यावरील चर्चेला आपण अडीच तासाच्या वर वेळ देत नाही.

यानंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

या सभागृहामध्ये मी असे पाहिलेले आहे की, एखाद्या प्रस्तावावर अडीच तासाऐवजी साडेचार तास चर्चा झाल्यानंतरही नाराजी व्यक्त केली जाते. त्यामुळे पुढील अधिवेशनाच्या वेळी कामकाज सल्लागार समितीची बैठक होईल त्यावेळी मी गट नेत्यांकडे कटाक्षाने काही गोष्टींचा अट्टाहास धरणार आहे. अडीच तासाची चर्चा ही तेवढ्या वेळेत संपलीच पाहिजे असा आग्रह मी त्यावेळी करणार आहे. ज्यावेळी वेळेची मर्यादा पाळली जाईल त्यावेळी अशासकीय कामकाजावर अन्याय होणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आम्हाला दिलेल्या वेळेतच आम्ही आमचे भाषण पूर्ण करीत असतो. परंतु काही सन्माननीय सदस्य वेळेची मर्यादा पाळत नाहीत. अशा सन्माननीय सदस्यांवर आपण बंधन घालावे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याबाबतही माझ आक्षेप आहे. परंतु तो मोठा नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण म्हणालात की, अडीच तासाची चर्चा वाढत जाते. सरकारला कामकाज उरकण्याची घाई असते. आगामी पावसाळी अधिवेशन केवळ 10 दिवस घेतले जाईल. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी चिंता व्यक्त केली आहे की, सभागृहात अशासकीय कामकाज होत नाही. या दोन्ही सभासदांची समिती नेमून त्यांनी सर्वांच्या वतीने सरकारला पटवून दिले पाहिजे. पावसाळी अधिवेशन 4 आठवड्याचे झाले पाहिजे अशी सर्व सन्माननीय सदस्यांची भावना आहे. या सभागृहात त्याबाबत ठराव मंजूर करुन सरकारकडे पाठवू. माननीय संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी आम्हा सर्वांच्या भावना लक्षात घ्याव्यात.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण मंत्री महोदयांना स्पष्ट निर्देश दिले होते. एप्रिल अखेरपर्यंत कार्यवाही केली जाईल असे मघाशी माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री म्हणाल्या होत्या. त्यापूर्वी त्या असे म्हणाल्या होत्या की, सर्व सन्माननीय सदस्यांना कळवू. आपण असे म्हणालात की, हा प्रश्न राज्यातील सर्व विद्यार्थ्यांचा आहे. एप्रिल अखेर ही पुस्तके मिळाली पाहिजेत, कारण मे महिन्यात सुट्टी सुरु होत असते. एप्रिल महिन्याच्या 15 दिवसात अभ्यासक्रम

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

श्री.कपिल पाटील....

पूर्ण होण्याची शक्यता असते. नववीच्या विद्यार्थ्यांची दहावीची तयारी एप्रिल महिन्यातच सुरु केली जाते. त्या विद्यार्थ्यांना वेळेवर पुस्तके उपलब्ध न झाल्यामुळे दहावीच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. आपल्याकडे पुस्तक तयार करण्याची प्रक्रिया उशिराने सुरु केल्यामुळे अडचण निर्माण होते. आता पुस्तके तयार करण्याची प्रक्रिया सुरु केल्यानंतर 15 मे पर्यंत पुस्तके तयार केली तर त्यात चुका दिसून येतात. त्यासाठी सीबीएसई प्रमाणे कोर्स मान्य केलेला आहे. त्यांच्या प्रमाणे आपल्याकडे वेळापत्रक आखून ते अंमलात आणले पाहिजे. ते अंमलात आणले जात नाही म्हणून ही अडचण निर्माण होते. नवीन शैक्षणिक वर्षामध्ये दिनांक 15 जून, 2013 रोजी शाळा सुरु होणार आहेत. परंतु त्या दिवशी शनिवार आहे. त्याऐवजी शासनाने दिनांक 17 जून, 2013 रोजी शाळा सुरु कराव्यात. शासनाकडून कसलाही विचार न करता एखादी तारीख ठरवून त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाते.

सभापती : ठीक आहे. त्याबाबत विचार करण्यात येईल. आज मध्यंतरासाठी सुट्टी होणार नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आज सभागृहासमोर बरेच कामकाज आहे. परंतु कामकाजाचा क्रम मला समजला तर बरे होईल. कारण विधानसभेमध्ये नगरविकास विभागाशी संबंधित अंतिम आठवडा प्रस्तावाला सुरुवात झालेली असल्यामुळे मला तेथेही उपस्थित राहावयाचे आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी मघाशी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली होती. सूचनेतील विषय या नियमात कसा बसतो हे मला त्यावेळीच सांगावयाचे होते. परंतु आपण सूचना अमान्य केल्यामुळे मी बोलू शकलो नाही. माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी आम्हाला सभागृहात असे वारंवार सांगितले आहे की, मूल्यांकनाचे निकष बदलण्यासाठी आम्ही मंत्रिमंडळासमोर जाणार आहोत. मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती करतो की, मंत्रिमंडळासमोर याबाबतचा प्रस्ताव आणण्यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा आणि लवकरात लवकर निकष बदलण्यासाठी प्रयत्न करावा.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाकडून प्रयत्न चालू आहेत. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव पाठविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / मुद्रितशोधनाधीन नाही

श्री. कपिल पाटील : माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.

सभापती : आपल्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे.

श्री. कपिल पाटील : शाळा 15 जूनला सुरु होणार आहेत.

सभापती : माननीय राज्यमंत्री महोदयांनी आणि सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात एकत्र येऊन चर्चा करावी.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वयेच्या सूचनांच्या निवेदनाबाबत

सभापती : आज नियम 93 अन्वयेच्या सूचनांची 36 निवेदने आलेली आहेत. मी ही सर्व निवेदने पटलावर ठेवण्याचे ठरविले आहे.

श्री. विनोद तावडे : नियम 93 अन्वयेच्या सूचनांची निवेदने पटलावर ठेवण्यास हरकत नाही. परंतु काही निवेदने चुकीची आहेत असे सन्माननीय सदस्यांना वाटते. तेव्हा ज्या सन्माननीय सदस्यांना त्यांच्या निवेदनाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असतील तर ते त्यांना विचारण्याची परवानगी द्यावी.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुचविल्या प्रमाणे एखाद्या निवेदनाबाबत सन्माननीय सदस्यांना शंका असेल तर त्यांनी प्रश्न उपस्थित करण्यास हरकत नाही. परंतु संबंधित खात्याचे मंत्री सभागृहामध्ये त्यावेळी हजर असणे महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी चिठ्ठी दिली तर संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांना बोलाविण्याचा मी प्रयत्न करीन.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी. : औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, एका बाजूला आरोग्य खात्या मार्फत राजीव गांधी जीवनदायी सारखी चांगली योजना राज्यात राबविली जात आहे तर दुस-या बाजूला आरोग्य विभागाच्या एका महत्वाच्या प्रश्नाकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे आपले लक्ष आकर्षित करीत आहे.

राज्यात 10 हजार रुग्णांमागे फक्त एक ॲम्ब्युलन्स अशी परिस्थिती असून उपचाराअभावी मृत्युमुखी पडणा-यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशा अपघातग्रस्त गरोदर महिला व गंभीर आजारी रुग्णांसाठी केन्द्र शासनाने सुरु केलेल्या क्रांती योजनेच्या रुग्ण वाहिकेमुळे देशातील 16 राज्यातील लाखो नागरिकांचे प्राण वाचले आहेत.ही महत्वाची योजना आहे. जखमींचे प्राण वाचावेत म्हणून 2005मध्ये क्रांती योजना सुरु करण्यात आली. नॅशनल रुरल हेल्थ मिशनच्या माध्यमातून ही योजना राबविली जाते. 108 या दूरध्वनी क्रमांकावर अपघाताची माहिती कळविताच केवळ 20 मिनिटांमध्ये या रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचतात. मात्र या जनताभिमुख योजनेची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत राज्य शासन का उदासीन आहे हा प्रश्न सर्वसामान्यांना पडलेला आहे. गेल्या 7 वर्षापासून सुरु असलेल्या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्रामध्ये अद्यापर्यंत झालेली नाही. राज्यासाठी 997 रुग्णवाहिका मंजूर करण्यात आलेल्या असून केन्द्र शासनाने त्यासाठी 1050 कोटी रु.चे अनुदान देखील दिलेले आहे. मार्च महिन्यापर्यंत या रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेसाठी धावणार होत्या. मात्र या योजनेची अद्यापपर्यंत अंमलबजावणी झालेली नसल्यामुळे रुग्णांना तातडीने उपचार मिळत नाहीत. त्यामुळे अनेक रुग्णांना जिवाशी खेळावे लागत आहे. या गंभीर विषयाची राज्य शासनाने दखल घेऊन या योजनेची राज्यात तातडीने अंमलबजावणी करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे."

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, मराठी भाषा ही सातासमुद्रापलीकडे पोहोचविणारे साहित्यरत्न, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील अग्रगण्य लढाऊ नेते लोकशाहीर आणाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीने मराठी साहित्य समृद्ध केले. एवढेच नव्हे तर गिरणी कामगार, लाल बावटा, मिल मजदूर संघ, दीन, दलित व कष्टक-यांच्या प्रश्नांना आपल्या अमोघ वाणीतून, हृदयस्फूर्ती काव्यातून वाचा फोडली. या चळवळीचा त्यांचा प्रमुख केन्द्रबिंदू गोल्डमोहोर मिल होती. लोकजागृतीचे प्रचंड काम उभे करुन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अग्रेसर राहिलेले आण्णाभाऊ साठे यांनी गोल्डमोहोर मिल याच ठिकाणाहून सर्वांना संयुक्त महाराष्ट्राची प्रेरणा दिली. मुंबई महाराष्ट्राचीच असल्याचे सर्वांना पटवून दिले. हे ऐतिहासिक कार्य ज्या गोल्डमोहोर मिल मधून केले अशा मिलच्या 7 एकर 5 गुंठे जागेवर साहित्यरत्न आणाभाऊ साठे यांचे सर्वांना प्रेरणा मिळेल असे एक ऐतिहासिक स्मारक राज्य शासनामार्फत उभे करावे. ही जागा आणाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी मिळविण्याकरिता राज्य शासनाने केन्द्र शासनाकडे पाठपुरावा करावा असा माझा औचित्याचा मुद्दा आहे. "

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक 23 फेब्रुवारी, 2012; 5 मार्च, 2011; 23 नोव्हेंबर, 2011 व 11 ऑक्टोबर, 2012 अन्वये विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणा-या पदवी, पदव्युत्तर आणि पदविका संस्था तसेच अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठातील प्राध्यापक आणि प्राचार्य पदाची नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत क्रमश: 62 व 65 पर्यंत वाढ करण्यात आली आहे. तथापि राज्यातील कृषि विद्यापीठातील प्राध्यापकांना मात्र या वाढीव वयोमर्यादेचा लाभ देण्यात आला नाही. गुजरात आणि अन्य राज्यांमध्ये कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांना निवृत्तीचे वय 62 करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांचे निवृत्तीचे वय 62 पर्यंत वाढविण्याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बिहार आणि झारखंड उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या आहेत. न्यायालयाने सुध्दा म्हटले आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने जे निर्देश दिले ते सर्व राज्यांना बंधनकारक आहेत. त्यांनी सुध्दा त्यांच्या कृषी विद्यापीठातील प्राध्यापकांची वयोमर्यादा वाढविली आहे. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठातील प्राध्यापकांच्या निवृत्तीची वयोमर्यादा 62 करण्यात यावी, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली, तुरुंगवास भोगला अशा स्वातंत्र्यसैनिकांची नोंद असलेले येरवडा कारागृहातील अभिलेखे नष्ट झाल्याची गंभीर बाब नुकतीच उघडकीस आली आहे. 75 वर्षापूर्वीचे अभिलेखे जीर्ण झाल्याने स्वातंत्र्यासाठी आहुती दिलेल्या, तुरुंगवास भोगलेल्या क्रांतीकारकांचे, देशभक्तांचे अभिलेखे उपलब्ध राहिलेले नाहीत. ब्रिटिश सरकार कारागृहाचे प्रकाशन, क्रांतीकारकांची संपूर्ण माहिती, त्यात नाव वय, वर्तन, जात, धर्म, पत्ता, शिक्षण तसेच कोणत्या कलमाखाली कारावास भोगावा लागत आहे याच्या नोंदी तसेच अटकेचा व सुटकेचा दिनांक अभिलेख्यात नोंदवित असत. ते अभिलेखे नष्ट झाले आहेत. ऑगस्ट, 1942 मधील क्रांतीकारकाची माहिती असलेली पाने नोंद वहीत नाहीत. त्यामुळे कारागृहाकडे असलेल्या अभिलेख्यांचे संगणकीकरण करावे अशी विनंती मी शासनास विनंती करीत आहे. अतिशय महत्वाच्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास, अभिलेखे याचे शासनाने संगणकीकरण करुन हे ऐतिहासिक अभिलेखे देशाच्या पातळीवर तरुण पिढीसाठी जपून ठेवावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो.

नंतर 3 ए.1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"पुण्यातील येरवडा परिसरात ऐतिहासिक होळकर समाजाच्या समाध्या आहेत तसेच होळकर छत्री सुध्दा आहे. ही जागा होळकर घराण्याच्या मालकीची आहे. आता ही जागा होळकर ट्रस्टच्या ताब्यात आहे. हा समाधी परिसर संपूर्ण राज्यातील व देशातील धनगर समाजाचे आराध्य दैवत वास्तू असल्याने पर्यटनस्थळ म्हणून घोषित करण्याची होत असलेली मागणी.या पवित्र स्थळाची दुरवस्था झाली असून या ठिकाणी अनैतिक बाबी घडत आहेत. त्यामुळे धनगर समाज व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. हे स्थळ पर्यटनस्थळ म्हणून घोषित करण्याबाबत व वास्तूचे जतन करण्यात यावे यासाठी या परिसरातील सर्व समाध्या व होळकर छत्री व जागेचा विकास करण्याबाबत शासनाने गांभीर्यपूर्वक पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय,या ठिकाणी वर्धमान ज्वेलर्सचा मालक श्री. सुरेश जैन याने या ठिकाणच्या जागेचा कब्जा घेतलेला असून समाधीस्थळाची मालकी त्याची असल्याचे सांगत आहे. या प्रकरणाची चौकशी शासनामार्फत गांभीर्याने व्हावी व सुरेश जैन याच्यावर कारवाई करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय,माझ्याकडे भारत इतिहास संशोधक मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्रमांक 54, पुणे नगर संशोधन वृत्त खंड पहिले यांचा होळकर छत्रीचा नामनिर्देश असलेला पुरावा आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, खडकी, होळकर पुलापलीकडे मुळेच्या मागे तटबंदी महादेवाचे मंदिर आहे. या ठिकाणी ज्वेलर्स मालकाने गांजाची झाडे लावली आहेत. पोलिसांनी या ठिकाणी धाड टाकून ती झाडे पकडली आहेत. यासंदर्भात आमच्या समाजाच्या तरुण युवकांनी मोठे आंदोलन केले होते. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी याबाबत आपण निर्देश द्यावेत व ही जागा ट्रस्टच्या मालकीच्या ताब्यात द्यावी अशी औचित्याच्या मुद्यामार्फत मी विनंती करीत आहे.

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, या बाबत नोंद घेण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमधील प्राथमिक शिक्षकांना जानेवारी 1986 नंतर निवड श्रेणी लागू करतांना 18 वर्ष अर्हताकारी सेवा पदवीधर शिक्षण धारण करणे आणि त्या संवर्गातील वरिष्ठ श्रेणीतील 20 टक्के पदांना सेवा ज्येष्ठतेनुसार निवड श्रेणी अनुज्ञेय राहील या तीन अटी अन्यायकारक असल्याची सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघटनेची तक्रार असणे, या अन्यायकारक अटीमुळे अनेक सेवानिवृत्त शिक्षक निवड श्रेणी पासून वंचित राहिलेले असणे, सेवानिृत्त शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, त्या अनुषंगाने प्राथमिक शिक्षकांना निवड श्रेणी लागू करणे या तीन अटी रद्द करण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे".

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

नुकतीच चंदगड येथे निवडणूक झाली. ही निवडणूक ज्या विषयाभोवती फिरली त्याबाबत मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. एबीएच कंपनी डांबरापासून उप पदार्थ तयार करते. चंदगड हा कोल्हापूर जिल्हयातील शेवटचा तालुका असून तो निसर्गाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. या कंपनीमुळे तेथील पर्यावरणाला धोका निर्माण झालेला आहे. या कंपनीमुळे येथील पाणी, पिके,पर्यावरणाला धोका निर्माण झालेला आहे. 75 टक्के ग्रामपंचायतीने या कंपनीला विरोध दर्शवला असतांना सुध्दा हा प्रकल्प पुढे रेटण्याचा प्रयत्न चालू आहे. चंदगड येथे निवडणूक असल्यामुळे सरकारने या ठिकाणी अनेक प्रकारच्या घोषणा केल्या. या भागातील माजी आमदार सन्माननीय श्री. नरसिंग पाटील हे यासंदर्भात संघर्ष करीत आहेत.

ही मूळ कंपनी कर्नाटकातील बेल्लार येथील आहे. डांबराची वाहतूक करुन चंदगड येथील हळकर्णे येथील एमआयडीसीमध्ये हा प्रकल्प सुरु झाला आहे. गडहिंग्लज येथील हळकर्णीसाठी हा प्रकल्प मंजूर झाला आणि हा प्रकल्प चुकून चंदगड येथील हळकर्णी येथे आला. दोन्ही ठिकाणच्या हळकर्णीमध्ये हा प्रकल्प सोयीचा नाही. या कारखान्यात डांबरापासून पदार्थ बनविले जातात. त्यामुळे सरकारने हा प्लँट ताबडतोब बंद करावा अशी विनंती आहे. निवडणुकीच्या भाषणामध्ये माननीय उप मुख्यमंत्र्यांसहित सर्वांनी प्रचाराच्या वेळी हे मान्य केले आहे. असे असतांनाही हा प्रकल्प सुरु रहावा यासाठी प्रयत्न चालला आहे. या कंपनीला त्वरित काम बंद करण्याचे आदेश द्यावे अशी विनंती आहे. ही कंपनी फोडण्यासाठी त्या भागातील हजारो तरुणांनी प्रयत्न केल्यामुळे या सर्वांवर दरोडयाच्या केसेस दाखल झालेल्या आहेत. त्यामुळे या कारखान्याचे काम लवकरात लवकर बंद करण्यात यावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माझी एवढीच विनंती आहे की, पर्यावरण मंत्री या ठिकाणी योगायोगाने का होईना, रोस्टर म्हणून का होईना उपस्थित आहेत. माननीय मंत्री महोदय या विषयाच्या संदर्भात सर्वांना बोलावून पुढील 15 दिवसात बैठक घेऊन हा विषय निकाली काढणार आहेत काय ?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, मे महिन्यात यासंदर्भात बैठक घेण्यात येईल.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अलिबाग तालुक्यातील खाराग्राम पंचायतीमध्ये एकाच कामाची 10-10 बिले काढण्याचा विक्रम ग्रामपंचायतीच्या सरपंचाने केलेला आहे.

यानंतर श्री. भारवि.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

येथे अनेक कामे बोगस केलेली आहेत. कामाचा दर्जा देखील खालावलेला आहे. त्यामुळे या कामांची चौकशी करावी अशी मी मागणी करीत आहे. सदर कामाची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली करण्यात यावी अशी माझी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

====

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मौजे भोजगाव, तालुका पाटण, जिल्हा सातारा येथे महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाचे वन विश्रामधाम आहे. सदरचे वन विश्राम ब्रिटीश काळातील आहे. सदर विश्रामधाम सन 1941 साली बांधण्यात आले असून ते जुने असल्यामुळे वन विभागामार्फत नुकतेच नूतनीकरण करण्यात आले आहे. या विश्रामधामाला तारेचे कुंपण असून ते मोडकळीस आलेले आहे. तारेचे कुंपण मोडकळीस आल्यामुळे विश्रामधामचे संरक्षण होत नाही. तेथे रात्रीच्या वेळी वन्य प्राणी वन विश्रामधामामध्ये येत आहेत. त्यामुळे तेथे असणाऱ्या रक्षकांना राहणे देखील धोक्याचे झाले आहे. याबाबत भोजगाव, ता.पाटण, जिल्हा सातारा येथील वन विश्रामधामाला भिंतीचे कुंपण बांधण्यासाठी महाराष्ट्र शासनाला सूचना करावी अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, प्राध्यापकांच्या संपा विषयी माझा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. आज सकाळी हायकोर्टाने असा निर्णय दिला आहे की, उद्या पर्यंत सरकारने चर्चा करावी आणि हा विषय सोडवावा. अशा प्रकारची चपराक हायकोर्टाला मारावी लागते. मागच्या वेळी संप मिटवताना जे नेटसेट झाले नाहीत त्यांना युजीसीने मान्यता दिली तर आमची हरकत नाही असे माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांनी सांगितले होते. आता युजीसीने मान्यता दिली आहे. तरी देखील हे सरकार आडमुठेपणा करीत आहे. कर्मचारी आपले म्हणणे सर्व नेत्यांकडे मांडत आहे. सभापती महोदय येथे माननीय राज्य मंत्री उपस्थित असल्यामुळे मी त्यांना विचारू इच्छितो की, आज सकाळी हायकोर्टाने कोणता निर्णय दिलेला आहे तो त्यांनी सांगावा.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत अजून माझ्याकडे आलेली नाही. उद्या संध्याकाळी 4.00 वाजता यासंबंधी बैठक बोलाविण्यात आली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाने नुसती बैठक न घेता हा प्रश्न सोडविला पाहिजे.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, माननीय हायकोर्टाने बैठक घ्यावी असे सांगितले असेल तरी देखील आम्ही हा प्रश्न सोडविण्यासाठीच बैठक आयोजित केलेली आहे.

तालिका सभापती : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष नेते म्हणतात त्याप्रमाणे आपण उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत मागवून ताबडतोब माहिती मागवून तातडीने कारवाई करावी.

श्री.डी.पी.सावंत : होय.

.....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो.

खामगाव जिल्हा बुलढाणा मधील फत्तेपूर हे गाव शासनाच्या डोंगरी भागामध्ये समाविष्ट असून खामगाव पासून 50 कि.मी.अंतरावर आहे. स्वातंत्र्य मिळाल्या पासून या गावात शासनाच्या कोणत्याही योजनेची अंमलबजावणी झालेली नाही. या गावाची लोकसंख्या 650 पेक्षा जास्त आहे. या गावाला ग्रामपंचायत नसल्यामुळे सर्व विकास कामे ठप्प आहेत. फत्तेपूर हे गाव खामगाव उंद्री मार्गावर असून ते मुख्य रस्त्यापासून 1 कि.मी.अंतरावर डोंगरावर वसलेले आहे. या गावात जाणारा रस्ता कच्च्या स्वरूपाचा असल्यामुळे तेथे वारंवार अपघात होऊन वाहतूक ठप्प होते. गावातील रस्ता कच्चा असल्यामुळे तेथे कोणतेही खाजगी वाहन येत नाही. 5 कि.मी.अंतरावर लाखनवाडा येथे असलेल्या शासकीय आरोग्य केंद्रावर रूग्णांना घेऊन जाताना अडचणीचा सामना करावा लागतो. या गावातील मुलामुलींना शिक्षणा पासून वंचित रहावे लागते. या गावातील मुला-मुलींचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तसेच गावातील नागरिकांना रस्त्याच्या जाणवणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी तसेच या गावासाठी तातडीने पक्क्या रस्त्याचे काम करण्यासाठी सदर बाब औचित्याच्या मुद्याद्वारे मी सार्वजनिक बांधकाम मंत्र्याच्या निदर्शनास आणून देत आहे.

.....

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे: सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने याठिकाणी औचित्याच्या मुद्याव्दारे मी अत्यंत महत्वाचा मुद्दा सभागृहासमोर मांडत आहे.

सभापती महोदय, या सभागृहापुढे अंधश्रध्देच्या विरुध्द, जादूटोणा विरोधी कायदा संमत व्हावा म्हणून या सभागृहापुढे आतापर्यंत सहा वेळा हा विषय आलेला आहे. परंतु याठिकाणी तो कायदा मंजूर होऊ शकलेला नाही. मला असे वाटते की, आपल्या पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही बाब भूषणावह नाही. याबाबतीत अनेक घटकांशी चर्चा झाली. आपल्या राज्यात अंधश्रध्दा निर्मूलन कायदा तसेच जादूटोणा विरोधी कायदा आहे आणि असे असूनही याबाबतीत घटना घडत आहेत. अंधश्रध्देच्या बाबतीत कोणाचा विरोध नाही. परंतु अंधश्रध्देमुळे जे बळी पडतात, त्यामध्ये महिला व लहान मुले बळी पडत आहेत. याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आहेत, आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.विनोंदजी तावडे आहेत. मी त्यांनाही विनंती करतो की, आपण प्रत्येक वेळी पुरोगामी महाराष्ट्र म्हणतो आणि असे असताना आपण एक विधेयक पास करु शकत नाही.

तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) : सन्माननीय सदस्यांनी भाषण करु नये.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, मी भाषण करीत नाही. हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे आणि माझी विनंती आहे की, आपण सर्वांनी मिळून जादूटोणा विरोधी कायदा या सभागृहाने संमत केला पाहिजे. तसेच माननीय श्री.नरेंद्रजी दाभोळकर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी येथे आंदोलन केले, तुरुंगात गेले. या अधिवेशनामध्ये जादूटोणा विरोधी कायदा मंजूर करणे शक्य झाले नाही तरी पुढील अधिवेशनात तरी हा जादूटोणा विरोधी कायदा सभागृहासमोर आणावा अशी विनंती मी औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

विनोद तावडे : सभापती महोदय, मला असे समजले आहे की, पुढच्या अधिवेशनामध्ये जादूटोणा विधेयक मंजूर व्हावे म्हणून श्री.सुधीर तांबेसाहेबांनी शिर्डीला जाऊन नवस केलेला आहे.

. . . .3 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी./मु.शी. : गवाणपाडा, मुलूंड (पूर्व), येथील पाम एकर्स् सोसायटीच्या कम्पाऊंडला लागून अनधिकृतपणे होत असलेली मासळीची विक्री याबाबत श्री.रमेश शेंडगे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील निकडीच्या व महत्वाच्या बाबीवर पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मुलूंड (पूर्व), गव्हाणपाडा, मुंबई येथे अधिकृत मासळी विक्रेत्यांचे मार्केट असणे, सदर बाजार अधिकृत इमारतीमध्ये सुरळीत सुरु असणे, परंतु त्याच्या जवळच 400 फूट अंतरावर मुख्य रस्त्यावर पाम एकर्स सोसायटीच्या कम्पाऊंडला लागूनच अनधिकृतरित्या मासळी विक्रेते मासळी विकत असणे. स्थानिक रहिवाशांनी अनेक वेळा तक्रार करुनही सदर अनधिकृत मासळी विक्रेत्यांवर अजून कोणतीही कारवाई केलेली नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर अनधिकृत मासळी विक्रेत्यांना त्वरित हटविण्याबाबत माननीय आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे तक्रारी केल्यानंतर सदर अनधिकृत मासळी विक्रेत्यांना तेथून हटविण्यात आले आहे असे देखील कळविले आहे. परंतु आज सुध्दा त्याठिकाणी मासळी विक्रेते अनधिकृतपणे मासळी विकत आहेत. यामुळे या परिसरात दुर्गंधी पसरुन डास, कीडे, उंदीर व जंतू यामुळे स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. सदर अनधिकृत मासळी बाजार त्वरित हटवून संबंधितांवर त्वरित कठोर कारवाई करावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे.

. . . .3 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आता आपल्याला प्रस्तावावरील चर्चा सुरु करावयाची असून माननीय मंत्री महोदय सदनामध्ये येत आहेत. तोपर्यंत आपण लक्षवेधी सूचना घेणार आहोत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, याठिकाणी जे विशेष उल्लेख आहेत ते सर्व पटलावर घ्यावेत. विशेष उल्लेख वाचण्यासंबंधी सर्वांना पत्रे दिली आहेत आणि सर्व सन्माननीय सदस्यांच्या ज्या विशेष उल्लेखाच्या सूचना आहेत. त्या सर्व पटलावर घेण्यात याव्यात. जेणेकरुन नंतर त्याची उत्तरे रेकॉर्डवर येतील आणि त्यामुळे वेळ वाचेल असे माझे म्हणणे आहे.

. . . .3 सी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : एस.टी.महामंडळातील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीची

नस्ती गहाळ होणे याबाबत प्रा.सुरेश नवले यांनी
वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, एस.टी.महामंडळामध्ये 158 अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीची नस्ती ही गहाळ झालेली आहे आणि ही अतिशय गंभीर बाब आहे.महाव्यवस्थापकांनी या गहाळ नस्तीसंबंधी असमर्थता दर्शविलेली आहे. याबाबतीत महाराष्ट्र शासनाने सखोल चौकशी करावी आणि कार्यवाही करावी.

. . . .3 सी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मालाड मालवणी, जनकल्याणनगर, भाब्रेकर नगर, मालाड (प) येथे गृहनिर्माण योजनेमध्ये सदनिका देण्याचे अमिष दाखवून

सभासदांची करण्यात आलेली फसवणूक

मु.शी. : मालाड मालवणी, जनकल्याणनगर, भाब्रेकर नगर, मालाड (प) येथे गृहनिर्माण योजनेमध्ये सदनिका देण्याचे अमिष दाखवून सभासदांची करण्यात आलेली फसवणूक याबाबत सर्वश्री.विजय गिरकर,विनोद तावडे,ॲड.आशिष शेलार, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विजय गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"समर्थ मार्केटींग ॲण्ड कंपनीचे नावे राजीव गांधी व्यापारी संकूल छत्रपती शिवाजी राजे संकूल गणेश नगर, चारकोप, कांदिवली (प) येथे कार्यालय चालू करुन विजयसिंह देशमुख यांनी म्हाडाच्या मालाड मालवणी, जनकल्याण नगर, भाब्रेकर नगर, मालाड (प) येथील गृहनिर्माण योजनेमध्ये शासन स्वेच्छाधिकार अंतर्गत असलेल्या सदनिका मिळवून देण्याचे आमिष दाखवून सभासदांची लाखो रुपयांची फसवणूक करणे, या कामी महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग आणि म्हाडाची बनावट कागदपत्रे तयार करुन वापरण्यात आल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकरणी मुख्य अधिकारी, म्हाडा पणन विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रार करुनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .3 सी-6

18-04-2013 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3C-6

APR/ ST/ ST/ पूर्वी श्री.भारवी 14:35

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, याठिकाणी म्हाडाचे खोटे लेटर हेड, म्हाडाच्या ऑफीसचे नंबर, म्हाडाच्या सी.ई.ओ.चे नंबर, म्हाडातील अधिकाऱ्यांच्या सह्या घेऊन जवळजवळ 4 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.अ.शिगम . . . ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

म्हाडाचे अधिकारी त्यांना फ्लॅट दाखवून "तुम्हाला असा असा फॅलट दिलेला आहे" असे सांगायचे. त्या लोकांना त्यांनी म्हाडाचे अलॉटमेंट लेटर सुध्दा दिलेले आहे. सन 2004 पासूनचा हा भ्रष्टाचार सुरु आहे. सन 2010 मध्ये तक्रार केलेली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी श्री.विजय देशमुख याला अद्यापपर्यंत पोलिसांनी अटक केलेली नाही. श्री.विजय देशमुख यांनी म्हाडाची बोगस कागदपत्रे तयार करुन लोकांना फसवले आहे. तेव्हा समर्थ मार्केटींगचे प्रमुख असलेले श्री.विजय देशमुख यांना अटक करुन या प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.कडे देणार काय, तसेच त्याची प्रॉपर्टी विकून फसगत झालेल्यांचे पैसे परत देणार काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, अशा प्रकरणा संदर्भात वेळोवेळी गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच दिनांक 3.12.2012 रोजी देखील गुन्हा दाखल केलेला आहे. या प्रकरणातील एक आरोपी मोहम्मद शेख यास पोलिसांनी अटक केलेली आहे. त्यांनी लोकांची कशी फसवणूक केली याची माहिती त्याच्याकडून घेणार आहोत. या प्रकरणाची चौकशी सहआयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यास सांगण्यात येईल. या प्रकरणामध्ये आणखी कोणाचा समावेश आहे काय याची चौकशी करुन यामध्ये अधिकाऱ्यांचा सहभाग असेल तर त्यांच्यावर देखील उचित कारवाई केली जाईल. या प्रकरणातील आरोपी श्री.देशमुख फरारी आहे. त्याची कोठेही मालमत्ता असेल ती सील करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईच्या सुधारित विकास आराखड्यामध्ये तिवरे व पुळण जागांची अचूक नोंद न होणे

मु. शी. : मुंबईच्या सुधारित विकास आराखड्यामध्ये तिवरे व पुळण जागांची अचूक नोंद न होणे या संबंधी श्रीमती अलका देसाई, सर्वश्री संजय दत्त व सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुंबई महापालिकेने हाती घेतलेल्या विकास आराखड्यात सुमारे 973 एकर जमिनीवरील तिवरे व पुळणीची ठिकाणेच नाहीशी झाली असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, तिवरांच्या बेसुमार कत्तलीमुळे 26 जुलै, 2005 च्या पावसात मिठी नदीला आलेला प्रलय लक्षात घेऊनही विकास आराखड्यात वने, पुळण, समुद्रकिनारे, तिवरे यांच्या जागांची अचूक नोंद केली न जाणे, मुंबई महानगरपालिकेने ज्या परदेशी कंपनीवर हे विकास आराखडा बनविण्याचे काम सोपविले आहे त्यांनी तिवरांना नकाशावरुन हद्दपार करणे, सीआरझेडची नियमावली, पाणथळ नकाशे, भारतीय वनविभागाचे सर्वेक्षण याकडे करण्यात आलेले दुर्लक्ष, परिणामी या विकास आराखड्यात अनेक त्रुटी राहिल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिंतेची भावना, शासनाने या बाबत तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.विक्रम काळे): : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मुंबई हे एक बेट आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने खारफुटी ही राष्ट्रीय संपत्ती आहे असे आपण मानतो. निवेदनात नमूद केलेले आहे, "खारफुटीचे संरक्षित क्षेत्रफळ 41.16 चौ.कि.मी.आहे." माझे प्रश्न आहेत की, मुंबई बेटावर खारफुटी फक्त 41.16 चौ.कि.मी.वर असेल तर बाकीची खारफुटी अनधिकृत म्हणून गायब झाली काय, या खारफुटी क्षेत्रावर इमारती उभ्या राहणार आहेत काय ? सन 2014 पासून पुढील 20 वर्षाच्या कालावधीकरिता विकास आराखडा सुधारित करण्याचे काम मेसर्स एस.सी.ई.ग्रुपकडे दिलेले आहे. त्या कंपनीने मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने हा आराखडा तयार केला आहे काय ? नसल्यास सन 2005 सारखी जगबुडी येण्यास वेळ लागणार नाही. तेव्हा पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून शासन हे शहर वाचविणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन 2014 ते 2034 या कालावधीकरिता मुंबईचा सुधारित विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरु झालेले आहे. अशाप्रकारचा विकास आराखडा तयार करण्यासाठी आपण पॅनेल नेमतो.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.भास्कर जाधव....

मागच्या 20 वर्षामध्ये जो डी.पी. जाहीर झाला होता त्या अनुषंगाने आज त्या शहराची काय स्थिती आहे याचा एकंदरीतपणे वस्तुनिष्ठ प्लान तयार केला जातो. त्यानंतर सेक्शन-25 खाली तो महानगरपालिकेकडे पाठविला जातो. त्यानंतर सेक्शन-26 खाली सूचना व हरकती मागविल्या जातात. त्यानंतर प्रोसिजरप्रमाणे तो प्लान शासनाकडे आल्यानंतर नगर विकास संचालनालयाच्या संचालकाकडे पाठविला जातो. त्यांच्याकडून तो शासनाकडे आल्यानंतर त्या प्लानला अंतिम स्वरुप प्राप्त होते. या पूर्वी अशा प्रकारच्या डीपी ची मुदत संपल्यानंतर पुढील डीपी किती कालावधीत जाहीर करावा या बाबत निश्चित कालावधी ठरविलेला नव्हता. परंतु आता राज्य सरकारने चांगली भूमिका घेतली. आता डीपी ची मुदत संपण्यापूर्वी नवीन डीपी चे कच्चे प्रारुप तयार केल्यानंतर साडेचार वर्षांच्या आत त्याला शासनाकडून अंतिम स्वरुप देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

सन्माननीय सदस्यांनी फॉरेनच्या एका एजन्सीचा उल्लेख केला. हे खरे आहे की, फ्रान्स येथील एक छोटीशी कंपनी जॉईन व्हेंचरच्या माध्यमातून यामध्ये सहभागी झाली आहे. मुंबईत तिवरांचे क्षेत्र किती आहे या बाबत मी स्टेटमेंट करणार आहे. या ठिकाणी थोडा फरक दिसत आहे. वन विभागाच्या माध्यमातून सॅटेलाईट सर्व्हे केल्यानंतर 2 चौ.कि.मी. तिवर आहे. परंतु पूर्वी तिवराचे क्षेत्र 40.94 चौ.कि.मी. दर्शविले होते. 2008 च्या अधिसूचनेत 41.16 चौ.कि.मी. क्षेत्र दाखविले होते. याचाच अर्थ पूर्वी आयडेंटीफाईड झालेले तिवराचे क्षेत्र आणि आताचे प्रस्तावित क्षेत्र जवळजवळ सारखेच आहे. पर्यावरण, प्रदूषण, 2005 मध्ये आलेला पूर या सर्व गोष्टी ठीक आहेत.

महोदय, तिवराचे क्षेत्र तयार होण्यासाठी विशिष्ट परिस्थितीच लागते असे नाही. तिवरांची झाडे दलदलीच्या ठिकाणी कोठेही तयार होतात. परंतु त्यांचा फायदा आणि दुरुपयोग असे दोन्ही केले जाते. त्या मुळे वन विभागाने सीसीएफ दर्जाच्या अधिकाऱ्यांची यावर लक्ष ठेवण्यासाठी नेमणूक केली आहे. त्यांच्या हाताखाली 37 लोकांचा स्टाफ दिला आहे. तिवराचा मुद्दा कोकणातील चार जिल्ह्याच्या ठिकाणी आहे. मुळात तिवराची झाडे समुद्र किनाऱ्यालगत, भरती-ओहोटीच्या ठिकाणी, दलदलीच्या ठिकाणी येतात. एकंदरीत तिवराचे क्षेत्र निश्चित करुन त्यांचे संरक्षण करण्याची शासनाने खबरदारी घेतली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे : महोदय, अधिवेशनाचा या आठवड्यातील आजचा चौथा दिवस आहे. सलग चार दिवसांपासून तिवरांचा विषय सभागृहात येत आहे. हे खरे आहे की, तिवरांची होत असलेली कत्तल हा गंभीर विषय आहे. दोन दिवसांपूर्वीच ठाण्यामध्ये अशाच प्रकारची घटना घडली आहे. भिवंडी-मानकोली लगत मोठ्या प्रमाणावर तिवराचा पट्टा आहे. त्या ठिकाणी तिवरांची कत्तल करुन तेथे रात्रं-दिवस भरणीचे काम सुरु आहे. जिल्हाधिकाऱ्यांना या बाबत सांगितले तर ते म्हणतात की, यावर कारवाई करण्यासाठी आमच्याकडे योग्य ती यंत्रणा नाही. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्यास केवळ छोटी मोठी केस दाखल केली जाते. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, त्या भागात होत असलेल्या तिवरांच्या कत्तलीबाबत शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : महोदय, आयडेंटीफाईड आणि नोटीफाईड केलेल्या ठिकाणी तिवरांची कत्तल केली जात असेल तर त्याची जबाबदारी जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार यांचीच नव्हे तर वन विभागाच्या सीसीएफ दर्जाच्या अधिकाऱ्याची सुध्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक ठिकाण सांगितले तर त्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन 24 तासांच्या आत तेथे भेट देण्यास सांगितले जाईल. भेट दिल्यानंतर तेथे चुकीचे होत आहे असे निदर्शनास आले तर त्या संदर्भात संबंधितांवर कारवाई करण्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

उप सभापती : तुम्हाला सांगणाऱ्यांची नावे उघड करु नका नाही तर तिवरांच्या ऐवजी त्यांची कत्तल होईल.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अतिशय गंभीर आणि महत्वाच्या विषयाच्या संदर्भात आहे. मुंबईच्या डेव्हलपमेंट प्लॅनचे फायनलायझेशन म्हणजे मुंबई शहरातील भूखंड डेव्हलपर्स यांची मोठी उलथापालथ याच्याशी संबंधित असते. खाजगी सल्लागार मेसर्स एस.सी.ई.ग्रुप या खाजगी कंपनीला आपण काम दिले. महानगरपालिकेला हे काम दिल्यानंतर त्या कॉन्ट्रॅक्टरने महानगरपालिकेच्या आयुक्तांना काम करण्यास मनाई केली. त्यानंतर महानगरपालिका आयुक्तांनी निगोशिएशन करुन पुन्हा त्यांना काम करावयास लावले. जेव्हा त्यांना काम दिले तेव्हा त्या कंपनीचे डायरेक्टर, पार्टनर कोण होते आणि पुन्हा निगोशिएशन केल्यानंतर त्या कंपनीच्या डायरेक्टर्समध्ये कोण घुसले आणि त्यातील इन्टरेस्टेड पार्टी कोण होती याची माहिती माननीय मंत्री सदनासमोर देतील का ? या ठिकाणी तिवरांच्या झाडांबद्दल उल्लेख झाला. त्याचे क्षेत्र 40-41 हेक्टर असे सांगण्यात आले. महानगरपालिकेने 2012-2013 चा जो एन्व्हायरमेंटल स्टेटस रिपोर्ट प्रसिध्द केला आहे त्यामध्ये 55 हेक्टर क्षेत्र असल्याचे आपण म्हटले आहे आणि त्याला ओव्हरकम करण्यासाठी एमएमआर रिजनमध्ये एमएमआरडीएने 100 कोटी रुपयांची तरतूद मॅनग्रोव्ह पार्कसाठी केलेली आहे. ते पार्क कधीपर्यंत करणार ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी 40 किंवा 41 हेक्टर असे म्हणालो नाही तर मी त्याची माहिती चौरस किलोमीटरमध्ये सांगितली. ज्यावेळेला त्या कंपनीला काम देण्यात आले त्यावेळी डायरेक्टर कोण होते आणि निगोशिएशन झाल्यानंतर डायरेक्टर कोण होते आणि नक्की कोण घुसले याचा शोध घेण्याकरिता थोडा वेळ लागेल. ती माहिती नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. मॅन्ग्रोव्ह पार्कसाठी एमएमआरडीएने 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यामध्ये फॉरेस्ट खात्याकडे असलेल्या सटेलाईट सर्व्हेचा एकंदरीत एरिया कमी दिसतो. मुंबई महानगरपालिकेचा एरिया आणखी वेगळा दिसतो. ज्या रिपोर्टचा आपण या ठिकाणी आधार घेतला त्यामध्ये वेगळा एरिया दिसतो. मॅन्ग्रोव्ह पार्क नक्की कोठे उभारावयाचे आहे आणि किती हेक्टरवर उभारावयाचे आहे याचा निश्चित सर्व्हे केल्याशिवाय त्या संदर्भात भाष्य करणे उचित होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आपण मॅनग्रोव्ह पार्क कराल तेव्हा करा परंतु आता जे मॅनग्रोव्हज आहेत ते वाचविणे महत्वाचे आहे. कोळी बांधवांचे संपूर्ण आयुष्य त्याच्यावर अवलंबून आहे. मॅनग्रोव्हजच्या ठिकाणी मासे अंडी घालण्यासाठी येतात. माहीमच्या खाडीमध्ये वरळी सी-लिंकसाठी केंद्र शासनाची केवळ 1.4 एवढी भरावाची परवानगी असताना त्या ठिकाणी 100 एकरमध्ये ठराव टाकण्यात आला. मुंबई हे सात बेटांचे शहर आहे आणि केवळ याच ठिकाणी नाही तर मालवणी आणि असंख्य ठिकाणी जागोजागी मॅनग्रोव्हज गाडली जाऊन त्या ठिकाणी नवीन नवीन इमारती उभ्या राहात आहेत. ही मॅनग्रोव्हज म्हणजे मुंबई शहराची फुफ्फुसे आहेत आणि ती या शहराला जगवित आहे. मॅनग्रोव्हची कत्तल करणे, मॅनग्रोव्ह गाडून टाकणे हे प्रकार शासन तातडीने थांबविणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याला जर चांगला प्राणवायू घ्यावयाचा असेल तर फुफ्फुसांचे जतन केलेच पाहिजे. म्हणून या फुफ्फुसांचे जतन नक्कीच केले जाईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, जी तिवरांची झाडे, जी पुळण, वने आहेत या सर्वांचे संरक्षण मुंबई महानगरपालिका करणार आहे असे निवेदनात नमूद केले आहे. यामध्ये नक्की काय खरे आहे ? त्यांनी केलेले प्लॅनिंग खरे आहे की, या निवेदनामध्ये जे नमूद केले आहे ते खरे आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, तिवरांच्या झाडांचे संरक्षण करणे हे खरे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : एकदंत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सांताक्रुझ (पूर्व) या संस्थेच्या कारभाराबाबत झालेल्या तक्रारी

मु. शी. : एकदंत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सांताक्रुझ (पूर्व) या संस्थेच्या कारभाराबाबत झालेल्या तक्रारी यासंबंधी सर्वश्री रमेश शेंडगे, राम पंडागळे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"एकदंत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पोस्टल कॉलनी, असगर अली कंपाऊंड, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई या संस्थेच्या कारभाराबाबत संस्थेच्या सदस्यांनी तक्रारी करणे, परिणामी सदर संस्थेवर उपनिबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था, म्हाडा/मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 78 (1) अन्वये दिनांक 17 मार्च, 2012 रोजीच्या आदेशान्वये प्रशासकाची नियुक्ती करणे, असे असूनही नियोजित एकदंत एसआरए संस्थेच्या नावे बनावट संस्था स्थापन करणे, त्यामुळे मूळ सभासदांमध्ये पसरलेले गोंधळाचे व संभ्रमाचे वातावरण, संस्थेचे माजी पदाधिकारी अशोक कारंडे, संदिप रावराणे, सतीश नातू सुतार, एकनाथ भोगले व विकासक सचिन घोलप यांचेविरुध्द प्रशासकांनी वाकोला पोलीस ठाण्यात दिनांक 19 मार्च, 2013 रोजी तक्रार दाखल करणे, अद्यापही या तक्रारीची पोलिसांनी दखल न घेणे, त्यामुळे मूळ सोसायटीच्या सदस्यांत पसरलेले भीतीचे वातावरण, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. खंदारे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, एकदंत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पोस्टल कॉलनी, असगर अली कम्पाऊंड, न्यू वाकोला, सांताक्रुझ (पूर्व) येथे स्थापन झाली आणि या संस्थेचे दिनांक 21.9.1990 रोजी रजिस्ट्रेशन झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी तशी परवानगी दिली. दि.29.9.1992 रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी एकदंत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेला 30 वर्षासाठी लिजने जागा दिली. पहिली कमिटी असतानाही या संस्थेला जागा दिल्यानंतर वेगळ्या विचाराने काम करणाऱ्या काही लोकांनी या संस्थेची जागा दुसऱ्या बिल्डरला देण्याच्या हेतूने प्रयत्न सुरु केले. संस्थेच्या सभासदांनी त्याला विरोध केला होता. त्यांचे असे म्हणणे होते की, याच संस्थेच्या माध्यमातून ही जागा डेव्हलप केली पाहिजे. परंतु काही लोकांनी या संस्थेच्या नावाशी साधर्म्य असेल अशा नावाची म्हणजे एकदंत एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) नावाची संस्था स्थापन केली. नवीन संस्थेचे सभासद आपल्या संस्थेत आहेत हे दाखविण्यासाठी त्यांनी मयत झालेल्या लोकांच्याही सह्या केलेल्या आहेत. हे प्रकरण म्हाडाच्या उपनिबंधकांकडे गेल्यावर उपनिबंधकांनी या संस्थेवर प्रशासकाची नेमणूक केली. म्हणून एसआरएच्या नावाने स्थापन झालेल्या दुसऱ्या संस्थेला शासनाने स्थगिती दिली पाहिजे. त्या प्रशासकांनी पोलिसात तक्रार केलेली आहे. दुसरी स्थापन केलेली संस्था डुप्लीकेट आहे आणि सदस्य दिशाभूल करुन बिल्डरला जागा विकण्याचा प्रयत्न करीत आहेत.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांना मी सांगू इच्छितो की, आपण या लक्षवेधीच्या माध्यमातून भाषण करु नये. आपण आपला प्रश्न विचारावा.

श्री.रमेश शेंडगे : पहिल्या नावाशी साधर्म्य असलेल्या एसआरए सहकारी संस्थेला शासन स्थगिती देणार आहे काय, पहिल्या संस्थेला जागा डेव्हलप करण्याला परवानगी दिली जाईल काय, प्रशासकांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई केली जाईल काय, त्या लोकांनी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडेही तक्रार केलेली आहे. या सोसायटीची कागदपत्रे माझ्याकडे आहेत. ती कागदपत्रे मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांकडे देतो. मंत्री महोदयांनी योग्य ती कारवाई करावी.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, एकदंत सहकारी गृहनिर्माण संस्था ही नोंदणीकृत संस्था आहे. दुसरी संस्था नियोजित आहे. नियोजित संस्थेला स्थगिती देणे याला काही अर्थ नाही. एकाच प्लॉटवर दोन सोसायट्या होऊ शकत नाहीत हे निश्चित आहे. त्यामुळे पहिल्या सोसायटीला विश्वासात घेतल्याशिवाय दुसरी कोणतीही सोसायटी रजिस्टर होऊ देणार नाही. म्हाडाने प्रशासकाची नियुक्ती केलेली आहे, त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केलेली आहे आणि पोलीस स्टेशननेही त्याची दखल घेतलेली आहे. पोलीस स्टेशनने असे सांगितले आहे की, असे काही निष्पन्न होत नाही. डीसीपीकडे ही चौकशी प्रलंबित आहे. डीसीपीकडे एक महिन्यात चौकशी पूर्ण करुन संबंधित लोक दोषी असतील तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, या संस्थेमध्ये असलेले लोक गुंडगिरी करीत आहेत. लोकांना मारहाण करीत आहेत. पोलीस सुध्दा दखल घेत नाहीत. मयत झालेल्या लोकांच्या नावाने खोट्या सह्या करीत आहेत. म्हणून हे प्रकरण गंभीर आहे असे माझे मत आहे. हे लोक आजूबाजूच्या परिसरामध्ये अनधिकृतपणे झोपड्या बांधून ते विकण्याचे काम करीत आहेत. ही म्हाडाची जागा असल्यामुळे कायद्याप्रमाणे एसआरएला जागा देता येणार नाही. ते लोक गुंडगिरी करीत आहेत. शासनाने त्याची योग्य दखल घ्यावी, पुढाकार घ्यावा. तेथील डीएसपींना बोलवावे. त्या ठिकाणी गेल्या 40-50 वर्षांपासून लोक राहत आहेत त्यांना शासन संरक्षण देणार की नाही ? मयतांच्या नावाने सह्या केल्यामुळे तक्रारी केलेल्या आहेत त्याबाबत शासन योग्य प्रकारची कारवाई करणार आहे का ?

श्री.सचिन अहिर : होय.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

पृ. शी. : ठाणे जिल्हयातील निळजे गावात फ्लॅट देण्याच्या नावाखाली विकासकाने आयआयटी कर्मचा-यांची केलेली फसवणूक

मु. शी. : ठाणे जिल्हयातील निळजे गावात फ्लॅट देण्याच्या नावाखाली विकासकाने आयआयटी कर्मचा-यांची केलेली फसवणूक यासंबंधी ॲड. अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये झालेला भ्रष्टाचार

मु. शी. : नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये झालेला भ्रष्टाचार यासंबंधी सर्वश्री जयंवतराव जाधव, विनोद तावडे,चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार व श्री. रामनाथ मोते,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये प्रचंड प्रमाणात झालेला भ्रष्टाचार, बँकेतील घोटाळे व गैरव्यवहारांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८९ अ(१) अन्वये विशेष तपासणी पथकाने केलेल्या तपासणीत सदर बँकेच्या संचालक मंडळाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ व नियम १९६१ बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, बँकेचे नोंदणीकृत उपविधींमधील तरतुदी, नाबार्ड व सहकार आयुक्त कार्यालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यास जाणीवपूर्वक कसूर केली असल्याचे निदर्शनास येणे, सदर बँकेमध्ये शासनामार्फत प्रशासकाची नियुक्ती करण्याची आवश्यकता, गैरव्यवहारांची रक्कम व अवाजवी खर्चाबाबत जबाबदारी निश्चित करुन सदर रकमा वसूल करण्याबाबत ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव : मागील वर्ष सहकार वर्ष म्हणून आपण साजरे केले. आता आपण घटनादुरुस्तीच्या निमित्ताने सहकारासंबंधीचे विधेयक आणलेले आहे. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची मुदत 12 सप्टेंबर 2012 रोजी संपली. परंतु दुष्काळी परिस्थितीमुळे त्या संचालक मंडळास मुदत वाढ देण्यात आली. ही मुदतवाढ देत असताना सहकार आयुक्तांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना काही निर्बंध घातलेले आहेत. संचालक मंडळाने धोरणात्मक निर्णय घेऊ नये, अधिकचा खर्च करु नये अशा प्रकारचे निर्बंध असताना देखील नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेने 26 कोटी रु.चा संगणक खेरदीचा प्रस्ताव मंजूर केला आणि त्याचक्षणी ठेकेदाराला 19 कोटी रुपयाचे पेमेंट करण्यात आले. जिल्हा उपनिबंधक, धुळे यांनी बँकेचे ऑडिट केले. त्यामध्ये गंभीर बाबी निदर्शनास आल्या. बेकायदेशीरपणे कर्ज देणे, चहापानासाठी लाखो रुपये खर्च करणे, फर्निचरसाठी करोडो रुपये खर्च करणे अशा प्रकारचे गंभीर आरोप केलेले आहेत. या बँकेचे सहनिबंधकांनी ऑडिट केल्यानंतर बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याच्या सूचना त्यांनी दिलेल्या आहेत. या नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेचे गैरव्यवहार उघडकीस आलेले असताना संचालक मंडळावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करुन ही बँक बरखास्त करण्यात येईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संदर्भात अनेक तक्रारी सहकार विभागाकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्या तक्रारींच्या संदर्भात कलम 89(अ) अंतर्गत बँकेचे इन्स्पेक्शन करण्यात आले. सन्माननीय सदस्यांनी बँकेचे ऑडिट केले असा उल्लेख केला. ते ऑडिट नव्हते तर ते बँकेचे इन्स्पेक्शन होते. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे आणि अन्य चार अधिका-यांच्या पथकाने या बँकेचे इन्स्पेक्शन केले. या इन्स्पेक्शनमध्ये गैरव्यवहारावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. 3 वर्षाचे लेखापरीक्षण करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर फेर लेखापरीक्षण करण्याचे आदेश सहकार विभागाने दिले. बँकेच्या संचालक मंडळावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करुन ते बरखास्त करावे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. बरखास्तीबाबत आयुक्त सहकार यांनी रिझर्व्ह बँकेकडे कलम 110 अंतर्गत प्रस्ताव पाठविलेला आहे. लेखापरीक्षण अहवाल 15 दिवसामध्ये अपेक्षित आहे. या प्रकरणी जे संचालक आणि अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.

...नंतर श्री. भोगले...

अशासकीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 5.....

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेचा विषय अतिशय गंभीर आहे. दैनंदिन खर्चाशिवाय कोणताही भांडवली खर्च आम्ही करणार नाही असा ठराव संचालक मंडळाने मंजूर केला होता. त्या ठरावाचे उल्लंघन झालेले आहे. सह निबंधकांनी भांडवली खर्च करु नये असे आदेश दिलेले होते आणि ॲडव्होकेट जनरल यांनी असा सल्ला दिला होता की, संचालक मंडळाला कोणत्याही प्रकारचा भांडवली खर्च करता येणार नाही. तरीही संचालक मंडळाने 19 कोटी रुपये एकाच दिवशी खर्च केले. ही बाब अतिशय गंभीर आहे. बँकेच्या संचालक मंडळासह ज्यांनी कट कारस्थान केले त्यांना पाठीशी घालण्याची आवश्यकता नाही. त्यांच्याविरुध्द ताबडतोब फौजदारी गुन्हा दाखल करुन 19 कोटी रुपये वसूल केले पाहिजेत. राज्य शासनाची उज्ज्वल प्रतिमा लोकांसमोर गेली पाहिजे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, कोणतीही कारवाई करताना लेखापरीक्षणाचा आधार घ्यावा लागतो. लेखापरीक्षणाचा अहवाल आपल्याकडे उपलब्ध नसेल तर त्या आधारे फौजदारी गुन्हा सुध्दा नोंद होत नाही. ही कारवाई निश्चितपणे योग्य दिशेने सुरु आहे. या प्रकरणात घाई केली आणि आजच कारवाई करा असे म्हटले तर ती कारवाई कायद्याच्या चौकटीत टिकणार नाही.

मी सन्माननीय सदस्यांना स्पष्टपणे सांगितले की, 15 दिवसात हा अहवाल शासनाकडे किंवा आयुक्त कार्यालयाकडे येणे अपेक्षित आहे. अहवाल सादर झाल्यानंतर जे संचालक, अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होईल. आयुक्त किंवा सह निबंधकांनी सूचना देऊनही रक्कम खर्च केली, उघडपणे पायमल्ली केली हे मान्य केले आहे. त्यांच्या बाबतीत योग्य ती कारवाई सहकार विभागाच्या माध्यमातून सुरु आहे. म्हणून लेखापरीक्षण झाल्यानंतर यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी निश्चितपणे कारवाई होईल असे सांगितले आहे. संचालक मंडळ बरखास्त होत नाही तोपर्यंतच्या मधल्या काळासाठी त्यांच्यावर कोणते निर्बंध घातले जाणार आहेत? निर्बंध असतानाही त्यांनी रक्कम खर्च केली आहे. त्याकरिता कोणती उपाययोजना करणे अपेक्षित आहे?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, लेखापरीक्षण आजच्या तारखेपर्यंत करण्याचे आदेश दिलेले आहेत हे मी अगोदरच सांगितले आहे. लेखापरीक्षण आजच्या तारखेपर्यंतचे होणार असून त्याचा अहवाल आल्यानंतर जे जे गैरव्यवहार झाले त्या संदर्भात विभागाच्या वतीने कारवाई करण्यात येईल.

श्री.चंद्रकांत छाजेड : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे हे सरकारला मान्य आहे. मंत्री महोदयांनी तांत्रिक बाबी पुढे करु नयेत. संचालक मंडळाने बँकेची नवीन इमारत बांधली परंतु अद्याप पूर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही. कोट्यवधी रुपये त्यासाठी खर्च केले आहेत. ज्या सहकारी संस्थेचे भांडवल 10 हजार रुपये आहे त्यांना दीड दीड कोटी रुपये कर्ज दिले गेले. त्यामुळे बँकेचे सभासद अडचणीत येण्याची शक्यता आहे. सहकार विभागाने संगणकीकरणासाठी खर्च करु नये असे सांगूनही रक्कम खर्च केली असेल तर संचालक मंडळच नव्हे तर बँकेचे जनरल मॅनेजर, ज्यांनी चेकवर सही केली त्यांनाही संयुक्तपणे दोषी धरुन कारवाई केली जाईल काय?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी याठिकाणी सांगितले आहे की, आजच्या तारखेपर्यंतचा लेखापरीक्षण अहवाल मागविला आहे. तो अहवाल आल्यानंतर त्यात केवळ संगणकीकरणाचा व्यवहार नव्हे तर इतरही अनियमिततेबाबत जे जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

नंतर 3जे.1..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.जयंतवराव जाधव : सभापती महोदय, यामध्ये 19 कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. हे 19 कोटी रुपये ज्या बँकेच्या खात्यामधून देण्यात आले त्या बँकेच्या एका कर्मचाऱ्यावर कारवाई करुन त्याला निलंबित करण्यात आलेले आहे असून या प्रकरणामध्ये कारवाई झालेली आहे. बँकेमध्ये जर कोणी चेक घेऊन आला व त्या बँकेच्या कर्मचाऱ्याने चेक वटवून दिला तर त्यामध्ये बँकेचा चेक वटवून देणारा कर्मचारी दोषी कसा काय असू शकतो ? त्यामुळे या प्रकरणामध्ये कर्मचाऱ्याचे निलंबन मागे घेतले जाणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सदर कारवाई बँकेने केलेली असून ही कारवाई आमच्या विभागामार्फत करण्यात आलेली नाही. परंतु लेखापरीक्षणाचा अहवाल आल्यानंतर संचालक आणि अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि ई-कचरा निर्माण करणाऱ्या कंपन्यांनी ई-कचऱ्याची जबाबदारी स्वीकारणे

मु. शी. :इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि ई-कचरा निर्माण करणाऱ्या कंपन्यांनी ई-कचऱ्याची जबाबदारी स्वीकारणे यासंबंधी सर्वश्री अनिल भोसले,जयवंतराव जाधव, किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि ई-कचरा निर्माण करणाऱ्या कंपन्यांसाठी केंद्रीय वने आणि पर्यावरण मंत्रालयाने दिनांक १२ मे, २०११ रोजी अधिसूचना काढणे, त्यानुसार इलेक्ट्रॉनिक्स वस्तू निर्माण करणाऱ्या अथवा ई-कचरा करणाऱ्या कंपनीने ई-कचऱ्याची पुन:प्रक्रिया आणि पुनर्वापर यांची जबाबदारी स्वीकारणे जरुरीचे असणे, ई-कचरा निर्माण करण्यांत मुंबई, पुणे आणि नागपूर ही शहरे अग्रक्रमावर असणे, मात्र, या तीनही शहरात ई-कचऱ्यासाठी कलेक्शन सेंटरचा अभाव असल्याने पर्यावरणाची होत असलेली हानी, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री. संजय देवतळे (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, राज्यात दर वर्षी 17 हजार टनापेक्षा जास्त ई-कचरा तयार होत असतो. एकटया मुंबईत 7 हजार टन ई-कचरा तयार होतो. ई-कचऱ्याच्या संदर्भात राज्यात व्यवस्थापन नाही. ई-कचरा कोठे साचवायचा यासंदर्भात नगरपालिका महानगरपालिकांमध्ये मतभेद आहेत. त्यामुळे ई-कचऱ्याच्या विल्हेवाटीच्या संदर्भात शासनाने कोणते पाऊल उचलले आहे ? स्थानिक स्वराज्य संस्था ई-कचऱ्याच्या संदर्भात प्रशिक्षण देऊन शासन त्याचे नियोजन करणार आहे काय ?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, इलेक्ट्रीकल आणि इलेक्ट्रॉनिक्स टाकाऊ कचऱ्याला ई-कचरा म्हटले जाते. या ई-कचऱ्याची व्यवस्था लावण्यासाठी राज्यामध्ये 1 मे, 2012 पासून कायदा अंमलात आलेला असून त्यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच शासनाने नवी मुंबई, पुणे व ठाणे या तीन ठिकाणी सेंटर सुरु केलेले आहे. त्याच बरोबर 14 डिसमेंटल केंद्र सुरु झाले असून एक रिसायकल केंद्र वसई येथे सुरु करण्यात आलेले आहे. या कायद्याला अजून एक वर्ष पूर्ण व्हावयाचे आहे. पूर्ण राज्यात ई-कचऱ्याच्या लिंक करिता एका कंपनीला परवानगी दिलेली आहे. सुरुवातीला बायो मेडीकल वेस्टची व्यवस्था नव्हती परंतु आता सर्व ठिकाणी बायो मेडीकल वेस्टची चांगल्या प्रकारे व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे मेडीकल वेस्ट प्रमाणेच ई-कचऱ्याची सुध्दा चांगल्या प्रकारे व्यवस्था लावली जाईल. ज्या ठिकाणी ई-कचऱ्याच्या केंद्राची आवश्यकता असते अशा ठिकाणी केंद्र सुरु केले जातील.

सभापती महोदय, ई-कचऱ्याच्या संदर्भात संघटीत आणि असंघटीत असे दोन घटक आहेत. मोबाईल, टीव्ही अशा गोष्टी ई-कचऱ्यामध्ये येतात. स्थानिक स्वराज्य संस्था कचरा गोळा करीत असतात व त्यामधून ई-कचरा वेगळा करुन तो सेंटर्सकडे पाठविण्यासाठी अवेअरनेस निर्माण करण्याच्या संदर्भात योग्य त्या सूचना देण्यात येतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. वाढत्या नागरिकरणाचा परिणाम किती भयंकर होत चालला आहे त्याचे हे उदारहरण आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, राज्यामध्ये 20 हजार मेट्रीक टन ई-कचरा तयार होत आहे. उत्तरामध्ये म्हटले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार .....

आहे की, डिसमेंटल तसेच रिसायकल केंद्राला परवानगी दिलेली आहे. मुंबई, नागपूर या ठिकाणी ई-कचऱ्याच्या संदर्भात केंद्र सुरु नाहीत. ही ई-वेस्ट प्रोसेसिंग अँड डिस्पोजल फॅसिलीटीची आवश्यकता आहे. परंतु आपण डिसमेंटल आणि कलेक्शनच्या संदर्भातच येथे बोलत आहोत. एमपीसीबीने प्रिलिमनरी रिपोर्ट जुलै,2009 मध्ये दिला होता. 20 हजार मेट्रीक टनसाठी प्रोसेसिंग आणि डिस्पोजल फॅसिलिटी करण्याची आवश्यकता आहे. मुंबई आणि मुंबई उपनगरात 11 हजार मेट्रीक टन ई-कचरा तयार होत असतो. ॲडव्हायजरी कमिटने 15 हजार मेट्रीक टन ई-कचऱ्याच्या प्रोसेसिंग प्लँट लावयला सांगितला आहे. एमएमआरडीएला हे काम पीपीपी मेसर्स जेलॉईड नावाच्या कॉन्ट्रक्टरला कन्सलटन्सीसाठी 25 लाख रुपये दिले. ऑक्टोबर, 2010 पासून प्रोसेस सुरु झाली.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

दिनांक 9 फेब्रुवारी 2012 रोजी 2 कंत्राटदार अंतिम करायचे होते. पण रि-टेंडरींग झाले. प्रोसेस प्लांटचे काम ऑक्टोबर 2010 मध्ये सुरू झाले होते. 9 फेब्रुवारी 2012 रोजी सर्व काम अंतिम टप्प्यावर आले असताना रि टेंडरींग झाले. एमपीसीबीच्या डायरेक्शन नुसार एमएमआरडीने टेंडर काढले होते. ते परत कधी निघणार आहे, ही फॅसिलिटी एमएमआरला कधी मिळणार आहे ? याचे ठोस उत्तर माननीय मंत्रिमहोदय देतील काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, वसई येथे रि-सायकल केंद्र कार्यान्वित आहे. कॉमन वेस्ट फॅसिलिटीसाठी मानकोळी, भिवंडी येथे चार एकर जागा एमएमआरडीने घेतली आहे. या कामासाठी दोन बिडर आले होते. ते क्वालिफाय नव्हते. त्यामुळे रि-बिड प्रोसेस सुरू आहे. सदर प्रोसेस लवकरात लवकर करण्यासंबंधी मंडळाला सूचना करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, अडीच वर्षापासून ही सर्व प्रोसेस सुरू आहे. आता येथे उत्तर देण्यात येते आहे की, आम्ही त्यांना सांगू. ई कचरा कलेक्शन सेंटर ही देशाची राज्याची आवश्यकता आहे. तेव्हा आम्ही सहा महिन्यात, दोन महिन्यात टेंडर काढू अशा प्रकारचे ठोस उत्तर द्यावे.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, मघाशी सांगितल्या प्रमाणे ते दोन बिडर क्वालिफाय झाले असते तर ही वेळ आली नसती. त्यामुळे रिबिड प्रोसेस सुरू केले आहे. त्यांना सर्व प्रोसेस पूर्ण करून टेंडरची कार्यवाही करण्यास सांगण्यात येईल. याचे महत्व लक्षात घेऊन कार्यवाही करावी अशा प्रकारच्या सूचना एमपीसीबी आणि एमएमआरडीला देण्यात येतील व मी स्वत: यामध्ये लक्ष घालतो.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, भविष्याचा वेध घेणारी लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी उपस्थित केली आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तूद्वारा ई कचरा निर्माण होत आहे. त्यामुळे रि-सायकलींग प्रोसेस आपण जास्तीत जास्त कार्यक्षम कशा प्रकारे करणार आहात ? जुन्या संगणकाचे रि युटीलायझेशन करून ग्रामीण भागातील संस्था व शाळांना ते संगणक दिले तर तेथील मुलांना त्याचा फायदा होऊ शकेल. तशी कल्पना शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, रि-सायकलींग करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा वापर करण्यात येतो. डिसमेंटलर केंद्र असून त्यात इलेक्ट्रॉनिक वस्तू व उपकरणांची विभागणी केली जाते. त्यांना चांगला पार्ट मिळाला तर तो पुन्हा वापरून वस्तू बनविण्यात येतात. जो वेस्ट माल असतो तो रि-सायकल केंद्राकडे पाठविला जातो व त्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावली जाते.

उप सभापती : जुने संगणक आहेत ते संस्थांना देणार काय असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे

श्री.संजय देवतळे : यात काही संस्था आहेत. संस्थांनी अर्ज केला व त्यांची मागणी असेल तर त्या प्रमाणे निश्चित विचार केला जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ही राज्यातील पर्यावरणावर देखरेख ठेवणारी महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेची स्थापना केल्यानंतर बायोमेडिकलसह अन्य नवनवे विषय पुढे आले. त्यानुसार आपल्याकडील यंत्रणा सुसज्ज करण्याचे काम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केले आहे. ई-कचरासंबंधी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे काय, इतर देशांमध्ये ज्या गोष्टींचा अवलंब केला जातो त्याची माहिती आपण घेतली आहे काय, आपल्या प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये एक खास अधिकारी ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमणार आहात काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, बायोमेडिकल वेस्ट संबंधातील फॅसिलिटी सर्व जिल्ह्यांमध्ये रिजनमध्ये आहे. ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधीचा कायदा दिनांक 12 मे 2011 रोजी करण्यात आला आहे. त्यानुसार आपण डिस्मँटलर केंद्र, रिसायकल केंद्र निर्माण केलेले आहे. परदेशात ई-कचऱ्याची विल्हेवाट करण्यासाठी कोणत्या आधुनिक सुविधा आहेत ते पाहून येथेही आधुनिक व्यवस्था निर्माण करून ई-कचऱ्याची निश्चितपणे विल्हेवाट लावण्यासाठी शासन निश्चितपणे प्रयत्न करेल.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आशिष शेलार . . ..

सभापती महोदय, एमपीसीबी एमएमआरडीएला किती दिवसामध्ये कळविणार आहे याबाबतीत तरी माहिती द्यावी. टेंडर जेव्हा काढावयाचे असेल तेव्हा काढण्यात यावे.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, मी आजच कळवितो.

---

3 एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवरील बाब क्र.9 च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 426 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 426 निवेदने कृपया छापावीत.)

.. . .. 3 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वयेच्या सूचनांसंबंधीची निवेदने

सभागृहाच्या पटलावर ठेवणे

उप सभापती : नियम 93 अन्वयेची सर्व निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 93 च्या सूचनेवरील क्रमांक 1 ते 41 ही निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 93 च्या निवेदनाच्या बाबतीत सांगावयाचे तर माननीय सभापती महोदयांनी एकंदर 115 सूचनांबाबत निवेदने करण्याबाबत सांगितले होते आणि आज त्यापैकी आमच्याकडे 41 निवेदने आहेत म्हणजे जवळजवळ निम्मी निवेदने ही शेवटच्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. पण नियम 93 च्या सूचनांना न्याय मिळाला पाहिजे. मी या अधिवेशनामध्ये याबाबत तीन वेळा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यावेळी असे सांगण्यात येते की, निवेदने येतील आणि मग एकाच दिवशी सर्व निवेदने येतात आणि ती अजूनही येत आहेत. मघाशी 36 असे सांगितले आणि आता त्यामध्ये 5 निवेदने वाढली असून जी अडचणीची निवेदने आहेत ती येथे येत नाहीत आणि यामध्ये मला कुठेतरी गडबड घोटाळा असल्याचे वाटत आहे. त्यामुळे पुढील अधिवेशनामध्ये तरी या निवेदनांना न्याय मिळाला पाहिजे.

उप सभापती : ठीक आहे. निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 41 निवेदने छापावीत.)

. . . . 3 एल-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील मराठा समाजाला शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण देण्याचा गेल्या 3 वर्षापासून प्रलंबित असलेला निर्णय.

मु.शी.: राज्यातील मराठा समाजाला शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण देण्याचा गेल्या 3 वर्षापासून प्रलंबित असलेला निर्णय याबाबत श्री.चंद्रकांत पाटील वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

उप सभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी एक तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील आपली सूचना वाचतील व भाषण करतील.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील मराठा समाजाला शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण देण्याचा गेल्या 3 वर्षापासून प्रलंबित असलेला निर्णय, मराठा समाजातील मुलांना चांगले गुण मिळूनही इंजिनियरींग, मेडिकल, आयआयटी सारख्या क्षेत्रात उच्च शिक्षणाची दारे बंद होणे, सद्य:स्थितीत एकूण 52 टक्के आरक्षण अनुसूचित जाती-जमाती, भटक्या, इतर मागास, विशेष मागास आदी जातींना दिले असणे, मराठा समाजातील युवकांत बेकारीच्या प्रमाणात वाढ होणे, राजर्षी शाहू महाराजांचा जाहीरनामा, ब्रिटीश शासन निर्णय, 1955 सालचा कालेकर आयोग यांनी मराठा जातीचा समावेश ओबीसीमध्ये केला असणे, मात्र सद्य:स्थितीत राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल शासनास सादर करुनही शासनाकडून वेगवेगळया समित्यांची नियुक्ती करुन निर्णयाबाबत चालढकल करण्यात येणे, तृतीय अधिवेशन 2012 दरम्यान उद्योग मंत्री यांची एक सदस्यीय समिती नियुक्त करुन एका महिन्यात मराठा समाजास आरक्षण देण्याची केलेली घोषणा, सदर आश्वासनाचे पालन न झाल्यामुळे राज्या तील मराठा समाजात पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

सभापती महोदय, आज याठिकाणी एका अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु करताना

. . . .3 एल-5

श्री.चंद्रकांत पाटील . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी आपल्या माध्यमातून सरकारला आठवण करुन देतो की, ही चर्चा एवढ्या उशीरा सुरु करण्याचे एक कारण असे होते की, ज्यावेळी ही चर्चा सुरु होईल तेव्हा सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित असतील. मला हे मान्य आहे की, याठिकाणी संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत. परंतु चर्चेच्या सुरुवातीला माझी अशी विनंती राहील की, माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री यांच्यापैकी कोणीतरी सदनामध्ये उपस्थित राहतील यादृष्टीने माननीय सभापतींनी प्रयत्न करावा.

सभापती महोदय, एक अत्यंत गंभीर विषय की जो गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे. ज्या मागणीची सुरुवात खऱ्या अर्थाने 1982 . . . . .

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, सदरहू विषयावरील चर्चेसाठी एक तासाचा वेळ दिलेला आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, एक तासामध्ये चर्चा पूर्ण होणार नाही.

उप सभापती : मला माहिती आहे की, सदरहू विषय महत्वाचा आहे. अशा वेळी याचे गांभीर्य ओळखून सन्माननीय सदस्यांनी एक तासामध्ये चर्चा पूर्ण करावी.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असतील तर बरे होईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून हा विषय उपस्थित होत आहे. मी कालही आणि आजही बोललो होतो की, आपण हा विषय लवकर चर्चेला घेऊन त्याला योग्य तो न्याय देऊ या. सरकार न्याय देत नाही हा वेगळा भाग आहे. पण सभागृहामध्ये तरी चर्चेसाठी पुरेसा वेळ मिळणे गरजेचे आहे.

उप सभापती : मी पुरेसा वेळ देतो.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या विषयासाठी एक तासाची वेळ पुरेशी नाही.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, याठिकाणी मराठा समाजाला आरक्षण देण्यासंबंधात नियम 97 अन्वये चर्चा सुरु आहे. महाराष्ट्रामध्ये या मागणीसाठी स्व.अण्णासाहेब पाटील यांनी पहिला मोर्चा 22 मार्च 1982 साली काढला. त्याला आता 30 वर्षे झाली आहेत. पहिल्यांदा या ....

. . . .3 एल-6

श्री.चंद्रकांत पाटील . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोर्चाच्या माध्यमातून हे शब्दबध्द झाले की, महाराष्ट्रामध्ये असणारा 34 टक्के मराठा समाज जो एका अर्थाने वर्षानुवर्षे या राज्यावर शासन करीत आला. परंतु काळाच्या ओघामध्ये त्याची स्थिती ज्या प्रकारची झालेली आहे, त्यामुळे ओबीसीच्या मूळ आरक्षणाला धक्का न लावता यांना ओबीसी मध्ये आरक्षण दिले पाहिजे अशी मागणी पहिल्यांदा करुन 30 वर्षे पूर्ण झाली. यामध्ये आमचा एक प्रयत्न असा होता की, 22 मार्च 1982 रोजी स्व.अण्णासाहेब पाटील यांनी काढलेल्या मोर्चाला 30 वर्षे पूर्ण होत आहेत तर 22 मार्चलाच मी लक्षवेधी दिली होती आणि ती त्यादिवशी मांडण्यात आली. पण त्यादिवशी असा मुद्दा उपस्थित झाला की, या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे होते म्हणून आपण ती लक्षवेधी सूचना नियम 97 मध्ये परिवर्तीत केली.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)

श्री.चंद्रकांत पाटील...

हा विषय अनेक वर्षे प्रलंबित आहे. आम्ही नव्याने मागणी करीत नाही आणि शासनही नव्याने काही देणार आहे असे नाही.

सभापती महोदय, दिनांक 26 जुलै 1902 रोजी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थांनच्या जाहीरनाम्यामध्ये प्रशासनातील नोकऱ्यांमध्ये 50 टक्के आरक्षण दिले त्यामध्ये प्रशासकीय नोकऱ्यांतील आरक्षणामध्ये मराठा जातीचा समावेश होता.

सभापती महोदय, दिनांक 23.4.1942 रोजी ब्रिटीश शासनाच्या निर्णयाप्रमाणे अनुसूची अे मध्ये 149 क्रमांकावर मराठा जातीचा समावेश होता. त्यानंतर 1955मध्ये भारत सरकारने नेमलेल्या कालेलकर आयोगाने मराठा जातीचा समावेश ओबीसीमध्ये केला. 1982 मध्ये मंडल आयोगाने ओबीसीच्या यादीतून मराठा समाजाला वगळले. तेव्हापासून ओबीसीमध्ये ज्या जातींचा समावेश आहे त्या जातींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला नवीन आरक्षण द्यावे अशी मागणी करीत आहोत. शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये मराठा समाज आरक्षण मागत आहे. आज मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण न मिळाल्यामुळे त्यांची अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. मराठा समाजाला राजकीय आरक्षण द्यावे असा कोणीच उल्लेख केलेला नाही.

सभापती महोदय, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आमचा मागील तीस वर्षापासून संघर्ष सुरु आहे. शेवटी सरकारने हा विषय राज्य मागासवर्ग आयोगाकडे सोपवला. या आगोयाचे अध्यक्ष बापट होते. या आयोगाने मराठा समाजाला आरक्षण देण्याचे नाकारले. त्यानंतर दिनांक 29 जानेवारी 2009 रोजी मंत्रिमंडळाच्या उप समितीमध्ये बापट आयोगाच्या अहवालावर पुनर्विचार व्हावा असा निर्णय झाला. बापट आयोगाचा कार्यकाल संपल्यानंतर न्या.सराफ अध्यक्ष झाले. त्यांचाही कालावधी संपला. आता श्री.भाटीया अध्यक्ष आहेत. सरकारला मराठा समाजाला आरक्षण द्यावे असे वाटत असेल तर मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे असे वाटणाऱ्या लोकांना समितीमध्ये घेतले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात सरकारने राज्य मागास वर्ग आयोगावर प्रा.हरी नरके आणि श्रीमती पल्लवी रेणके यांची नियुक्ती केली. प्रा.हरी नरके यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या विरोधात लिखाण केलेले आहे.

सभापती महोदय, या विषया बाबत सकारात्मक आहोत आणि हा विषय पुन्हा एकदा राज्य मागास वर्ग आयोगाकडे सोपविणार आहोत असे शासन सांगत आहे. परंतु राज्य मागासवर्ग आयोगाच्या दोन अध्यक्षांचा कालावधी संपलेला आहे. तिसऱ्या अध्यक्षांची नियुक्ती झाली असली तरी या विषयावर निर्णय झालेला नाही. ज्यांचा मराठा आरक्षणाला विरोध आहे त्यांची राज्य मागास वर्ग आयोगावर नियुक्ती केलेली आहे. श्रीमती पल्लवी रेणके या मराठा समाजाच्या आरक्षणाच्या विरोधात कोर्टात गेलेल्या आहेत त्यांची आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केलेली आहे. अशा व्यक्तींकडून मराठा समाजाला कसा न्याय मिळेल ? सरकारला या प्रश्नासंबंधी सकारात्मक निर्णय घ्यायचा आहे की, वेळकाढूपणा करायचे आहे हे स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, राज्य मागासवर्ग आयोगाकडून लवकर निर्णय होत नाही म्हणून माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती करण्यात आली. राज्य मागास वर्ग आयोग असताना अशी समिती निर्णय घेऊ शकते काय असा प्रश्न आहे. असे असताना माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली.

सभापती महोदय, मराठा समाजाचा भव्य मोर्चा येईपर्यंत कोणतीही समिती नेमण्यात आली नव्हती. मोर्चाला काहीतरी उत्तर दिले पाहिजे म्हणून एक दिवस अगोदर या समितीची नियुक्ती झालेली आहे. आता ही समिती काम करणार आहे. आज सर्व मराठा समाज या निर्णयाकडे डोळे लावून बसला आहे त्याचा शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, दिनांक 1 जून 2004 रोजी राज्य मागास वर्ग आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार यादी क्रमांक 83 वर मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा असा उल्लेख आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

त्या नंतर राज्यातून केंद्र सरकारकडे जी शिफारस करावयास हवी होती ती केली नाही. त्यामुळे कुणबी मराठा आणि मराठा कुणबी या जातींना महाराष्ट्रात ओबीसी खाली आरक्षण मिळत असले तरी केंद्र सरकारमध्ये आरक्षण मिळत नाही. राज्यात मराठा कुणबी व कुणबी मराठा या जातींना मुळात जातीचा दाखल मिळण्यात अडचणी येतात. त्यांच्याकडे पुरावा म्हणून 1920 पूर्वीच्या जातीच्या दाखल्याची मागणी केली जाते. वास्तविक पाहता ओबीसी प्रवर्गामध्ये एखादी जात अंतर्भूत केल्यानंतर त्यांना पूर्वीची एक वर्षापर्यंतची कागदपत्रे पुरावा म्हणून मागावयास पाहिजेत. मराठा कुणबी आणि कुणबी मराठा यांना ओबीसी यादीमध्ये अंतर्भूत केले असताना त्यांना 1920 पूर्वीचा पुरावा मागण्याची आवश्यकता काय आहे ? त्यांच्याकडे अशा प्रकारचा पुरावा मागितल्यामुळे ते प्रकरण दोन-चार वर्षे पेंडींग राहते. मराठा समाजाला आरक्षण देणे हा मोठा विषय आहे. या निमित्ताने मी मागणी करतो की, ज्या जातींचा समावेश ओबीसी प्रवर्गामध्ये केला आहे त्यांना जातीची प्रमाणपत्रे वेळेवर मिळण्यात मोठ्या अडचणी आहेत त्या बाबत विचार केला पाहिजे. महोदय,

राज्यात स्व.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आहे. राज्यात इतर महामंडळे ही ठराविक समाजाच्याच लोकांसाठी आहेत. त्या महामंडळामध्ये त्याच समाजाचे लोक सोयी सवलतीसाठी पात्र असतात. मुळात मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या तरुण-तरुणींना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सोयी-सवलती मिळाल्या पाहिजेत. या अर्थसंकल्पात या महामंडळाचे भाग भांडवल 500 कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आलेले आहे. ही रक्कम या महामंडळाला लवकरात लवकर दिले पाहिजे. आज मराठा समाजातील मुला-मुलींना मेरीटवर प्रवेश मिळत आहेत. परंतु त्यांच्याकडे फी भरण्यासाठी पैसे नसतात. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यकक्षा फार न वाढविता या महामंडळाच्या माध्यमातून केवळ मराठा समाजातील लोकांना सोयी सवलती मिळाल्या पाहिजेत.

महोदय, मराठा समाजाला ओबीसीच्या यादीमध्ये जोडले जाईल, त्यांना आरक्षण मिळेल, मूळ ओबीसीला धक्का न लावता आरक्षण मिळेल, किंबहुना जे काही टक्के आरक्षण मिळायचे ते मिळेल. आज एससी, एसटी, ओबीसी यांना 51 टक्के आरक्षण आहे. उर्वरित 49 टक्के आरक्षण इतर समाजासाठी आहे. 49 टक्के आरक्षणामध्ये 51 टक्के आरक्षणातील लोकांना अर्ज करता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येणार नाही असे केले तरच किमान 49 टक्के आरक्षण खऱ्या अर्थाने नॉन एससी, नॉन एसटी, नॉन ओबीसी यांना मिळेल. आज आकडेवारी पाहिली तर एससी, एसटी, ओबीसी समाजाला 51 टक्के आरक्षण दिले जात असल्याचे कागदावर दिसेल. परंतु प्रत्यक्षात एससी, एसटी, ओबीसीचे तरुण-तरुणी खुल्या प्रवर्गातून अर्ज करतात. खुल्या प्रवर्गात नंबर लागला नाही तर त्या त्या आरक्षणामध्ये पात्र होतात. या मुळे 51 टक्क्यांऐवजी 87 टक्क्यांपर्यंत त्या समाजाचे आरक्षण जाते. उरलेल्या 13 टक्क्यांमध्ये हा मराठा समाज राहतो. एससी, एसटी, ओबीसी समाजाला खुल्या प्रवर्गातून अर्ज करता येणार नाही या बाबत घटनात्मक विचार केला तर बरे होईल. या संदर्भात सरकार निर्णय घेणार आहे की नाही, की केवळ वेळकाढूनपणाचे धोरण स्वीकारणार आहे ? या विषयाकडे संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाज पाहत आहे. या निमित्ताने आपल्या माध्यमातून माझे सरकारला निवेदन आहे की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात शासनाने ठोस कार्यवाही केली पाहिजे.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 97 अन्वये अतिशय महत्त्वाच्या विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांना धन्यवाद देतो.

महोदय, हा विषय 1980 च्या दशकामध्ये या सभागृहाचे सदस्य कै.आमदार अण्णासाहेब पाटील यांनी पहिल्यांदा मांडला होता. महोदय, आम्ही आग्रह धरला होता की, या चर्चेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत राज्याचे प्रमुख माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी येथे थांबावे. याचे कारण त्यांनी इतर समाजाला ज्या पध्दतीने न्याय आणि सवलती दिल्या जातात तशाच प्रकारे मराठा समाजातील काबाडकष्ट करणाऱ्या समाजासाठी द्याव्यात अशी अपेक्षा होती. माननीय सामाजिक न्याय मंत्री आणि विधी व न्याय मंत्र्यांच्या माध्यमातून एवढा महत्त्वाचा प्रश्न सुटावा हे आम्हाला योग्य वाटत नाही. त्यामुळे ते अनुपस्थित असल्याबद्दल सर्वप्रथम मी दु:ख व्यक्त करतो.

महोदय, दुसरी बाब अशी की, या महत्त्वाच्या चर्चेला खूपच कमी वेळ दिलेला आहे. या विषयावर किमान 5-6 तास चर्चा व्हावयास हवी होती.

नंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील ....

कारण सभागृहामधील बऱ्याच सदस्यांनी वर्तमानपत्रामध्ये, मीडियामध्ये तसेच वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहून याला समर्थन दिलेले आहे. आपण सन्माननीय सदस्यांची उपस्थिती जरी पाहिली तरी त्यावरुन या चर्चेला किती महत्व आहे हे आपल्या लक्षात येईल. हा विषय एखाद्या तालुक्यापुरता किंवा एखाद्या जिल्ह्यापुरता मर्यादित नसून महाराष्ट्रातील संपूर्ण मराठा समाजाचा हा प्रश्न आहे, याकडे मी आपले लक्ष वेधत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी 1982 चा उल्लेख करण्यात आला. 22 मार्च, 1982 रोजी आर्थिक निकषावर आरक्षण मिळावे हा मुद्दा पहिल्यांदा स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांनी मांडला होता. अण्णासाहेबांच्या आयुष्याची सुरुवात माथाडी चळवळीपासून सुरु झाली. परंतु काँग्रेस पक्षाचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांनी त्यांना महाराष्ट्राच्या विधान परिषदेमध्ये संधी दिली. ती संधी दिल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात असलेल्या कामगार चळवळीला एकत्र करुन कामगारांना न्याय मिळवून देण्याचा अतोनात प्रयत्न केला आणि त्याच वेळेला मराठा आरक्षणाच्या मुद्याला त्यांनी हात घातला.

सभापती महोदय, 22 मार्चचा मोर्चा झाल्यानंतर 23 मार्चला सकाळी ती घटना घडली. ज्यावेळी ती घटना घडली तेव्हा विधान परिषद आणि विधानसभेचे कामकाज चालू होते. त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि इतर मंत्र्यांनी त्याचबरोबर माझ्या वडिलांच्या सहकारी आमदारांनी त्यांच्या विचारांबद्दल, त्यांच्या चळवळीबद्दल आपले विचार मांडण्याचा प्रयत्न केला. या ठिकाणी शोक प्रस्ताव संमत केला. त्या शोक प्रस्तावाची प्रत मी या ठिकाणी मुद्दाम आणली होती. या सभागृहात या विषयावर चांगली चर्चा होईल अशी माझी अपेक्षा होती. सभागृहाचा एक सदस्य जो कामगार चळवळीमध्ये काम करीत करीत समाजाच्या चळवळीमध्ये हातभार लावतो, समाजाला वर आणण्याचा, समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न करतो, या समाजाच्या चळवळीमध्ये असणाऱ्या ज्या कार्यकर्त्यांनी आपल्या जीवाचे बलिदान दिले त्या बलिदानाची आठवण म्हणून कमीतकमी पाच सहा तास तरी ही चर्चा ठेवावयास पाहिजे होती. परंतु तसे झालेले नाही.

सभापती महोदय, खरे म्हणजे आम्ही 22 मार्च, 2013 ला तो मार्चा काढणार होतो परंतु आमच्या समाजामध्ये इतके दिग्गज नेते आहेत की, त्या दिग्गजांना एकत्र करता करता आम्हाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील .....

घाम फुटला. असे दिग्गज नेते आमच्याच समाजात आहेत असे नाही तर प्रत्येक समाजामध्ये अशा प्रकारचे नेते असतात. नंतर आम्हाला 4 तारखेला या विषयावर मोर्चा काढावा लागला. 4 तारखेला मोर्चा काढण्याच्या अगोदर 21 तारखेच्या रात्री सन्माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन झाले. त्याचे परिपत्रक आम्हाला 22 तारखेला मिळाले. सन्माननीय सदस्यांनी ज्यावेळी हा विषय मांडला त्यावेळेला मराठा महासंघ किंवा मराठा समाजाच्या महाराष्ट्रातील वेगवेगळ्या संस्थेच्या लोकांनी एकच विचार मनामध्ये आणला होता की, आम्हाला कोणाचे आरक्षण कमी करावयाचे नाही. आम्हाला कोणावर अन्याय करावयाचा नाही परंतु आज महाराष्ट्रामध्ये जो समाज मोठ्या संख्येमध्ये आहे, ज्या समाजाचे नेतृत्व काही मंत्री करतात, काही आमदार करतात, काही उद्योगपती करतात हे बघून इतर समाजाला असे वाटते की, या समाजाचे आमदार आणि मंत्री असताना या समाजाला आरक्षणाची काय गरज आहे ?

सभापती महोदय, आमदार आणि मंत्र्यांना आरक्षणाची खरोखरच गरज नाही कारण त्यांच्या चार-चार, पाच-पाच पिढ्या बसून खातील एवढी त्यांची संपत्ती झालेली आहे. गेल्या 15-20 वर्षात जेवढे सत्तेत बसले त्या सर्वांबद्दल मी बोलत आहे. परंतु जो शेतकरी आहे, जो कामगार आहे, जो ऊसतोड कामगार आहे, जो माथाडी कामगार आहे, जो गिरणी कामगार आहे, जो इतर उद्योगधंद्यामध्ये काम करणारा कामगार आहे त्यांच्या मुलांना आरक्षणाच्या सवलती न मिळाल्यामुळे त्यांना परत शेतीच्या व्यवसायामध्ये पाठवावे लागते, परत तो माथाडी कामगार होतो, रोजंदारी करतो, परत ऊसतोडीमध्ये जातो, दगड फोडण्यासाठी जातो, इतर कामासाठी जातो.

सभापती महोदय, काही वर्षाच्या अगोदर छत्रपती शाहू महाराजांनी आरक्षणाच्या बाबतीत जी भूमिका मांडली तीच भूमिका पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील.....

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार हा देशाला दिशा देणारा ठरला. त्या विचाराने नाही रे समूहाला प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयोग केला आणि तो यशस्वी झाला. त्यांनी प्रत्येक समाजासाठी योगदान दिलेले आहे. हा वर्ग इतर समाजापासून अलिप्त होता. नाही रे समाज प्रवाहात येत नव्हता किंवा त्यांना येऊ दिले जात नव्हते. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम डॉ.बाबासाहेबांनी केले. परंतु आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, या महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांपासून आजपर्यंत या राज्यात जे राज्यकर्ते झाले त्यांच्या घरात त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांची, त्यांच्या तालुक्यातील, त्यांच्या गावातील, त्यांच्या जिल्हा परिषदेतील लोकांची परिस्थिती बिकट झालेली आहे. राज्यकर्त्यांनी यामध्ये लक्ष घालणे फार गरजेचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी काही आयोगांचा उल्लेख केला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची सुरुवात या आयोगाने केली होती. परंतु अचानकपणे ती दिशा दुसऱ्या दिशेला फरफटत गेली. काही सन्माननीय सदस्यांचा येथे उल्लेख झाला आहे. त्या सदस्यांनी समाजाचे हित बघण्यापेक्षा या समाजाला न्याय कसा मिळणार नाही किंवा मिळू देणार नाही यावरच अधिक भर दिला होता. गेल्या 31 वर्षांपासून हा प्रश्न असाच भिजत पडलेला आहे. भिजत घोंगड्यासारखा पडलेला आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. या प्रश्नासाठी राज्यातील विविध संघटनांनी असंख्य आंदोलने केलेली आहेत. या आंदोलनाने प्रत्येक वेळी राज्य सरकारला वेठीस धरलेले आहे. राज्य सरकार या लोकांकडे लक्ष देऊन त्यांना न्याय मिळवून देणार आहे काय ?

सभापती महोदय, मला थोडा अधिक वेळ द्यावा. कारण माझ्या वडिलांबद्दल ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी येथे विचार मांडले होते ते वाचून दाखविण्याच्या मन:स्थितीमध्ये मी होतो. मला अधिक वेळ पाहिजे होता, परंतु या विषयावर खूपच कमी वेळ दिलेला आहे हे आमचे दुर्भाग्य आहे. कमी वेळेत अधिक मुद्दे मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. या चर्चेच्या माध्यमातून स्थापन झालेल्या समितीच्या माध्यमातून या समाजाला न्याय मिळावा अशी आमची अपेक्षा आहे. या प्रश्नाला 31 वर्षे झालेली असल्यामुळे सरकारने आणखी वेळ लावू नये. त्या दिवशी या समाजाचा मोर्चा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.नरेंद्र पाटील....

आला होता त्यामध्ये वयोवृध्द माणसे आली नव्हती. त्या मोर्चामध्ये तरुण वर्ग जास्त संख्येने होता. आरक्षण नसल्यामुळे त्या तरुण वर्गाला अपयश मिळाले, कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला नाही, सरकार दरबारी नोकरी मिळाली नाही, पोलीस दलात नोकरी मिळाली नाही. बढती मिळाली नाही असा सर्व वर्ग त्या मोर्चात उपस्थित होता. आम्ही त्या मोर्चाला योग्य पध्दतीने नियंत्रित केले होते. मोर्चा संपल्यानंतर त्यांनी योग्य पध्दतीने परत जाणे अपेक्षित होते व त्याप्रमाणे तो गेला. त्यासाठी मी सर्व समाजाच्या नेत्यांना धन्यवाद देतो. परंतु एका गोष्टीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. मोर्चातील लोकांची भावना खूप तीव्र होती. मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींनी थोडेसे चुकीचे काही बोलले असते तर त्याचा उपद्रव झाला असता. मोर्चाची संख्या पाहिली असती तर त्याचे गांभीर्य लक्षात आले असते.

सरकारने स्थापन केलेल्या समितीचा अहवाल चांगल्या पध्दतीने व लवकरात लवकर सादर करण्यात यावा. अहवाल तयार करणे सोपे असते, परंतु तो टिकला पाहिजे. कायदेशीरपणे टिकणे फार गरजेचे आहे. परंतु काही मंडळी समितीमध्ये आल्यानंतर अहवाल न टिकण्याचा प्रयत्न करीत असतात. ओबीसीमध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. काही वर्षांपूर्वी कुणबी मराठा, कुणबी समाजाला सवलती दिल्या. परंतु त्या सवलती कागदोपत्री राहिल्या आहेत. खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांना आदेश न दिल्यामुळे त्या सवलती त्या लोकांना अजूनही मिळालेल्या नाहीत. त्याही लवकरात लवकर मिळाव्यात अशी माझी शासनाला कळकळीची विनंती आहे.

सभापती महोदय, माझ्या वडिलांच्या नावाचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी आर्थिक विकास महामंडळाची घोषणा केली. राज्यामध्ये जेवढी महामंडळे आहेत त्यामार्फत सर्व समाजाच्या लोकांना सवलती मिळत असतात.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील...

अण्णासाहेबांनी फक्त मराठी समाजाचे नेतृत्व केले असे म्हणणे योग्य ठरणार नाही. त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात माथाडी चळवळीतून केली. जो माथाडी कामगार आहे, जो डोंगर कपारीतून मुंबईमध्ये आलेला आहे, मग तो कोणत्या जातीचा धर्माचा, पंथाचा, गोत्राचा आहे हे न पहाता त्याला न्याय मिळाला पाहिजे एवढीच त्यांची इच्छा होती. हा मराठी समाज मोठया प्रमाणावर माथाडी कामगार म्हणून काम करीत आहे. या समाजाला न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. आपण अन्य महामंडळांना जसे जातीचे निकष लावलेले आहेत. त्या प्रमाणे अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला मराठा समाजाचा निकष लावावा जेणेकरुन त्याचा फायदा या समाजातील तरुणाला ज्याला स्वत:च्या पायावर उभे रहायचे आहे, शिक्षण घ्यायचे आहे, ज्याची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे, अशा वर्गाला होईल. हा समाज कोणत्या तरी पठाणाच्या, मुनीमाच्या, पतपेढीच्या, बँकेच्या कर्जात अडकण्या पेक्षा ज्या नेत्याने आपल्या समाजासाठी जिवाचे बलिदान दिले अशा नेत्याच्या महामहामंडळाकडून आर्थिक सहाय्य मिळण्याची हा समाज अपेक्षा करीत आहे. म्हणून या महामंडळाला हा निकष आपण लावावा.

सभापती महोदय, आरक्षणाची चर्चा भविष्यामध्ये होत राहील. काही समाजाच्या थोर नेत्यांनी मग त्यामध्ये श्री. गोपीनाथ मुंडे असतील, आरपीआयचे श्री. रामदास आठवले असतील, श्री.छगनराव भुजबळ असतील, नांदेड, कोल्हापूरमध्ये राहाणारे बलुतेदार असतील या सर्वांनी मराठा आरक्षणाला पाठिंबा दिलेला आहे. राज्यातील प्रमुख सामाजिक संघटनावर प्रभुत्व ठेवणा-या नेत्यांनी मराठा समाजाला न्याय मिळावा अशी भूमिका घेतल्यानंतर आमच्यातीलच काही भाऊबंद राजकीय आरक्षणाचा मुद्दा घेऊन काही वर्षे भांडत बसले. सभापती महोदय, मंत्र्यांमध्ये, आमदारांमध्ये, खासदारांमध्ये आमची भावकी आहे. पण खाली तळागाळामध्ये असलेल्या शेतक-यांच्या मुलाला न्याय मिळाला पाहिजे. त्यासाठी राजकारणाचा मुद्दा अलिप्त राहिला तरी माझा वैयक्तिक विरोध राहाणार नाही. परंतु या लोकांना आरक्षणाच्या सर्व सवलती मिळाल्या पाहिजेत एवढीच माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री.नारायण राणे यांच्या समितीचा अहवाल पुढील पावसाळी अधिवेशनाच्या आधी मिळावा अशी अपेक्षा आहे. या समाजाला प्रत्येक वेळी वेठीस धरले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाते. निवडणूक आली की आमच्या समाजाची काही मंडळी या पक्षाला पाठिंबा दे, त्या पक्षाला पाठिंबा दे, अशी भूमिका घेतात. त्यामुळे या समाजाचा तरुण वर्ग पूर्णपणे भरकटला जातो. मग त्याला कळते की, पराजय झाल्यानंतर सत्ता मिळाली नाही तर त्याच्या मागण्यांची कोणतीही वाच्यता होत नाही. म्हणून मराठा समाजाच्या आरक्षणाचा हा जो फुटबॉल झालेला आहे तो फुटबॉल एकदाचा संपवावा अशी माझी आपणास विनंती आहे. माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांच्या समितीचा अहवाल लवकरात लवकर मिळावा आणि यदाकदाचित तो वेळेच्या आधी प्राप्त झाला तर तुम्हाला एवढे आश्वासन देतो की या समाजाचा सर्व तरुण वर्ग, नोकर वर्ग हा सदैव आपला ऋणी राहील. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत ही चर्चा व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली होती. परंतु ही अपेक्षा फोल ठरली याबद्दल खेद व्यक्त करुन सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांच्या भाषणाचे आणि त्यांनी घेतलेल्या भूमिकेचे मी स्वागत करतो. कारण गुजरात मधील आरक्षण विरोधी आंदोलनानंतर या राज्यामध्ये तशीच प्रतिक्रिया उमटली होती. ज्या "नाही रे" वर्गाची भूमिका सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी मांडली त्या "नाही रे" वर्गाला बरोबर घेऊन आरक्षण विरोधी भूमिका मांडली गेली होती. पण तो कटू इतिहास बदलण्याची भूमिका आज सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील घेत आहेत ही सर्वांत मोठी स्वागतार्ह गोष्ट आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

अशा बदलत्या भूमिकेचे स्वागतच केले पाहिजे. मी पहिल्यांदा त्यांचे मनापासून स्वागत करतो आणि अभिनंदनही करतो.

सभापती महोदय, मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे सातत्याने या सभागृहात आणि सभागृहाबाहेर मांडणी करतात. त्यांची भूमिका प्रामाणिक आहे याबद्दल माझ्या मनात शंका नाही. पण ही मागणी जेव्हा पुढे येते तेव्हा दोन प्रश्न उभे राहतात. ही मागणी केवळ शैक्षणिक आणि नोकरीच्या आरक्षणाबाबत आहे की राजकीय आरक्षणाबाबत आहे? मला माहिती आहे, माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि त्यांचे सहकारी राजकीय आरक्षणाबाबत बोलत नाही. राजकीय आरक्षणाच्या मागणीतच या मागणीला छेद जातो. राजकीय आरक्षण पाहिले तर पंचायत समितीपासून ग्रामपंचायतीपर्यंत सत्ता तीच आहे.

सभापती महोदय, घटनेमध्ये कोणाला आरक्षण द्यायचे याची स्पष्टपणे तरतूद केलेली आहे. किती प्रमाणात द्यायचे याबद्दल सुप्रीम कोर्टाचे बंधन आहे. सुप्रीम कोर्टाने घटनेच्या तरतुदीबाबत जे इंटरप्रिटेशन केले ते मान्य केले पाहिजे. सुप्रीम कोर्ट भूमिका बदलत नाही तोपर्यंत त्यात बदल होणार नाही. माझे इंटरप्रिटेशन असे आहे की, 50 टक्क्याचे बंधन आहे ते ओबीसी वर्गासाठी आहे. घटनेत एस.सी. आणि एस.टी.च्या आरक्षणाच्या व्यतिरिक्त 50 टक्क्याची तरतूद आहे. परंतु सुप्रीम कोर्टाने निकाल दिल्यानंतर त्या संदर्भात केंद्र आणि राज्य सरकारला वेगळी भूमिका घेता येत नाही. त्या चौकटीत राहून मी माझे मत व्यक्त करतो.

सभापती महोदय, मागासवर्गीय कोण या संदर्भात घटनेत 340 कलम आहे. मागासवर्गीय आयोग स्थापन करुन मागासलेला वर्ग कोणता हे आयोगाने निश्चित करावयाचे आहे. पहिला मागासवर्ग आयोग नेमल्यानंतर मंडल आयोग नेमण्यात आला. ज्यांनी शास्त्रीयदृष्ट्या मागासलेले कोण हे ठरविले. मागासवर्गामध्ये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्यांचा समावेश होतो. राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्याचा समावेश होत नाही इतके स्पष्ट म्हटले आहे.

सभापती महोदय, या देशातील जाती व्यवस्था नष्ट होत नाही. त्या जाती व्यवस्थेने देशातील बहुसंख्य समाजाला शिक्षणापासून, सामाजिक प्रतिष्ठेपासून वंचित ठेवले. शिक्षण आणि सामाजिक प्रतिष्ठेपासून वंचित राहिल्यामुळे त्यांच्यात राजकीय आणि आर्थिक अवनती आली. हा त्याचा परिणाम आहे. आर्थिक निकषावर आरक्षण द्यावे असे म्हटले, गुजरात राज्यात तशी .....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

आंदोलनामधून मागणी केली गेली. माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी चांगली भूमिका मांडली. आर्थिक निकष का नको, राजकीय निकष का नको याचे कारण सामाजिकदृष्ट्या मागासलेपणाचा तो परिणाम असतो. त्यामुळे तो निकष लावता येणार नाही. मागासलेपणा आला तर 16(4) प्रमाणे सवलत देता येईल. प्रश्न असा आहे की, मराठा समाज त्यामध्ये बसतो का?

सभापती महोदय, खरे पाहिले तर हे काम या सभागृहाचे नाही. हे काम प्रशासनाचे किंवा राज्य शासनाचे नाही. मागासवर्गीय आयोगाला घटनेने मान्यता दिली आहे. 2009 साली मागासवर्गीय आयोगाने हा विषय फेटाळलेला आहे. एक गोष्ट खरी आहे की, मराठा समाजामध्ये माथाडी, मापाडी, ऊस तोडणी मजूर यांचा मोठ्या प्रमाणात अंतर्भाव आहे. अंग मेहनत करणारे हमाल मापाडी वर्गामध्ये हा समाज मोठ्या संख्येने आहे. शेतीमधील दुरवस्था आणि इतर काही अडचणी, अडथळे यामुळे समाजामध्ये अवनती निर्माण झाली. शिकू मागितल्यानंतर शिकलेल्या वर्गाला नोकरीत किंवा अन्य ठिकाणी संधी उपलब्ध होते, त्यावेळी त्याला वाटते की, माझ्या मार्गात काही तरी अडथळे निर्माण होत आहेत.

नंतर 3एस.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

या राज्यातील एससीला 13 टक्के आणि एसटीला 7 टक्के व भटक्या विमुक्तांना 11 टक्के रिझर्व्हेशनच्या जागा आहेत व उरलेले 19 टक्क्यामध्ये आहेत. मागासवर्गीयांची भारतातील एकूण लोकसंख्या 52 टक्के आहे. महाराष्ट्रात ही संख्या 39-40 टक्के असून याबद्दल वाद सुरु आहे. या सर्वांची बेरीज केली तर जवळपास 60 ते 70 टक्के वर्गाला प्रत्यक्षात 50 टक्के जागा असून उरलेल्या 50 टक्के जागा ओपनसाठी मोकळया आहेत. ओपनच्या जागेमध्ये जी स्पर्धा लागते त्यामधून जी कटुता निर्माण होते त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांच्या भाषणातून उल्लेख आला व त्यावेळेस माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी म्हणालो की, ही आपलीही भूमिका आहे काय ? कारण हा धोक्याचा भाग आहे. एससी, एसटी आणि ओबीसी जर ओपनमध्ये जाऊ मागत असतील तर त्यांना प्रवेश बंद करा अशी भूमिक कोणताही राजकीय पक्ष या घडीला घेईल असे मला वाटत नाही. सन्माननीय सदस्य श्री विनायक मेटे तसेच सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांची प्रामाणिक इच्छा आहे याबाबत माझ्या मनात शंका नाही. परंतु या प्रश्नावर ज्या पध्दतीने आज राजकारण केले जात आहे ...

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी त्यांच्या भाषणात माझे नाव घेतले आहे. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये यासाठी मी दोन मिनिटात यासंदर्भात सांगतो. या ठिकाणी आरक्षण देत असतांना आपण मराठा समाजाला आरक्षणही देणार नाही आणि ज्यांना 49 टक्के आरक्षण आहे त्यांना ओपनमध्ये अप्लाय करण्याची परवानगी दिली तर ते आरक्षण 87 टक्क्यापर्यंत जाते. आपण 49 टक्के आरक्षण दिले आहे व त्याला कोणाचाही विरोध नाही. ज्यांना आरक्षण मिळाले त्यांच्या बद्दल दुःख अशा प्रकारची भूमिका सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील माझ्या तोंडी धालू पाहत आहेत त्याला माझा विरोध आहे. मला जर 49 टक्क्याचे दु:ख असते तर मी 49 टक्क्याला विरोध केला असता. 49 टक्केवाल्यांनी 49 टक्क्यामध्ये रहावे नाही तर त्यांचे आरक्षण 87 टक्क्यावर जाते एवढेच मला म्हणावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मराठा आरक्षणाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली आहे. खरे म्हणजे मागासवर्गीय आयोग असतांना अशा प्रकारे नवीन कमिटी नेमणुकीतून हा प्रश्न सुटेल हीच मुळात या समाजाची फसवणूक आहे. शासन एक प्रकारे स्वत:ची फसवणूक करीत आहे व गरीब, वंचित मराठा समाजाच्या घटकांचीही फसवणूक करीत आहे. ज्या ठिकाणावरुन प्रश्नांची सोडवणूक होणार नाही त्यांच्या हातामध्ये हे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी द्यावयाची आणि आता आम्ही काही तरी करीत आहोत असे सांगायचे व प्रत्यक्षात या राज्यामध्ये जातीय संघर्ष पेटवून द्यायचा असे जर होत असेल तर ते जास्त दु:खद आहे.

जेव्हा जेव्हा मराठा आरक्षणाचा मुद्दा येतो तेव्हा स्वाभाविकपणे ओबीसीला असे वाटते की, आता हे आमच्या जागा घेणार आहेत. जागा घेणार म्हटले की, ओबीसी विरोध करणार. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी जी भूमिका मांडलेली आहे त्यातून सुध्दा जातीय संघर्ष निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या संघर्षाला तुम्ही आमंत्रण देणार आहात काय ? मला या विषयाच्या संदर्भात शासनाची प्रामाणिक भूमिका दिसत नाही आणि हीच खरी अडचण आहे. 50 टक्क्यपेक्षा तुम्हाला अधिक देता येत नाही तर आपण कसे देणार ? ओबीसी मध्ये या समाजाला घालण्यासाठी माननीय श्री. नारायण राणे यांच्या अध्यक्षते खालील समितीची घोषणा करायची आणि दोन समाजामध्ये भांडण लावून द्यायचे हे कोणी सांगितले ?

आरक्षणाच्या संदर्भात तामिळनाडू सरकारने काय केले ते मी सांगतो व त्यांसदर्भात मार्गही देतो. या ठिकाणी मी टीका करण्यासाठी उभा नाही तर मार्ग देण्यासाठी उभा आहे. आपल्या राज्यात जर 50 टक्क्यापेक्षा अधिक आरक्षण द्यावयाचे असेल व त्यामध्ये मराठा समाजाला समाविष्ठ करावयाचे असेल तर आहे त्या आरक्षणामध्ये मराठा समाजाला समाविष्ट करता येणार नाही ही वस्तुस्थिती आहे व ती आपण स्वीकारली पाहिजे. या आरक्षणाला धक्का न लावता, त्या आरक्षणामध्ये न जाता अतिरिक्त आरक्षण पाहिजे असेल तर तेही करता येते परंतु भांडण लावून न देता ते करण्याची शासनाची तयारी असेल तर आपल्या राज्याने तामिळनाडू राज्याचा आदर्श पाळला पाहिजे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

तामिळनाडू राज्याने नवव्या शेड्यूल्डमध्ये समावेश करून 69 टक्क्यांपर्यंत आरक्षण नेले. आपण दहा टक्के आरक्षण का मागता. आपल्याला अजून 17 ते 18 टक्के आरक्षण मिळू शकेल. आपल्याकडे 52 टक्के आरक्षण आहे. 2 टक्के आरक्षणाला सुप्रीम कोर्टाने विरोध केला आहे. गोवारी समाजाला समाविष्ट केल्यामुळे आरक्षणाचे प्रमाण 52 टक्के झाले. त्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिलेला आहे. त्यामुळे शासनाला 50 टक्क्यांमध्ये गोवारी समाजाला सामावून घ्यावे लागत आहे. तामिळनाडू सरकार 69 टक्क्यांपर्यंत जाते. त्यामुळे उरलेल्या 19 टक्के जागा मराठा समाजाला देता येतील. त्यासाठी स्वतंत्र कायदा करावा लागेल. यासाठी दोन्ही सभागृहांना केंद्राला विनंती करून नवव्या शेड्युल्डमध्ये हा कायदा समाविष्ट करावा लागेल. इतर मागासवर्गीयां व्यतिरिक्त अन्य ज्या जाती आहेत त्यांना आम्ही आरक्षण देऊ पहात आहोत. त्यासाठी वेगळी व्यवस्था करण्याची आपली इच्छा आहे. यासाठी आपल्याला ठराव आणून हे सर्व करावे लागेल. आपण ओबीसी आरक्षणामध्ये मराठा समाजाला समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला तर भांडण लागेल. त्यातून हा प्रश्न सुटणार नाही. सध्या मराठा समाज व मागासवर्गीयांमध्ये भांडण लावण्याचा नवा उद्योग सुरू झाला आहे तो कृपा करून बंद झाला पाहिजे.

सभापती महोदय, दिनांक 9 नोव्हेंबर 1993 रोजी तामिळनाडू विधान सभेने एक मताने ठराव केला. 1993 मध्ये सानी विरूद्ध केंद्र सरकारची केस झाली. त्या केस नंतर सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला की, 50 टक्केच्यावर आरक्षण द्यायचे नाही. आर्टिकल 31 सी ला आव्हान मिळणार नाही यासाठी तामिळनाडू सरकारने मागणी केली. ती मागणी आपल्याला करता येईल. ती न करता आपण मागणी केली तर येथे भांडणे लागतील. घटनेमध्ये आपण प्रोव्हीजन करावी. आपण गरीब समाजाच्या ताटामध्ये वाटे करायला निघाला आहात. ज्याच्याकडे सारे काही आहे त्याच्याकडून आपण काहीच खेचून घेत नाही. आहे रे वर्गातून काहीच घ्यायचे नाही आणि नाही रे वर्गात भांडण लावायचे. हा जो उद्योग आहे तो बंद केला पाहिजे. राज्य शासन यात गंभीर असेल तर त्यांनी खोटी आश्वासने देणे बंद करावे. कृपा करून शासनाने कोणाचीही दिशाभूल करू नये. भांडण लावू नये. तामिळनाडू सरकारने आरक्षण लागू करण्यासाठी जो प्रयत्न केला व 31 सी खाली कायद्याला संरक्षण मिळवून दिले तसा प्रयत्न आपण करावा अशी सूचना मी करतो आणि येथेच थांबतो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मराठा आरक्षणाचा मुद्दा निवडणुका जवळ आला की सुरू होतो. कायदे सर्वांना माहीत आहेत. आपण काय करू शकतो हे देखील माहिती आहे. आपल्या मर्यादा सर्वांना माहिती आहेत. आपण 52 टक्केच्या पुढे जाऊ शकत नाही हे माहीत असताना आपण वेगवेगळ्या कमिट्या नेमून घोषणा करून गरीब मराठा समाजाला झुलवत ठेवण्याचे काम करीत आहात.

राज्य शासनाला आरक्षण लागू करायचे असेल तर घटनेमध्ये दुरूस्ती करावी लागेल. त्यासाठी केंद्र शासनाला विनंती करावी लागेल. त्यानंतर मग एस.सी., एस.टी., ओबीसी यांना किती आरक्षण द्यायचे यात वाद होतील. त्यावेळी मग आम्ही खऱ्या अर्थाने चर्चा घडवून आणू. घटनेमध्ये जे आहे ते आम्हा सर्वांना माहीत आहे. पाठिंबा देणाऱ्यांना देखील माहीत आहेत. ते काहीच बोलत नाही. आपण जे करू शकणार नाही त्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे साहेब ओरडत आहेत. पण माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे साहेब घटनेमध्ये दुरूस्ती करावी हे सांगत नाही. दोन्ही सभागृहामध्ये आपल्या पक्षाचीच सत्ता आहे. आपल्या शासनाने सहकार कायद्यामध्ये दुरूस्ती केली नाही काय ? सहकार कायद्यामध्ये दुरूस्ती करताना येथे अर्धवटच चर्चा करावी लागली. एकदा वटहुकूम काढल्यानंतर पुन्हा काढण्याची पाळी शासनावर आल्याचे मी पहिल्यांदाच पहात आहे. असे बिहार राज्यामध्ये होते. बिहार राज्यामध्ये बिल पास होत नाही म्हणून वटहुकूम काढला जातो. अधिवेशनात बिल मंजूर होत नसल्यामुळे पुन्हा तेथे वटहुकूम काढला जातो. हे बिहार, यु.पी.मध्ये चालते.

यानंतर श्रीमती रणदिवे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

वटहुकूम काढल्यानंतर पुन्हा त्याच गोष्टी साठी वटहुकूम काढावा लागला आहे आणि महाराष्ट्रा-मध्ये सहकार कायद्यामध्ये ही गोष्ट पहिल्यांदाच झालेली आहे. बिहारमध्ये बिल पास होत नाही तर वटहुकूम काढला जातो आणि अधिवेशन संपले तरी बिल मंजूर होत नाही आणि मग त्याच गोष्टी साठी पुन्हा वटहुकूम काढला जातो. हे बिहार, उत्तर प्रदेश येथे चालते आणि हे मला माननीय श्री.शरदरावजी पवार यांनी सांगितले की, जयंता हे असे आहे. पण आपले राज्य वेगळे आहे. दिवाळीच्या वेळी कधीतरी माननीय श्री.शरदराव पवार हे अलिबाग येथे येतात. मग ते आमच्या घरी देखील येतात, गप्पा होतात आणि त्यांनी मला स्वत: सांगितले की, बिहार आणि उत्तर प्रदेश ही राज्ये वेगळी आहेत. तेथे वटहुकूम काढला जातो, तो लॅप्स होतो आणि मग पुन्हा त्याच गोष्टीसाठी वटहुकूम काढला जातो. मी याबाबतीत बोलणार नव्हतो. पण सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे नेहमी मराठा समाजासाठी लढत आहेत. माझा त्यांना नेहमी पाठिंबा आहे. परंतु त्यांची फसवणूक करु नका अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने विनंती आहे. याठिकाणी त्यांची फसवणूक होत आहे.

सभापती महोदय, आजच्या चर्चेच्या निमित्ताने राज्य शासनाला माझी विनंती आहे की, तुम्ही याबाबतीत बिल आणावे. याठिकाणी खऱ्या अर्थाने घटनेमध्ये दुरुस्ती करण्याचा आपल्याला तो अधिकारच नाही. केंद्र शासनाने घटनेमध्ये दुरुस्ती करावी. मग त्यावर आपल्याला कशा प्रकारे चर्चा करता येईल, याबाबत काय करता येईल ते पाहू. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने माझी स्पष्ट भूमिका आहे की, मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटेसाहेब यांना सांगू इच्छितो की, आता केंद्र शासनामध्ये अशी परिस्थिती आहे की, दहा सदस्य बाजूला झाले तरी केंद्र सरकार पडू शकते. तुम्ही आपली तलवार काढून त्यांना सांगावे की जर तुम्ही या घटनेमध्ये दुरुस्ती केली नाही तर आम्ही तुमची खुर्ची काढून घेऊ. मग याबाबतीत त्यादृष्टीने लगेच तयारी सुरु होईल असे मला वाटते. मी याबाबत अधिक सांगत नाही.

सभापती महोदय, या देशामध्ये गरीब समाज मोठ्या प्रमाणात आहे. पूर्वीची समाज रचना आणि आताची समाज रचना, तेव्हाची परिस्थिती आणि आताची परिस्थिती यामध्ये सुध्दा आमुलाग्र बदल झालेला आहे आणि त्याबाबत एक तासामध्ये ही चर्चा पूर्ण होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेब, तुम्ही जे बोलला,ती गोष्ट खरी आहे.पण त्यामध्ये देखील तुमची फसवणूक

. . . .3 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ ST/

16:05

श्री.जयंत प्र.पाटील . . .

होत आहे आणि हे चटावरचे श्राध्द उरकण्याचे काम आहे असे माझे स्पष्ट मत आहे. कारण जर खरोखर तुम्हाला चर्चा करावयाची असती तर संपूर्ण एक दिवस याबाबत चर्चा करता आली असती आणि त्याबाबत आम्ही विरोध केला असता काय ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेजी आपण देखील विरोध केला असता काय? म्हणून माझे असे स्पष्ट मत आहे की, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटेसाहेब त्या लाईनने सन्माननीय सदस्य बोलतील आणि केंद्र शासनाला इशारा देतील व नेत्यांना सांगतील की, याठिकाणी तुम्हाला खरोखर दुरुस्ती करावयाची असेल आणि गरीब मराठ्यांचे रक्षण करावयाचे असेल तर ही भूमिका घेतली तर ती खऱ्या अर्थाने योग्य होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय श्री.कपिल पाटील यांनी याबाबतचे सर्व रेफरन्स् पाहिले आहेत. मी आणि त्यांनी याबाबत सकाळी चर्चा केली. मी याबाबत बोलणार नव्हतो. आपण लोकशाही मानतो आणि ती स्वीकारलेली आहे. कायद्यामध्ये जी बंधने आहेत, ती जर आपण सोडून दिली तर ते बरोबर होणार नाही. आज आपण वेगळ्या दिशेने जात आहोत. माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघेसाहेब आरक्षण देऊ शकतात. राज्य शासन एखाद्या समाजासाठी शैक्षणिक फी-माफीसाठी बजेटमध्ये तरतूद करु शकते आणि ती तशी द्यावी.कारण ही बाब शासनाच्या अखत्यारितील आहे. मराठा समाजातील जे लोक आर्थिकदृष्ट्या गरीब आहेत, त्यांच्यासाठी राज्य शासनाला माझी विनंती आहे की,पहिला टप्पा म्हणून यासाठी तरतूद करा.जे विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित आहेत त्यांनी आम्ही या बजेट मधील 1800 कोटी रुपये देतो, 2000 कोटी रुपये देतो आणि त्यांची शैक्षणिक उन्नती करतो असे सांगा. असे केले तर खऱ्या अर्थाने राज्य शासन याबाबत गंभीर आहे असे मला वाटेल. याठिकाणी केवळ बोलून, चर्चा करुन या समाजाची जी फसवणूक चालली आहे, ती थांबविली पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी राज्यकर्ते कोण आहेत? हे राज्य स्थापन झाल्यापासून जे कोणी प्रमुख आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम . . . ..

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

किल्लीसुध्दा त्यांच्याकडे आणि कुलूपसुध्दा त्यांच्याकडे आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत मराठा समाजातील गरीब लोकांसाठी बजेटमध्ये आर्थिक तरतूद करण्यात येईल असे उत्तर माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांनी द्यावे. दादांकडे तिजोरीची किल्ली आहे. श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकडे काही नाही. दादांना नाही म्हणण्याची हिम्मत या सरकारमध्ये कोणाचीही नाही. दादांचा शब्द अंतिम आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि दादांचे चांगले संबंध आहेत. तेव्हा मराठा समाजातील गरीब लोकांची फसवणूक न करता त्यांना न्याय देण्याची भूमिका शासनाने घ्यावी अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी नियम 97अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या चर्चेसाठी वेळ दिल्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, ज्या पध्दतीने शासन गरीब मराठा समाजावर अन्याय करीत आहे त्या पध्दतीने मराठा आरक्षणा संदर्भातील चर्चा उपस्थित करण्याबाबत या सभागृहात अन्याय झाला असे मी म्हणणार नाही. या विषयावरील चर्चा उशिरा होत आहे, परंतु उशिरा का होईना न्याय मिळाला हे देखील काही कमी नाही. त्याबद्दल मी पुन्हा एकदा आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, मराठा समाजाच्या आरक्षणा संदर्भातील प्रश्न समजून घेण्यास काही जण तयार नाहीत. काही मूठभर श्रीमंत समाज हाच वर्ग अनेकांच्या डोळ्यासमोर आहे. परंतु ग्रामीण आणि झोपडपट्टी भागात देखील मोठ्या प्रमाणावर मराठा समाज राहत आहे. हा समाज खेड्यापाड्यात, वाड्यावर आणि तांड्यावर देखील राहत आहे. परंतु त्यांच्याकडे मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध करणारे पाहण्यास तयार नाहीत. फक्त पूर्वीचे राजे, महाराजे, जमीनदार, वतनदार हे मराठा समाजाचे होते असे वारंवार सांगितले जाते. त्या शिवाय स्वातंत्र्या नंतर स्व.यशवंतराव चव्हाण पासून आताचे मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्यापर्यंत सर्व मराठा समाजाचे होते असे सांगण्यात येते आणि हेच आमचे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, मराठा समाज हा प्रामुख्याने शेतकरी वर्ग आहे. पूर्वी त्यांच्याकडे 100 - 200 एकर जमीन होती. ज्या शेतकऱ्यांकडे इतक्या मोठ्या प्रमाणावर जमीन होती ती आता फक्त एक-दोन एकर शिल्लक राहिलेली आहे. मग ती आर्थिक परिस्थितीमुळे असेल, विभक्त कुटुंब पध्दतीमुळे असेल, नैसर्गिक आपत्तीमुळे असेल किंवा अन्य काही कारणे असतील त्यावर मी काही बोलत नाही.

मराठा समाजातील काही लोक अल्पभूधारक तर काही भूमीहीन आहेत. हा समाज गरीब का झाला याचा विचार केला पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

मात्र दुर्दैवाने या बाबतचा विचार करण्यास कोणी तयार नाही. वारंवार पूर्वीचे दाखले देऊन व आताच्या परिस्थितीकडे डोळेझाक करुन भुई थोपटण्याचे काम करणार असाल तर ते योग्य नाही. आई जेऊ घालेना, अन् बाप भीक मागू देईना, अशी परिस्थिती दुर्दैवाने आज या मराठा समाजाची झ ालेली आहे.

महोदय, मराठा समाज हा गरीब आहे. आमची मागणी काय आहे ? या राज्यातील जो मराठा समाज आहे त्या समाजाचा ओबीसी मध्ये समावेश करुन, त्याला 25 टक्के आरक्षण दिले पाहिजे. आम्ही आरक्षण कोणासाठी मागतो ? जे गरीब आहेत, जे आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत, जे दारिद्र्यरेषेखालील आहेत त्या वर्गाला आरक्षण मिळाले पाहिजे. आमचे काही मित्र म्हणतात की, आम्हाला राजकारणात आरक्षण हवे आहे. परंतु तसे नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, आम्ही आजही मागणी करतो की, आम्हाला राजकारणात आरक्षण नको. राजकारणातून विशिष्ट समाज कमी झाल्याशिवाय आमच्या समाजाची प्रगती होऊ शकत नाही. या परिस्थितीमध्ये खरोखरच सुधारणा घडवून आणायची असेल तर मंत्रिमंडळात आरक्षण ठेवले पाहिजे. मी तर म्हणेन की, मुख्यमंत्री पदासाठी सुध्दा आरक्षण लावा. त्यास आमची काहीच हरकत नाही. कशासाठी शासन हवे आहे ? असो.

महोदय, वारंवार असे सांगितले जाते की, आम्हाला राजकारणात आरक्षण हवे आहे. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, आम्हाला मुळात राजकीय क्षेत्रात आरक्षण नको. मी मराठा समाजाचे थोडेफार काम करतो. त्या अनुभवावरुन सांगू इच्छितो की, खऱ्या अर्थाने या समाजाला आरक्षण लागू करण्यास हरकत नाही. किमान या मुळे तरी या प्रश्नाला न्याय मिळेल.

महोदय, मराठा समाजाला आरक्षण मिळण्याची मागणी अनेक वर्षांपासूनची आहे. कै.अण्णासाहेब पाटील यांनी या समाजाच्या मागण्यांसाठी मोर्चा काढला होता. त्यावेळी त्यांची मागणी काय होती ? केवळ आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना आरक्षण मिळावे अशी त्यांची मागणी होती. या देशात श्रीमंत आणि गरीब या दोनच जाती मानाव्यात तसेच जो गरीब वर्ग आहे मग तो कोणत्याही जातीतील असो त्याला आरक्षण देण्याची मागणी त्यांनी केली होती. आज ओबीसीचे जे नेते आहेत ते त्यावेळी कै.अण्णासाहेब पाटील आणि आमच्या बरोबर होते. परंतु देशात आणि राज्यात मंडल आयोगाचा निर्णय झाला त्या वेळी आमच्या बरोबर असलेले ओबीसी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

वर्गातील नेते हळूच बस बदलून दुसरीकडे गेले आणि आम्हाला शहाणपणाच्या गोष्टी सांगू लागले. सभापती महोदय, इतिहासातील काही गोष्टी खोदून काढल्या तर अनेकांना ते झोंबेल.

महोदय, आम्ही या ठिकाणी अजिबात भांडत नाही, कोणाचे आरक्षण मागत नाही, एखाद्या समाजाचे आरक्षण कमी करुन मागत नाही. महोदय, राज्यामध्ये विविध समाजासाठी एकूण 52 टक्के आरक्षण दिले जाते. देशात हेच प्रमाण 50 टक्के आहे. देश स्तरावर आरक्षणाच्या तीन कॅटॅगरी आहेत. त्यानुसार अनुसूचित जातीसाठी 15 टक्के, अनुसूचित जमातीसाठी 8 टक्के आणि ओबीसी प्रवर्गासाठी 27 टक्के अशा प्रकारे एकूण 50 टक्के आरक्षण दिले जाते. परंतु आपल्या राज्यात 52 टक्के आरक्षण दिले जाते. अनुसूचित जातीसाठी 13 टक्के, अनुसूचित जमातीसाठी 7 टक्के, ओबीसीसाठी 19 टक्के, विमुक्त जाती (अ) साठी 3 टक्के, भटक्या जमाती (ब) साठी 2.5 टक्के, भटक्या जमाती (क) साठी 3.5 टक्के, भटक्या जमाती (ड) साठी 2 टक्के आणि विशेष मागास वर्गासाठी 2 टक्के अशा प्रकारे एकूण 52 टक्के आरक्षण दिले जाते.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

या राज्यामध्ये जो 52 टक्के वर्ग आहे त्यांच्यातील आम्हाला एक टक्का सुध्दा नको. आम्ही या ठिकाणी बोलतो तसेच बाहेरही सांगतो की, आम्हाला त्यांच्यातील एक टक्का सुध्दा नको. आम्ही एवढे ओरडून सांगत असताना, प्रामाणिकपणे सांगत असताना सुध्दा आमच्याबद्दल संशयच घेतले जातात की, याना यामध्येच आरक्षण पाहिजे. सन्माननीय सदस्य कपिल पाटील म्हणतात आम्ही भांडण लावणार. जर आम्ही सांगतो की त्यांच्यातील आम्हाला काहीही नको तग मग भांडणाचा प्रश्न कोठे येतो ? आम्ही तुमच्यातील काही मागत नाही, तुमचे काढून घ्या असे म्हणत नाही, तुम्हाला देऊ नका असेही म्हणत नाही. फक्त आम्हाला द्या असे आम्ही म्हणत आहोत.

आमच्या मुलांना शिक्षण मिळत नाही, त्यांना नोकरी मिळत नाही, उद्योग व्यवसाय करण्यासाठी आर्थिक सवलत मिळत नाही, मदत मिळत नाही, मग या मुलामुलींनी काय करावे ? त्यांनी फक्त आत्महत्या करावी काय ? अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या झाल्या त्यातील अनेक आत्महत्याग्रस्त शेतकरी हे मराठा समाजाचे आहेत. त्याची दखल कोण घेणार ? आमच्याकडे सर्व याद्या आहेत. सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत. त्याकडे कोण पाहतो ? या सर्वांकडे लक्ष देण्याकरिता, या सर्वांची परिस्थिती सुधारण्याकरिता आम्ही हे आरक्षण मागत आहोत. कोणाचेही आरक्षण कमी न करता प्रामाणिकपणे हे आरक्षण मागत असताना आम्हाला नावे ठेवली जातात किंवा आमच्या हेतूबद्दल शंका घेतात. माझे स्पष्ट मत आहे की, कोणाचेही आरक्षण कमी न करता आम्ही आरक्षण मागत असताना दुसऱ्यांच्या पोटात दुखण्याचे काय कारण आहे ?

माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे यांना सांगू इच्छितो की, आपण शासन म्हणून या बाबतीत कधी तरी स्पष्ट उत्तर दिले पाहिजे. कोणी विरोध करील नाही तर समर्थन देईल परंतु या राज्यामध्ये जो गोरगरीब आहे, जो दीनदलित आहे, जो गरजवंत आहे त्याला समान न्याय मिळाला पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. एखादा वर्ग जर इतिहासामध्ये पुढारलेला असेल, सधन असेल, चांगला असेल, पण काळाच्या ओघामध्ये निसर्गामुळे जर त्यांची अतिशय वाईट परिस्थिती असेल तर त्या वर्गाला आधार देण्याचे काम, त्या वर्गाला वर आणण्याचे काम शासनाने केले पाहिजे.

छत्रपती शाहू महाराजांनी 1902 साली या देशामध्ये पहिल्यांदा आरक्षण चालू केले. त्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

उल्लेख आमच्या दोन तीन सहकाऱ्यांनी केला. केवळ दलितांसाठीच नाही तर त्यामध्ये मराठा समाजापासून अनेक समाज होते. त्यामध्ये फक्त ब्राम्हण आणि आणखी दोन-तीन समाज नव्हते. 1902 सालामध्ये म्हणजे त्या काळामध्ये सुध्दा शाहू महाराजांना जी दूरदृष्टी होती ती या राज्याला ती दृष्टी का लाभू नये हा खरा प्रश्न आहे. आपण त्यांना का न्याय देऊ शकत नाही. हजारो नव्हे तर लाखो तरुण-तरुणी बेरोजगार असून नैराश्याच्या गर्तेत सापडलेले आहेत. त्यांना कोण न्याय देणार ?

काही लोक सांगतात की, 50 टक्क्याच्या पुढे जाऊ नका. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी घटना सुध्दा दाखवली. 50 टक्क्याच्या वर आरक्षण जाऊ नये हा निर्णय सुप्रीम कोर्टाच्या माध्यमातून केंद्र शासनाने घेतला. 50 टक्क्याच्या वर जाऊ नये असे सुप्रीम कोर्टाचे निर्देश आहेत. 50 टक्क्याच्या वर जायचे नाही असे म्हणत असताना, सातत्याने कागद फडकवून 50 टक्क्याच्यावर आम्हाला जायचे नाही असे सांगत असताना आपण या महाराष्ट्रामध्ये 52 टक्के आरक्षण का दिले

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

असा मी प्रश्न विचारतो. त्या 2 टक्क्यांमध्ये आमच्या समाज बांधवांना समाविष्ट करुन त्यांना न्याय देणे गरजेचे होते हे शासनाला पटलेले आहे. ते 2 टक्के आरक्षण वाढवून दिले असेल तर आमच्या गोरगरिबांच्या मुलामुलींसाठी आरक्षणाची टक्केवारी शासन का वाढवू शकत नाही ? ही टक्केवारी वाढवू शकत नसाल तर शासनाची नियत साफ नाही हे स्पष्ट होत आहे. शासनाच्या मनात आहे का हाच खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या राज्याने 2 टक्क्यांनी आरक्षण वाढविलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी असे सांगितले की, तामिळनाडूमध्ये 69 टक्के आरक्षण आहे. त्या राज्य सरकारने अनुसूचि 9 मध्ये हे आरक्षण दिलेले आहे. हे आरक्षण कोणत्या प्रवर्गात दिले जाईल हा खरा प्रश्न आहे. मग केंद्र शासन असेल, राज्य शासन असेल पण कोणत्याही प्रवर्गाशिवाय आरक्षण देता येत नाही. शासनाला मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातच आरक्षण द्यावे लागेल. त्याला दुसरा पर्याय असू शकत नाही. आम्हाला राजकीय आरक्षण नको. आम्हाला अनुसूचि 9 मध्ये आरक्षण द्यावे. प्रवर्गाशिवाय आरक्षण देण्याचा शासनाने प्रयत्न केला तर या राज्यातील मराठा समाजाला पुन्हा खाईत घेऊन जाल आणि या समाजाचे कधी भरुन न येणारे नुकसान होईल. अशा प्रकारचा शासनाने मनामध्ये विचारही आणू नये.

तामिळनाडू सरकारने 69 टक्के आरक्षण दिलेले आहे. त्या राज्य सरकारने श्रेयस सतीश चव्हाण या व्यक्तीला बीसीचे प्रमाणपत्र दिलेले आहे. तामिळनाडू राज्यात मराठा समाज बीसीमध्ये समाविष्ट आहे. आमची तशी मागणी नाही. कर्नाटकमध्ये 66 टक्के आरक्षण आहे. त्या राज्यात मराठा समाज ओबीसीमध्ये आहे. मग या राज्यामध्ये मराठा समाजाला शासन आरक्षण का देऊ शकत नाही ? या राज्यामध्ये मराठा समाज मोठ्या संख्येने आहे. प्रश्न असा आहे की, या समाजाकडे शासनाचे दुर्लक्ष का होत आहे ? गेल्या अनेक वर्षांपासून आमची ही मागणी आहे. या राज्यातील गोरगरीब मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करुन आरक्षण मिळाले पाहिजे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

श्री.विनायक मेटे.....

सभापती महोदय, कालेलकर आयोगाने शिफारस केलेली आहे. त्यानंतर 1993 साली खत्री आयोगाने शिफारस केलेली आहे. त्यानंतर खत्री आयोगाचे मागासवर्गीय आयोगात रुपांतर करण्यात आले. त्यानंतर बापट यांची समिती नियुक्ती करण्यात आली. जसा राज्य शासन या समाजावर अन्याय करीत आहे तसा बापट यांनी आमच्यावर अन्याय करण्याचे काम केले आहे. हे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे या संदर्भात अनेक वर्षे काम करीत असल्यामुळे त्यांना अधिक वेळ द्यावा असे मी प्रामाणिकपणे सांगतो. आज आपल्याला आणखी दोन विधेयके मंजूर करावयाची आहेत. औद्योगिक विकास सुधारणा विधेयक व प्रकल्पबाधित लोकांच्या पुनर्वसन सुधारणा विधेयक ही विधेयके आज मंजूर होऊ शकणार नाहीत. कारण ती विधेयके विधानसभेकडून या सभागृहात चर्चेसाठी केव्हा येतील हे माहीत नाही. ती आली तरी आज मंजूर होऊ शकणार नाहीत, कारण त्या विधेयकांवर अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत, उपसूचना करावयाच्या आहेत. त्यामुळे वि.स.वि.क्र.14 हे विधेयक प्रथम मंजूर करण्यात यावे अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी सांगत होतो की, मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात खत्री आयोग, कालेलकर आयोग, राज्य मागासवर्गीय आयोग, बापट आयोग असे आयोग नेमण्यात आले. जो बापट आयोग नेमला त्या बापट आयोगाने आमच्यावर पूर्वग्रहदूषित भूमिका घेऊन अन्याय केला. बापट साहेबांनी जुलै 2008 मध्ये राज्य शासनाला दोन अहवाल सादर केले. या आयोगामध्ये एकूण पाच सदस्य होते. आयोगाच्या अहवालाची प्रत माझ्याकडे आहे. 5 पैकी 3 सदस्यांनी मराठा समाजाला आरक्षण द्यावे अशा प्रकारची स्पष्ट शिफारस केलेली आहे. श्री. कसबे हे सहावे सदस्य नव्याने निवडून आलेले होते त्यामुळे त्यांना मताचा अधिकार नव्हता. मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात बहुमत असताना सुध्दा बापट आयोगाने मराठा समाजाच्या विरोधात अहवाल द्यायचाच असा निश्चय करुन तो अहवाल दिलेला आहे.

हा अहवाल दिल्यानंतर दिनांक 16 सप्टेंबर 2008 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख साहेब आणि तत्कालीन उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेब यांना आम्ही सर्व जण भेटलो आणि सांगितले की हा अहवाल आमच्यावर अन्याय करणारा आहे. हा अहवाल चुकीच्या पध्दतीने दिलेला आहे. हा अहवाल फेर तपासणीसाठी पाठवावा आणि आम्हाला न्याय देण्याचे काम करावे. त्यानंतर राज्य शासनाने तसे आदेश काढले. राज्य शासनाने आयोगाला पत्र पाठवून आयोगाने काय केले पाहिजे यासंबंधीच्या स्पष्ट सूचना दिल्या. राज्य शासनाने आयोगाला 13.2.2009, 3.6.2010, 29.7.2010, 24.1.2011. 28.2.2011. 18.7.2011 या दिवशी पत्रे पाठविली आणि त्या पत्रामध्ये मराठा समाजाचा इतर मागासवर्गामध्ये समावेश करावा अशा सूचना राज्य शासनाने आयोगाला केल्या. या पत्रांना आयोगाने उत्तर दिले नाही. या संदर्भात आयोगाने काय करावे आणि काय करु नये हे राज्य शासनाने स्पष्ट करावे अशा आशयाचे पत्र आयोगाने दिनांक 3.6.2010 रोजी दिले.

मागासवर्गीय आयोगाने इतक्या वर्षात काही केले नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

कारण त्याना करायचेच नव्हते, हे त्यातून पुढे आले आहे. याचे कारण असे की, बापट साहेबांची नियुक्ती झाली. त्यांचा कार्यकाळ 2004 ते 2008 पर्यंत होता. 24 नोव्हेबर, 2008 रोजी बी.पी.सराफ यांची नियुक्ती झाली. त्या आयोगामध्ये श्रीमती अनुराधा भोईटे, प्रा.हरी नरके, हाजी शौकत तांबोळी, चंद्रशेखर देशपांडे, एस.जी.देवगावकर, डॉ.राघोजीराव कुंभार असे 7 सदस्य होते. नंतर त्यांची मुदत संपली. पुन्हा 31 डिसेंबर, 2011 रोजी पूर्वीचे एक-दोन सदस्य वगळता इतर सदस्यांची फेरनियुक्ती करण्यात आली. सराफ यांचे निधन झाल्यानंतर न्या.भाटिया यांची नियुक्ती 21 मार्च, 2013 रोजी केली गेली.

सभापती महोदय, 12 जानेवारी, 2004 च्या शासन पत्रान्वये राज्य मागासवर्ग आयोगाची स्थापना झाली. त्या पत्रात असे म्हटले आहे की, आयोगाची रचना करताना अध्यक्ष, सहा सदस्य व एक सदस्य सचिव असतील. अध्यक्ष हे सेवानिवृत्त न्यायाधीश असतील, एक महिला सदस्य असेल व इतर पाच सदस्य आणि एक सदस्य सचिव असतील. तीन वर्षापेक्षा अधिक काळ rs पद धारण करणार नाहीत असे स्पष्ट पत्रामध्ये नमूद केलेले असताना शासनाने 24 नोव्हेंबर, 2008 रोजी आयोगाची रचना करण्याकरिता जो आदेश काढला त्यात प्रा.हरी नरके, डॉ.राघोजीराव कुंभार, हाजी शौकत तांबोळी यांची नियुक्ती केली. ते तीन वर्षच कार्यकाळ धारण करु शकतात असे आदेश असताना आयोगावर नियुक्त केलेल्यांची साडेचार वर्षे पूर्ण झालेली आहेत.

पल्लवी बाळकृष्ण रेणके या प्रा.हरी नरके यांच्या मेहुणी आहेत आणि बाळकृष्ण रेणके हे प्रा.हरी नरके यांचे सासरे आहेत. प्रा.हरी नरके हे सातत्याने दूरदर्शनवर, रेडिओवर, वृत्तपत्राच्या माध्यमातून, समारंभातून, जाहीर कार्यक्रमातून लोकांपर्यंत जाण्याचा प्रयत्न करीत असतात. मराठा समाजाला आरक्षण कसे मिळणार नाही, ओपन वर्गाला कसे आरक्षण मिळणार नाही हाच त्यांचा कार्यक्रम असतो. प्रा.हरी नरके मराठा आरक्षणाच्या विरोधात असताना त्यांची आयोगावर नियुक्ती कशी होते? ते आहेत, त्यांचे नातेवाईक आहेत आणि इतर सहकारी आहेत त्यांची या आयोगावरील मुदत संपली आहे. 2009 पासून 2013 पर्यंत साडेचार वर्षे पूर्ण होत आहेत. ही सर्व मंडळी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या विरोधात असताना शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात कितीही पत्रे आयोगाला पाठविली तरी अहवाल येऊ शकत नाही.

नंतर 4बी.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

आरक्षण देण्याच्या संदर्भात त्यांच्याकडून रिपोर्ट येऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये तुम्हाला हे चारही सदस्य बदलावे लागणार आहेत. येत्या आठ दिवसाच्या आत या चारही सदस्यांचे सदस्यत्व रद्द झाले पाहिजे. हे चारही सदस्य आदेशाच्या विरुध्द वागले असल्यामुळे या चारही सदस्यांचे सदस्यत्व रद्द झाले पाहिजे. जे आमच्या आरक्षणाच्या विरोधात आहेत त्यांना प्रथम बाहेर काढले पाहिजे.

सभापती महोदय, माझी दुसरी मागणी आहे की, जे लोक विरोधात आहेत त्यांना काढून टाकले गेले पाहिजे. या आयोगावर कोण असावे यासाठी मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना बरीच पत्रे दिलेली आहेत. अध्यक्ष किंवा सदस्य नेमतांना तो पूर्वग्रह दूषित असता कामा नये, कोणत्याही एका विचाराने बांधिल असता कामा नये. जे निपक्ष असतील, पक्षातीत असतील, जो सर्वांना न्याय देऊ शकेल असा सदस्य असला पाहिजे. हा आयोग केवळ एका जातीपुरता, समाजापुरता नाही तर या राज्यामध्ये ज्या कोणाला आपल्याला आरक्षण पाहिजे त्यांच्यासांठी किंवा वगळण्यासाठी हा आयोग आहे. हा आयोग काही एका जातीसाठी किंवा समाजासाठी नाही. जो सर्व समाजाला आपले मानेल, न्याय देईल अशांनाच या आयोगावर सदस्य म्हणून घेतले पाहिजे. मी श्री. भाटीया साहेबांवर टीका टिपणी करणार नाही. परंतु बाकीचे जे चार सदस्य आहेत त्यांची नियुक्ती त्वरित रद्द केली पाहिजे असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सरकार कशा प्रकारे आरक्षण देऊ शकते याबद्दल मी थोडक्यात सांगू इच्छितो की, नाईन शेडयुलमध्ये आपण आरक्षण देऊ शकतो. परंतु अशा माध्यमातून आरक्षण देण्याची शासनाची तयारी आहे काय ? याबातही विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कनार्टक राज्य शासन व सुप्रीम कोर्टामध्ये यासंदर्भात निर्णय झाला होता व तो निर्णय 1994 मध्ये आला होता. एखाद्या समाजाला आरक्षण द्यावे असे शासनाला वाटले तर त्या समाजाचा सर्वंकष डाटा जमा करावा आणि नंतर निर्णय घ्यावा व असे करण्यास शासन निश्चितपणे समर्थ आहे. याला कोणतीच अडचण येऊ शकत नाही. या दोन पध्दतीने आपल्याला आरक्षण देता येऊ शकते. दोन महिन्यापूर्वी हरियाणा शासनाने 10 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

घेतला आहे. जर 10 टक्के आरक्षण हरियाणा सरकार देऊ शकते, इतर राज्य 50 टक्के आरक्षण लागू करु शकते तर महाराष्ट्र राज्य या समाजाला न्याय देण्यासाठी आरक्षण का देऊ शकत नाही ? आपण जर अशा पध्दतीने आरक्षण दिले तर खऱ्या अर्थाने या समाजाला न्याय देऊ शकतो. लाखो गोरगरीब मुला-मुलींना शिक्षणामध्ये आणि नोकरीमध्ये न्याय मिळू शकेल असे माझे ठाम मत आहे. काही ठिकाणी मराठा कुणबी समाजाला आरक्षण मिळालेले आहे. या राज्यातील विदर्भ तसेच कोकणाला यामध्ये न्याय मिळाला आहे. या राज्यातील सहा जिल्हयांमध्ये गडचिरोली, चंद्रपूर,ठाणे, नंदूरबार या जिल्हयांमध्ये कुणबी समाजाची संख्या जास्त असल्यामुळे या ठिकाणी ओबीसी समाजाला आरक्षण कमी मिळते. माझा ओबीसी नेत्यांना सवाल आहे की, या राज्यामध्ये मोठया प्रमाणात कुणबी समाज आहे परंतु त्यांच्यासाठी तुम्ही काही काम केले आहे काय ? आवाज उठवला आहे काय ? या ठिकाणच्या ओबीसी समाजाला न्याय मिळावा यासाठी आम्ही गडचिरोली येथे आवाज उठवला, रास्ता रोको केला, मोर्चे काढले. याचा अर्थ त्या ठिकाणच्या आदिवासीवर अन्याय व्हावा असा नाही. आदिवासींना त्यांचा हक्क मिळालाच पाहिजे.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून माझे स्पष्टपणे म्हणणे आहे की, ...

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, सदनामध्ये काय सुरु आहे? याठिकाणी धमक्या दिल्या जात आहेत की, जे आडवे येतील त्यांना बघून घेऊ. याठिकाणी जर अशा प्रकारे शब्दप्रयोग होत असतील तर ते बरोबर नाही. सदरहू शब्द कामकाजातून काढून टाकण्यात यावेत. जर सदनामध्ये अशा प्रकारे वाक्यप्रयोग होत असतील आणि जर कोणी असे समजत असेल की, आम्ही काय वाटेल ते करु. जर हिंमत असेल तर विधान सभेच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकावा. याठिकाणी अशा प्रकारच्या धमकावण्या चालणार नाहीत आणि हे शब्द कामकाजातून काढून टाकण्यात यावेत.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : ठीक आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांना कशाचा झटका आला आहे? त्यांना असे अधून-मधून झटके येत असतात. मूळामध्ये प्रश्न असा आहे की, राजकारणामध्ये कोणी अशा प्रकारे वागेल आणि समाजाला गृहीत धरेल त्याला समाज क्षमा करणार नाही. म्हणून माझे स्पष्टपणे म्हणणे आहे की, तुम्ही राजकारणाचे आणि मोठ्या लोकांचे पाहू नका. येथे मंत्री किती आहेत आणि माननीय मुख्यमंत्री म्हणून कितीजण राहिले आहेत, आमदार किती आहेत, खासदार किती आहेत याकडे पाहू नका. खेड्या-पाड्यातील, झोपडपट्टीमधील आमच्या गरीब मराठा समातातील मुला-मुलींकडे बघा आणि त्यानंतर बोला. याठिकाणी मी जास्त बोलत नाही.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांना सांगू इच्छितो की, आज आपण येथे शेजारी बसलो आहोत. मी महाराष्ट्र राज्याचे उदाहरण देत नाही. पण मंत्रालया मध्ये जाऊन पहावे. तेथे काही अपवाद वगळता कै.यशवंतराव चव्हाण यांच्यापासून आतापर्यंतचे माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण पर्यंत सर्व माननीय मुख्यमंत्री मंत्रालयातच बसले आहेत. मराठा समाजाचे किती लोक आहेत याचा एकदा सर्व्हे करावा. याबाबतीत माझे ठामपणे मत आहे आणि तुमची हिंमत आहे तर एकदा होऊन जाऊ दे आणि मग खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे समोर येईल. मंत्रालयातील जाऊ दे, पण विधान भवन मध्ये काय स्थिती आहे? येथे तुमचे जे अधिकारी, कर्मचारी आहेत त्यामध्ये मराठा समाजाचे किती लोक आहेत याची माहिती तुमच्याकडे उपलब्ध आहे काय?याबाबत माहिती घ्यावयाची असेल तर एका तासाच्या आत तुमच्यासमोर येईल.

. . . .4 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे . . . .

रिपोर्ट येईल. पण तुम्ही तो देऊ शकत नाही, सांगू शकत नाही. याठिकाणी मराठा समाजाचे सभापती किती झाले, अध्यक्ष किती झाले? हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, हे आमचे दुर्दैव आहे. आम्ही केवळ दिसत आहोत पण प्रत्यक्षात दिव्याखाली अंधार आहे हाच खरा प्रश्न आहे. बाकीच्यांना न्याय देता-देता आमच्यावर कधी अन्याय केला हे आम्हाला कळलेच नाही आणि जरी कळले तरी ते वळत नाही. कारण आमचे राजकारण यात आडवे येत आहे हा सगळ्यात मोठा मुद्दा आहे. आम्हाला हे राजकारण नको आहे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.रामभाऊ पडांगळे यांना राग आला. पण सन्माननीय सदस्य श्री.रामभाऊ पडांगळे यांना सांगू इच्छितो की, ज्याला मिळत आहे, त्याला ते मिळालेच पाहिजे या मताचे आम्ही आहोत आणि.याला माझा विरोध नाही. आम्ही तुमच्या बरोबर भांडावयास तयार आहोत. पण जे मागासवर्गीय समाजातील बांधव आहेत, त्यांना न्याय मिळण्या-करता आपल्या शासनाने प्रत्येक विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे हित पहाण्यासाठी मागासवर्गीय कक्ष निर्माण केलेला आहे. पण आमच्यासाठी कोण आहे? याची कोणाला दाद ना फिर्याद. आज या राज्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग भयभीत झालेला आहे. अशा वेळी कोणावर विश्वास ठेवावा आणि कोणाच्या पाठिमागे जावे, आपल्याला कोणी न्याय देईल याची अपेक्षा राहिलेली नाही. कारण ज्याच्याकडे जावे त्या माननीय मंत्री महोदयांकडे किंवा अन्य ठिकाणी गेल्यानंतर त्यांना अशी भीती वाटते की, आपल्याला जातीयवादी म्हणतील काय? मग या माणसाला लांब ठेवा आणि बाकीच्यांना न्याय द्या. त्यांनाही न्याय द्या पण किमानपक्षी याच्यावर अन्याय तरी करु नका. शासनात बसलेल्या सर्व मंडळींनी निदान एवढी तरी भूमिका घ्यावी. मग शासन कोणाचेही असो. म्हणून या बाबतीत एकदा कुठेतरी निर्णय झाला पाहिजे. मराठा समाजाचे खऱ्या अर्थाने किती लोक आहेत याचा एकदा बॅकलॉग काढला पाहिजे.

सभापती महोदय, यानिमित्ताने माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघसाहेब, तुमच्याकडे माझी अशी मागणी आहे की, याचा एकदा बॅकलॉग काढण्यात यावा, त्यादृष्टीने सुरुवात करा. पण तुमचे सगळे गोंधळ सुरु आहेत

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशोधित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.विनायक मेटे...

सभापती महोदय, राज्य शासनाने राज्य मागासवर्ग आयोगाला लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, "सध्या असलेल्या इतर मागासवर्गीय भटके, विमुक्त व विशेष मागास प्रवर्ग यांच्या 32 टक्के आरक्षणास बाधा न आणता मराठा समाजाला शैक्षणिक व नोकरीतील आरक्षण व आर्थिक सहाय्य देता येईल किंवा कसे या बाबत राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल सादर करावा." राज्य सरकारने न्यायालयात जे प्रतिज्ञापत्र सादर केलेले त्याची प्रत देखील माझ्याकडे आहे.

सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनामध्ये आपण सर्वांनी आग्रह धरल्यामुळे माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. आम्हाला शासनाच्या विरुध्द हक्कभंग आणावा लागला.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाने काढलेल्या परिपत्रकामध्ये नमूद केलेले आहे की, "राज्यातील मराठा समाजाचा इतर मागास प्रवर्गामध्ये समावेश करण्या संदर्भात आढावा घेऊन योग्य त्या शिफारशी करण्यासाठी माननीय उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे. या समितीमध्ये महसूल मंत्री, सामाजिक न्याय मंत्री, आदिवासी विकास विभाग मंत्री, राज्यमंत्री, सामाजिक न्याय, राज्य मंत्री सामान्य प्रशासन विभाग, अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग,सचिव, सामाजिक न्याय, महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पुणे यांचा समितीमध्ये समावेश आहे." माझे म्हणणे आहे की, या समितीचा निर्णय ग्राह्य मानायचा की, राज्य मागासवर्ग आयोगाचा निर्णय ग्राह्य मानायचा या बाबत एकदा निर्णय घेतला पाहिजे.

सभापती महोदय, राज्य मागास वर्ग आयोगाचा रिपोर्ट येईल तेव्हा येईल. परंतु शासनाने राज्य मागास वर्ग आयोगावरील सदस्य बदलले पाहिजेत.

सभापती महोदय, माननीय उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीला वैधानिक दर्जा आहे. या समितीने सर्व डाटा एकत्रित करणे आवश्यक आहे. हा डाटा एकत्रित करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने यंत्रणा पुरविली पाहिजे. अन्यथा माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांना "लढ" असे सांगायचे आणि त्यांच्याकडून तलवार काढून घ्यायची असे प्रकार होता कामा नयेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे...

माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांच्यासारखे तडफदार व कर्तबगार मंत्री या समितीला लाभलेले आहेत. त्यांनी ठरविले तर मराठा समाजाला न्याय मिळाल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, मराठा समाजाच्या गोरगरीब विद्यार्थी-विद्यार्थिनींना न्याय देण्याकरिता तसेच त्यांना संधी देण्याकरिता आम्ही आरक्षणाची मागणी करीत आहोत. तेव्हा मराठा समाजाला संधी मिळण्याकरिता आरक्षण देण्याची भूमिका लवकरात लवकर घ्यावी. मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या विरोधात जे कोणी असतील त्यांनी गोरगरीब विद्यार्थ्यांकडे पाहून मराठा समाजातील गरीब लोकांना आरक्षण देण्याकरिता सकारात्मक विचार करावा अशी नम्र विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी कृपया दोन-दोन मिनिटांत आपले मुद्दे मांडावेत.

श्री.प्रवीण पोटे-पाटील (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आभार मानतो. पूर्वी मराठा समाजाची ख्याती 'जमीनदार' अशी होती. पूर्वी त्या समाजाकडे जमीनदार, वतनदार म्हणून बघितले जायचे. परंतु आज त्या समाजावर अशी परिस्थिती आली आहे की, 'मराठा' हा शब्द कायम राहिला असून, त्यांची परिस्थिती मात्र हलाखीची झाली आहे. पूर्वी मोठ्या प्रमाणावर संपत्ती असलेला मराठा समाज आज रस्त्यावर आला आहे. सन्माननीय सदस्य वारंवार या समाजाला आरक्षण मिळण्याबाबत मागणी करीत आहेत. परंतु त्या अनुषंगाने सरकार कार्यवाही करताना दिसत नाही.

महोदय, कुणबी हा मराठा समाजाचा घटक आहे. पूर्वी मोठ्या अभिमानाने आणि स्टेटसने मराठा जातीचा उल्लेख केला जात होता. ज्या मराठा समाजाकडे पूर्वी 100-100 एकर जमीन होती त्याच्याकडे आता केवळ 10-20 एकर जमीन राहिली आहे. पूर्वी ही मंडळी आनंदाने मराठा म्हणून मिरत होती. परंतु नंतर कुटुंब वाढीमुळे शेकडो एकर असलेली जमीन कुटुंबात वाटली गेली. त्यामुळे शेकडो एकर जमीन असलेला मराठा समाज आज अल्पभूधारक झाला आहे. त्याची आपल्या मुलांना शिक्षण देण्याइतपत सुध्दा परिस्थिती राहिली नाही. एकंदरीत या सर्व परिस्थितीचा विचार करता, मराठा समाजाला शक्य तितक्या लवकर आरक्षण देण्याबाबत विचार केला पाहिजे.

महोदय, मराठा समाजातील मुले चांगले गुण मिळाल्यानंतर डॉक्टर, इंजिनियर्सचे शिक्षण घेण्यासाठी जातात त्या वेळी त्यांना प्रवेश मिळत नाही. या निमित्ताने माझी मागणी आहे की, या समाजाला लवकरात लवकर आरक्षण लागू करावे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी अतिशय महत्त्वाचा असा ठराव मांडल्याबद्दल मी यांचे अभिनंदन करतो. तसेच आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले सुध्दा आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 97 अन्वये मांडण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, अतिशय महत्त्वाच्या विषयावर ही चर्चा सुरु आहे. महोदय, आम्हाला आमची मते मांडण्यासाठी पुरेशी संधी द्यावी. या ठिकाणी आपण सर्व बाजूंनी धमकी देत आहात. त्यामुळे आम्ही घाबरलेल्या स्थितीत आहोत. किमान या महत्त्वाच्या विषयावर विचार मांडण्यास पुरेसा वेळ द्यावा अशी मी विनंती करतो.

महोदय, आज सर्व वर्गातून आरक्षणाची मागणी होत आहे. पूर्वी ज्या वर्गाकडून आरक्षणाची थट्टा आणि मत्सर केला जायचा त्या वर्गाकडून आज आरक्षणाची मागणी होत आहे. आता बिचारी ब्राम्हण मंडळीच आरक्षणापासून वंचित राहिली आहे. मला वाटते त्यांनी सुध्दा आरक्षणाची मागणी करावी, जेणेकरुन सर्व बाजूंनी आरक्षण परिपूर्ण होईल.

महोदय, या निमित्ताने मला दोन गोष्टी सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना आम्ही वंदन करतो. सबंध महाराष्ट्र राज्यामध्ये मराठ्यांचे राज्य आहे, असा संकेत पाळला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करतो म्हणजे एका अर्थाने मराठ्यांना वंदन करतो. छत्रपतींचे राज्य सबंध हिंदुस्थानात पसरलेले आहे. सबंध देशात मराठ्यांचे राज्य पसरले याचा आम्हाला अभिमान आहे.

महोदय, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गाव पातळीच्या सरपंचापासून ते मुख्यमंत्र्यापर्यंत ही पदे मराठ्यांच्या हातात आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आपण युतीच्या काळात गृह राज्यमंत्री होता. त्या वेळी मोठमोठ्या लोकांच्या पेट्रोल पंपांवर आपण धाडी टाकल्या.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीरत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राम पंडागळे ....

सरपंचापासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व यंत्रणा मराठा समाजाच्या हातामध्ये आहे. सभापतीपासून जिल्हा अध्यक्षापर्यंत, सर्व सामाजिक यंत्रणा, सर्व आर्थिक यंत्रणा, सर्व शैक्षणिक यंत्रणा मराठा समाजाच्या हातामध्ये आहे. या राज्याचा राज्यकारभार मराठा वर्गाच्या हातामध्ये आहे. आमदार-खासदारांपासून एखाद-दुसरा अपवाद सोडला तर सर्व मुख्यमंत्री, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या चव्हाणांपासून तर या चव्हाणांपर्यंत सर्व मराठा समाजाचे आहेत. या राज्यात संपूर्ण राज्य मराठ्यांच्या हातामध्ये आहे. असे असताना जर कोणी वंचित राहिला असेल, जर कोणी गरीब राहिला असेल तर तो दोष राज्यकर्त्यांचा आहे. ज्यांच्या हातामध्ये यंत्रणा होती ते योग्य प्रकारे यंत्रणा राबवू शकले नाहीत. त्या यंत्रणेचा हा दोष आहे असे मला वाटते. एखाद-दुसरा गरीब मराठा असेलही. हे मी अमान्य करीत नाही. जे गरीब असतील त्यांना न्याय मिळाला पाहिजे. बाबासाहेबांच्या घटनेमध्ये तेच आहे.

सभापती महोदय, रजपूत भामटे आरक्षणामध्ये आहेत. आपण या रजपूतांचा इतिहास काढून बघा. महाराष्ट्रातील रजपूतांचे नाते राजस्थामध्ये आहे. त्यांचे नाते उत्तरप्रदेशमध्ये आहे पण ते या ठिकाणी आरक्षणामध्ये आहेत. तो कोण भामटा आहे त्याचा शोध तरी घ्या. प्रत्यक्षात जो भामटा आहे त्याला आरक्षण मिळत नाही परंतु या आरक्षणामध्ये रजपूत भामटे घुसले. असे कोणी भामटे पुन्हा यामध्ये येऊ नयेत याची खबरदारी श्री. मोघे साहेब, आपल्याला घ्यावी लागेल. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, तुम्ही ओबीसीमध्ये येण्याचा प्रयत्न का करीत आहात ?

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे हे बोलण्याच्या ओघामध्ये अशा अनेक गोष्टी बोलतात की ज्या त्यांना कळत नाहीत. रजपूत भामटा हा एक समाज आहे त्यांच्यापुरता तो शब्द निश्चितपणे बरोबर आहे परंतु असे भामटे परत आरक्षणामध्ये येतात म्हणजे काय ? हे बोलणे बरोबर नाही. या ठिकाणी मराठा समाजाचा विषय आहे. म्हणजे तुम्हाला मराठा समाजाच्या बाबतीत असे म्हणावयाचे आहे का ? या ठिकाणी आपण बोलू शकतो म्हणजे काहीही बोलण्याचे कारण नाही. आपण सर्व समाजाला बोलत आहात. तुम्हालाच सर्व कळते असे नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : या चर्चेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांची भाषणे आता थांबविण्यात येत आहेत. माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, जो गरीब मराठा असेल त्याचा सन्माननीय सदस्य श्री. मेटे साहेब यांनी शोध घ्यावा. जो खरोखर गरीब असेल त्यालाच फायदा दिला पाहिजे. नाही तर या भामट्यांसारखे होता कामा नये असे मला म्हणावयाचे आहे. मी या आरक्षणाला पाठिंबा देतो पण हा पाठिंबा देत असताना आपण ओबीसीमध्ये घुसू नका, दलितांमध्ये घुसू नका असे मला सांगावयाचे आहे.

तालिका सभापती : सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावी.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, अनेक वर्षे चर्चेत असलेल्या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, नरेंद्र पाटील, विनोद तावडे, विनायकराव मेटे, भगवानराव साळुंके, दीपक साळुंके व इतर सन्माननीय सदस्यांनी या सभागृहात नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, नरेंद्र पाटील, कपिल पाटील, विनायकराव मेटे, प्रवीण पोटे-पाटील, राम पंडागळे इत्यादी सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

सभापती महोदय, मराठा समाजाला आरक्षण मिळावे या दृष्टीकोनातून राज्यामध्ये अनेक वर्षापासून चर्चा चालू आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

त्या दृष्टीकोनातून आयोगाकडून माहिती मागविण्याचाही शासनाने प्रयत्न केलेला आहे. त्याची माहिती सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. या सर्व गोष्टी पाहता कोणत्या जातीमध्ये जन्मावे, कोणत्या जातीमध्ये जन्मू नये हे कोणाच्या हातामध्ये नसते. आज कोणी श्रीमंत असेल, कोणती जात श्रीमंत असेल, कोणती जात शौर्यवान असेल, पण पुढच्या पिढीमध्ये तसेच राहील असे नाही. शौर्य राहत नाही, श्रीमंती राहत नाही की गरिबीही राहत नाही. 100 एकरवाला असेल, 200 एकरवाला असेल. पण तो उद्या श्रीमंत असेल की नाही हे सांगता येत नाही. ही भूमिका का मांडली आहे ? मराठा समाज हा एका जमान्यामध्ये श्रीमंत असेल, आज तो समाज श्रीमंत नाही. श्रीमंत नाही म्हणजे आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. म्हणून त्या समाजाला आरक्षण मिळावे अशा दृष्टीकोनातून सर्वत्र मागणी होत आहे. परंतु हा समाज परंपरागत श्रीमंत असल्यामुळे त्यांना आरक्षण कशाला पाहिजे असाही एक मतप्रवाह दिसून येतो.

न्या.बापट आयोगाने जुलै, 2008 रोजी मराठा समाजाबाबत नकारात्मक अहवाल सादर केला होता. कोणत्याही आयोगाचा अहवाल मंत्रिमंडळाच्या उपसमितीसमोर येत असतो. त्यानंतर मंत्रिमंडळासमोर जातो. तसा हा अहवाल मंत्रिमंडळाच्या उपसमितीसमोर आला होता. त्या समितीचे असे म्हणणे होते की, या आयोगाने बरीचशी माहिती घेतलेली नाही. पुरेशा प्रमाणात लोकांचा सर्व्हे केलेला नाही. बऱ्याच संघटनाना तुम्ही भेटला नाही. या मुद्यांमुळे उपसमितीने दिनांक 29.1.2009 रोजी अहवाल परत केला. दिनांक 13.2.2009 पासून या आयोगाकडून शासनाला अहवाल प्राप्त झालेला नाही. याबाबतची माहिती यावी यासाठी शासनाने प्रयत्न केले आहेत. हा अहवाल लवकरात लवकर देण्यासाठी शासनाने त्या आयोगाला अनेक स्मरणपत्रे दिलेली आहेत.

सन 1993 मध्ये सुप्रीम कोर्टाने इंदिरा साहनी विरुध्द भारत सरकार या केसचा निकाल दिलेला आहे. त्या निकालातही राज्यामध्ये मागासवर्गीयांसाठी 50 टक्के आरक्षण असावे, त्यापेक्षा अधिक असू नये असे म्हटलेले आहे. हे जरी खरे असले तरी तामिळनाडू राज्यात पूर्वीपासून 69 टक्के आरक्षण आहे, आंध्र प्रदेश, कर्नाटक व इतर राज्यात 50 टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण आहे. सुप्रीम कोर्टाचे असे म्हणणे आहे की, एखाद्या राज्याला मागासवर्गीयांसाठी 50 टक्क्यांपेक्षा जास्त

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.शिवाजीराव मोघे.....

आरक्षण द्यावयाचे असेल तर क्वॉन्टिफिकेशन डाटा उपलब्ध झाला पाहिजे. शासनाने मेरिटवर शोधले पाहिजे. तसे असेल तर 50 टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण देता येईल. त्या राज्याने अधिकचे दिलेले आरक्षण योग्य की अयोग्य हे सुप्रीम कोर्ट ठरविणार आहे. त्याच आधारावर मराठा समाजाला आरक्षण द्यावे की नाही हा प्रश्न आहे. याबाबत दोन मतप्रवाह आहेत. एक मतप्रवाह असे म्हणतो की, मराठा समाजाला ओबीसीत समाविष्ट करावे. दुसरा मतप्रवाह असे सांगतो की, कशाला या भानगडीत पडता, यामुळे वाद निर्माण होईल. 15 वर्षापूर्वी ओबीसीमध्ये फक्त 180 जाती होत्या. आता ओबीसीमध्ये 400 जातींचा समावेश केलेला आहे. काहींचे असे म्हणणे आहे की, आणखी किती जातींचा ओबीसीत समावेश करणार ? परंतु दुसऱ्या मतप्रवाहाचे म्हणणे आहे की, मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे. या समाजाला राजकीय आरक्षण नको. परंतु शैक्षणिक, आर्थिक व नोकऱ्यांमध्ये आरक्षण पाहिजे. अनुसूचि 9 मध्ये समाविष्ट करुन हे आरक्षण मिळावे. म्हणून यासंबंधी आयोगाचे मत मागविलेले आहे. त्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे...

दिनांक 25.12.2012 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांकडे एक शिष्टमंडळ आले होते. त्यांनी आम्हाला ओबीसीमध्ये आरक्षण न देता वेगळे आरक्षण द्यावे, आम्हाला कोणाबरोबर वाद नको, अशी भूमिका घेतली हाती. त्यासंबंधी चर्चा झाली होती. दुदैवाने डॉ. सराफ यांचे 15.4.2012 रोजी निधन झाले. दिनांक 26.6.2012 रोजी मराठा आरक्षणाची नस्ती मंत्रालयाला लागलेल्या आगीमध्ये जळाली. त्यानंतर हा प्रस्ताव मुख्य सचिव श्री. जे.एच. बांठिया यांच्याकडे सोपविलेला आहे. त्या बाबतीत देखील बरेच मतप्रवाह आलेले आहेत. मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, अनूसूचित जाती जमाती या भारतीय राज्यघटनेमध्ये नमूद आहेत. एक स्वल्प विराम बदलायचा असेल तरी देखील घटना दुरुस्ती आणावी लागते. याचा परिणाम असा झाला की, अनुसूचित जातीमध्ये एकही जात वाढली नाही, अनुसूचित जातीतील तीन जाती कमी झाल्या. मात्र आपल्या राज्यामध्ये विमुक्त जाती आणि भटक्या जमाती तसेच इतर मागास वर्गाच्या जातीमध्ये भरमसाठ वाढ झालेली आहे हे सुध्दा मला येथे नमूद करावयाचे आहे.

मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या बाबतीत आपल्याला इतर मागासवर्गीय आयोगाचा रिपोर्ट घेणे आवश्यक आहे. या आरक्षणाला एक चांगला सपोर्ट मिळावा म्हणून माननीय उद्योगमंत्री श्री. नारायण राणे साहेबांच्या अध्यक्षतेखाली एक कॅबिनेट सबकमिटी नेमलेली आहे. या सबिकमिटीचा अहवाल येण्यास किती दिवस लागतील हे मी सांगू शकत नाही. या सबकमिटीने अनुकूल अहवाल दिला तर महाराष्ट्र राज्य जरुर विचार करु शकेल. या समाजाला ओबीसीमध्ये आरक्षण द्यायचे की जनरल 9 सेक्शनमध्ये आरक्षण द्यायचे हा विचार आपल्याला करावा लागेल.

श्री. विनायक मेटे : मराठा समाजाचा इतर मागास वर्गीयामध्ये समावेश करावा यासाठी सबकमिटी नेमलेली आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : आपल्याला दोन पर्याय आहेत. सुप्रीम कोर्टाचे म्हणणे असे आहे की, तो समाज खरोखर मागासलेला आहे काय, त्या समाजाला खरोखर आरक्षणाची गरज आहे काय यासंबंधीचा डाटा उपलब्ध असला पाहिजे. केवळ भावनात्मक भूमिका घेऊन आम्ही ओबीसी आहोत, आम्ही विकर आहोत असे म्हणून चालणार नाही. आपण हेही मान्य केले पाहिजे की, अनुसूचित जाती/जमातीला आरक्षण द्यावे अशी मागणी त्या जातीतील लोकांनी केलेली नव्हती. ही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे....

मागणी देशातील लोकांनी केलेली होती. विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी आपल्या राज्यामध्ये सुरुवातीला केवळ 4 टक्केच आरक्षण होते. आज त्याना मोठया प्रमाणावर आरक्षण दिलेले आहे. हे आरक्षण द्यावे असे केवळ विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील लोकांनी म्हटलेले नाही तर सर्वांनी त्या आरक्षणाची गरज आहे असे म्हटलेले आहे. ओबीसीमध्ये देखील ब-याच जाती मागासलेल्या आहेत. काही जाती फॉरवर्ड असू शकतील. परंतु त्यांना देखील 19 टक्के आरक्षण दिलेले आहे.

आरक्षणाच्या संदर्भात जे आयोग नेमलेले आहेत त्या आयोगातील काही सदस्यांच्या भावना पूर्वग्रहदूषित आहेत असा उल्लेख करण्यात आला. परंतु आयोगा संबंधी अशा प्रकारचे मत व्यक्त करणे उचित नाही असे मला वाटते. कारण आयोग हा त्रयस्थ असतो. तरी देखील असा काही प्रकार असेल तर त्याचीही माहिती घेण्यात येईल आणि अशी कोणी भूमिका घेत असेल तर त्याला तेथे ठेवले जाणार नाही. मराठा समाजातील गरीब लोकांना न्याय मिळावा अशी शासनाची देखील भूमिका आहे. हे आरक्षण आपण दिले तर उद्या ते सुप्रीम कोर्टामध्ये टिकले पाहिजे. याबाबतीत घाईघाईने निर्णय घेऊन चालणार नाही. हे आरक्षण केवळ रेकॉर्डसाठी, कुणी भांडत आहे म्हणून किंवा कोणत्या संघटनेने मागणी केली म्हणून दिले आहे, असे होता कामा नये. आरक्षण दिल्यानंतर ते टिकले पाहिजे ही महाराष्ट्र शासनाची भूमिका आहे. म्हणून हा निर्णय 2014 च्या निवडणुकीपूर्वी झाला पाहिजे अशी भूमिका घेऊ नये.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीर्षकासाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

आमची ही भूमिका आहे. प्रोलॉंग करण्याची भूमिका नाही. आम्हाला हीच भीती आहे की, आरक्षण दिले तर ते टिकले पाहिजे. केवळ रेकॉर्डसाठी दिले असे होता कामा नये. माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत मी हेच सांगितले की, राजकारणासाठी राजकारण करायचे नाही. मराठा समाजात जो गरीब आहे त्याला न्याय द्यावा ही भूमिका आहे. त्या दृष्टीने आमचा प्रयत्न सुरु आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मुद्दा मांडला की, माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांची समिती का नेमली? सुप्रीम कोर्ट असे म्हणते की, तुम्ही जी भूमिका मांडाल त्या संदर्भात सर्वकष डाटा गोळा करावा. खरोखरच गरज आहे, 50 टक्क्याच्या वर आरक्षण द्यायचे असेल, राज्यात तेवढी संख्या असेल, आर्थिकदृष्टया व शैक्षणिकदृष्टया मागासलेपणा आहे हे पटवून देण्यासाठी ही भूमिका घेतली आहे.

श्री.दिवाकर रावते : माननीय उद्योगमंत्री यांची समिती सुप्रीम कोर्टाला भूमिका पटवून देण्यासाठी नेमली आहे का?

श्री.शिवाजीराव मोघे : आपण ही भूमिका घेतली ज्यायोगे आपण हे काम मजबुतीने करीत आहोत हे दाखविण्यासाठी सपोर्टिंग डाटा निर्माण झाला पाहिजे. आयोग सर्वांशी संपर्क साधेल असे नाही. या ठिकाणी असे म्हटले आहे की, विषयाच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना यांच्याबरोबर चर्चा करतील, राज्यातील मराठा समाजाची लोकसंख्या, त्या समाजाची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थिती याबाबत चर्चा करतील. या विषयाबाबत जो उपलब्ध शासकीय दस्तऐवज आहे.....

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सरकारच्या उत्तराला माझा आक्षेप आहे. शासन कमिट करीत आहे की तपासणी करीत आहे हे मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे. कमिट करीत असाल तर तपासणी बंद करावी, उद्योगमंत्र्यांची समिती बरखास्त करावी. अन्यथा तपासणी करतो असे सांगावे.

श्री.शिवाजीराव मोघे : सन्माननीय सदस्यांची शंका रास्त आहे. आयोगाचा अहवाल येणे आणि उद्योगमंत्री यांच्या समितीचा अहवाल येणे, त्यानंतर आरक्षण दिले तर ते टिकले पाहिजे. केवळ राजकारणातून आरक्षण दिले असे होऊ नये ही शासनाची भूमिका आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, विषयाला वेगळे वळण लागत आहे. आदेशात स्पष्ट म्हटले आहे की, लोकप्रतिनिधी आणि संघटना यांच्याबरोबर ते चर्चा करतील. शासनाला समिती नेमण्याचा पूर्ण अधिकार आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : समितीचे सर्वंकष डाटा गोळा करणे हे प्रमुख काम आहे. त्या अनुषंगाने सर्वंकष डाटा आल्यानंतर शासन निश्चितपणे आरक्षण देऊ शकते. फक्त मराठा समाजाला नव्हे तर ज्यांची कोणाची मागणी असेल त्यासाठी हे होईल. माननीय उद्योगमंत्र्यांच्या समितीने मराठा समाजाबद्दल डाटा गोळा करणे हे त्यांचे काम आहे. त्यानंतर शासन निर्णय घेऊ शकते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहात आम्हाला अपेक्षित असलेलेच उत्तर शासनाकडून दिले गेले पाहिजे असे बंधनकारक करता येणार नाही.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

नंतर 4के.1..

अशुद्धीत प्रत / परिशुद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडला आहे त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सुप्रीम कोर्टाचा उल्लेख या ठिकाणी वारंवार केला असून तो बरोबर आहे. सुप्रीम कोर्टाने किंवा कॉन्स्टीटयूशनने आरक्षण 50 टक्क्यापर्यंतच राहिले पाहिजे असे काही म्हटलेले नाही. इंद्रा सहानी केसमध्ये 50 टक्के आरक्षणाचा विषय आहे परंतु सन 2010 मध्ये सुप्रीम कोर्टाने म्हटले होते की, कॉन्टीफिकेशन करा, माहिती कलेक्ट करा आणि त्याच्याही पलिकडे जाऊन सुप्रीम कोर्टाने असे म्हटले होते की, "Reservation are more to achieve the equality of opportunity guaranteed under the Constitution." याचा अर्थ हा डाटा कलेक्ट करण्यासाठी समिती स्थापन होऊ शकते. त्यामुळे या समितीने अपॉर्च्यूनिटी कलेक्ट करण्यासाठी डाटा कलेक्ट करावा आणि तो तातडीने द्यावा.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सभागृहाचा मी जास्त वेळ घेणार नाही. या समितीचे एक महत्वाचे काम असे आहे की, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय आयोगाचा यासंदर्भात जो रिपोर्ट येणार आहे त्याचा सुध्दा या समितीला अभ्यास करावा लागणार आहे. नंतर हा विषय सबकॅबिनेट पुढे जाऊन नंतर कॅबिनेट पुढे जाईल. त्यामुळे या प्रकरणाचा समितीने अभ्यास करावा हा महत्वाचा उद्देश आहे. जो जो समाज यामध्ये बसेल त्याचा या समितीला अभ्यास करावा लागणार आहे. आजही आयोगाकडून आपल्याकडे अनेक शिफारसी आलेल्या असून त्याचा सुध्दा अभ्यास सुरु आहे. या ठिकाणी केवळ मराठा समाजाचा पर्टीक्युलर उल्लेख केल्यामुळे मी उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

धन्यवाद.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : या विषयावरील चर्चा संपली आहे. नियम 97 अन्वये वरील चर्चेला राईट टू रिप्लाय नसतो. नियम 97 अन्वये वरील मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणानंतर ही चर्चा संपते असा नियम आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय,या चर्चेच्या दरम्यान मी जे स्पेसिफिकेशन दिले होते त्याचा उल्लेख माननीय मंत्री महोदयांच्या भाषणात आला नाही. मागासवर्गीय आयोगाचा तीन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ...

वर्षाचा कार्यकाल एवढेच करावयाचे आहे. आयोगावरील चार लोकांचा कार्यकाल संपून गेलेला असतांना त्यासंदर्भात एक अवाक्षर सुध्दा काढले जात नाही. या आयोगावरील ही माणसे जोपर्यंत बदलली जात नाहीत तोपर्यंत रिपोर्ट शक्य होणार नाही.

श्री. नरेंद्र पाटील :सभापती महोदय, मी जे काही विचार मांडले होते त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरात खुलासा झालेला नाही त्यामुळे माननीय खुलासा करावा अशी विनंती आहे. मला सन्माननीय सभागृहाला विनंती आहे की, या विषयाच्या संदर्भात कोणीही गैरसमज करुन घेऊ नये. आम्ही सर्व समाजाच्या संदर्भात मागणी करीत असून निवडणुका पुढे लागणार आहेत म्हणून आम्ही मोर्चा काढून मागणी करीत आहोत असे मानण्याचे काहीही कारण नाही.

सभापती महोदय,ग्रामपंचायतीमध्ये आरक्षण असते, जिल्हा परिषदेमध्ये आरक्षण असते,पंचायत समितीमध्ये आरक्षण असते. शिक्षण क्षेत्रामध्येही आरक्षणाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सर्व क्षेत्रामध्ये मराठा समाजाला न्याय मिळावा अशी या माध्यमातून विनंती आहे.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : ही चर्चा आता संपलेली आहे. आता विधेयक चर्चेला घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनवर्सन(सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XIII OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PROJECT AFFECTED PERSONS REHABILITATION ACT, 1999.)
AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE THEREON.

श्री. प्रकाश सोळंके : (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्या प्रमाणे सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 13 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 13 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महिलांच्या दृष्टीने हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. हिंदू वारसा अधिनियम 1994 मध्ये दुरुस्ती करण्यात आली व त्या दुरुस्तीनंतर वडिलोपार्जित मिळकतीमध्ये बहिणींना हक्क देण्यात आले.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके....

त्यानंतर वडिलोपार्जित मिळकतीवर बहिणींना हक्क देण्यात आले. मात्र, महाराष्ट्र प्रकल्बाधित व्यक्तींचे पुनवर्सन अधिनियम 1999 मधील कलमांमध्ये जे काही स्पष्टीकरण देण्यात आले आहे त्यामध्ये अशा प्रकारची तरतूद झाली नाही. त्यामुळे वडिलोपार्जित मिळकतीपासून पुनर्वसनांतर्गत मिळणाऱ्या सुविधांपासून वंचित रहावे लागते अशी स्थिती आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनवर्सन अधिनियम 1999 मधील कलम 2 (अ) खालील स्पष्टीकरणामध्ये प्रत्येक भावाला या मजकूरा नंतर तसेच बहिणाला या शब्दाचा अंतर्भाव करण्यात यावा व स्पष्टीकरणातील कंसातील मृत भावाच्या शब्दापुढे किंवा बहिणीचा हा शब्द अंतर्भूत करावा आणि मृत विवाहित बहिणीचा मुलगा आणि मुलगी यांचा संयुक्त एक युनिटमध्ये समावेश करावा अशी दुरूस्ती करणे आवश्यक होती. त्या दुरूस्तीसाठी शासनाच्या वतीने हे विधेयक सभागृहापुढे आलेले आहे. महिलांना, मुलींना, बहिणींना वडिलांच्या प्रापर्टीमधील पुनर्वसनासंबंधातील लाभ मिळणे शक्य होणार आहे. अशा प्रकारे एक चांगले विधेयक मांडण्याची मी संधी घेत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांचा आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

तालिका सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचा आहे. त्यांनी तो मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव मांडते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव या दोन्हींवर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर माननीय मंत्र्यांचे भाषण झाल्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल. तो असंमत झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी भाषणास सुरूवात करावी.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मी मांडलेला आहे. तो प्रस्ताव मांडण्या मागील माझे विवेचन मी थोडक्यात करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय महसूल राज्यमंत्री यांनी 1994 चा उल्लेख केला आहे. 1994 च्या महिला धोरणा नुसार आपण महिलांना सांपत्तिक अधिकार प्रदान केला असे आपण मानतो. 1994 मध्ये महिला धोरण जाहीर करण्यात आले होते तेव्हा व विद्यमान महिला धोरणामध्ये आम्ही आमचे मत मांडले होते. हिंदू संयुक्त कुटुंबामध्ये परंपरागत वारसा मिळतो. आपण मुलींना वाटा दिलेला आहे असे म्हणत असलो तरी प्रत्यक्षात आढावा घेतला तर बहुतेक ठिकाणी आपल्याला असे दिसते की, मुलींचा त्या संपत्तीमध्ये वाटा नाही अशा प्रकारचे लिहून घेतले जाते. किंबहुना 7/12 च्या उताऱ्यावर मुलींची मग ती विवाहित असेल तर पतीकडून प्रॉपर्टी मिळणार म्हणून माहेरचा वाटा गेला असे आपण गृहीत धरतो. परंतु, अविवाहित, विधवा, परितक्त्या, अशा महिला एकत्रित कुटुंबात असतील तर त्यांना कोणताही वाटा मिळत नसल्याची आम्ही स्वत: उदाहरणे पाहिली आहेत. एवढेच कशाला साखर कारखान्याच्या शेअर्सचा मुद्दा आला की, जीवंत असलेली मुलगी जीवंतच नाही असे दाखविले जाते. यासंबंधी अनेक मोहिमा घेतल्या गेल्या. 7/12 च्या उताऱ्यावर मुलींची नावे लावण्यासंबंधी सरकारने काय पावले उचलली आहेत? यासंबंधी आपल्याला अजूनही असे चित्र दिसते की, घराघरामध्ये भांडणे होतील, वादविवाद होतील या कारणासाठी मुलींचे नाव त्या शेतजमिनीवरील वाट्यांमध्ये लावले जात नाही.

दुसरे असे की, पतीच्या प्रॉपर्टीमध्ये तिचा वाटा असला पाहिजे असे आपण म्हणतो. पण 7/12 उताऱ्यावर तिचे नाव नसल्यामुळे तिला कोणताही फायदा होत नाही. जेव्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात तेव्हा दुर्दैवाने ती पत्नी या कुटुंबामध्ये होती का नव्हती, नुकतेच लग्न झाले होते, अशी कारणे दाखवून तिला पतीच्या संपत्तीतून निष्कासित केले जाते. अशी हजारो उदाहरणे यवतमाळ जिल्ह्यासह अनेक जिल्ह्यांमध्ये पहायला मिळत आहेत. त्यामुळे स्त्रियांना जमिनीचा वाटा मिळावा यासाठीच श्री.शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून लक्ष्मी मुक्ती आणि सीता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

शेती यासारखी आंदोलने मोठ्या प्रमाणावर केली होती. आपण हा कायदा करीत आहोत ही चांगली गोष्ट आहे. त्या कायद्याला विरोध नाही. मी तर असे म्हणेन की, वायू, जल, जमीन, दळणवळण, अशा प्रकारे व्यक्तींचे अधिकार बाधित होत असतात. त्यासंबंधातील अनेक उदाहरणे आहेत. त्यातील एक पुणे जिल्ह्यातील मावळ येथील डाऊ चे उदाहरण आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भोपाळ सारखे उदाहरण आहे, ज्याच्यामध्ये प्रकल्पबाधित लोकांना त्यांचा अधिकारच मिळाला नाही, त्यांचा जगण्याचा अधिकारच काढून घेतला गेला आणि आजही त्यांचे पूर्णपणे पुनर्वसन होऊ शकत नाही.

सभापती महोदय, तिसरे आणि चौथे उदाहरण मी देऊ इच्छिते आणि ते म्हणजे सिडको आणि पिंपरी-चिंचवडचे निगडी प्राधिकरण. तेथे वेगवेगळ्या कारणामुळे प्रकल्प येणार आहेत या कारणामुळे किंवा सरकारी कामांसाठी जमिनी ताब्यात घेण्यात आल्या. परंतु या प्रकल्पबाधित लोकांचे आजही पुनर्वसन झालेले नाही.यासंदर्भात आज आपल्याला कायद्याच्या अंमलबजावणीबाबत त्रुटी असल्याचे दिसत आहे. तसेच याठिकाणी असे म्हटलेले आहे की, "मृत बहिणीचे मुलगे व मुली, मृत भावाच्या मुली" पण जर मृत बहीण विवाहित असेल तर त्यांच्या मुला-मुलींची नावे समाविष्ट करण्यासाठी आधी बहिणींची नावे सातबारा वर लावावे लागते आणि जर त्यांची नावे सातबारा वर नसतील तर काय करणार? सध्या आपल्याकडील कुटुंब अ-विभक्त आहेत. त्यामुळे सातबारा वर वडिलांचे, आजोबांचे नाव असते. घरातील मुलांचीही नावे नसतात. कारण खातेफोड झाली तर शेती किफायतशीर होत नाही या कारणाखाली अजूनही अनेक कुटुंबांमध्ये खाते फोड केलेली नाही. या माध्यमातून मला सरकारला असे सुचवावयाचे आहे की, 1975 सालापासून सातत्याने सांगितले जात आहे की, जमीन विषयक कायद्यांमध्ये सुधारणा झाल्या पाहिजेत. या सुधारणा होत असताना कुटुंब संस्थांनां काय मान्य होईल याचा विचार करण्यात यावा. 1994 मध्ये जन्म झालेल्या मुलांना संपत्तीत वाटा देण्याच्या संदर्भातील विधेयक बहुमताला टाकले तर सदर विधेयक विधान सभा आणि विधान परिषदेमध्ये पराभूत झाले नसते असे मला वाटते.

सभापती महोदय, दुसरा प्रश्न आहे पण आम्हाला माहिती आहे आणि त्यावेळी माननीय मंत्री श्री.प्रकाश सोळंकेजी आपण येथे नव्हता. त्यावेळी ज्या चर्चा झाल्या, त्या आम्हाला माहिती आहेत. म्हणून आमचे म्हणणे असे आहे की, ज्यावेळी तुम्ही विधेयके आणता तेव्हा हिंदू अ-विभक्त कुटुंबातील मुलींना काय अधिकार असणार आणि ज्या विवाहित मुली आहेत, त्यांचा पतीच्या संपत्ती मध्ये काय अधिकार असणार या दोन्ही कायद्यांमध्ये संशोधन झाल्याशिवाय जर तुम्ही अर्धे-अर्धे टप्पे केले तर त्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणीच होत नाही ही यातील खरी परिस्थिती आणि प्रॉब्लेम आहे.म्हणून मी सदरहू विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे असे सांगितले जेणेकरुन ...

. .. .4 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . ..

कुठे ना कुठेतरी याबाबत चर्चा होईल. लॉ-कमिशनने अनेक अहवाल दिलेले आहेत. ज्यावेळेला वर्मा समितीची चर्चा झाली तेव्हा त्याच शिफारशी 1987 सालापासून प्रलंबित राहिल्या. तसेच मुलींना संपत्तीत अधिकार देण्याच्या संबंधात लॉ-कमिशनने केलेल्या ज्या शिफारशी आहेत. त्याच्यावर एकूण संशोधन, एकूण बदल आणि त्याबद्दलची आपली भूमिका स्पष्ट झाली पाहिजे अन्यथा कागदोपत्री फार चांगल्या वाटणाऱ्या शिफारशींची अंमलबजावणी होत नाही हा खरा प्रश्न आहे. धन्यवाद.

---

4 एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सदर बिलाबद्दल सन्माननीय सदस्या डॉ.नीलम ताई यांनी आपले मत मांडलेले आहे. त्यांनी प्रॅक्टीकल अडचणीतील गोष्टी मांडल्या आहेत त्या सत्य असतीलही. पण माझी सन्माननीय सदस्य डॉ.नीलमताई गोऱ्हे आणि सदनातील सन्माननीय सदस्यांना विनंती राहील की, हे विधेयक आपण तातडीने मंजूर करावे. याबाबतीत सदरहू विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविण्याचा आग्रह धरणे सोयीचे नाही असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्यांचे मत योग्य आहे असे मी म्हटले आहे. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या अडचणी प्रॅक्टीकल असल्या तरी प्रत्यक्षात ऑब्जेक्शन व रिजन्स् मध्ये परिस्थिती स्पष्टपणे नमूद केलेली आहे, ती अशी की, ॲफेक्टेड पर्सनच्या डेफीनेशन मध्ये ज्या लोकांच्या जागा जातात त्याच्यामध्ये एक युनिट मानले तर त्या जागेचा मोबदला किंवा पर्यायी व्यवस्था ही त्या जागेतील कर्त्या पुरुषाला मिळते. घरामध्ये कधीपर्यंत कर्ता पुरुष असतो हिंदू सक्सेशन ॲक्टमध्ये बदल करण्यात आला नव्हता तोपर्यंत. हिंदू सक्सेशन ॲक्टमध्ये जॉईंट फॅमिलीच्या अनुषंगाने 2005 साली बदल झाला. त्यानंतर त्या घरातील जी मुलगी असेल मग ती लग्न झालेली आणि दुर्दैवाने मरण पावली असेल तर तिची मुले देखील यामध्ये येऊ शकतात म्हणजे त्याची व्याप्ती वाढली. सन्माननीय सदस्यांनी ज्या प्रॅक्टीकल अडचणी मांडल्या, त्या खऱ्या आहेत. पण समजा दोन भाऊ आणि एक बहिण असेल आणि जर ती बहीण दुर्दैवाने मरण पावली असेल तर तिच्या मुलांना सुध्दा अधिकार मिळू शकतो असा बदल 2005 मध्ये हिंदू सक्सेशन ॲक्टखाली झाला. त्यामुळे 2005 साली झालेला बदल तुम्ही आता 2013 साली आणला आहे. हिंदू सक्सेशन ॲक्टमध्ये अगदी तारखेनुसार सांगावयाचे तर 9 सप्टेंबर 2005 मध्ये केंद्र शासनाने नोटीफीकेशन इश्यु केले आणि को-पार्सनर म्हणजे कोण तर ती मुलगी आणि मुलगीचे डिसीस्ट आणि तसे नसेल तर तिची मुले ही बाब केंद्रीय कायद्यानुसार त्यांनी मान्य केली.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / शोधनेसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

आपण या कायद्यामध्ये त्याप्रमाणे बदल घडवू इच्छित आहात. माझे असे म्हणणे आहे की, जेन्डर डिस्क्रीमिनेशन काढण्यासंबंधीची तरतूद हिंदू सक्सेशन ॲक्टच्या कलम सहामध्ये आहे. त्या शिवाय दिनांक 15 एप्रिल 2009 रोजीचे शेखर विरुध्द गीता या केसचे देखील जजमेंट आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की, 2005 मध्ये केलेल्या बदलाची अंमलबजावणी आपण 2013 मध्ये करीत आहोत. दरम्यानच्या काळात आठ वर्षे गेली आहेत. या आठ वर्षाच्या कालावधीत अनेक महिलांचा हक्क गेलेला आहे किंवा तो जाऊ शकतो. आपण अजून उशीर केला तर रोज एका महिलेला या अधिकारापासून वंचित रहावे लागेल.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी व्हॅट विधेयक मंजूर केले. आपण मला या विधेयकावर बोलू दिले नाही. आपण ते विधेयक पूर्वलक्षी प्रभावाने लागू केले. मागील अधिवेशनात मुंबईचे आयुक्त श्री.अरुप पटनाईक यांची बदली करण्यात आली. त्यांनी पोस्टींगच्या अगोदर केलेले काम पूर्वलक्षी प्रभावाने मान्य करण्यात आले.

सभापती महोदय, सन 2005 मध्ये हिंदू सक्सेशन ॲक्टमध्ये बदल करण्यात आला. त्याचे फायदे मुलींना व महिलांना 2013 मध्ये मिळणार आहेत. तेव्हा माझी विनंती आहे की, आपण हा कायदा सुध्दा पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावा.

सभापती महोदय, सेक्शन 2 (ii) मध्ये म्हटले आहे की, "for the words "son or sons of any deceased brother all together as one unit" the words "son or sons or daughter or daughters of each deceased brother or deceased sister as one separate unit of such brother or sister" shall be substituted. Here it should be added "retrospectively from 2005 or from when the Hindu Succession Act amendment has been passed." असे केल्यामुळे 2005 ते 2013 या आठ वर्षाच्या कालावधीमध्ये हक्कापासून वंचित राहिलेल्या मुलींना आणि महिलांना त्याचा फायदा होईल. तेव्हा हा कायदा पूर्वलक्षी प्रभावाने व लवकर मंजूर करावा अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यात आलेले आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश आणि कारणे यामध्ये नमूद केलेले आहे की, "राज्यातील सिंचन प्रकल्प, विद्युत प्रकल्प, लोकोपयोगी प्रकल्प,उद्योग प्रकल्प इत्यादी सारख्या विवक्षित प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन करण्याची तरतूद आहे." राज्यामध्ये एकूण किती सिंचन प्रकल्प आहेत याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. या सिंचन प्रकल्पामुळे बाधित झालेले किती वारसदार आहेत त्याची यादी देखील माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. या विधेयकाची व्याप्ती खूप मोठी आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

या विधेयकावर दोन-चार मिनिटांत बोलून हे विधेयक संमत करावे, इतके हे छोटे विधेयक नाही.

महोदय, राज्यात जे सिंचन प्रकल्प घेतलेले आहेत त्यातील अनेक प्रकल्प प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन होऊ न शकल्यामुळे पूर्णत्वास येऊ शकलेले नाहीत. कुटुंबातील आपसातील भांडणामुळे प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन होऊ शकलेले नाही. कोकणात कुटुंबे विभक्त झाल्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपल्या जमिनीची वेगवेगळी वाटणी करुन घेतली आहे. कोकणात एक गुंठा जमीन 14-14 लोकांच्या नावावर आहे. महोदय, आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी म्हणून आम्ही माननीय मंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली. नुकसान भरपाईचे पैसे मिळाले. परंतु त्यातील 20 लाख रुपये वाटपाविना पडून आहेत. मी ही बाब जबाबदारीने सांगत आहे. आपण ती तपासून पहावी. कारण पैसे घेण्यासाठी लोकच येत नाहीत. उदाहरणार्थ 500 रुपयांचा चेक असेल आणि 20 हिस्सेकरी असतील तर त्यांचे पैसे प्रवासातच जातील. महोदय, अशा प्रकारचे विधेयक आणले तर उद्योग, सिंचन इ. प्रकल्प कधीच पूर्ण होऊ शकणार नाहीत अशी आम्हाला भीती आहे.

सभापती महोदय, एका कुटुंबात पाच भाऊ आणि एक बहीण असेल आणि तिचे लग्न झाल्यानंतर ती दुसऱ्या कुटुंबात गेल्यानंतर ती हिस्सेदार असली तरी ती आमची बहीण असल्यामुळे तिला हिस्सा दिलाच पाहिजे. यात दुमत नाही. परंतु ती बहीण मयत झाल्यानंतर तिच्या मुला-मुलींना या विधेयकाच्या माध्यमातून हिस्सा दिला जाणार आहे. ही बाब कोणत्या नियमात बसते ? मुळात बहिणीचा हिस्सा तिच्या सासरच्या घरी आहेच. मग तिच्या पश्चात तिच्या मुलांना का म्हणून हिस्सा द्यावा ? मला वाटते अशा तरतुदींमुळे विधेयकाची अंमलबजावणी होऊ शकणार नाही. महोदय, कोकणातील प्रकल्प पूर्ण करावयाचे असल्यामुळे वारसदार दुसऱ्या राज्यात असले तरी त्यांच्याकडे जाऊन त्यांची सही आणली जाते. त्यामुळे आपण म्हणता तेवढे हे विधेयक सोपे नाही.

महोदय, जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्पाच्या बाबतीत शासन काय करणार आहे ? कारण या विधेयकात विद्युत प्रकल्पांचा सुध्दा समावेश केला आहे. जैतापूर प्रकल्पासाठी जी जमीन संपादित केली आहे त्यामुळे शेकडो शेतकरी भूमिहीन होत आहेत. शेतकऱ्यांना मुळासह उखडून टाकायचे आणि नंतर त्यांना सांगायचे की आम्ही तुमचा विकास करणार आहोत. मुळात या प्रकल्पाला त्या भागातील जनतेचा विरोध असताना सुध्दा या सरकारकडून सांगितले जाते की, कोणत्याही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

परिस्थितीत जैतापूर प्रकल्प करणाच आहोत. महोदय, हे सरकार शेतकऱ्यांवर गोळ्या घालण्याशिवाय दुसरे काय करणार आहे ? माननीय श्री.अजितदादा यांच्यामध्ये जेवढी ताकद, हिंमत, पाणी आहे तेवढ्या गोळ्या त्यांनी आमच्या छातीवर घालाव्यात. आम्ही कोणत्याही परिस्थितीत कोकणात अणु ऊर्जा प्रकल्प होऊ देणार नाही हे या सभागृहात सांगतो.

महोदय, या विधेयकात विद्युत प्रकल्पाच्या पुनर्वसनाबाबतचा उल्लेख आहे. कोकणातील जे मच्छीमार आहेत, मुस्लिम मच्छीमार आहेत, भूमिहीन आहेत ते या विधेयकाशी संबंधित आहेत. महोदय, मी विधेयकाच्या बाहेर जाऊन बोलणार नाही. माननीय श्री.अजितदादा या ठिकाणी आले नसते तर मी या बाबी बोललो नसतो. सुदैवाने ते या ठिकाणी आले आहेत. इतकी चांगली संधी मिळालेली असताना ती कोण सोडणार ? कोणत्याही परिस्थितीत जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्प करणारच अशी माननीय श्री.अजितदादांची भाषा आहे. माननीय श्री.अजितदादा तुमच्यामध्ये पाणी असेल तर आमच्यात किती पाणी आहे हे सुध्दा बघू.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

सभापती महोदय, जैतापूरमध्ये आपण नेमके काय करणार आहात ? त्या ठिकाणी एकाला गोळ्या घातल्या. त्याला 2 लाख रुपये सुध्दा दिले नाहीत. जैतापूरच्या विद्युत प्रकल्पामध्ये शासन नेमके काय करणार आहे ? मी माननीय मंत्री श्री. प्रकाश सोळंके यांना सांगू इच्छितो की, हे बिल सहज सोपे नाही. बहिणीपर्यंत हिस्सा देणे ठीक आहे. ते आपण ठेवावे पण यामध्ये बहिणीच्या मुलांचा समावेश केला तर ते शक्य होणार नाही. कारण त्यांना तिकडचा हिस्सा मिळणारच आहे. समजा अजितदादा यांना बहीण असेल तर त्यांनी तिला हिस्सा दिला पाहिजे. पण बहिणीचे लग्न होऊन ती सासरी गेल्यानंतर तिची जी मुले असतील त्यांना ते हिस्सा देतील का ? कदाचित जास्त पैसे असल्यामुळे अजितदादा मन मोठे करुन हिस्सा देतीलही. ज्या ठिकाणी बहिणीचे लग्न झाले असेल त्या ठिकाणी त्यांची प्रॉपर्टी असतेच. त्या बहिणीची जी मुले असतील त्यांना त्यांच्या वडिलांची, आजोबांची, पणजोबांची जी प्रापर्टी असेल त्यातून हिस्सा मिळेल.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये सिंचन प्रकल्प, लोकोपयोगी प्रकल्प उद्योग प्रकल्प यांचा उल्लेख आहे. सभापती महोदय, मी आपल्या शब्दाच्या बाहेर जाणार नाही. आपण भाषण संपवा म्हटले तर आम्हाला खाली बसावेच लागेल. माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, यामध्ये थोडासा बदल करावा. सिंचन प्रकल्पाबाबत, विद्युत प्रकल्पाबाबत एकदा धोरण निश्चित करुन घ्यावे. यापुढे कोणत्याही प्रकल्पामध्ये कोणत्याही शेतकऱ्याला भूमिहिन करणार नाही असे आश्वासन या सभागृहामध्ये द्यावे. या अगोदर विद्युत प्रकल्पाच्या बाबतीत या सभागृहामध्ये आमच्या नेत्यांनी आम्हाला आश्वासन दिले होते की, की ज्या बागायती जमिनी असतील त्या घेतल्या जाणार नाहीत. आता त्या ठिकाणी आपण सर्व बागायती जमिनी घेतलेल्या आहेत. जर आपण सभागृहातील आश्वासने पाळत नसाल तर तुमच्यावर कोण विश्वास ठेवणार ? माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, आपण थोडा विचार करा आणि जर आपल्या मनाला पटले तर या बिलामध्ये बदल करुन पुन्हा सभागृहासमोर बिल घेऊन यावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांच्या बाजूने लढणारा मी एक कार्यकर्ता आहे. या ठिकाणी या बिलाच्या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, आमच्या तालुक्यामध्ये खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणावर प्रश्न निर्माण झालेला आहे. याआधी प्रकल्पग्रस्ताचे सर्टिफिकेट ट्रान्सफर करण्याचा अधिकार होता. म्हणजे जयंत पाटलांचे सर्टिफिकेट अजित दादांना देऊ शकत होतो. त्याप्रमाणे लोकांनी सर्टिफिकेटस् दिले. लोकांनी हे सर्टिफिकेटस् विकत घेतले आणि त्याप्रमाणे त्यांना नोकऱ्या लागल्या. त्या ठिकाणी देशातील एकमेव प्रकल्प असा आहे की, ज्यामध्ये 100 टक्के प्रकल्पबाधित व्यक्तींना सेवेत घेण्यात आले. फक्त 140 प्रकल्पग्रस्त ज्यांनी सर्टिफिकेटस् विकत घेतले होते त्यांना नोकरीत घेता येत नाही म्हणून हा कायदा आला.

सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी आपले विचार मांडले. खरे म्हणजे त्यांना विस्तृत बोलण्याची संधी द्यावयास पाहिजे होती. कारण ते कायद्यानुसार व्यवस्थित बोलत होते. त्या ठिकाणी तांत्रिक मुद्दा असा आला की, ज्या 140 प्रकल्पग्रस्तांनी सर्टिफिकेटस् विकत घेतले

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

त्या लोकांसमोर हा नवीन कायदा आल्यामुळे प्रश्न निर्माण झालेला आहे. या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री व तत्कालीन केंद्रीय आरोग्य मंत्री श्री.अंतुले यांनी सुध्दा यासाठी जोरदार प्रयत्न केले होते. त्यानंतर मी सुध्दा या विषयाचा अभ्यास केला आहे. त्यानंतर मी संसदीय विनंती अर्ज समितीसमोर गेलो. त्या समितीने आमची साक्ष घेतली. त्या ठिकाणी मी माझ्या मोडक्या तोडक्या हिंदी भाषेत प्रकल्पग्रस्तांची बाजू मांडली होती. संसदीय विनंती अर्ज समितीने प्रकल्पग्रस्तांच्या बाजूने निर्णय दिला आहे. त्याप्रमाणे लेखी स्वरुपात आम्हाला कळविले. त्यानंतर तेथे एक वाद झाल्यावर त्याचे श्रेय मला मिळू नये यासाठी आमच्या मित्रांकडून प्रयत्न करण्यात आला.

त्यानंतर जिल्हा नियोजन समितीमध्ये सर्वपक्षीय बैठक घेण्याबाबत मी स्वत:च ठराव मांडला होता. त्यानुसार सह्याद्रीवर एक बैठक झाली. त्यावेळी आरसीएफच्या अधिकाऱ्यांना बोलविले होते. त्या कंपनीच्या सीएमडीने असे सांगितले की, डिसेंबर महिन्यापर्यंत प्रकल्पग्रस्तांची भरती करण्यात येईल. खासदार श्री.अनंत गिते यांनीही आपले मत व्यक्त केले होते. त्यानंतर दिनांक 31 डिसेंबर रोजी असे सांगितले की, या भरतीसाठी राज्य शासनाची परवानगी पाहिजे. पूर्वी असे सांगितले जात होते की, राज्य शासनाचा संबंध नाही, हा केंद्र सरकारचा प्रकल्प आहे. मी यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो. त्यांनी मुख्य सचिवांना सांगितले की, यांना शिफारशीचे पत्र द्यावे. गेल्या सहा महिन्यांपासून हे प्रकल्पग्रस्त लोक माझ्या नेतृत्वाखाली आरसीएफच्या गेटवर ठाण मांडून बसलेले आहेत. माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे. मी तेथे एक सभा घेणार आहे, 50 हजार लोक जमविणार आहे, त्यावेळी पोलीस बंदोबस्तावर शासनाचा खर्च होईल.

यातील मुख्य मुद्दा असा आहे की, आरसीएफमध्ये एका व्यक्तीला नोकरी मिळविण्यासाठी 30 लाख रुपये द्यावे लागतात. 140 लोकांना नोकरी दिली तर 330 लाख रुपयांना ते लोक मुकतील असे त्यांना वाटते. म्हणून आरसीएफचे अधिकारी हे होऊ नये म्हणून प्रयत्नशील आहेत. या देशामध्ये संसदेपेक्षा अधिकारी व कंपन्या मोठया आहेत काय ? सरकारचा अंगिकृत व्यवसाय असलेली ही कंपनी आहे. प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र दिल्यानंतरही त्यांना नोकरी.....

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

मिळत नाही. आज सुधारणा विधेयक आले असले तरी पूर्वीच्या कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत भविष्य काळात आपल्याला ॲलर्ट राहावे लागणार आहे. पीएपीचे दाखले मिळविताना कशी नोंदणी होत आहे हे देखील महत्वाचे आहे. जिल्हाधिकारी कचेरीतही घोटाळे होत आहेत. नोंदणी पारदर्शक कशी होईल हे पाहिले पाहिजे.

माननीय पुनर्वसन मंत्री महोदयांनी याबाबत लक्ष घालावे. ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांनी पैसे घेतले आहेत. विमानतळासाठी जमीन संपादित करीत असताना शासन वेगळे बोलत आहे. त्या लोकांना असे सांगितले जाते की, तुम्ही प्रमाणपत्र घेतले नाही, नोकरी घेतली नाही तर पैसे घ्यावे. नोकरी नको असेल तर पैसे घेण्यास भरीस घालत आहात. त्यामुळे या 140 प्रकल्पग्रस्तांना शासनाने न्याय द्यावा अशी त्यांना मी विनंती करतो आणि येथेच थांबतो.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपल्या देशात द्विभार्या प्रतिबंधक कायदा आहे. त्यामुळे एकाच पत्नीची मुले, भाऊ-बहीण अशा भावंडांचा विषय या ठिकाणी आलेला आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा मी येथे उल्लेख करु इच्छितो. सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिलेला आहे की, आपल्या देशामध्ये जरी द्विभार्या प्रतिबंधक कायदा असला तरी जर रखेल असेल आणि तिच्या पासून मुले जन्माला आलेली असतील तर त्यांना सुध्दा संपत्तीमध्ये अधिकार प्राप्त होतो. या विधेयकामध्ये हा संदर्भ आलेला नाही याकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधीत आहे. 2005मध्ये हिंदू कुटुंबाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिलेला आहे. रखेलीच्या मुलांना देखील संपत्तीमध्ये हक्क दिला असेल तर तशा प्रकारची तरतूद या विधेयकामध्ये असली पाहिजे. ही तरतूद पुढील अधिवेशनामध्ये शासन आणील का असा माझा प्रश्न आहे. अन्यथा हे विधेयक परिपूर्ण होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे हा कायदा करावा लागेल. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर टीका करता येते, न्यायालयावर टीका करता येत नाही. देशात द्विभार्या प्रतिबंधक कायदा असला तरी मानवतावादी दृष्टीकोन ठेवून त्यांनी चुका केल्या असल्या तरी त्यांच्या मुलांना संपत्तीमध्ये हक्क दिलेला आहे. तेव्हा हे विधेयक परिपूर्ण होण्यासाठी रखेलीपासून झालेल्या मुलांना देखील संपत्तीमध्ये हक्क मिळावा अशी सुधारणा मंत्री महोदय आणतील का एवढेच मला मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे.

--

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कु. राही सरनोबत हिचे उज्ज्वल यशाबद्दल अभिनंदन

मु.शी.: कु. राही सरनोबत हिचे उज्ज्वल यशाबद्दल अभिनंदन

यासंबधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस :येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

...नंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाच्या निर्णयाबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. परंतु पुरस्काराची रक्कम कधीपर्यंत दिली जाईल हे सभागृहाला कळले पाहिजे. कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणाऱ्या खेळाडूंना एक वर्षानंतर पुरस्काराची रक्कम देण्यात आली, याची आठवण करुन देतो.

श्री.पद्माकर वळवी : 15 दिवसाच्या आत 1 कोटी रुपयांचा पुरस्कार दिला जाईल.

श्री.दिवाकर रावते : मी या गोष्टीचे स्वागत करतो. खेळाडूंना अशाप्रकारे प्रोत्साहन दिले पाहिजे, याबद्दल वाद नाही. या निमित्ताने एक बाब निदर्शनास आणू इच्छितो, प्राणाची बाजी लावून आंतकवाद्यांविरुध्द लढणाऱ्या पोलिसांना पुरस्कार जाहीर केले जातात. आम्ही या ठिकाणी विचारणा करतो, खेळाडूंना पुरस्कार कधी देणार आहात? चांगल्या गोष्टी कधी अंमलात आणणार आहात? पोलिसांना जाहीर केलेले पुरस्कार वेळेवर दिले जात नाहीत. ते पुरस्कार सुध्दा वेळेवर द्यावेत. म्हणजे आपले प्राण पणाला लावून लढण्यास त्यांना बळ मिळेल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./ मु.शी. : श्रीमती इंदू सहानी यांनी मुंबईच्या नगरपाल पदाचा राजीनामा देऊनही सहा महिन्यानंतर त्या नगरपाल या नात्याने तत्कालीन मुख्यमंत्र्यांसमवेत कार्यक्रमास उपस्थित राहणे, निमंत्रण पत्रिकेत त्यांचे नगरपाल म्हणून नाव समाविष्ट असणे याबाबत ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 29 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-29.....

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, श्रीमती इंदू सहानी यांनी दिनांक 19.12.2009 रोजी आपल्या नगरपाल पदाचा त्याग केला.....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नियम 93 ची 36 निवेदने पटलावर ठेवण्यात आली होती. त्यामुळे आता चर्चा घेण्याचे प्रयोजन आम्हाला कळले पाहिजे.

सभापती : मघाशी नियम 93 ची 36 निवेदने पटलावर ठेवली गेली त्या वेळेला असे ठरले होते की, आज निवेदने पटलावर ठेवली जातील, त्यावर चर्चा होणार नाही. एखाद्या निवेदनामध्ये काही चुका आहेत असे आढळून आले आणि तसे निदर्शनास आणून दिले तर संबंधित मंत्री महोदयांना सभागृहात पाचारण केले जाईल आणि त्या निवेदनावर चर्चा घेण्यात येईल. त्या दृष्टीने शालेय शिक्षण राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत.

श्री.रामदास कदम : मी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेबाबतचे निवेदन काल सभागृहात चर्चेला आले होते, परंतु संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नव्हते. माननीय उप सभापतींनी उद्या निवेदन चर्चेला घेण्यात येईल असे जाहीर केले होते. सकाळपासून मी तीन वेळा चिठ्ठी पाठवून विनंती केली की, संबंधित मंत्री महोदयांना बोलावून घ्यावे आणि माझे निवेदन चर्चेला घेण्यात यावे.

सभापती : निवेदने वितरित केली त्याच वेळेला माझ्या निदर्शनास आणून दिले असते तर संबंधित मंत्री महोदयांना बोलावता आले असते. आता सायंकाळचे 6 वाजून 8 मिनिटे झाली आहेत.

श्री.रामदास कदम : दुपारी 12.00 वाजता मी माननीय उप सभापतींना चिठ्ठी पाठविली होती. तीन वेळा ही बाब लक्षात आणून दिली आहे.

सभापती : पुढील वेळी याकडे लक्ष दिले जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, वांद्रे येथील लिलावती रुग्णालयाबाबत गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. दोन ट्रस्टींमध्ये भांडणे सुरु आहेत. हे रुग्णालय विकून त्या ठिकाणी पंचतारांकित हॉटेल उभारण्याचा विचार सुरु आहे.

सभापती : मी स्वत: ते निवेदन पाहतो आणि त्याबाबत सरकारला काय ॲक्शन घेता येईल हे मी सरकारला कळवितो.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-29.....

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मी एक महत्वाची चूक आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. श्रीमती इंदू सहानी यांनी दिनांक 10.12.2009 रोजी नगरपाल पदाचा कार्यभार उप नगरपाल यांच्याकडे सोपविला होता. असे असताना दिनांक 31 जुलै व 1 ऑगस्ट, 2010 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री आणि मनुष्यबळ विकास मंत्री यांच्याबरोबर त्या कार्यक्रमास उपस्थित राहिल्या होत्या. त्याची सर्व कागदपत्रे मी आपल्याकडे पाठवितो. निमंत्रण पत्रिकेत त्यांचे नाव छापलेले आहे, कार्यक्रमाचे फोटो उपलब्ध आहेत. त्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या, भाषण केले. नगरपाल म्हणून त्यांचा उल्लेख आहे. दोन गोष्टी मी आपल्या निदर्शनास आणल्या आहेत. त्याची चौकशी किंवा शहानिशा मंत्री महोदयांनी केली तर बरे होईल. चुकीचे रेकार्डवर राहू नये म्हणून चौकशी करावी अशी विनंती करतो.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा आग्रह आहे की, याबाबत माहिती घेण्यात यावी, ते एक्झामिन करता येईल.

नंतर 4टी.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ....

याबाबतीत एक बाब मला लक्षात आणून द्यावयाची आहे की, या विषयासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात श्रीमती इंदू सहानी यांनी एक रीट पिटीशन फाईल केले होते त्यामध्ये शरीफ कोणते कोणते बेनिफिट घेणार नाहीत याची माहिती दिली होती व यासंदर्भात जी वेबसाईट होती ती आता बंद केली जात आहे व त्यांच्याकडून अनवधानाने काही चूक झाली असेल तर त्यांदर्भात योग्य ती कारवाई करतील. कोर्टाने ही केसे रद्द केली होती. कोर्टाने यामध्ये असे म्हटले होते की, "The learned counsel appearing on behalf of Respondent No.2 confirms that Respondent No.2 ceased to be the Sheriff of Mumbai with effect from 19.12.2009. He states that thereafter she has not discharged any functions as the Sheriff of Mumbai. He further states that Respondent No.2 will not, in any manner whatsoever, hold herself out to be the Sheriff of Mumbai. The website, he states inadvertently remained to be deleted immediately upon her ceasing to be the Sheriff of Mumbai. It has now been deleted. He further states that if there is any other material which indicates that she continues to be the Sheriff of Mumbai, the Petitioner may inform Respondent No.2 of the same and Respondent No.2 will forthwith take steps to remedy the situation. The statements are accepted. The writ petition, is accordingly, disposed of."

सभापती महोदय, कोर्टाने ही केस रद्दबातल केली असून यासंदर्भातील माहिती विभागाकडून घेण्यात येईल एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छिते.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, चोकशी करण्यात यावी असे यामध्ये म्हटले होते. परंतु आता ते म्हणतात की, माहिती घेऊ. यासंदर्भातील पुरावे सुध्दा माझ्याकडे उपलब्ध आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांबरोबरचे फोटो सुध्दा माझ्याकडे आहेत. या प्रकरणात कोर्टाने आदेश दिल्यानंतरही .....

The Chairman: Madam, you better examine.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनवर्सन(सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XIII OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PROJECT AFFECTED PERSONS REHABILITATION ACT, 1999.)
AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE THEREON.

(चर्चा पुढे सुरु...

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत.

विधेयकाच्या अधिनियमातील खंड (2) मध्ये "एखाद्या भोगवटदाराची प्रकल्पबाधित परिपंडळातील जमीन, गावठाणातील जमीन धरुन संपादित करण्यात आलेली आहे" अशी भोगवटदार व्यक्तीची व्याख्या करण्यात आलेली आहे. यासंदर्भात जे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे त्यामध्ये "एखाद्या शेतजमिनीच्या संदर्भात गावच्या अभिलेख्यातील नोंद अविभक्त हिंदू कुटुंबातील कर्ता पुरुष अथवा व्यवस्थापक म्हणून कोणत्याही एक भावाच्या नावाने असेल, तेथे प्रत्येक भावाला किंवा मृत भावाचा मुलगा अथवा मुलगे यांना संयुक्तपणे एक युनीट म्हणून त्या जमिनीत हिस्सा राहील मग त्याचे नाव अशा गावाच्या अभिलेख्यात नोंदलेले असो वा नसो व त्यास प्रकल्पबाधित व्यक्ती म्हणून मानण्यात येईल व तो उक्त अधिनियमान्वये लाभ घेण्यास हक्कदार राहील" असे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रकल्पबाधित व्यक्तींचा लाभ देण्याची बाब असते त्यावेळेस युनीट म्हणून मानले जाते व त्यापैकी एकाला तो देण्यात आलेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम साहेबांनी जी काही भीती व्यक्त केली ती यामध्ये लागू होत नाही. शेवटी युनीटची व्याप्ती जरी वाढवित असलो तरी सुध्दा यामध्ये प्रकल्पग्रस्तांना एकच दाखला मिळणार आहे व त्याचा उपयोग नोकरीसाठी करण्यात आलेला आहे. त्यामुळे या विधेयकाच्या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, हे विधेयक पास होऊन कार्यरत व्हावे यासाठी अनेक संघटनांनी मागणी केली होती. ज्या संघटना प्रामुख्याने प्रकल्पग्रस्तांसाठी काम करतात त्यांच्या मागणी प्रमाणे हे विधेयक या ठिकाणी आणले गेले आहे. या विधेयकाचे अनेकांनी स्वागतच केलेले आहे. त्यामुळे आपण सर्वांनी एकमताने हे विधेयक मान्य करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विधेयकावर चर्चा व्हावी यासाठी आम्ही आग्रह धरला होता. प्रत्यक्षात अंमलबजावणी करतांना यामध्ये अडचणी येत असतात. यासंदर्भात तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर जे लोक संघर्ष करीत असतात तसेच या विधेयकामध्ये आपण विवाहीत मुलींच्या संदर्भात विचार करतो आहोत.

यानंतर श्री. भारवि.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

अविवाहित खास करून परित्यक्ता असणाऱ्या भगिनी कुटुंबा बरोबर असतात त्यांचा अधिकार बऱ्याच वेळा नोंदविला जात नाही. या प्रकल्पबाधित कुटुंबांमध्ये असणाऱ्या अविवाहित आणि परित्यक्ता भगिनींसंबंधात सर्व महसूल स्तरावर मोहीम घेण्याचे आश्वासन दिले तर मी माझा प्रस्ताव मागे घेईन, असे मी नमूद करू इच्छिते.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जी अपेक्षा व्यक्त केली त्याबाबत महसूल विभागाकडून कारवाई करण्यात येईल. मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा विनंती करतो की, त्यांनी आपला प्रस्ताव मागे घ्यावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक आश्वासन दिल्यामुळे मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 वि.स.वि.क्रमांक 13 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 13 संमत झाले आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विधान परिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधान सभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधान मंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO.XIV OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL (CHAIRMAN AND DEPUTY CHAIRMAN) AND THE MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY (SPEAKER AND DEPUTY SPEAKER) SALARIES AND ALLOWANCES ACT, THE MAHARASHTRA MINISTERS' SALARIES AND ALLOWANCES ACT, THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' SALARIES AND ALLOWANCES ACT AND THE LEADERS OF OPPOSITION IN MAHARASHTRA LEGISLATURE SALARIES AND ALLOWANCES ACT, 1978.)

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 14 - महाराष्ट्र विधान परिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधान सभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते याबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, 1978 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 14 - महाराष्ट्र विधान परिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधान सभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते याबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, 1978 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : महाराष्ट्र विधान परिषद (सभापती व उप सभापती) आणि विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते,आणि महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते,महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधान मंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, 2013

L. A. BILL NO.XIV OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL (CHAIRMAN AND DEPUTY CHAIRMAN) AND THE MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY (SPEAKER AND DEPUTY SPEAKER) SALARIES AND ALLOWANCES ACT, THE MAHARASHTRA MINISTERS' SALARIES AND ALLOWANCES ACT, THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' SALARIES AND ALLOWANCES ACT AND THE LEADERS OF OPPOSITION IN MAHARASHTRA LEGISLATURE SALARIES AND ALLOWANCES ACT, 1978.)

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कामकाज मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि.क्रमाक 14- महाराष्ट्र विधान परिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, आणि महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते महाराष्ट्र राज्य विधान मंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, 2013 मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे चे वि.स.वि. क्रमांक - 14 महाराष्ट्र विधान परिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, आणि महाराष्ट्र मंत्र्यांचे वेन व भत्ते, महाराष्ट्र विधान मंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र राज्य विधान मंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, 2013 विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

4 व्ही-2 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे विधेयक संमत करण्यापूर्वी आपल्याकडे वेतन भत्त्याचा कायदा आहे. त्या कायद्यामध्ये मी आता व्यक्त केलेली जी सन्माननीय नावे आहेत म्हणजे माननीय अध्यक्ष, माननीय उपाध्यक्ष तसेच माननीय मंत्री महोदयांचे वेतन, विधीमंडळा सदस्यांचे वेतन व भत्ते,याचा अर्थ असा या विधेयकामध्ये आपण कोणत्याही प्रकारचे वेतन व भत्ते वाढविलेले नाहीत. केवळ हा कायद्याचा उल्लेख असल्यामुळे ही नावे वर आलेली आहेत. त्यामुळे उद्या असा गैरसमज होऊ नये की, या सर्वांचे वेतन व भत्ते वाढलेले आहेत.

उप सभापती : तसे होणार नाही कारण सर्व सन्माननीय सदस्यांनी हे विधेयक काळजीपूर्वक वाचलेले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, याबाबत विचारणा करण्यात आली होती. मला देखील काही लोकांनी विचारणा केली म्हणून विधान सभेमध्ये आणि याठिकाणी मी मुद्दाम बोललो आहे. फक्त आपण या विधेयकामध्ये कोणता निर्णय घेतला आहे तर या मध्ये आपल्याला पूर्वी प्रथम वर्गाने प्रवास करण्याची जी सवलत होती, त्याऐवजी आता ए.सी.-सेकंड मधून प्रवास करण्याची सवलत दिलेली आहे. नव्याने वेगळी वाढकरण्यात आलेली नाही. सभापती महोदय, दुसरी बाब म्हणजे यामध्ये विमानाच्या 32 सिंगल फेऱ्या समाविष्ट होत्या. त्यामध्ये कोणतीही वाढ केलेली नाही. याबाबत यापूर्वीच निर्णय केल्याप्रमाणे पती किंवा पत्नी यांना परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे आणि सन्माननीय सदस्यांचे जे पी.ए.आहेत त्यांच्यासाठी आठ हजार रुपयांच्या ऐवजी पंधरा हजार रुपयांची वाढ देण्याबाबत निर्णय करण्यात आलेला आहे आणि ही वाढ दि.1 एप्रिल 2013 पासून करण्यात यावी.

(सभापतीस्थानी - माननीय सभापती)

सभापती महोदय, मला दुसरी बाब सांगावयाची आहे की, वेतन व भत्त्याचा जो कायदा आहे, याच्या मध्ये काही बदल करण्याची आवश्यकता आहे आणि माननीय वित्त मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वेतन भत्ते व सुधार समिती आहे आणि त्यावेळी त्यामध्ये दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्य उपस्थित असतात. निमंत्रित म्हणून मी देखील त्या समितीचा एक सदस्य आहे. त्यामुळे याबाबतीत आपण एकत्र बसून मार्ग काढू.सदरहू विधेयक संमत करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

18-04-2013 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 4V-3

APR/ ST/ 18:20

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खंड 2 ते 10 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक - 14 संमत करण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 14 संमत झाले आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कामगार कायद्यात सुधारणा करण्यासाठी तदर्थ समिती नियुक्त करणे

मु.शी.: कामगार कायद्यात सुधारणा करण्यासाठी तदर्थ समिती नियुक्त करण्याबाबत कामगार राज्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे प्रस्ताव मांडतो :-

दिनांक 16 एप्रिल, 2013 रोजी कामगार विभागावर महाराष्ट्र विधान सभा नियम 293 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे व इतर विधान सभा सदस्य यांनी मांडलेल्या प्रस्तावरील चर्चेस उत्तर देताना दिलेल्या आश्वासनानुसार कामगार विभागाच्या संबंधित विविध कायद्यांचा अभ्यास करुन त्यामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी 11 विधानसभा सदस्य व 4 विधानपरिषद सदस्यांचा समावेश असलेली एकूण 15 सदस्यांची संयुक्त तदर्थ समिती गठीत करण्यात यावी.

सदर समितीच्या कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

(1) कामगार विभागाशी संबंधित राज्य शासनाच्या कायद्याचा अभ्यास करुन त्यामध्ये कामगार हीत लक्षात घेऊन दुरुस्त्या सुचविणे.

(2) कामगार विभागाशी संबंधित केंद्र शासनाच्या कायद्याचा अभ्यास करुन त्यामध्ये कामगार हीत लक्षात घेऊन दुरुस्त्याबाबत शिफारशी करणे.

(3) औद्योगिकीकरणात झालेली भरमसाठ वाढ व जागतिकीकरण या गोष्टींचा अभ्यास करुन औद्योगिक शांतता राहण्यासाठी नवीन कामगार कायदे करण्यासाठी योग्य शिफारशी करणे.

(4) सदर समिती 6 महिन्याच्या मुदतीत आपला अहवाल सभागृहास सादर करतील.

सदर समितीत दोन्ही सभागृहाचे एकूण 15 सदस्य असतील. या समितीचे समिती प्रमुख हे माननीय कामगार मंत्री असतील व माननीय कामगार राज्यमंत्री हे समितीचे सदस्य राहतील. समितीच्या 4 विधानपरिषद सदस्यांची नावे माननीय सभापती महोदय नामनियुक्तीने निश्चित करतील.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र विधान परिषद पहिले अधिवेशन, 2013 संबंधी आढावा

सभापती : अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजच्या दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 24

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 2 तास 45 मि.

गणपूर्ती नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 15 मि.

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 24 तास 40 मि.

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 163 तास

नियमाप्रमाणे अपेक्षित कामकाज - 168 तास

रोजचे सरासरी कामकाज 6 तास 50 मि.

तारांकित प्रश्न : एकूण - 4851, कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 4234

स्वीकृत प्रश्न 1823, सभागृहात तोंडी उत्तरीत झालेले तारांकित प्रश्न - 166,

उत्तरीत झालेला अल्पसूचना प्रश्न - 1.

नियम 93 एकूण सूचना - 232, स्वीकृत सूचनांची संख्या - 115, निवेदने झाली - 44,

पटलावर ठेवण्यात आलेली निवेदने - 41

औचित्याचे मुद्दे : 78 मांडण्यात आले.

लक्षवेधी सूचना : प्राप्त सूचना -1593, मान्य सूचना 523, चर्चा झालेल्या सूचना - 97.

विशेष उल्लेखाच्या : 150 सूचना मांडण्यात आल्या.

नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा : प्राप्त झाल्या 16, मान्य झाल्या 8, चर्चा झाल्या 5.

शासकीय विधेयके संमत : 10 (विधान परिषद 3 - विधान सभा 7)

नियम 260 अन्वये प्रस्ताव : 7 प्रस्तावावर चर्चा झाली.

अर्धा तास चर्चा : प्राप्त झाल्या 197, मान्य झाल्या 158, चर्चा झाली 11

अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

सभापती : मी खालील घोषणा करतो.

"राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 15 जुलै, 2013 रोजी, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे."

--

..4.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

सभापती : सभागृहापुढील कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढील प्रमाणे संदेश आला आहे.

"मी के. शंकरनारायणन् महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन याद्वारे गुरुवार, 18 एप्रिल, 2013 रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्ती बरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

(यानंतर राष्ट्रगीत झाले.)

(सायंकाळी 6.30 वाजता सत्र संस्थगित झाले.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही